# लेखा परीक्षण अहवाल

# सन २००५-०६

# भाग – १

## व

भाग – २

## : : अ नु क्र म णि का : :

## लेखा परीक्षण अहवाल: सन २००५-०६


**मुख्य लेखा परीक्षक यांचे लेखा परीक्षणाबाबत निवेदन:** (पृ.क्र.१ ते ४)

**भाग -१**

**(अ) विभागनिहाय लेखा परीक्षण तपशिल:**

| अ.क्र. | विभागाचे नांव | लेखा परीक्षणाअंतर्गत कालावधी | पृष्ठ क्रमांक |
|---|---|---|---|
| ०१ | लेखा विभाग | २००४-२००५ | ५ ते ३४ |
| ०२ | आरोग्य विभाग | २००३—०४ ते ०४-०५ | ३५ ते ४८ |
| ०३ | शिक्षण विभाग | २००३—०४ ते ०४-०५ | ४९ ते ६८ |
| ०४ | जनसंपर्क विभाग | २००३—०४ ते ०४-०५ | ६९ ते ७५ |
| ०५ | उद्यान विभाग | २००३—०४ ते ०४-०५ | ७६ ते ७९ |
| ०६ | मालमत्ता विभाग | २००२-०३ ते ०४-०५ | ८० ते १२५ |
| ०७ | वॉर्ड -ड | २००३—०४ ते ०४-०५ | १२६ ते १४१ |
| ०८ | अग्निशमन विभाग | २००४-२००५ | १४२ ते १४६ |
| ०९ | आस्थापना विभाग | २००५-२००६ | १४७ |
| | **भाग -२** | | |
| **ब )** | **विशेष तपासणी / लेखा परीक्षण तपशील:** | | |
| १० | प्रस्तावना भाग-२ | | १४८ |
| ११ | मा.महापौर यांच्या आदेशानुसार तपासणी : **मालमत्ता विभाग** | | १४९ |
| १२ | मा.सर्वसाधारण सभा आदेशानुसार तपासणी: **अग्निशमन विभाग** | | १५० ते १५३ |
| १३ | मा.स्थायी समिती सभा आदेशानुसार तपासणी : **नगररचना विभाग** | | १५४ ते १९२ |
| | मा.स्थायी समिती सभा आदेशानुसार तपासणी : **: जकात विभाग** | | १९३ ते १९९ |
| १४ | मा.आयुक्त यांचे सुचनेनुसार तपासणी: आस्थापना विभाग | | २०० ते २०४ |

जा.क्र./मनपा/मु.ले.प/२००६/
कार्यालय महानगरपालिका औरंगाबाद.
दिनांक : ०२/०९ /२००६.

प्रति,
**मा.सभापती,**
स्थायी समिती,
महानगरपालिका,औरंगाबाद.

विषय :- **सन २००५–०६ या आर्थिक वर्षातील कामकाजाबाबतचा अहवाल सादर करणे बाबत.**

**आदरणीय महोदय,**

मुंबई प्रांतिक महानगरपालिका अधिनियम १९४९ मधील कलम १०६ (३) अनुसार लेखापरीक्षण विभागाच्या कामकाज विषयक आणि हिशेब तपासणीबाबतचा सन २००५-०६ या आर्थिक वर्षासाठीचा अहवाल हा यासोबत सादर करण्यात येत आहे.

अ) अहवाल वर्षात लेखापरीक्षण विभागात खालीलप्रमाणे अधिकारी व कर्मचारी कार्यरत होते.

| **अ.क्र.** | **पदनाम** | **मंजूर पदे** | **कार्यरत कर्मचारी/ अधिकारी** | शेरा |
|---|---|---|---|---|
| १ | मुख्यलेखापरीक्षक | ०१ | ०१ | २२ जुलै २००५ रोजी शासनाकडून प्रतिनियुक्तीने नेमणूक. तत्पुर्वी रिक्त पदावर अतिरिक्त कार्यभार सोपविण्यात आलेला आहे. |
| २ | वरिष्ठ लेखापरीक्षक (कार्यालय अधिक्षक संवर्ग) | ०१ | -- | अहवाल वर्षात सदरचे पद रिक्त असल्यामुळे कनिष्ठ लेखापरीक्षक यांचेकडे अतिरिक्त कार्यभार सोपविण्यात आला आहे. |
| ३ | कनिष्ठ लेखापरीक्षक (वरिष्ठ लिपीक संवर्ग) | ०४ | ०२ | अहवाल वर्षात दोन पदावर कर्मचारी कार्यरत असून उर्वरीत दोन पदे रिक्त आहेत. कार्यरत कर्मचाऱ्यापैकी एक कर्मचारी हे माहे ऑगस्ट २००५ मध्ये बदलीने रूजू झालेले आहेत. |
| ४ | कनिष्ठ लिपीक | ०४ | ०६ | कार्यरत कर्मचाऱ्यापैकी दोन कर्मचारी हे माहे ऑगस्ट २००५ मध्ये बदलीने रूजू झालेले आहेत. |
| ५ | वाहन चालक | ०१ | ०१ | -- |

| | | | | |
|---|---|---|---|---|
| ६ | शिपाई | ०२ | ०२ | -- |
| | **एकूण** | १३ | १२ | |

वरील पदांवरील अधिकारी/ कर्मचाऱ्यां व्यतिरिक्त एक दैनिक वेतन कनिष्ठ लिपीक व दैनिक वेतन संगणक ऑपरेटर कार्यरत आहेत.

ब) सन २००५-२००६ या आर्थिक वर्षातील महानगरपालिकेचे निव्वळ उत्पन्न हे रू.२११.९७ कोटी (सुरूवातीची शिल्लक रक्कम रू.२.८० कोटी वगळून ) इतके असून खर्च रू.१६८.६३ कोटी इतका आहे. सदर वर्षात वेतन व भत्ते यावर रू.५१.९० कोटी खर्च झाला असून एकूण महसूली उत्पन्नाच्या प्रमाणात वेतन व भत्ते यावरील खर्चाची टक्केवारी ही २४.४९ टक्के इतकी आहे.

क)१. अहवाल वर्षात मुख्यलेखापरीक्षक,महानगरपालिका,औरंगाबाद या पदाचा पदभार हा दि.२२ जुलै २००५ रोजी मी स्विकारला आहे. मुख्यलेखापरीक्षक या पदाचा पदभार स्विकारल्यानंतर कामकाज पाहत असतांना विविध विभागांकडून वेतन निश्चिती पडताळणीस्तव सादर होणाऱ्या बहुतांश प्रकरणांमध्ये १९७६,१९८६ व १९९६ चे वेतन आयोगानुसार अनुज्ञेय सुधारीत वेतननिश्चिती बाबतची प्रकरणे ही कर्मचारी सेवानिवृत्त झाल्यानंतर पडताळणीस्तव सादर होत आहेत आणि त्यामुळे निवृत्त कर्मचाऱ्यांना सेवानिवृत्ती वेतनाचे लाभ हे विलंबाने प्रदान केले जातात असे निदर्शनास आल्याने भविष्यात वेतन निश्चितीच्या पडताळणीसाठीची प्रकरणे ही संबंधित कर्मचाऱ्याच्या सेवानिवृत्तीपूर्वी किमान एक वर्ष अगोदर लेखापरीक्षण विभागाकडे पाठविण्याबाबत सर्व संबंधित विभागप्रमुख/शाखा प्रमुख यांना परिपत्रक क्र.मनपा/मुलेप/८७/२००५,दिनांक २९.०७.२००५ अन्वये सूचित करण्यात आलेले आहे. त्याचप्रमाणे लेखापरीक्षणाचे कामकाज हे अधिक परिणामकारक आणि विहीत मुदतीत पुर्ण करणे शक्य व्हावे यासाठी कोणत्या प्रकल्पावर अथवा लेखाशिर्षनिहाय कुठल्या बाबीवर किती खर्च झाला आहे ? तसेच झालेला खर्च हा अर्थसंकल्पिय तरतूदीच्या प्रमाणातच झालेला आहे किंवा नाही याची माहिती ही लेखापरीक्षणास विभागप्रमुखांचे/शाखाप्रमुखांचे स्तरावर, अर्थसंकल्पिय तरतूद नोंदवही (Budget Watch Register),देयक नोंदवही (Bill Register) आणि इतर अनुषंगिक नोंदवह्याच्या माध्यमातून उपलब्ध होण्याच्या दृष्टीने कार्यालयीन परिपत्रक क्र.मनपा/मुलेप/१०६/२००५, दिनांक १६.८.२००५ अन्वये सर्व संबंधितांना सूचना काढण्यात आलेल्या आहेत.

२. आस्थापना व लेखाविषयक कामकाज हे अचूक, तत्पर आणि अद्ययावत व्हावे यादृष्टीने दिनांक २९.९.२००५ रोजी सर्व शाखाप्रमुख व प्रभाग अधिकारी यांची बैठक आयोजित करून बैठकीमध्ये शाखाप्रमुख व प्रभाग स्तरावर करावयाचे दैनंदिन कामकाज, कर्मचाऱ्यांचा अभिलेख, कर्मचारी स्वेच्छानिवृत्ती आणि करापोटी जमा होणाऱ्या रकमा संबंधीचे हिशोब

इत्यादीबाबत अनुसरावयाच्या कार्यपध्दतीबाबत सविस्तर मार्गदर्शन करण्यात आले आहे. विशेषत: स्वेच्छासेवानिवृत्तीसाठी नियमानुसार दिलेल्या आगाऊ सूचनेनंतरही वर्ग-४ संवर्गातील कर्मचाऱ्यांना आठ-दहा महिन्यापर्यंत स्वेच्छासेवानिवृत्त करण्यात येत नसल्याचे निदर्शनास आल्याने भविष्यात महाराष्ट्र नागरी सेवा (निवृत्ती वेतन) नियम १९८२ मधील नियम ६६ (२) नुसार अचूक कार्यवाही अनुसरण्याविषयी सूचना देण्यात आलेल्या आहेत. तसेच लेखा परीक्षणाचे वेळी विभागप्रमुख व शाखाप्रमुख यांनी घ्यावयाची खबरदारी आणि इतर अनुषंगिक लेखा विषयक आक्षेपार्ह बाबींविषयी अनुसरावयाच्या कार्यपध्दतीबाबतही विशेष सूचना करण्यात आल्या असून वर नमूद केल्यानुसार आयोजित करण्यात आलेल्या बैठकीचे इतिवृत्त हे जा.क्र.मनपा/मुलेप/१५४/२००५, दिनांक २६.१०.२००५ अन्वये निर्गमित करण्यात आले आहे. परिणामी, सर्व विभागाकडून त्यानुसार यथोचित कार्यवाही करण्यात येत आहे.

३. महापालिका स्तरावर लेखापरीक्षण अहवालामध्ये विभागनिहाय व वर्षनिहाय प्रलंबित असलेल्या परिच्छेदांची स्थिती व त्याबाबतचा निपटारा हा वेळोवेळी प्रशासनास उपलब्ध व्हावा यादृष्टीने अंतर्गत व्यवस्था म्हणून मुख्य लेखाधिकारी यांचे अधिनस्त एका स्वतंत्र पथकाची स्थापन करणे गरजेचे वाटते, आणि त्यादृष्टीने दि.१०.१.२००६ रोजी संपन्न झालेल्या स्थायी समिती सभेमध्ये मुख्य लेखा परीक्षक यांनी ही बाब प्रशासनाच्या निदर्शनासही आणून दिलेली आहे. मात्र प्रशासनाकडून त्याबाबत अद्यापपावेतो कार्यवाही करण्यात आलेली नाही.

ड) महानगरपालिका स्थरावरील लेखापरीक्षणाचे स्वरूप आणि व्याप्ती विचारात घेता, लेखापरीक्षण विभागासाठी पुरेसा कर्मचारी वर्ग उपलब्ध व्हावा यादृष्टीने जा.क्र. मनपा/मुलेप/२००६/९३, दिनांक ४.८.२००५ अन्वये एकूण २६ नविन पदांसाठी मान्यता मिळण्याच्या दृष्टीने शासनाकडे प्रस्ताव सादर करण्यात आलेला असून त्यासाठी पाठपुरावा सुरू आहे. तरी परंतु, अस्तित्वात असलेल्या कर्मचारीवृंदाकडून अहवाल वर्षात एकूण आठ विभागाचे लेखापरीक्षण (थकीत लेखापरीक्षणासह) पुर्ण करण्यात आलेले असून त्याबाबतचे अहवाल हे मुंबई प्रांतिक महानगरपालिका अधिनियम १९४९ चे कलम १०५ (१) नुसार मा.सभापती,स्थायी समिती यांना वेळोवेळी सादर करण्यात आलेले आहेत. शिवाय मा.महापौर, मा.सभापती,स्थायी समिती व मा.आयुक्त यांनी वेळोवेळी दिलेल्या आदेशानुसार विशेष लेखापरीक्षण करून त्याबाबतचे अहवालही विहीत वेळेत संबंधित महोदयांना सादर करण्यात आलेले आहेत. **अहवाल वर्षात वार्षिक लेखापरीक्षण कार्यक्रमानुसार पूर्ण करण्यात आलेल्या लेखापरीक्षणाबाबतचा अहवाल व विशेष तपासणी /चौकशी बाबतचा अहवाल हा या अहवालामध्ये अनुक्रमे भाग-१ व भाग-२ च्या स्वरूपात सादर करण्यात आलेला आहे.**

लेखापरीक्षण विभागाद्वारे दैनंदिन कामकाज करीत असतांना निदर्शनास आलेल्या गंभीर स्वरूपाच्या आक्षेपार्ह बाबी ह्या वेळोवेळी मा.आयुक्तांचे निदर्शनास आणून देण्यात आलेल्या असून त्यानुषंगाने प्रशासनामार्फ़त यथोचित कार्यवाही सुध्दा करण्यात आलेली आहे.

अहवाल वर्षात मा.महापौर , मा.सभापती,स्थायी समिती, व मा.आयुक्त यांनी लेखा परीक्षण विभागाच्या अडी-अडचणी ह्या वेळोवेळी आस्थापूर्वक समजावून घेऊन त्याबाबत आवश्यक ती उपाय-योजना केली आहे. शिवाय लेखापरीक्षणाचे कार्य हे अधिक सुलभ आणि परिणामकारक होण्याच्या दृष्टीनेही मोलाचे सहकार्य केलेले आहे. त्यासाठी आम्ही त्यांचे ऋणी आहोत. तसेच अहवाल वर्षात मा.उपमहापौर, मा.सभागृहनेता, मा.विरोधी पक्षनेता, सर्व सन्माननीय सदस्य आणि महानगरपालिकेतील सर्व विभागप्रमुख / शाखाप्रमुख यांचेकडूनही मोलाचे सहकार्य मिळाले असल्यामुळे, आम्ही त्यांचेही मन:पूर्वक आभारी आहोत.

अशाच प्रकारचे सहकार्य यापुढेही सर्वांकडून मिळेल अशी आशा बाळगतो.

आपला विश्वासू,

**(एस.एन.औताडे)**
मुख्य लेखा परीक्षक,
महानगरपालिका,औरंगाबाद.

**औरंगाबाद:**
**दि. ०२/०९/२००६.**

# लेखा विभाग

## (भाग– अ)

**अहवाल वर्षात महानगरपालिका अंतर्गत जमा व खर्चाचा आढावा हा लेखा विभागाकडील अभिलेख्यांच्या आधारे घेण्यात आला आहे. त्यानुसार सन २००५–०६ या आर्थिक वर्षातील प्रत्यक्ष जमा प्रारंभीच्या शिल्लक रकमेसह रक्कम रू. २१४.७८ कोटी इतकी असून (प्रारंभीची शिल्लक रू.२.८० कोटी ) प्रत्यक्ष खर्च रू.१६८.६३ कोटी इतका आहे. दिनांक ३१ मार्च २००६ रोजीची अखेरची शिल्लक रू. ४६ कोटी १४ लाख इतकी असल्याचे निदर्शनास आले आहे. अहवाल वर्षात महापालिका अंतर्गत पदाधिकारी , अधिकारी आणि कर्मचारी यांना वेळोवेळी मंजूर करण्यात आलेल्या अग्रिम रकमा व त्यांचे समायोजन याबाबत लेखा विभागाकडून माहिती घेण्यात आली. तसेच न वटलेले धनादेश व त्यानुषंगाने वसूल झालेल्या रकमा अहवाल वर्षातील महापालिकेद्वारा करण्यात आलेली विविध कर्जफ़ेड या बाबतही तपशिल मागविण्यात आलेला आहे. प्राप्त तपशिलानुसार खालील प्रमाणे अभिप्राय नमूद करण्यात येत आहेत.**

**अ) अर्थसंकल्पिय तरतूद आणि प्रत्यक्ष जमा व खर्चाच्या रकमेतील तफ़ावतीबाबत:**

मुंबई प्रांतिक महानगरपालिका अधिनियम १९४९ चे कलम ९५ अन्वये महापालिकेचे अपेक्षित उत्पन्न व खर्च यांचे अंदाजपत्रक प्रतीवर्षी तयार करण्यात येते. सन २००४-०५ व सन २००५-०६ या आर्थिक वर्षाच्या अर्थसंकल्पिय तरतूद आणि प्रत्यक्ष जमा व खर्च याबाबत तपासणी केली असता असे दिसून आले की, महापालिकेस प्रत्यक्षात प्राप्त रकमा आणि महापालिकेद्वारा करण्यात आलेला प्रत्यक्ष खर्च हा अर्थसंकल्पिय तरतूदीपेक्षा १० ते २५ % कमी अथवा जादा झालेला आहे. त्याबाबतचा तपशिल हा खालीलप्रमाणे नमूद करण्यात येत आहे.

| **वर्ष** | **जमा (रूपये)** | | | | |
|---|---|---|---|---|---|
| | मूळ अर्थसंकल्पिय तरतूद | सुधारित अर्थसंकल्पिय तरतूद | प्रत्यक्ष जमा | कमी अथवा जादा रक्कम | टक्केवारी |
| २००४-०५ | १८५.११ कोटी | १५०.६७ कोटी | १२२.३१ कोटी | (-) ६२.८० कोटी | ३३.९२% |
| २००५-०६ | २३५.८८ कोटी | २२६.२४ कोटी | २१४.७८ कोटी | (-) २१.१० कोटी | ८.९४% |

| **वर्ष** | **खर्च (रूपये)** | | | | |
|---|---|---|---|---|---|
| | मूळ अर्थसंकल्पिय तरतूद | सुधारित अर्थसंकल्पिय तरतूद | प्रत्यक्ष खर्च | कमी अथवा जादा रक्कम | टक्केवारी |
| २००४-०५ | १८५.०० कोटी | १५०.६१ कोटी | १३४.०१ कोटी | (-) ५०.९९ कोटी | २७.५६% |

| | | | | | |
|---|---|---|---|---|---|
| २००५-०६ | २३५.७० कोटी | १७३.१५ कोटी | १६८.८३ कोटी | (-) ६६.८७ कोटी | २८.३७ % |

वरील तपशिलाचे अवलोकन केले असता असे निदर्शनास येते की, वार्षिक अंदाजपत्रक तयार करतांना मागील वर्षीच्या प्रत्यक्ष जमा व खर्चाच्या प्रमाणात तरतूद ठेवण्यात आलेली नाही. त्यामुळे अर्थसंकल्पिय तरतूदीनुसार जमा व खर्चाची रक्कम आणि प्रत्यक्ष जमा व खर्च यामध्ये तफ़ावत दिसून येते.

तेव्हा, भविष्यात महापालिका प्रशासनाद्वारा सादर होणाऱ्या अर्थसंकल्पामध्ये लक्षणीय तफ़ावत राहणार नाही अशी अपेक्षा व्यक्त करण्यात येते.

**ब) पदाधिकारी, अधिकारी आणि कर्मचारी यांचेकडील प्रलंबित अग्रिम रकमेबाबत:**

सन २००५ अखेर महापालिका पदाधिकारी /अधिकारी आणि कर्मचारी यांचेकडे एकूण रू.-------------- एवढा अग्रिम प्रलंबित असून अहवाल वर्षात पदाधिकारी आणि अधिकारी व कर्मचारी यांना कार्यालयीन कामकाजास्तव व वैयक्तिक कारणास्तव (आजारपण इ.) मंजूर करण्यात आलेल्या अग्रिम रकमेपैकी सोबत दर्शविलेल्या तपशिलानुसार एकूण १८० प्रकरणांत रू.३१३५७११/- इतक्या रकमेचे समायोजन अद्यापपावेतो करण्यात आलेले नाही. **(तपशिल पृष्ठ क्र.९ ते १३ प्रमाणे)**

वरील प्रमाणे प्रलंबित अग्रिम रकमेचे समायोजन हे संबंधिताकडून विनाविलंब होणेबाबत विभागाने कार्यवाही करावी असे सूचित करण्यात येते.

**क) लेखा विभागाकडे विना तजविज परत आलेल्या धनादेशांबाबत: (न वटलेले धनादेश):**

अहवाल वर्षात महापालिकेस जकात कर, मालमत्ता कर, पाणीपट्टी व अन्य करापोटी संबंधित व्यक्तिंकडून धनादेशाद्वारे रकमेचे प्रदान करण्यात आलेले आहे. मात्र काही वेळा काही धनादेश हे संबंधिताच्या बँक खात्यामध्ये पुरेसे पैसे नसल्यामुळे वटलेले नाहीत. अहवाल वर्षात रू.२६,४८,५४५/- इतक्या रकमेचे एकूण २८० धनादेश हे दिनांक १७.०७.२००६ अखेर वटविले गेले नसल्याचे प्राप्त तपशिलावरून स्पष्ट झाले आहे. विभागनिहाय न वटलेल्या धनादेशांचा तपशिल हा खालीलप्रमाणे सादर करण्यात येत आहे.

| अ.क्र. | विभागाचे नांव | धनादेशांची संख्या | धनादेशाची रक्कम रू. |
|---|---|---|---|
| ०१ | विभाग क्र.१ व वॉर्ड अ | १५ | २०५४२३/- |
| ०२ | विभाग क्र.२ व वॉर्ड ब | ६७ | ४२२६२६/- |
| ०३ | विभाग क्र.३ व वॉर्ड क | १३ | ६२५४९/- |
| ०४ | विभाग क्र.४ व वॉर्ड ड | ८४ | ८०३५५३/- |
| ०५ | विभाग क्र.५ व वॉर्ड इ | १३ | ४८९४६/- |
| ०६ | विभाग क्र.६ व वॉर्ड फ़ | ६९ | ५५७३१५/- |
| ०७ | विभाग क्र.७ | ०४ | २७६३९/- |
| ०८ | विभाग क्र.८ | ०१ | ४२४२/- |
| ०९ | मालमत्ता विभाग | ०१ | ४८१७४५/- |

| | | | |
|---|---|---|---|
| १० | जकात विभाग | १३ | ३४५०७/- |
| | **एकूण** | **२८०** | **२६४८५४५**/- |

विभागाने वरील प्रमाणे रक्कम वसूलीबाबत ठोस कार्यवाही करून अनुपालन सादर करावे.

**ड) १) महापालिकेस कर्जापोटी /विविध देयकापोटी देय असलेल्या व अहवाल वर्षात परत . फेड केलेल्या रकमांबाबत:**

अहवाल वर्षातील पाणीपुरवठा व जलनि:सारण योजनेसाठी महानगरपालिकेने घेतलेल्या विविध सरकारी संस्था व खुल्या बाजारातील कर्जफ़ेड ही मुंबई प्रांतिक महानगरपालिका अधिनियम १९४९ च्या कलम १११ अन्वये करण्यात येत आहे. कर्जफ़ेडीबाबतचा तपशिल प्राप्त झाला असून सन २००५-०६ या वर्षात एकूण ०४ प्रकारच्या कर्जा अंतर्गत रक्कम रू.२९२९३१८९/- अ़दा करण्यात आलेली आहे. कर्ज प़रत फेडीबाबतचा तपशिल हा खालीलप्रमाणे नमूद करण्यात येत आहे.

| अ.क्र. | कर्ज देणाऱ्या संस्थेचे नांव | मुद्दल (रू) | व्याज (रू) | एकूण (रू) |
|---|---|---|---|---|
| १ | आयुर्विमा महामंडळ पाणीपुरवठा योजना | ५५८६३१६/- | १००५७२८८/- | १५६४३६०४/- |
| २ | खुल्या बाजारातील कर्ज (महाराष्ट्र जिवन प्राधिकरण) | १४३५९९१/- | १०३६७८७२/- | ११८०३८६३/- |
| ३ | भूमिगत गटार योजनेसाठी घेतलेले कर्ज | ४५४५४५/- | २७९५४६/- | ७३४०९१/- |
| ४ | हडको | ८५१३६४/- | २६०२६७/- | १११११६३१/- |

## २) <u>मार्च२००६ अखेर महापालिकेस देणे असलेल्या रकमेचा तपशिल:</u>

| | | |
|---|---|---|
| १ | महाराष्ट्र राज्य विद्युत मंडळ यांचे विद्युत देयक रक्कम | रू.२१८.१९ कोटी |
| २ | महाराष्ट्र जीवन प्राधिकरण पाणी खरेदी देयक रक्कम | रू.७.१२ कोटी |
| ३ | एल.आय.सी. व खुल्या बाजारातील कर्जे व बँक कर्जे (मुद्यल) | रू.७२.०० कोटी |
| ४ | पोलिस दल पगार व भत्ते | रू.००.४७ कोटी |
| ५ | महाराष्ट्र राज्य रस्ते विकास महामंडळ | रू.०३.५० कोटी |
| ६ | नगररचना आस्थापना खर्च | रू.०१.१८ कोटी |
| ७ | महाराष्ट्र डिस्टीलरी लि.कंपनी | रू.०३.३२ कोटी |

| | | |
|---|---|---|
| ८ | १%, २%, ३% व इतर अनामत परतावा | रू.१०.०६ कोटी |
| | **एकूण** | **रू.३१२.५२ कोटी** |

**इ) रोख नोंदवहीतील दिनांक ३१.३.२००५ अखेर शिलकेचा ताळमेळ न घालणे बाबत:**

लेखा विभागाकडील सन २००४-०५ या आर्थिक वर्षातील रोखनोंदवहीचे अवलोकन केले असता असे निदर्शनास आले की, दिनांक ३१.३.२००५ अखेरचे आर्थिक व्यवहाराबाबतच्या नोंदी ह्या सक्षम अधिकारी यांनी प्रमाणित केलेल्या नाहीत. तसेच दिनांक ३१.३.२००५ रोजी शिल्लक रकमेचा ताळमेळ हा बँक खात्यावरील शिल्लक रकमेशीही घातलेला नाही. रोख रकमेचा नियमित ताळमेळ घेणे ही बाब आर्थिक व्यवहार सुरळीत आणि अचूक ठेवण्याच्या दृष्टीने अत्यंत महत्वाची असून विभागाने याकडे दुर्लक्ष केल्याचे दिसून येते.

तेव्हा, मार्च २००५ आणि मार्च २००६ अखेर शिल्लक रकमेचा ताळमेळ हा बँकखात्यावरील शिल्लक रकमेशी घेण्यात यावा आणि कार्यवाहीअंती लेखापरीक्षण विभागास अहवाल सादर करावा असे सूचित करण्यात येते.

# अधिकारी / कर्मचारी यांचेकडील प्रलंबित अग्रिम रकमेबाबतचा तपशिल:

| अ.क्र. | अग्रिम मंजूरीचा दिनांक | अधिकारी/ कर्मचाऱ्यांचे नांव | विभाग | अग्रिमाचा हेतू | रक्कम रू. |
|---|---|---|---|---|---|
| १ | १३.०४.२००५ | एम.एस.गंगावणे | आस्था-१ | १४ एप्रिल | १०००० |
| २ | २०.०४.२००५ | एन.एल.चव्हाण | भांडार | संत गाडगेबाबा | १५००० |
| ३ | २९.०४.२००५ | सुभेदार | आरोग्य | २९.०४.२००५ | २००० |
| ४ | ०४.०५.२००५ | बी.पी.सोनवणे | नगररचना | कार्यालयीन | ५००० |
| ५ | ०५.०५.२००५ | सुनिल ढेकळे | आयुक्त दालन | पेट्रोल अग्रिम | ५००० |
| ६ | ११.०५.२००५ | एस.बी.शहाणे | आरोग्य | संत गाडगेबाबा | १००० |
| ७ | ११.०५.२००५ | डॉ.मनिषा भोंडवे | आरोग्य | पल्स पोलियो | २३५७३० |
| ८ | १६.०५.२००५ | घानदा कुलकर्णी | सांस्कृतिक | कार्यालयीन | ५०० |
| ९ | १७.०५.२००५ | डॉ.बा.ह.काळे | आरोग्य | झेरॉक्स | ३००० |
| १० | १९.०५.२००५ | आय.बी.खाजा | इमारत | कार्यालयीन | २००० |
| ११ | १९.०५.२००५ | शैलजा गुळवे | महापौर दालन | चहा | ५००० |
| १२ | २५.०५.२००५ | भगवान घडामोडे | उप-महापौर | मुंबई दौरा | ७००० |
| १३ | २६.०५.२००५ | शाहिन खान | वॉर्ड क | एम.आय.एस.सी. | १५०० |
| १४ | ३१.०५.२००५ | बी.ए.वाहुळ | जकात | पेट्रोल अग्रिम | ८५०० |
| १५ | ०१.०६.२००५ | शैलजा गुळवे | महापौर दालन | पेट्रोल अग्रिम | १२५०० |
| १६ | ०४.०६.२००५ | प्रताप निंबाळकर | आयुक्त दालन | दिल्ली दौरा | ५००० |
| १७ | ०४.०६.२००५ | एस.डी.पानझडे | पाणी पुरवठा | पेट्रोल अग्रिम | ५४०० |
| १८ | ०७.०६.२००५ | अनिल वाळुजकर | आस्था-२ | फ़राळ | ३००० |
| १९ | १०.०६.२००५ | व्ही.व्ही.जावरे | प्रकल्प | प्रेस | ६०० |
| २० | १३.०६.२००५ | सुनिल ढेकळे | आयुक्त दालन | मुंबई दौरा | ८००० |
| २१ | १४.०६.२००५ | एम.एस.गंगावणे | आस्था-१ | पुस्तके | ३३०० |
| २२ | १५.०६.२००५ | सि.एस.सोनी | शहर अभियंता | पेट्रोल अग्रिम | ३००० |
| २३ | १६.०६.२००५ | डी.पी.गायकवाड | यांत्रिकी | पेट्रोल अग्रिम | १५००० |
| २४ | १८.०६.२००५ | संजय मेहर | आस्था-१ | पोस्ट | १०००० |
| २५ | २३.०६.२००५ | विजयकुमार भाटी | वॉर्ड फ़ | पोस्ट | १००० |
| २६ | २४.०६.२००५ | डॉ.बा.ह.काळे | आरोग्य | जुन –पेट्रोल | ४००० |
| २७ | २९.०६.२००५ | एम.डी.राठोड | नगररचना | कार्यालयीन | १०००० |
| २८ | ३०.०६.२००६ | एम.पी.कुलकर्णी | लेखा | जुन | ३६८० |
| २९ | ३०.०६.२००६ | अशोक कांबळे | आरोग्य | कार्यालयीन | १००० |
| ३० | ०२.०७.२००५ | डॉ.सि.आर.गायकवाड | आरोग्य | कार्यालयीन | ५०००० |
| ३१ | ०४.०७.२००५ | सुनिल ढेकळे | आयुक्त दालन | पेट्रोल अग्रिम | ५००० |
| ३२ | २०.०७.२००५ | सुनिल ढेकळे | आयुक्त दालन | चहा | २००० |
| ३३ | २१.०७.२००५ | कमलाकर फ़ड | उपआयुक्त | मुंबई दौरा | ४००० |

| | | | | | |
|---|---|---|---|---|---|
| ३४ | २१.०७.२००५ | डॉ.प्रेमलता कराड | आरोग्य | नाशिक दौरा | २००० |
| ३५ | २५.०७.२००५ | ज्ञानदा कुलकर्णी | सांस्कृतिक | ग्रंथालय पुस्तके | ६००० |
| ३६ | २५.०७.२००५ | अशोक जाधव | वॉर्ड - इ | निवडणूक | ३००० |

| अ.क्र. | अग्रिम मंजूरीचा दिनांक | अधिकारी/ कर्मचाऱ्यांचे नांव | विभाग | अग्रिमाचा हेतू | रक्कम रू. |
|---|---|---|---|---|---|
| ३७ | २५.०७.२००५ | डॉ.एस.जी.टाकळकर | एन-८ आरोग्य | औषधी | १००० |
| ३८ | २६.०७.२००५ | एम.एम.बनकर | जायकवाडी | हैद्राबाद दौरा | २००० |
| ३९ | २९.०७.२००५ | डॉ.अंजली शिंदे | आरोग्य | चेकअप | २०००० |
| ४० | ०८.०८.२००५ | आर.ए.मालोदे | जलतरण | शालेय स्पर्धा | ४१६४० |
| ४१ | ०८.०८.२००५ | आर.ए.मालोदे | जलतरण | शालेय स्पर्धा | २१००० |
| ४२ | ११.०८.२००५ | मुकुंद कुलकर्णी | वॉर्ड -अ | १५ ऑगस्ट | ३००० |
| ४३ | ११.०८.२००५ | सुनिल ढेकळे | आयुक्त दालन | पेट्रोल अग्रिम | ५००० |
| ४४ | ११.०८.२००५ | एस.व्ही.महिरे | मालमत्ता | कार्यालयीन | २००० |
| ४५ | १२.०८.२००५ | डॉ.बा.ह.काळे | आरोग्य | पेट्रोल अग्रिम | ४००० |
| ४६ | १६.०८.२००५ | डॉ.बा.ह.काळे | आरोग्य | पेट्रोल अग्रिम | ३००० |
| ४७ | २०.०८.२००५ | एस.एस.रामदासी | स्लम | पुणा दौरा | १०००० |
| ४८ | २०.०८.२००५ | भगवान घडामोडे | उप-महापौर | मुंबई दौरा | ७००० |
| ४९ | २०.०८.२००५ | संजय सिरसाठ | सभागृहनेता | मुंबई दौरा | ७००० |
| ५० | २०.०८.२००५ | तरविंदरसिंग धिल्लन | विरोधीपक्षनेता | मुंबई दौरा | ७००० |
| ५१ | ३०.०८.२००५ | एस.डी.पानझडे | पाणीपुरवठा | पेट्रोल अग्रिम | ५४०० |
| ५२ | ३१.०८.२००५ | भगवान घडामोडे | उप-महापौर | मुंबई दौरा | ७००० |
| ५३ | ३१.०८.२००५ | संजय सिरसाठ | सभागृहनेता | पुना दौरा | ७००० |
| ५४ | ०२.०९.२००५ | अफ़सर सिद्यीकी | नगररचना | पुना दौरा | ७०० |
| ५५ | ०५.०९.२००५ | आर.ए.मालोदे | जलतरण | शालेय स्पर्धा | ९३७४० |
| ५६ | ०६.०९.२००५ | पी.बी.चव्हाण | वॉर्ड -ड | गणेशचतुर्थी | ९००० |
| ५७ | ०६.०९.२००५ | पी.बी.चव्हाण | वॉर्ड -ड | गणेशचतुर्थी | २०००० |
| ५८ | २०.०९.२००५ | असिम गुप्ता | आयुक्त | कार्यालयीन | ८००० |
| ५९ | २२.०९.२००५ | एस.डी.पानझडे | पाणीपुरवठा | पेट्रोल अग्रिम | ५६०१ |
| ६० | २९.०९.२००५ | डॉ.सि.आर.गायकवाड | आरोग्य | कार्यालयीन | १०००० |
| ६१ | २९.०९.२००५ | डॉ.सि.आर.गायकवाड | आरोग्य | कार्यालयीन | १५०० |
| ६२ | २९.०९.२००५ | बी.एम.अंभोरे | वॉर्ड -ब | एम.आय.एस.सी | १००० |
| ६३ | २९.०९.२००५ | आर.ए.मालोदे | जलतरण | शालेय स्पर्धा | ४३४०० |
| ६४ | २९.०९.२००५ | एस.एस.अडके | आरोग्य | औषधी | ५००० |
| ६५ | २९.०९.२००५ | आर.ए.मालोदे | जलतरण | बॅडमिंटन | २४०००० |
| ६६ | २९.०९.२००५ | सुनिल वायकोस | आरोग्य | कार्यालयीन | ४६४२ |
| ६७ | ०३.१०.२००५ | डी.पी.सुर्या | विधी | कोर्ट | १०००० |
| ६८ | ०३.१०.२००५ | आर.ए.मालोदे | जलतरण | टेबल टेनिस | २१२७०० |
| ६९ | ०५.१०.२००५ | डॉ.परोपकारी | आरोग्य | कार्यालयीन | १००० |
| ७० | ०६.१०.२००५ | एस.पी.काचेवार | आस्था-१ | ओ.बी.सी. | १०००० |

| | | | | | |
|---|---|---|---|---|---|
| ७१ | १३.१०.२००५ | सि.एस.सोनी | शहर अभियंता | पेट्रोल अग्रिम | ४००० |
| ७२ | १४.१०.२००५ | पी.पी.शहापुरकर | उप-महापौर | दौरा | २२००० |
| ७३ | १७.१०.२००५ | जिजाबाई मोरे | प्रकल्प | कार्यालयीन | ३०० |

| अ.क्र. | अग्रिम मंजूरीचा दिनांक | अधिकारी/ कर्मचाऱ्यांचे नांव | विभाग | अग्रिमाचा हेतू | रक्कम रू. |
|---|---|---|---|---|---|
| ७४ | १७.१०.२००५ | एस.एस.कुलकर्णी | नगररचना | मुंबई दौरा | २५०० |
| ७५ | १८.१०.२००५ | भगवान घडामोडे | उप-महापौर | महाबळेश्वर | १५००० |
| ७६ | १९.१०.२००५ | संजय सिरसाठ | सभागृहनेता | महाबळेश्वर | १०००० |
| ७७ | १९.१०.२००५ | सुनिल ढेकळे | आयुक्त दालन | दौरा | ८००० |
| ७८ | २१.१०.२००५ | एम.डी.राठोड | नगररचना | पेट्रोल अग्रिम | ५००० |
| ७९ | २८.१०.२००५ | डी.व्ही.जोशी | लेखा | लेखापरीक्षण | ५००० |
| ८० | २९.१०.२००५ | भुषण व्यवहारे | कार्यालय | कार्यालयीन | ५००० |
| ८१ | २९.१०.२००५ | डी.डी.सुर्यवंशी | वॉर्ड -ब | एम.आय.एस.सी. | १०००० |
| ८२ | ३१.१०.२००५ | एम.पी.खैरनार | लेखाधिकारी | दिल्ली दौरा | १००००० |
| ८३ | ०७.११.२००५ | संजय सिरसाठ | सभागृहनेता | पेट्रोल अग्रिम | २१६०० |
| ८४ | ०९.११.२००५ | अण्णा शंकर वाघ | लेखा | पोस्ट | १००० |
| ८५ | १४.११.२००५ | एस.एस.चोबे | मिटींग | पेट्रोल अग्रिम | ५००० |
| ८६ | १८.११.२००५ | डॉ.देशमुख | --- | कार्यालयीन | ३००० |
| ८७ | २१.११.२००५ | एम.पी.खैरनार | मु. लेखाधिकारी | पेट्रोल अग्रिम | ५५०० |
| ८८ | २१.११.२००५ | डी.व्ही.जोशी | लेखा | एम.आय.एस.सी. | १५००० |
| ८९ | २२.११.२००५ | संजय पवार | लेखाधिकारी | दौरा | ३५०० |
| ९० | २२.११.२००५ | एम.ए.पठाण | सचिव | दौरा | १०००० |
| ९१ | २२.११.२००५ | अण्णा शंकर वाघ | लेखा | एम.आय.एस.सी. | १०००० |
| ९२ | २२.११.२००५ | डॉ.सि.आर.गायकवाड | आरोग्य | कार्यालयीन | ३०००० |
| ९३ | २३.११.२००५ | जे.के.बोर्डे | --- | कार्यालयीन | ५०० |
| ९४ | २५.११.२००५ | गोसावी | आरोग्य | कार्यालयीन | ५००० |
| ९५ | २५.११.२००५ | सै.फ़ईमोद्दीन | करआकारणी | एम.आय.एस.सी. | ५००० |
| ९६ | २९.११.२००५ | आर.ए.मालोदे | जलतरण | महापौर चषक | ३०००० |
| ९७ | २९.११.२००५ | डॉ.एस.व्ही.रझवी | पशुधनअधिकारी | ट्रक हायर | २३०९० |
| ९८ | ०१.१२.२००५ | बी.एम.अंभोरे | वॉर्ड -ब | चहा | १००० |
| ९९ | ०३.१२.२००५ | भगवान घडामोडे | उपमहापौर | अकोला दौरा | १०००० |
| १०० | ०३.१२.२००५ | आर.ए.मालोदे | जलतरण | क्रिकेट | २००० |
| १०१ | ०३.१२.२००५ | बी.एम.अंभोरे | वॉर्ड -ब | मिटींग | २००० |
| १०२ | ०७.१२.२००५ | सुनिल ढेकळे | आयुक्त दालन | पेट्रोल अग्रिम | ११००० |
| १०३ | १२.१२.२००५ | गोविंद बारबोटे | विधी | नागपुर दौरा | २००० |
| १०४ | १२.१२.२००५ | डी.व्ही.जोशी | लेखा | लेखापरीक्षण | १०००० |
| १०५ | १३.१२.२००५ | व्ही.व्ही.जावरे | प्रकल्प | मिटींग | ५०० |
| १०६ | १५.१२.२००५ | संजय सिरसाठ | सभागृहनेता | मुंबई दौरा | १०००० |
| १०७ | १७.१२.२००५ | सि.एस.सोनी | शहर अभियंता | पेट्रोल अग्रिम | ४००० |

| | | | | | |
|---|---|---|---|---|---|
| १०८ | १९.१२.२००५ | बी.आर.मोरे | लेखा | मुंबई दौरा | १०००० |
| १०९ | १९.१२.२००५ | डी.व्ही.जोशी | लेखा | झेरॉक्स | १०००० |
| ११० | २१.१२.२००५ | संजय सिरसाठ | सभागृहनेता | मुंबई दौरा | १०००० |

| अ.क्र. | अग्रिम मंजूरीचा दिनांक | अधिकारी/ कर्मचाऱ्यांचे नांव | विभाग | अग्रिमाचा हेतू | रक्कम रू. |
|---|---|---|---|---|---|
| १११ | २१.१२.२००५ | एम.पी.खैरनार | मु.लेखाधिकारी | पेट्रोल अग्रिम | ५००० |
| ११२ | २१.१२.२००५ | डी.पी.गायकवाड | यांत्रिकी | आर.टी.ओ. | ५००० |
| ११३ | २१.१२.२००५ | गोकुळ सातदिवे | वॉर्ड -अ | स्टॅम्प | ५००० |
| ११४ | २३.१२.२००५ | संजय जगताप | सभापती-अ | मुंबई दौरा | १५००० |
| ११५ | २७.१२.२००५ | भगवान घडामोडे | उप-महापौर | मुंबई दौरा | १०००० |
| ११६ | २७.१२.२००५ | भाऊराव ड्रायव्हर | जकात | मेडीकल | ३५००० |
| ११७ | २७.१२.२००५ | महेश माळवदकर | शिक्षण सभापती | मुंबई दौरा | १६००० |
| ११८ | ३०.१२.२००५ | संगिता पाटील | आरोग्य | व्हॅक्सीन | २५००० |
| ११९ | ०३.०१.२००६ | संतोष खेंडके पाटील | सभापती | पिंपरी चिंचवड | १५००० |
| १२० | ०५.०१.२००६ | बाळु खरात | ड्रायव्हर | पेट्रोल अग्रिम | १४३०० |
| १२१ | ०५.०१.२००६ | पी.पी.शहापुरकर | उप-महापौर दा. | उदयपुर दौरा | ५०००० |
| १२२ | ०५.०१.२००६ | डी.आर.लाहोटी | आस्था-१ | पोस्ट | १०००० |
| १२३ | ०७.०१.२००६ | विजय जावरे | प्रकल्प | २१,२२,जाने. | ३०००० |
| १२४ | ०९.०१.२००६ | एस.पी.खन्ना | उप-अभियंता | एम.आय.एस.सी. | १५००० |
| १२५ | १०.०१.२००६ | बी.ए.वाहुळ | जकात | पेट्रोल अग्रिम | ८५०० |
| १२६ | १०.०१.२००६ | नईम अन्सारी | वॉर्ड ड | स्टॅम्प | ५०० |
| १२७ | १३.०१.२००६ | के.पी.धोंडे | जायकवाडी | | २०००० |
| १२८ | १९.०१.२००६ | एस.एम.काकडे | सब-ऑफ़िसर | २६ जानेवारी | ३००० |
| १२९ | २०.०१.२००६ | सि.आर.गायकवाड | एम.ओ. | कुटुंबनियोजन | ५०००० |
| १३० | २३.०१.२००६ | सुखेन्द्र निर्मल | ऑफ़िस | कार्यालयीन | ५०० |
| १३१ | २४.०१.२००६ | मुकुंद कुलकर्णी | वॉर्ड -अ | २६ जानेवारी | ३००० |
| १३२ | २४.०१.२००६ | रावसाहेब मालोदे | क्रिडा | २६ जानेवारी | ६३०० |
| १३३ | ०१.०२.२००६ | सुनिल ढेकळे | आयुक्त दालन | चहा | ७००० |
| १३४ | ०१.०२.२००६ | पी.आर.कुलकर्णी | आरोग्य | मुंबई दौरा | १५००० |
| १३५ | ०१.०२.२००६ | विलास मधुकर मापारी | | मेडीकल | ७०००० |
| १३६ | ०४.०२.२००६ | एच.डी.सातारकर | आरोग्य | झेरॉक्स | १००० |
| १३७ | ०४.०२.२००६ | किशनचंद तनवाणी | महापौर | पेट्रोल अग्रिम | २९६०० |
| १३८ | ०४.०२.२००६ | एस.पी.खन्ना | उप-अभियंता | चेन्नई दौरा | ४०००० |
| १३९ | ०४.०२.२००६ | सुनिल ढेकळे | आयुक्त दालन | पेट्रोल अग्रिम | ११००० |
| १४० | ०७.०२.२००६ | अनिल जैस्वाल | सभापती आरोग्य | नाशिक दौरा | १५००० |
| १४१ | ०७.०२.२००६ | एस.एस.अडके | सभापती | मेडीकल | ५००० |
| १४२ | ०७.०२.२००६ | ज्ञानदा कुलकर्णी | सांस्कृतिक | | २५०० |
| १४३ | ०८.०२.२००६ | सुनिल ढेकळे | आयुक्त दालन | मुंबई दौरा | ५६०८ |
| १४४ | १०.०२.२००६ | संजय सिरसाठ | सभागृहनेता | मुंबई दौरा | ७००० |

| | | | | | |
|---|---|---|---|---|---|
| १४५ | १३.०२.२००६ | के.एम.फ़ालक | पाणी पुरवठा | मुंबई दौरा | १०००० |
| १४६ | १८.०२.२००६ | ज्ञानदा कुलकर्णी | सांस्कृतिक | मिटींग | २०००० |
| १४७ | १८.०२.२००६ | महेश माळवदकर | सभापती शिक्षण | पुणे दौरा | ५००० |

| अ.क्र. | अग्रिम मंजूरीचा दिनांक | अधिकारी/ कर्मचाऱ्यांचे नांव | विभाग | अग्रिमाचा हेतू | रक्कम रू. |
|---|---|---|---|---|---|
| १४८ | १८.०२.२००६ | एम.वाय.शेख | --- | मेजरमेंट | ३००० |
| १४९ | २०.०२.२००६ | दाता बहुउद्‌देशिय सो. | | महापौर चषक | १००००० |
| १५० | २२.०२.२००६ | डॉ.व्हि.ए.तिखे | एम.ओ. | एम.आय.एस.सी. | २००० |
| १५१ | २२.०२.२००६ | अण्णा शंकर वाघ | लेखा | प्रेझेंट्स | ८६००० |
| १५२ | २७.०२.२००६ | डी.ए.गिरी | वॉर्ड क | एम.आय.एस.सी. | १०००० |
| १५३ | २७.०२.२००६ | अण्णा शंकर वाघ | लेखा | मेजर | १५००० |
| १५४ | ०१.०३.२००६ | शे.शाहेद | -- | बर्ड फ़्ल्यू | १०००० |
| १५५ | ०२.०३.२००६ | कादर फ़ईम | -- | नांदेड दौरा | १००० |
| १५६ | ०२.०३.२००६ | एम.बी.काझी | उप-अभियंता | निवडणुक | १५००० |
| १५७ | ०२.०३.२००६ | संजिव बालय्या | ऑफ़िस | कार्यालयीन | २००० |
| १५८ | ०२.०३.२००६ | जयश्री कुलकर्णी | आरोग्य | सिडको टेंडर | ५००० |
| १५९ | ०४.०३.२००६ | एस.व्ही.रझवी | -- | पिंपरी चिंचवड | ३००० |
| १६० | ०४.०३.२००६ | म्हात्रे सोम शेरकर | -- | मेजरमेंट | ३००० |
| १६१ | ०४.०३.२००६ | विजय जावरे | प्रकल्प | निबंध स्पर्धा | २५००० |
| १६२ | ०४.०३.२००६ | रविंद्र निकम | आस्था-१ | एम.आय.एस.सी. | १००० |
| १६३ | ०४.०३.२००६ | सुनिल ढेकळे | आयुक्त दालन | मुंबई दौरा | ९००० |
| १६४ | ०६.०३.२००६ | एम.वाय.कांबळे | उपायुक्त | पेट्रोल अग्रिम | ६००० |
| १६५ | ०६.०३.२००६ | बाबासाहेब उनवणे | एमओएच | संत गाडगे बाबा | १०००० |
| १६६ | ०९.०३.२००६ | संजय सिरसाठ | सभागृहनेता | मुंबई दौरा | ७००० |
| १६७ | ०९.०३.२००६ | एस.एस.चोबे | मिटींग | कार्यालयीन | २००० |
| १६८ | ०९.०३.२००६ | संगिता पाटील | एमओएच | कार्यालयीन | १०२०० |
| १६९ | ०९.०३.२००६ | एस.एस.चोबे | मिटींग | झेरॉक्स | १०००० |
| १७० | १४.०३.२००६ | एस.पी.भालेराव | -- | स्टॅम्प | ३००० |
| १७१ | १४.०३.२००६ | सय्यद सलिमोद्दीन | क्रिडा | महापौर चषक | ७५००० |
| १७२ | १६.०३.२००६ | बाबासाहेब उनवणे | आरोग्य | संत गाडगेबाबा | ३५००० |
| १७३ | १६.०३.२००६ | एस.व्ही.रझवी | पशुधन अधिकारी | कोंडवाडा | ५००० |
| १७४ | १८.०३.२००६ | ए.एस.वाघ | लेखा | निवडणुक | १८७७० |
| १७५ | २१.०३.२००६ | सि.आर.गायकवाड | आरोग्य | कुटुंबनियोजन | ५०००० |
| १७६ | २२.०३.२००६ | शिवाजी झनझन | अग्निशमन | मुंबई दौरा | १००० |
| १७७ | २२.०३.२००६ | आर.आर.कुबेर | सब-ऑफ़िसर | पेट्रोल अग्रिम | २०००० |
| १७८ | २२.०३.२००६ | सोमनाथ केराजी मोरे | -- | अहमदाबाद दौरा | २००० |
| १७९ | २९.०३.२००६ | डॉ.मनिषा भांडवे | एम.ओ. | पल्स पोलियो | २६९३७० |
| १८० | ३१.०३.२००६ | सचिव.डॉ.बा.आं.जयंती | सभापती | | १०००० |
| | | | | | **३१३५७११** |

## (भाग –ब)

सन २००४-०५ या आर्थिक वर्षात महापालिका सेवेतून निवृत्त झालेल्या /मयत झालेल्या प्रकरणांत महापालिकेद्वारा यथास्थिती निवृत्ती वेतन व कुटुंब निवृत्ती वेतन लाभांचे प्रदान करण्यात आलेले असून एकूण १०९ निवृत्ती वेतन/ कुटुंबनिवृत्ती वेतन प्रकरणांपैकी चाचणी स्वरूपात एकूण ३४ प्रकरणांची तपासणी करण्यात आली असून त्यामध्ये निदर्शनास आलेल्या आक्षेपार्ह बाबी संबंधिचा तपशिल हा प्रकरणनिहाय खालीलप्रमाणे सादर करण्यात येत आहे.

**परिच्छेद क्र.१: सेवा निवृत्ती वेतन अतिप्रदानाबाबत: सौ.शारदा चंद्रकांत मुळे से.नि.सहशिक्षिका.**

महानगरपालिका अंतर्गत सन २००४-०५ या आर्थिक वर्षात सेवानिवृत्त झालेल्या अधिकारी/कर्मचारी यांच्या सेवानिवृत्ती वेतन प्रदान प्रकरणांची तपासणी हाती घेण्यात आली असता सौ.शारदा चंद्रकांत मुळे यांच्या प्रकरणांत खालील आक्षेपार्ह बाबी निदर्शनास आल्या आहेत.

१. सौ.मुळे ह्या दि.११.०८.१९६९ रोजी सहशिक्षिका या पदावर रूजू झालेल्या असून त्या दि.३१.१२.२००४ रोजी नियत वयोमानाने सेवानिवृत्त झालेल्या आहेत. त्यानुसार त्यांचा सेवाकाळ हा ३५ वर्ष ४ महिने २१ दिवस इतका आहे.

२. सौ. मुळे यांचा जन्मदिनांक हा ०५.१२.१९४६ हा असून सेवा निवृत्तीच्या दिवशी त्यांचे वय हे ५८ वर्षे इतके आहे.

३. सौ.मुळे यांचे अंतिम वेतन प्रमाणपत्राआधारे वेतन रू.९९७५/- इतके असून सरासरी वेतन रू.९९०८/- इतके निश्चित करणे आवश्यक आहे.

वरील सर्व तपशीलाआधारे व म.ना.से.(निवृत्ती वेतन) नियमातील तरतुदींआधारे त्यांना खालीलप्रमाणे सेवाविषयक निवृत्ती वेतन लाभांचे प्रदान देय होते.

१. निवृत्ती वेतन :- $\frac{९९०८ \times ६६}{१३२}$ = रू.४९५४/ प्र.म.दि.०१.०१.२००५ पासून निश्चित होणे आवश्यक आहे. मात्र प्रत्यक्षात रू.४९८८/- प्र.म. इतके अदा करण्यात येत असल्यामुळे दि.०१.०१.२००५ ते २८.०२.२००६ पर्यंत वेतन रू.३४ अधिक अनुज्ञेय भत्ते (प्रचलित दरानुसार) जादा अदा करण्यात येत आहेत. देय-अनुज्ञेय लाभांचा तपशील हा खालील प्रमाणे नमूद करण्यात येत आहे.

| कालावधी | मूळ वेतन + महागाई वेतन | | महागाई भत्ता दर | जादा रक्कम |
|---|---|---|---|---|
| दि.०१.०१.२००५ ते दि.३१.०३.२००५ | ३४+१७(५०%डीपी)= ५१/- | + | ११%= ५७ X ३= | १७१.०० |
| दि.०१.०४.२००५ ते दि.३१.०६.२००५ | ३४+१७=५१/- | + | १४%=५८ X ३= | १७४.०० |

| | | | | |
|---|---|---|---|---|
| दि.०१.०७.२००५ ते दि.३१.१०.२००५ | ३४+१७=५१/- | + | १७%=६० X ४= | २४०.०० |
| दि.०१.११.२००५ ते दि.२८.०२.२००६ | ३४+१७=५१/- | + | २१%=६२ x ४= | २४८.०० |

**एकूण रू. ८३३/-**

वरील प्रमाणे संबंधितास दि.०१.०१.२००५ ते दि.२८.०२.२००६ पर्यंत रू.८३३/- जादा अदा करण्यात आले आहेत.

**१.** अंशराशीकरण :- निवृत्ती वेतन रू.४९५४/- प्र.म.आधारे १/३ रक्कम रू.१६५१/- ऐवजी रू.१६६२/- निश्चित करून त्या आधारे संबंधितास रू.२०७२३४/- ऐवजी रू.२०८६१४/- अदा करण्यात आले आहेत. परिणामी, रू.१३८०/- जादा रक्कम अदा करण्यात आलेली आहे.

तेंव्हा, जादा अदाईची एकत्रित रक्कम रू.२२१३/- ही संबंधिताकडून वसूल करून दि.०१.०३.२००६ पासून सुधारित निवृत्ती वेतन रू.४९५४/- प्र.म.अधिक भत्ते अदा करण्यात यावे आणि कार्यवाही अंती अनुपालन सादर करण्यात यावे असे विभागास सूचित करण्यात आलेले आहे.

अद्यापपावेतो अनुपालन अप्राप्त आहे.

**परिच्छेद क्र.२: सेवा निवृत्ती वेतन कमी प्रदानाबाबत:**
**श्रीमती गंगुबाई तेजराव मलवार, सेवानिवृत्त मजूर.**

महानगरपालिका सेवेअंतर्गत सन २००४-०५ या आर्थिक वर्षात सेवानिवृत्त झालेल्या अधिकारी/ कर्मचारी यांच्या सेवानिवृत्ती वेतन प्रदान प्रकरणांची तपासणी हाती घेण्यात आली असता श्रीमती गंगुबाई तेजराव मलवार, सेवानिवृत्त मजूर यांच्या प्रकरणांत खालील आक्षेपार्ह बाबी निदर्शनास आल्या आहेत.

१. श्रीमती मलवार ह्या दि.०३.०९.१९८३ रोजी मजूर या पदावर महापालिका सेवेत रूजू झालेल्या असून त्या दि.३०.०६.२००४ रोजी स्वेच्छा सेवानिवृत्त झालेल्या आहेत. मलवार यांचा मजूर या पदावरील सेवाकाळ हा २० वर्ष ९ महिने २८ दिवस एवढा असून स्वेच्छेने सेवानिवृत्त झाल्यामुळे महाराष्ट्र नागरी सेवा निवृत्ती वेतन नियम १९८२ चे नियम ६६ (३) प्रमाणे अर्हताकारी सेवेचा कालावधी हा जास्तीत जास्त ५ वर्षापर्यंत अनुज्ञेय होत असल्यामुळे सेवा निवृत्ती वेतन लाभासाठी त्यांची सेवा ही २५ वर्षे ९ महिने २८ दिवस एवढी विचारात घेवून निवृत्ती वेतन लाभांचे प्रदान करणे आवश्यक आहे. तथापि त्यानुसार श्रीमती मलवार यांना लाभांचे प्रदान झालेले नाही असे संबंधित संचिकेचे अवलोकन केले असता निदर्शनास येते.

**२.** श्रीमती मलवार यांचा जन्मदिनांक हा ०६.०१.१९५८ असून सेवानिवृत्तीच्या दिवशी त्यांचे वय हे ४६ वर्षे ५ महिने २४ दिवस इतके आहे.

३. श्रीमती मलवार यांचे अंतिम वेतन प्रमाणपत्राआधारे शेवटचे वेतन हे रू.३५१०/- इतके असून म.ना.से. (नि.वे.) १९८२ चे नियम ११० व १११ आणि म.ना.से. (अंशराशीकरण) १९८४ चे नियम ५ अंतर्गत नमूद तरतुदीनुसार त्यांना त्याआधारे खालील प्रमाणे सेवाविषयक निवृत्तीवेतन लाभांचे प्रदान देय होते**.**

| अनुज्ञेय लाभ तपशिल | प्रत्यक्ष देय रकमांचा तपशिल | अनुज्ञेय केलेल्या रकमांचा तपशिल | शेरा |
|---|---|---|---|
| १ | २ | ३ | ४ |
| निवृत्ती वेतन | १३८३/- प्र.म. | १३५७/- | २६/- प्र.म. कमी प्रदान |
| सेवा उपदान | ४५६३०/- | ४४७५३/- | ८७७/- कमी प्रदान |
| अंशराशीकरण | ७८००१/- | ७६४७८/- | १५२३/- कमी प्रदान |

वर नमूद तपशिलाप्रमाणे श्रीमती मलवार यांना सेवा निवृत्ती नंतर दि.१.७.२००४ पासून निवृत्ती वेतन आणि निवृत्ती वेतनाचे इतर लाभ हे माहे डिसेंबर २००४ मध्ये मंजूर करण्यात आलेले असून त्यानुसार रकमांचे प्रदानही माहे जानेवारी २००५ मध्ये करण्यात आलेले आहे. विभागाने श्रीमती मलवार यांना मंजूरीअंती वरील अ.क्र.३ प्रमाणे प्रदान करण्यात आलेल्या निवृत्ती वेतन लाभाविषयी पुन्हा खातरजमा करावी. शिवाय अ.क्र.२ मध्ये नमूद केल्याप्रमाणे निवृत्तीवेतनाचे लाभ (थकबाकीसह ) प्रदान करण्याच्या दृष्टीने कार्यवाही ही दि.१ मार्च २००६ पासून करून कार्यवाहीअंती तसे अनुपालन सादर करण्यात यावे असे विभागास सूचित करण्यात आलेले आहे.

अद्यापपावेतो अनुपालन अप्राप्त आहे.

**परिच्छेद क्र.३ सेवा निवृत्ती वेतन कमी प्रदानाबाबत:**
**श्रीमती कौसाबाई लक्ष्मण खरात, सेवानिवृत्त मजूर.**

महानगरपालिका सेवेअंतर्गत सन २००४-०५ या आर्थिक वर्षात सेवानिवृत्त झालेल्या अधिकारी/ कर्मचारी यांच्या सेवानिवृत्ती वेतन प्रदान प्रकरणांची तपासणी हाती घेण्यात आली असता श्रीमती कौसाबाई लक्ष्मण खरात, सेवानिवृत्त मजूर यांच्या प्रकरणांत खालील आक्षेपार्ह बाबी निदर्शनास आल्या आहेत.

१. श्रीमती खरात ह्या दि. ०४.०९.१९८३ रोजी मजूर या पदावर महापालिका सेवेत रूजू झालेल्या असून त्या दि.३१.०१.२००५ रोजी स्वेच्छा सेवानिवृत्त झालेल्या आहेत. श्रीमती खरात यांचा मजूर या पदावरील सेवाकाळ हा २१ वर्ष ४ महिने २७ दिवस एवढा असून स्वेच्छेने सेवानिवृत्त झाल्यामुळे महाराष्ट्र नागरी सेवा निवृत्ती वेतन नियम १९८२ चे नियम ६६ (३) प्रमाणे अर्हताकारी सेवेचा

कालावधी हा जास्तीत जास्त ५ वर्षापर्यंत अनुज्ञेय होत असल्यामुळे सेवा निवृत्ती वेतन लाभासाठी त्यांची सेवा ही २६ वर्षे ४ महिने २७ दिवस एवढी विचारात घेवून निवृत्ती वेतन लाभांचे प्रदान करणे आवश्यक आहे. तथापि त्यानुसार श्रीमती खरात यांना लाभांचे प्रदान झालेले नाही असे संबंधित संचिकेचे अवलोकन केले असता निदर्शनास येते.

२. श्रीमती खरात यांचा जन्मदिनांक हा ०२.०६.१९५८ असून सेवानिवृत्तीच्या दिवशी त्यांचे वय हे ४६ वर्षे ७ महिने २९ दिवस इतके आहे.

३. श्रीमती खरात यांचे अंतिम वेतन प्रमाणपत्राआधारे शेवटचे वेतन हे रू.३५८०/- इतके असून म.ना.से.(नि.वे.)१९८२ चे नियम ११० व १११ आणि म.ना.से.(अशराशीकरण) १९८४ चे नियम ५ अंतर्गत नमूद तरतुदीनुसार त्यांना त्याआधारे खालील प्रमाणे सेवाविषयक निवृत्तीवेतन लाभांचे प्रदान देय होते.

| अनुज्ञेय लाभ तपशिल | प्रत्यक्ष देय रकमांचा तपशिल | अनुज्ञेय केलेल्या रकमांचा तपशिल | शेरा |
|---|---|---|---|
| १ | २ | ३ | ४ |
| **निवृत्ती वेतन** | **२१३६/– प्र.म.** | **२११४/–** | **२२/– प्र.म. कमी प्रदान** |
| **सेवा उपदान** | **७११५३/–** | **६९७६१/–** | **१३९२/–कमी प्रदान** |
| **अंशराशीकरण** | **१२०४७०/–** | **११९११७/–** | **१३५३/–कमी प्रदान** |

वर नमूद तपशिलाप्रमाणे श्रीमती खरात यांना सेवा निवृत्ती नंतर दि.१.२.२००५ पासून निवृत्ती वेतन आणि निवृत्ती वेतनाचे इतर लाभ हे माहे मार्च २००५ मध्ये मंजूर करण्यात आलेले असून त्यानुसार रकमांचे प्रदानही माहे मार्च २००५ मध्ये करण्यात आलेले आहे. विभागाने श्रीमती खरात यांना मंजूरीअंती वरील अ.क्र.३ प्रमाणे प्रदान करण्यात आलेल्या निवृत्ती वेतन लाभाविषयी पुन्हा खातरजमा करावी. शिवाय अ.क्र.२ मध्ये नमूद केल्याप्रमाणे निवृत्तीवेतनाचे लाभ (थकबाकीसह) प्रदान करण्याच्या दृष्टीने कार्यवाही ही दि.१ मार्च २००६ पासून करून कार्यवाहीअंती तसे अनुपालन सादर करण्यात यावे असे विभागास सूचित करण्यात आलेले आहे.

अद्यापपावेतो अनुपालन अप्राप्त आहे.

**परिच्छेद क्र.४ :– सेवा निवृत्ती वेतन अति प्रदानाबाबत:**
**श्रीमती सरसाबाई हरी थोरात,सेवानिवृत्त मजूर.**

**म**हानगरपालिका सेवेअंतर्गत सन २००४–०५ या आर्थिक वर्षात सेवानिवृत्त झालेल्या अधिकारी/ कर्मचारी यांच्या सेवानिवृत्ती वेतन प्रदान प्रकरणांची तपासणी हाती घेण्यात आली असता श्रीमती सरसाबाई हरी थोरात, सेवानिवृत्त मजूर यांच्या प्रकरणांत खालील आक्षेपार्ह बाबी निदर्शनास आल्या आहेत.

१. श्रीमती थोरात ह्या दि. ०१.०७.१९८२ रोजी मजूर या पदावर महापालिका सेवेत रूजू झालेल्या असून त्या दि.३१.०१.२००५ रोजी स्वेच्छा सेवानिवृत्त झालेल्या आहेत. तथापि स्वेच्छा सेवानिवृत्ती बाबतची नोंद ही

संबंधिताच्या सेवापटात घेण्यात आलेली नाही. श्रीमती थोरात यांचा मजूर या पदावरील सेवाकाळ हा २२ वर्षे ७ महिने एवढा असून सेवानिवृत्त झाल्यामुळे महाराष्ट्र नागरी सेवा निवृत्ती वेतन नियम १९८२ चे नियम ६६(३)प्रमाणे अर्हताकारी सेवेचा कालावधी हा जास्तीत जास्त ५ वर्षापर्यंत अनुज्ञेय होत असल्यामुळे सेवा निवृत्ती वेतन लाभासाठी त्यांची सेवा ही २७ वर्षे ७ महिने एवढी विचारात घेवून निवृत्ती वेतन लाभांचे प्रदान करणे आवश्यक आहे. तथापि त्यानुसार श्रीमती थोरात यांना लाभांचे प्रदान झालेले नाही असे संबंधित संचिकेचे अवलोकन केले असता निदर्शनास येते.

२. श्रीमती थोरात यांचा जन्मदिनांक हा ०१.०६.१९५७ असून सेवानिवृत्तीच्या दिवशी त्यांचे वय हे ४७ वर्षे ८ महिने इतके आहे.

३. श्रीमती थोरात यांचे अंतिम वेतन प्रमाणपत्राआधारे शेवटचे वेतन हे रू.३५८०/- इतके असून म.ना.से.(नि.वे.)१९८२ चे नियम ११० व १११ आणि म.ना.से.(अंशराशीकरण) १९८४ चे नियम ५ अंतर्गत नमूद तरतुदीनुसार त्यांना त्याआधारे खालील प्रमाणे सेवाविषयक निवृत्तीवेतन लाभांचे प्रदान देय होते.

| अनुज्ञेय लाभ तपशिल | प्रत्यक्ष देय रकमांचा तपशिल | अनुज्ञेय केलेल्या रकमांचा तपशिल | शेरा |
|---|---|---|---|
| १ | २ | ३ | ४ |
| **निवृत्ती वेतन** | **२२२५/- प्र.म.** | **२२३८/-** | **१३/- प्र.म. अति प्रदान** |
| **सेवा उपदान** | **७३८३८/-** | **७३८३८/-** | **----** |
| **अंशराशीकरण** | **१२२८८७/-** | **११८६१४/-** | **४२७३/-कमी प्रदान** |

वर नमूद तपशिलाप्रमाणे श्रीमती थोरात यांना सेवा निवृत्ती नंतर दि.१.२.२००५ पासून निवृत्ती वेतन आणि निवृत्ती वेतनाचे इतर लाभ हे माहे मार्च २००५ मध्ये मंजूर करण्यात आलेले असून त्यानुसार रकमांचे प्रदानही माहे मार्च २००५ मध्ये करण्यात आलेले आहे. विभागाने श्रीमती थोरात यांना मंजूरीअंती वरील अ.क्र.३ प्रमाणे प्रदान करण्यात आलेल्या निवृत्ती वेतन लाभाविषयी पुन्हा खातरजमा करावी. शिवाय अ.क्र.२ मध्ये नमूद केल्याप्रमाणे निवृत्तीवेतन अतिप्रदान रक्कम रू. ३०१/- वसूल करावयाचे आहे. तर अंशराशीकरण रक्कम रू.४२७३/- प्रदान करावयाची आहे. एकूणंच संबंधित श्रीमती थोरात यांना निवृत्तीवेतन रकमेपोटी अतिप्रदान रक्कम रू.३०१/- वजा जाता उर्वरीत रक्कम रू.३९७२/- (अंशराशीकरण रकमेचे प्रदान) प्रदान करणे आहे. तद्वतच श्रीमती थोरात यांना वर नमूद केलेल्या तपशीलाप्रमाणे १ मार्च२००६ पासून सुधारित दराने निवृत्ती वेतनाचे प्रदान करण्यात यावे आणि कार्यवाहीअंती तसे अनुपालन सादर करण्यात यावे असे विभागास सूचित करण्यात आलेले आहे.

अद्यापपावेतो अनुपालन अप्राप्त आहे.

**परिच्छेद क्र५:. सेवा निवृत्ती वेतन कमी प्रदानाबाबत:**
**श्रीमती सुमन सदाशिव पाटील, सेवानिवृत्त सह शिक्षिका.**

महानगरपालिका सेवेअंतर्गत सन २००४-०५ या आर्थिक वर्षात सेवानिवृत्त झालेल्या अधिकारी/ कर्मचारी यांच्या सेवानिवृत्ती वेतन प्रदान प्रकरणांची तपासणी हाती घेण्यात आली असता श्रीमती सुमन सदाशिव पाटील, सेवानिवृत्त सहशिक्षिका यांच्या प्रकरणांत खालील आक्षेपार्ह बाबी निदर्शनास आल्या आहेत.

१. श्रीमती पाटील ह्या दि.०८.११.१९७१ रोजी सहशिक्षिका या पदावर महापालिका सेवेत रूजू झालेल्या असून त्या दि.३१.१२.२००४ रोजी स्वेच्छा सेवानिवृत्त झालेल्या आहेत. श्रीमती पाटील यांचा सहशिक्षिका या पदावरील सेवाकाळ हा ३३ वर्ष १ महिना २३ दिवस एवढा असून त्यानुसार त्यांची सेवा विचारात घेवून निवृत्ती वेतन लाभांचे प्रदान करणे आवश्यक आहे. तथापि त्याप्रमाणे श्रीमती पाटील यांना लाभांचे प्रदान झालेले नाही असे संबंधित संचिकेचे अवलोकन केले असता निदर्शनास येते.

**२.** श्रीमती पाटील यांचा जन्मदिनांक हा ०३.०७.१९४८ असून सेवानिवृत्तीच्या दिवशी त्यांचे वय हे ५६ वर्षे ५ महिने २९ दिवस इतके आहे.

३. श्रीमती पाटील यांचे अंतिम वेतन प्रमाणपत्राआधारे शेवटचे वेतन हे रू.६२५०/- इतके असून म.ना.से. (नि.वे.) १९८२ चे नियम ११० व १११ आणि म.ना.से. (अंशराशीकरण) १९८४ चे नियम ५ अंतर्गत नमूद तरतुदीनुसार त्यांना त्याआधारे खालील प्रमाणे सेवाविषयक निवृत्तीवेतन लाभांचे प्रदान देय होते.

| अनुज्ञेय लाभ तपशिल | प्रत्यक्ष देय रकमांचा तपशिल | अनुज्ञेय केलेल्या रकमांचा तपशिल | शेरा |
|---|---|---|---|
| १ | २ | ३ | ४ |
| **निवृत्ती वेतन** | **४६१३/– प्र.म.** | **४५९४/–** | **१९/– प्र.म. कमी प्रदान** |
| **सेवा उपदान** | **१५४६८८/–** | **१५१६०२/–** | **३०८६/– कमी प्रदान** |
| **अंशराशीकरण** | **––––** | **––––** | **––––** |

वर नमूद तपशिलाप्रमाणे श्रीमती पाटील यांना सेवा निवृत्ती नंतर दि.१.१.२००५ पासून निवृत्ती वेतन आणि निवृत्ती वेतनाचे इतर लाभ हे माहे मार्च २००५ मध्ये मंजूर करण्यात आलेले असून त्यानुसार रकमांचे प्रदानही माहे मार्च २००५ मध्ये करण्यात आलेले आहे. विभागाने श्रीमती पाटील यांना मंजूरीअंती वरील अ.क्र.३ प्रमाणे प्रदान करण्यात आलेल्या निवृत्ती वेतन लाभाविषयी पुन्हा खातरजमा करावी. शिवाय अ.क्र.२ मध्ये नमूद केल्याप्रमाणे निवृत्तीवेतनाचे

लाभ (थकबाकीसह ) प्रदान करण्याच्या दृष्टीने कार्यवाही ही दि.१ मार्च २००६ पासून करून कार्यवाहीअंती तसे अनुपालन सादर करण्यात यावे असे विभागास सूचित करण्यात आलेले आहे.

अद्यापपावेतो अनुपालन अप्राप्त आहे.

**परिच्छेद क्र.६: सेवा निवृत्ती वेतन कमी प्रदानाबाबत:**
**श्री.बाबु पापन्ना यादव, सेवानिवृत्त सेवक.**

महानगरपालिका सेवेअंतर्गत सन २००४-०५ या आर्थिक वर्षात सेवानिवृत्त झालेल्या अधिकारी/ कर्मचारी यांच्या सेवानिवृत्ती वेतन प्रदान प्रकरणांची तपासणी हाती घेण्यात आली असता श्री.बाबु पापन्ना यादव सेवानिवृत्त सेवक यांच्या प्रकरणांत खालील आक्षेपार्ह बाबी निदर्शनास आल्या आहेत.

१. श्री. यादव हे दि.०७.०३.१९६८ रोजी सेवक या पदावर महापालिकासेवेत रूजू झालेले असून ते दि. ३१.१०.२००४ रोजी नियत वयोमानानुसार सेवानिवृत्त झालेले आहेत. श्री. यादव यांचा सेवक या पदावरील सेवाकाळ हा ३६ वर्ष ७ महिने २५ दिवस एवढा असून त्यानुसार त्यांची सेवा विचारात घेवून निवृत्ती वेतन लाभांचे प्रदान करणे आवश्यक आहे. तथापि त्याप्रमाणे श्री.यादव यांना लाभांचे प्रदान झालेले नाही असे संबंधित संचिकेचे अवलोकन केले असता निदर्शनास येते.

२. श्री.यादव यांचा जन्मदिनांक हा १८.१०.१९४४ असून सेवानिवृत्तीच्या दिवशी यांचे वय हे ६० वर्षे इतके आहे.

३. श्री.यादव यांचे अंतिम वेतन प्रमाणपत्राआधारे शेवटचे वेतन हे रू.४०००/- इतके दर्शविले असून शासन निर्णय क्र.वेतन –१०९९/प्र.क्र.१/९९-सेवा-२, दि.२५.१.१९९९ अन्वये संबंधितास कुंठीत वेतनवाढ ही दि. ०१.०६.२००४ पासून अनुज्ञेय असतांना ती देय करण्यात आलेली नाही. परिणामी संबंधितास दि.०१.०६.२००४ रोजी एक वेतनवाढ देय असल्याने सेवानिवृत्तीच्या वेळी संबंधिताचे शेवटचे वेतन हे रू.४०७०/- विचारात घेवून म.ना.से. (नि.वे.) नियम१९८२ चे नियम ११० व १११ आणि म.ना.से. (अंशराशीकरण) नियम १९८४ चे नियम ५ अंतर्गत नमूद तरतुदीनुसार त्यांना खालील प्रमाणे सेवाविषयक निवृत्तीवेतन लाभांचे प्रदान देय होते.

| अनुज्ञेय लाभ तपशिल | प्रत्यक्ष देय रकमांचा तपशिल | अनुज्ञेय केलेल्या रकमांचा तपशिल | शेरा |
|---|---|---|---|
| १ | २ | ३ | ४ |
| **निवृत्ती वेतन** | **३०२७/– प्र.म.** | **३०००/–** | **रू.२७/– प्र.म. कमी प्रदान** |
| **सेवा उपदान** | **१००७३३/–** | **९९०००/–** | **रू.१७३३/– कमी प्रदान** |
| **अंशराशीकरण** | **११८७७९/–** | **११७७२०/–** | **रू.१०५९/– कमी प्रदान** |

वर नमूद तपशिलाप्रमाणे श्री.यादव यांना सेवा निवृत्ती नंतर दि.१.११.२००४ पासून निवृत्ती वेतन आणि निवृत्ती वेतनाचे इतर लाभ हे माहे डिसेंबर २००४ मध्ये मंजूर करण्यात आलेले असून त्यानुसार रकमांचे प्रदानही माहे डिसेंबर २००४ मध्ये करण्यात आलेले आहे. विभागाने श्री.यादव यांना मंजूरीअंती वरील रकाना .क्र.३ प्रमाणे प्रदान करण्यात आलेल्या निवृत्ती वेतन लाभाविषयी पुन्हा खातरजमा करावी आणि रकाना .क्र.२ मध्ये नमूद केल्याप्रमाणे निवृत्तीवेतनाचे लाभ (थकबाकीसह ) प्रदान करण्याच्या दृष्टीने कार्यवाही ही दि.१ मार्च २००६ पासून करून कार्यवाहीअंती तसे अनुपालन सादर करण्यात यावे असे विभागास सूचित करण्यात आलेले आहे.

अद्यापपावेतो अनुपालन अप्राप्त आहे.

**परिच्छेद क्र.७: सेवा निवृत्ती वेतन लाभांचे कमी /अति प्रदानाबाबत:**

**श्री .मारोती रंगनाथ साबळे, सेवानिवृत्त मजूर**.

महानगरपालिका सेवेअंतर्गत सन २००४-०५ या आर्थिक वर्षात सेवानिवृत्त झालेल्या अधिकारी / कर्मचारी यांच्या सेवानिवृत्ती वेतन प्रदान प्रकरणांची तपासणी हाती घेण्यात आली असता श्री. मारोती रंगनाथ साबळे सेवानिवृत्त सेवक यांच्या प्रकरणांत खालील आक्षेपार्ह बाबी निदर्शनास आल्या आहेत.

१. श्री. साबळे हे दि. १८.०८.१९८० रोजी मजूर या पदावर महापालिका सेवेत रूजू झालेले असून ते दि. ३१.१२.२००४ रोजी स्वेच्छेने सेवानिवृत्त झालेले आहेत. श्री. साबळे यांचा मजूर या पदावरील सेवाकाळ हा २४ वर्ष ४ महिने १४ दिवस एवढा असून स्वेच्छा सेवानिवृत्त झाल्यामुळे म.ना.से. निवृत्ती वेतन नियम १९८२ चे नियम ६६ (३) प्रमाणे अर्हताकारी सेवेचा कालावधी हा जास्तीत जास्त ५ वर्षे अनुज्ञेय होत असल्याने सेवा निवृत्ती वेतन लाभासाठी त्यांची सेवा ही २९ वर्षे ४ महिने १४ दिवस एवढी विचारात घेवून निवृत्ती वेतन लाभांचे प्रदान करणे आवश्यक आहे. तथापि त्याप्रमाणे श्री.साबळे यांना लाभांचे प्रदान झालेले नाही असे संबंधित संचिकेचे अवलोकन केले असता निदर्शनास येते**.**

**२.** श्री.साबळे यांचा जन्मदिनांक हा ०१.०९.१९५४ असून सेवानिवृत्तीच्या दिवशी त्यांचे वय हे ५० वर्षे ४ महिने इतके आहे.

३. श्री.साबळे यांचे अंतिम वेतन प्रमाणपत्राआधारे शेवटचे वेतन हे रू.३६५०/- इतके असून म.ना.से. (नि.वे.) नियम १९८२ चे नियम ११० व १११ आणि म.ना.से. (अंशराशीकरण) नियम १९८४ चे नियम ५ अंतर्गत नमूद तरतुदीनुसार त्यांना खालील प्रमाणे सेवाविषयक निवृत्तीवेतन लाभांचे प्रदान देय होते.

| अनुज्ञेय लाभ तपशिल | प्रत्यक्ष देय रकमांचा तपशिल | अनुज्ञेय केलेल्या रकमांचा तपशिल | शेरा |
|---|---|---|---|
| १ | २ | ३ | ४ |
| **निवृत्ती वेतन** | **२४३४/- प्र.म.** | **२४४८/-** | **रू.१४- प्र.म. अति प्रदान** |
| **सेवा उपदान** | **८०७५६/-** | **८०७५६/-** | **----** |
| **अंशराशीकरण** | **१२६०२९/-** | **११७९९४/-** | **रू.८०३५/- कमी प्रदान** |

वर नमूद तपशिलाप्रमाणे श्री. साबळे यांना सेवा निवृत्ती नंतर दि.०१.०१.२००५ पासून निवृत्ती वेतन आणि निवृत्ती वेतनाचे इतर लाभ हे माहे मार्च २००५ मध्ये मंजूर करण्यात आलेले असून त्यानुसार रकमांचे प्रदानही माहे मार्च २००५ मध्ये करण्यात आलेले आहे. विभागाने श्री.साबळे यांना मंजूरीअंती वरील रकाना .क्र.३ प्रमाणे प्रदान करण्यात आलेल्या

निवृत्ती वेतन लाभाविषयी पुन्हा खातरजमा करून रकाना.क्र.२ मध्ये नमूद केल्याप्रमाणे निवृत्तीवेतनातील अति प्रदान फ़रक रक्कम रू. ३४१/- वसूल करणे आहे,

तर अंशराशीकरण रक्कम रू.८०३५/- प्रदान करावयाची आहे. परिणामी संबंधित श्री.साबळे यांना निवृत्ती वेतन रकमेपोटी अति प्रदान रक्कम रू.३४१/- वजा जाता उर्वरीत रक्कम रू. ७६९४ /- (अंशराशीकरण रकमेचे प्रदान ) प्रदान करण्याच्या दृष्टीने कार्यवाही ही दि.१ मार्च २००६ पासून करून कार्यवाहीअंती तसे अनुपालन सादर करण्यात यावे असे विभागास सूचित करण्यात आलेले आहे.

अद्यापपावेतो अनुपालन अप्राप्त आहे.

**परिच्छेद क्र.८:– सेवा निवृत्ती वेतन लाभांचे कमी /अति प्रदानाबाबत:**
**श्री .खाजा खॉन सुलतान खॉन, सेवानिवृत्त वाहनचालक.**

महानगरपालिका सेवेअंतर्गत सन २००४-०५ या आर्थिक वर्षात सेवानिवृत्त झालेल्या अधिकारी/कर्मचारी यांच्या सेवानिवृत्ती वेतन प्रदान प्रकरणांची तपासणी हाती घेण्यात आली असता श्री. खाजा खॉन सुलतान खॉन, सेवानिवृत्त वाहनचालक यांच्या प्रकरणांत खालील आक्षेपार्ह बाबी निदर्शनास आल्या आहेत.

१. श्री. खॉन हे दि. ०१.१२.१९७० रोजी वाहनचालक या पदावर महापालिका सेवेत रूजू झालेले असून ते दि. ३१.०८.२००४ रोजी नियत वयोमानानुसार सेवानिवृत्त झालेले आहेत. श्री. खॉन यांचा वाहनचालक या पदावरील सेवाकाळ हा ३३ वर्ष ९ महिने एवढा असून त्यानुसार त्यांची सेवा विचारात घेवून त्यांना निवृत्तीवेतन लाभांचे प्रदान करणे आवश्यक आहे. तथापि त्याप्रमाणे श्री.खॉन यांना लाभांचे प्रदान झालेले नाही असे संबंधित संचिकेचे अवलोकन केले असता निदर्शनास येते.

२. श्री.खॉन यांचा जन्मदिनांक हा ०२.०८.१९४६ असून सेवानिवृत्तीच्या दिवशी त्यांचे वय हे ५८ वर्षे इतके आहे. मात्र सेवानिवृत्त झाल्याबाबतची नोंद ही श्री.खॉन यांच्या सेवापटात घेतल्याचे दिसून आलेले नाही.

३. श्री.खॉन यांचे अंतिम वेतन प्रमाणपत्राआधारे शेवटचे वेतन हे रू.५५००/- इतके असून म.ना.से. (नि.वे.) नियम १९८२ चे नियम ११० व १११ आणि म.ना.से. (अंशराशीकरण) नियम १९८४ चे नियम ५ अंतर्गत नमूद तरतुदीनुसार त्यांना खालील प्रमाणे सेवाविषयक निवृत्तीवेतन लाभांचे प्रदान देय होते.

| अनुज्ञेय लाभ तपशिल | प्रत्यक्ष देय रकमांचा तपशिल | अनुज्ञेय केलेल्या रकमांचा तपशिल | शेरा |
|---|---|---|---|
| १ | २ | ३ | ४ |
| **निवृत्ती वेतन** | **४०८८/– प्र.म.** | **४१२५/–** | **रू.३७– प्र.म. अति प्रदान** |

| | | | |
|---|---|---|---|
| **सेवा उपदान** | **१३६१२५/-** | **१३६१२५/-** | **----** |
| **अंशराशीकरण** | **१७०९५८/-** | **१७२५९०/-** | **रू.१६३२/- अति प्रदान** |

वर नमूद तपशिलाप्रमाणे श्री. खॉन यांना सेवा निवृत्ती नंतर दि.०१.०९.२००४ पासून निवृत्ती वेतन आणि निवृत्ती वेतनाचे इतर लाभ हे माहे सप्टेंबर २००४ मध्ये मंजूर करण्यात आलेले असून त्यानुसार रकमांचे प्रदानही माहे सप्टेंबर २००४ मध्ये करण्यात आलेले आहे. विभागाने श्री. खॉन यांना मंजूरीअंती वरील रकाना .क्र.३ प्रमाणे प्रदान करण्यात आलेल्या निवृत्ती वेतन लाभाविषयी पुन्हा खातरजमा करून रकाना.क्र.२ मध्ये नमूद केल्याप्रमाणे निवृत्तीवेतनातील अति प्रदान फ़रक रक्कम रू. ११६२/- , तर अंशराशीकरण रक्कम रू.१६३२/- अशी एकूण रक्कम रू.२७९४/- वसूल करणे आहे . तसेच संबंधित श्री.खॉन यांना निवृत्ती वेतन रकमेपोटी अति प्रदान रक्कम रू.३७/-प्र.म.प्रमाणे रक्कम रू.११६२/- वसूल करून १ मार्च २००६ पासून सुधारित दराने निवृत्ती वेतन प्रदान करण्याची कार्यवाही करावी आणि कार्यवाही अंती तसे अनुपालन सादर करण्यात यावे असे विभागास सूचित करण्यात आलेले आहे.

अद्यापपावेतो अनुपालन अप्राप्त आहे.

**परिच्छेद क्र.९ :– सेवा निवृत्ती वेतन लाभांचे कमी /अति प्रदानाबाबत:**

**श्रीमती जनाबाई दलपत कुचेकर ,सेवानिवृत्त मजूर.**

महानगरपालिका सेवेअंतर्गत सन २००४-०५ या आर्थिक वर्षात सेवानिवृत्त झालेल्या अधिकारी/कर्मचारी यांच्या सेवानिवृत्ती वेतन प्रदान प्रकरणांची तपासणी हाती घेण्यात आली असता श्रीमती जनाबाई दलपत कुचेकर, सेवानिवृत्त मजूर यांच्या प्रकरणांत खालील आक्षेपार्ह बाबी निदर्शनास आल्या आहेत.

१. श्रीमती कुचेकर ह्या दि. ०६.०५.१९७५ रोजी मजूर या पदावर महापालिका सेवेत रूजू झालेल्या असून त्या दि. ३१.१०.२००४ रोजी स्वेच्छेने सेवानिवृत्त झालेल्या आहेत. श्रीमती कुचेकर यांचा मजूर या पदावरील सेवाकाळ हा २९ वर्ष ५ महिने २६ दिवस एवढा असून स्वेच्छा निवृत्त झाल्यामुळे म.ना.से. निवृत्ती वेतन १९८२ चे नियम ६६ (३) प्रमाणे अर्हताकारी सेवेचा कालावधी हा जास्तीत जास्त ५ वर्ष अनुज्ञेय होत असल्याने सेवानिवृत्ती वेतन लाभासाठी त्यांची सेवा ही ३३ वर्ष विचारात घेवून निवृत्तीवेतन लाभांचे प्रदान करणे आवश्यक आहे. तथापि त्याप्रमाणे श्रीमती कुचेकर यांना लाभांचे प्रदान झालेले नाही असे संबंधित संचिकेचे अवलोकन केले असता निदर्शनास येते.

२. श्रीमती कुचेकर यांचा जन्मदिनांक हा ०२.०७.१९५० असून सेवानिवृत्तीच्या दिवशी त्यांचे वय हे ५४ वर्षे ३ महिने ३० दिवस इतके आहे.

३. श्रीमती कुचेकर यांचे अंतिम वेतन प्रमाणपत्राआधारे शेवटचे वेतन हे रू.३६५०/- इतके दर्शविले असून संबंधितास दि. ०१.०६.२००४ रोजी वेतनवाढ अनुज्ञेय असतांना ती देय करण्यात आलेली नाही. परिणामी संबंधितास दि.०१.०६.२००४ रोजी एक वेतनवाढ देय असल्याने सेवानिवृत्तीच्या वेळी संबंधिताचे शेवटचे वेतन हे रू. ३७२०/- विचारात घेवून म.ना.से. (नि.वे.) नियम १९८२ चे नियम ११० व १११ आणि म.ना.से. (अंशराशीकरण) नियम १९८४ चे नियम ५ अंतर्गत नमूद तरतुदीनुसार त्यांना खालील प्रमाणे सेवाविषयक निवृत्तीवेतन लाभांचे प्रदान देय होते.

| अनुज्ञेय लाभ तपशिल | प्रत्यक्ष देय रकमांचा तपशिल | अनुज्ञेय केलेल्या रकमांचा तपशिल | शेरा |
|---|---|---|---|
| १ | २ | ३ | ४ |
| **निवृत्ती वेतन** | **२७६४/- प्र.म.** | **२७३८/-** | **रू.२६- प्र.म. कमी प्रदान** |
| **सेवा उपदान** | **९२०७०/-** | **९०३३८/-** | **रू.१७३२/- कमी प्रदान** |
| **अंशराशीकरण** | **१२९६४०/-** | **१२८३७३/-** | **रू.१२६७/- अति प्रदान** |

वर नमूद तपशिलाप्रमाणे श्रीमती कुचेकर यांना सेवा निवृत्ती नंतर दि.०१.११.२००४ पासून निवृत्ती वेतन आणि निवृत्ती वेतनाचे इतर लाभ हे माहे जानेवारी २००५ मध्ये मंजूर करण्यात आलेले असून त्यानुसार रकमांचे प्रदानही माहे जानेवारी २००५ मध्ये करण्यात आलेले आहे. विभागानेश्रीमती कुचेकर यांना मंजूरीअंती वरील रकाना .क्र.३ प्रमाणे प्रदान करण्यात आलेल्या निवृत्ती वेतन लाभाविषयी पुन्हा खातरजमा करावी आणि रकाना.क्र.२ मध्ये नमूद केल्याप्रमाणे निवृत्तीवेतना चे लाभ हे (थकबाकीसह) प्रदान करण्याच्या दृष्टीने कार्यवाही ही दि.१ मार्च २००६ पासून करून कार्यवाही अंती तसे अनुपालन सादर करण्यात यावे असे विभागास सूचित करण्यात आलेले आहे.

अद्यापपावेतो अनुपालन अप्राप्त आहे.

**परिच्छेद क्र.१०:- सेवा निवृत्ती वेतन लाभांचे कमी /अति प्रदानाबाबत:**

**श्रीमती सिताबाई रामराव बनकर ,सेवानिवृत्त मजूर.**

महानगरपालिका सेवेअंतर्गत सन २००४-०५ या आर्थिक वर्षात सेवानिवृत्त झालेल्या अधिकारी/ कर्मचारी यांच्या सेवानिवृत्ती वेतन प्रदान प्रकरणांची तपासणी हाती घेण्यात आली असता श्रीमती सिताबाई रामराव बनकर, सेवानिवृत्त मजूर यांच्या प्रकरणांत खालील आक्षेपार्ह बाबी निदर्शनास आल्या आहेत.

१. श्रीमती बनकर ह्या दि. ०१.०२.१९८४ रोजी मजूर या पदावर महापालिका सेवेत रूजू झालेल्या असून त्या दि. ३१.०८.२००४ रोजी स्वेच्छेने सेवानिवृत्त झालेल्या आहेत. श्रीमती बनकर यांचा मजूर या पदावरील सेवाकाळ हा २० वर्ष ७ महिने एवढा असून स्वेच्छा निवृत्त झाल्यामुळे म.ना.से. निवृत्ती वेतन १९८२ चे

नियम ६६ (३) प्रमाणे अर्हताकारी सेवेचा कालावधी हा जास्तीत जास्त ५ वर्ष अनुज्ञेय होत असल्याने सेवानिवृत्ती वेतन लाभासाठी त्यांची सेवा ही २५ वर्ष ७ महिने विचारात घेवून निवृत्तीवेतन लाभांचे प्रदान करणे आवश्यक आहे. तथापि त्याप्रमाणे श्रीमती बनकर यांना लाभांचे प्रदानझालेले नाहीअसे संबंधित संचिकेचे / सेवाअभिलेख्यांचे अवलोकन केले असता निदर्शनास येते.

२. श्रीमती बनकर यांचा जन्मदिनांक हा ३१.०१.१९५१ असून सेवानिवृत्तीच्या दिवशी त्यांचे वय हे ५३ वर्षे ७ महिने इतके आहे.

३. श्रीमती बनकर यांचे अंतिम वेतन प्रमाणपत्राआधारे शेवटचे वेतन हे रू.३५१०/- इतके दर्शविण्यात आलेले आहे . तथापि संबंधिताचे सेवापट आणि अनुषंगिक संचिकेचे अवलोकन केले असता खालील बाबी निदर्शनात आलेल्या आहेत.

अ) श्रीमती बनकर यांची दि.१.१.९६ रोजीची वेतनपडताळणी ही विद्यमान वेतनश्रेणी रू.७५० ते ९४० मध्ये रू.९२६/- विचारात घेवून सुधारित वेतनश्रेणी रू.२५५० ते ३२०० मध्ये रू.२९००/- याप्रमाणे वेतननिश्चिती केल्यानुसार झालेली आहे. मात्र कार्यालयीन आदेश क्र.मनपा/आस्था-२/२३४२/१४९८, दि.२३.६.९८ अन्वये श्रीमती बनकर यांना समयश्रेणीतील रू.७७५ ते ११५० ही वेतनश्रेणी दि.९.६.९४ पासून मंजूर करण्यात येवून त्यानुसार सुधारित वेतनश्रेणी रू.२६१० ते ४००० मध्ये दि.१.१.९६ रोजी जे वेतन निश्चित केलेले आहे (रू.२९१०/-) ते चूकीचे असल्याचे निदर्शनास येते. वेतननिश्चिती नुसार वेतनपडताळणीची कार्यवाही न झाल्याने त्याबाबत विभागाने पुर्नतपासणी करून वेतनपडताळणीअंती पुढील आवश्यक ती अनुज्ञेयता निर्धारित करणे आवश्यक आहे .

**ब)** श्रीमती बनकर ह्या दि.३१.८.२००४ रोजी सेवानिवृत्त झालेल्या आहेत अशी नोंद ही सेवापटात घेण्यात आलेली आहे. तथापि ती प्रमाणित नसल्याने त्याबाबत पूर्तता होणे आवश्यक ठरते.

**क)** विभागाने श्रीमती बनकर यांचे शेवटचे वेतन हे रू.३५१०/- विचारात घेवून अनुज्ञेय करण्यात आलेले सेवानिवृत्ती वेतनाचे लाभ हे चूकीचे असल्यामुळे प्रकरणांत पुनर्तपासणी करून निवृत्ती वेतन लाभ अनुज्ञेय बाबत पुढील आवश्यक ती कार्यवाही करून तसे अनुपालन सादर करण्यात यावे असे विभागास सूचित करण्यात आलेले आहे.

अद्यापपावेतो अनुपालन अप्राप्त आहे.

**परिच्छेद क्र.११:- सेवा निवृत्ती वेतन लाभांचे कमी /अति प्रदानाबाबत:**
**श्रीमती प्रेमाबाई जिलेसिंग टाक ,कुटुंबनिवृत्ती वेतनधारक.**

महानगरपालिका सेवेअंतर्गत सन २००४-०५ या आर्थिक वर्षात सेवानिवृत्त झालेल्या अधिकारी/कर्मचारी यांच्या सेवानिवृत्ती वेतन प्रदान प्रकरणांची तपासणी हाती घेण्यात आली

असता श्रीमती प्रेमाबाई जिलेसिंग टाक, मयत श्री.जिलेसिंग हरपालसिंग टाक,सफ़ाई मजूर यांच्या वारस पत्नी प्रकरणांत खालील आक्षेपार्ह बाबी निदर्शनास आल्या आहेत.

१. श्री. जिलेसिंग हरपालसिंग टाक हे दि. ०८.०८.१९६६ रोजी मजूर या पदावर महापालिका सेवेत रूजू झालेले असून ते दि. १०.०८.२००४ रोजी सेवेत असतांना मयत झालेले आहेत. श्री. टाक यांचा मजूर या पदावरील सेवाकाळ हा ३८ वर्ष ३ दिवसएवढा असून त्यांच्या मृत्यूनंतर वारसदार पत्नी श्रीमती प्रेमाबाई जिलेसिंग टाक यांना त्यानुसार निवृत्ती वेतन लाभांचे प्रदान करणे आवश्यक आहे. तथापि त्याप्रमाणे श्रीमती टाक यांना लाभांचे प्रदान झालेले नाही असे संबंधित संचिकेचे/अभिलेख्यांचे अवलोकन केले असता निदर्शनास येते.

२. श्री.टाक यांचा जन्मदिनांक हा १५.०६.१९४८ असून मृत्यूसमयी त्यांचे वय हे ५६ वर्षे १ महिना २५ दिवस इतके आहे.

३. श्री.टाक यांचे अंतिम वेतन प्रमाणपत्राआधारे शेवटचे वेतन हे रू.४०००/- इतके दर्शविले असून संबंधितास दि. ०१.०८.२००४ रोजी एक वेतनवाढ देय असल्याने मृत्यूच्या वेळी संबंधिताचे शेवटचे वेतन हे रू. ४०७०/- विचारात घेवून म.ना.से. (नि.वे.) नियम १९८२ चे नियम १११ व ११७ अंतर्गत नमूद तरतुदीनुसार त्यांना खालील प्रमाणे सेवाविषयक निवृत्तीवेतन/कुटुंबवेतन लाभांचे प्रदान देय होते.

| अनुज्ञेय लाभ तपशिल | प्रत्यक्ष देय रकमांचा तपशिल | अनुज्ञेय केलेल्या रकमांचा तपशिल | शेरा |
|---|---|---|---|
| १ | २ | ३ | ४ |
| **✻ कुटुंब निवृत्ती वेतन** | **३०५३/– प्र.म.** | **३०००/–** | **रू.५३– प्र.म. कमी प्रदान** |
| **मृत्यू उपदान** | **२०१४६५/–** | **१९८०००/–** | **रू.३४६५/– कमी प्रदान** |
| **अंशराशीकरण** | **––––** | **––––** | **––––** |

✻ मंजूर कुटुंब निवृत्ती वेतन हे ०९. ०८.२०११ पर्यंत असून तद्नंतर सर्वसाधारण दरानुसार (रू.१९१३/-) कुटुंब निवृत्ती वेतन प्रदान करावयाचे आहे.

वर नमूद तपशिलाप्रमाणे श्रीमती टाक यांना त्यांच्या पतीच्या मृत्यूनंतर म्हणजेच दि.११.०८.२००४ पासून कुटुंब निवृत्ती वेतन आणि निवृत्ती वेतनाचे इतर लाभ हे माहे डिसेंबर २००४ मध्ये मंजूर करण्यात आलेले असून त्यानुसार रकमांचे प्रदानही माहे डिसेंबर २००४ मध्ये करण्यात आलेले आहे. **विभागाने श्रीमती टाक यांना मंजूरीअंती** वरील रकाना .क्र.३ प्रमाणे प्रदान करण्यात आलेल्या निवृत्ती वेतन लाभाविषयी पुन्हा खातरजमा करावी आणि रकाना.क्र.२ मध्ये नमूद केल्याप्रमाणे निवृत्तीवेतना चे लाभ हे (थकबाकीसह) प्रदान करण्याच्या दृष्टीने कार्यवाही ही दि.१ मार्च २००६ पासून करून कार्यवाही अंती तसे अनुपालन सादर करण्यात यावे असे विभागास सूचित करण्यात आलेले आहे.

अद्यापपावेतो अनुपालन अप्राप्त आहे.

**परिच्छेद क्र.१२:– सेवा निवृत्ती वेतन लाभांचे कमी /अति प्रदानाबाबत:**
**श्रीमती सरसाबाई तुकाराम त्रिभूवन ,सेवानिवृत्त मजूर.**

महानगरपालिका सेवेअंतर्गत सन २००४-०५ या आर्थिक वर्षात सेवानिवृत्त झालेल्या अधिकारी/कर्मचारी यांच्या सेवानिवृत्ती वेतन प्रदान प्रकरणांची तपासणी हाती घेण्यात आली असता श्रीमती सरसाबाई तुकाराम त्रिभूवन, सेवानिवृत्त मजूर यांच्या प्रकरणांत खालील आक्षेपार्ह बाबी निदर्शनास आल्या आहेत.

१. श्रीमती त्रिभूवन ह्या दि. ०१.०७.१९८२ रोजी मजूर या पदावर महापालिका सेवेत रूजू झालेल्या असून त्या दि. ३१.०१.२००५ रोजी स्वेच्छेने सेवानिवृत्त झालेल्या आहेत. श्रीमती त्रिभूवन यांचा मजूर या पदावरील सेवाकाळ हा २२ वर्ष ७ महिने एवढा असून स्वेच्छा निवृत्त झाल्यामुळे म.ना.से. निवृत्ती वेतन १९८२ चे नियम ६६ (३) प्रमाणे अर्हताकारी सेवेचा कालावधी हा जास्तीत जास्त ५ वर्ष अनुज्ञेय होत असल्याने सेवानिवृत्ती वेतन लाभासाठी त्यांची सेवा ही २७ वर्ष ७ महिने विचारात घेवून निवृत्तीवेतन लाभांचे प्रदान करणे आवश्यक आहे. तथापि त्याप्रमाणे श्रीमती त्रिभूवन यांना लाभांचे प्रदान झालेले नाही असे संबंधित संचिकेचे / सेवा अभिलेख्यांचे अवलोकन केले असता निदर्शनास येते.

**२.** श्रीमती त्रिभूवन यांचा जन्मदिनांक हा ०१.०६.१९५५ असून सेवानिवृत्तीच्या दिवशी त्यांचे वय हे ४९ वर्षे ८ महिने इतके आहे. मात्र सेवानिवृत्त झाल्याबाबतची नोंद ही श्रीमती त्रिभूवन यांच्या सेवापटात घेतल्याचे दिसून आलेले नाही.

३. श्रीमती त्रिभूवन यांचे अंतिम वेतन प्रमाणपत्राआधारे शेवटचे वेतन हे रू.३५८०/- इतके दर्शविले असून म.ना.से. (नि.वे.) नियम १९८२ चे नियम ११० व १११ आणि म.ना.से. (अंशराशीकरण) नियम १९८४ चे नियम ५ अंतर्गत नमूद तरतुदीनुसार त्यांना खालील प्रमाणे सेवाविषयक निवृत्तीवेतन लाभांचे प्रदान देय होते.

| अनुज्ञेय लाभ तपशिल | प्रत्यक्ष देय रकमांचा तपशिल | अनुज्ञेय केलेल्या रकमांचा तपशिल | शेरा |
|---|---|---|---|
| १ | २ | ३ | ४ |
| **निवृत्ती वेतन** | **२२२५/– प्र.म.** | **२२३८/–** | **रू.१३– प्र.म. अति प्रदान** |
| **सेवा उपदान** | **७३८३८/–** | **७३८३८/–** | **-----** |
| **अंशराशीकरण** | **११७८१९/–** | **११८६१४/–** | **रू.७९५/– अति प्रदान** |

वर नमूद तपशिलाप्रमाणे श्रीमती त्रिभूवन यांना सेवा निवृत्ती नंतर दि.०१.०२.२००५ पासून निवृत्ती वेतन आणि निवृत्ती वेतनाचे इतर लाभ हे माहे मार्च २००५ मध्ये मंजूर करण्यात आलेले असून त्यानुसार रकमांचे प्रदानही माहे मार्च २००५ मध्ये करण्यात आलेले आहे. विभागाने

श्रीमती त्रिभूवन यांना मंजूरीअंती वरील रकाना .क्र.३ प्रमाणे प्रदान करण्यात आलेल्या निवृत्ती वेतन लाभाविषयी पुन्हा खातरजमा करून रकाना.क्र.२ मध्ये नमूद केल्याप्रमाणे निवृत्तीवेतनातील अतिप्रदान फ़रक रक्कम रू. ३०१/- तर अंशराशीकरण रक्कम रू.७९५/- अशी एकूण रक्क्म रू.१०९६/- ही वसूल करावी. तसेच श्रीमती त्रिभूवन यांना निवृत्ती वेतन रकमेपोटी अति प्रदान रक्कम रू. १३/- प्रमाणे रक्कम रू.३०१/- वसूल करून दि.१ मार्च २००६ पासून सुधारित दराने निवृत्ती वेतन प्रदान करण्याची कार्यवाही करावी आणि कार्यवाही अंती तसे अनुपालन सादर करण्यात यावे असे विभागास सूचित करण्यात आलेले आहे.

अद्यापपावेतो अनुपालन अप्राप्त आहे.

**परिच्छेद क्र.१३:– सेवा निवृत्ती वेतन लाभांचे कमी /अति प्रदानाबाबत:**
**श्री .ज्ञानदेव कार्तिक बोरोले सेवानिवृत्त सह शिक्षक.**

महानगरपालिका सेवेअंतर्गत सन २००४-०५ या आर्थिक वर्षात सेवानिवृत्त झालेल्या अधिकारी/ कर्मचारी यांच्या सेवानिवृत्ती वेतन प्रदान प्रकरणांची तपासणी हाती घेण्यात आली असता श्री. ज्ञानदेव कार्तिक बोरोले सेवानिवृत्त सह शिक्षिक यांच्या प्रकरणांत खालील आक्षेपार्ह बाबी निदर्शनास आल्या आहेत.

१. श्री. बोरोले हे दि. १०.०८.१९७१ रोजी सह शिक्षक या पदावर महापालिका सेवेत रूजू झालेले असून ते दि. ३०.०९.२००४ रोजी स्वेच्छेने सेवानिवृत्त झालेले असून त्यांचा सह शिक्षक या पदावरील सेवाकाळ हा ३३ वर्ष १ महिना २१ दिवस एवढा असून त्यानुसार त्यांची सेवा विचारात घेवून त्यांना निवृत्तीवेतन लाभांचे प्रदान करणे आवश्यक आहे. तथापि त्याप्रमाणे श्री.बोरोले यांना लाभांचे प्रदान झालेले नाही असे संबंधित संचिकेचे /सेवा अभिलेख्यांचे अवलोकन केले असता निदर्शनास येते.

२. श्री.बोरोले यांचा जन्मदिनांक हा २४.०८.१९४७ असून सेवानिवृत्तीच्या दिवशी त्यांचे वय हे ५७ वर्षे १ महिना ७ दिवस इतके आहे.

३. श्री.बोरोले यांचे अंतिम वेतन प्रमाणपत्राआधारे शेवटचे वेतन हे रू.७२५०/- इतके असून म.ना.से. (नि.वे.) नियम १९८२ चे नियम ११० व १११ आणि म.ना.से. (अंशराशीकरण) नियम १९८४ चे नियम ५ अंतर्गत नमूद तरतुदीनुसार त्यांना खालील प्रमाणे सेवाविषयक निवृत्तीवेतन लाभांचे प्रदान देय होते.

| अनुज्ञेय लाभ तपशिल | प्रत्यक्ष देय रकमांचा तपशिल | अनुज्ञेय केलेल्या रकमांचा तपशिल | शेरा |
|---|---|---|---|
| १ | २ | ३ | ४ |
| **निवृत्ती वेतन** | **५४२५/– प्र.म.** | **५४३८/–** | **रू.१३– प्र.म. अति प्रदान** |

| | | | |
|---|---|---|---|
| **सेवा उपदान** | **१७९४३८/-** | **१७९४३८/-** | **----** |
| **अंशराशीकरण** | **२३३८८३/-** | **२३४४००/-** | **रू.५१७/- अति प्रदान** |

वर नमूद तपशिलाप्रमाणे श्री. बोरोले यांना सेवा निवृत्ती नंतर दि.०१.१०.२००४ पासून निवृत्ती वेतन आणि निवृत्ती वेतनाचे इतर लाभ हे माहे जानेवारी २००५ मध्ये मंजूर करण्यात आलेले असून त्यानुसार रकमांचे प्रदानही माहे जानेवारी २००५ मध्ये करण्यात आलेले आहे. विभागाने श्री.बोरोले यांना मंजूरीअंती वरील रकाना .क्र.३ प्रमाणे प्रदान करण्यात आलेल्या निवृत्ती वेतन लाभाविषयी पुन्हा खातरजमा करून रकाना.क्र.२ मध्ये नमूद केल्याप्रमाणे निवृत्तीवेतनातील अति प्रदान फ़रक रक्कम रू. ३८९/- , तर अंशराशीकरण रक्कम रू.५१७/- अशी एकूण रक्कम रू.९०६/- वसूल करणे आहे . तसेच संबंधित श्री.बोरोले यांना निवृत्ती वेतन रकमेपोटी अति प्रदान रक्कम रू.१३/-प्र.म.प्रमाणे रक्कम रू.३८९/- वसूल करून १ मार्च २००६ पासून सुधारित दराने निवृत्ती वेतन प्रदान करण्याची कार्यवाही करावी आणि कार्यवाही अंती तसे अनुपालन सादर करण्यात यावे असे विभागास सूचित करण्यात आलेले आहे.

अद्यापपावेतो अनुपालन अप्राप्त आहे.

**परिच्छेद क्र.१४:- सेवा निवृत्ती वेतन लाभांचे कमी /अति प्रदानाबाबत:**
**श्रीमती अहिल्याबाई सांडु लाठे ,सेवानिवृत्त मजूर.**

महानगरपालिका सेवेअंतर्गत सन २००४-०५ या आर्थिक वर्षात सेवानिवृत्त झालेल्या अधिकारी/कर्मचारी यांच्या सेवानिवृत्ती वेतन प्रदान प्रकरणांची तपासणी हाती घेण्यात आली असता श्रीमती अहिल्याबाई सांडू लाठे, सेवानिवृत्त मजूर यांच्या प्रकरणांत खालील आक्षेपार्ह बाबी निदर्शनास आल्या आहेत.

१. श्रीमती लाठे ह्या दि. ०१.०७.१९८२ रोजी मजूर या पदावर महापालिका सेवेत रूजू झालेल्या असून त्या दि. ३१.१२.२००४ रोजी स्वेच्छेने सेवानिवृत्त झालेल्या आहेत. श्रीमती लाठे यांचा मजूर या पदावरील सेवाकाळ हा २२ वर्ष ६ महिने एवढा असून स्वेच्छा सेवा निवृत्त झाल्यामुळे म.ना.से. निवृत्ती वेतन १९८२ चे नियम६६(३) प्रमाणे अर्हताकारी सेवेचा कालावधी हा जास्तीत जास्त ५ वर्ष अनुज्ञेय होत असल्याने सेवानिवृत्ती वेतन लाभासाठी त्यांची सेवा ही २७ वर्ष ६ महिने विचारात घेवून निवृत्तीवेतन लाभांचे प्रदान करणे आवश्यक आहे. तथापि त्याप्रमाणे श्रीमती लाठे यांना लाभांचे प्रदान झालेले नाही असे संबंधित संचिकेचे / सेवा अभिलेख्यांचे अवलोकन केले असता निदर्शनास येते.

२. श्रीमती लाठे यांचा जन्मदिनांक हा ०१.०६.१९५९ असून सेवानिवृत्तीच्या दिवशी त्यांचे वय हे ४५ वर्षे ७ महिने इतके आहे.

३. श्रीमती लाठे यांचे अंतिम वेतन प्रमाणपत्राआधारे शेवटचे वेतन हे रू.३६५०/- इतके असून म.ना.से. (नि.वे.) नियम १९८२ चे नियम ११० व १११ आणि म.ना.से.

(अंशराशीकरण) नियम १९८४ चे नियम ५ अंतर्गत नमूद तरतुदीनुसार त्यांना खालील प्रमाणे सेवाविषयक निवृत्तीवेतन लाभांचे प्रदान देय होते.

| अनुज्ञेय लाभ तपशिल | प्रत्यक्ष देय रकमांचा तपशिल | अनुज्ञेय केलेल्या रकमांचा तपशिल | शेरा |
|---|---|---|---|
| १ | २ | ३ | ४ |
| **निवृत्ती वेतन** | **२२६४/- प्र.म.** | **२२८२/-** | **रू.१८- प्र.म. अति प्रदान** |
| **सेवा उपदान** | **७५२८१/-** | **७५२८१/-** | **-----** |
| **अंशराशीकरण** | **१३००२०/-** | **१२८५९२/-** | **रू.१४२८/- कमी प्रदान** |

वर नमूद तपशिलाप्रमाणे श्रीमती लाठे यांना सेवा निवृत्ती नंतर दि.०१.०१.२००५ पासून निवृत्ती वेतन आणि निवृत्ती वेतनाचे इतर लाभ हे माहे फ़ेब्रुवारी २००५ मध्ये मंजूर करण्यात आलेले असून त्यानुसार रकमांचे प्रदानही माहे फ़ेब्रुवारी २००५ मध्ये करण्यात आलेले आहे. विभागाने श्रीमती लाठे यांना मंजूरीअंती वरील रकाना .क्र.३ प्रमाणे प्रदान करण्यात आलेल्या निवृत्ती वेतन लाभाविषयी पुन्हा खातरजमा करून रकाना.क्र.२ मध्ये नमूद केल्याप्रमाणे निवृत्तीवेतनातील अतिप्रदान रक्कम रू. ४४३/ वसूल करावयाची आहे, तर अंशराशीकरण रक्कम रू.१४२८/- ही प्रदान करावयाची आहे. परिणामी श्रीमती लाठे यांना निवृत्ती वेतन रकमेपोटी अति प्रदान रक्कम रू. ४४३/-वजा जाता उर्वरित रक्कम रू. ९८५/-(अंशराशिकरण रकमेचे प्रदान) प्रदान करणे आहे. तद्‌वतच श्रीमती लाठे यांना वर नमूद केलेल्या तपशिला प्रमाणे दि.१ मार्च २००६ पासून सुधारित दराने निवृत्ती वेतनाचे प्रदान करण्यात यावे आणि कार्यवाही अंती तसे अनुपालन सादर करण्यात यावे असे विभागास सूचित करण्यात आलेले आहे.

अद्यापपावेतो अनुपालन अप्राप्त आहे.

**<u>परिच्छेद क्र.१५:-</u> <u>सेवा निवृत्ती वेतन लाभांचे कमी /अति प्रदानाबाबत:</u>**
**<u>श्रीमती म्हाळसाबाई सांडुजी नावकर ,सेवानिवृत्त मजूर.</u>**

महानगरपालिका सेवेअंतर्गत सन २००४-०५ या आर्थिक वर्षात सेवानिवृत्त झालेल्या अधिकारी/कर्मचारी यांच्या सेवानिवृत्ती वेतन प्रदान प्रकरणांपैकी अभिलेख कक्षाकडून प्राप्त प्रकरणांची तपासणी हाती घेण्यात आली असता श्रीमती म्हाळसाबाई सांडुजी नावकरे, सेवानिवृत्त मजूर यांच्या प्रकरणांत खालील आक्षेपार्ह बाबी निदर्शनास आल्या आहेत.

१. श्रीमती नावकर ह्या दि. ०१.०७.१९८२ रोजी मजूर या पदावर महापालिका सेवेत रूजू झालेल्या असून त्या दि. ३१.१०.२००४ रोजी स्वेच्छेने सेवानिवृत्त झालेल्या आहेत. श्रीमती नावकर यांचा मजूर या पदावरील सेवाकाळ हा २२ वर्ष ४ महिने एवढा असून स्वेच्छा सेवा निवृत्त झाल्यामुळे म.ना.से. निवृत्ती वेतन १९८२ चे नियम६६(३) प्रमाणे अर्हताकारी सेवेचा कालावधी हा जास्तीत जास्त

५ वर्ष अनुज्ञेय होत असल्याने सेवानिवृत्ती वेतन लाभासाठी त्यांची सेवा ही २७ वर्ष ४ महिने विचारात घेवून निवृत्तीवेतन लाभांचे प्रदान करणे आवश्यक आहे. तथापि त्याप्रमाणे श्रीमती नावकर यांना लाभांचे प्रदान झालेले नाही असे संबंधित संचिकेचे /सेवा अभिलेख्यांचे अवलोकन केले असता निदर्शनास येते.

२. श्रीमती नावकरे यांचा जन्मदिनांक हा ०१.०६.१९५० असून सेवानिवृत्तीच्या दिवशी त्यांचे वय हे ५४ वर्षे ५ महिने इतके आहे.

३. श्रीमती नावकर यांचे अंतिम वेतन प्रमाणपत्राआधारे शेवटचे वेतन हे रू.३५१०/- इतके दर्शविले असून संबंधितास दि.०१.०७.२००४ रोजी एक वेतनवाढ देय असल्याने (सेवापटात वेतनवाढ नोंद नाही )श्रीमती नावकर यांचे शेवटचे वेतन हे रू.३५८०/- विचारात घेवून म.ना.से. (नि.वे.) नियम १९८२ चे नियम ११० व १११ आणि म.ना.से. (अंशराशीकरण) नियम १९८४ चे नियम ५ अंतर्गत नमूद तरतुदीनुसार त्यांना खालील प्रमाणे सेवाविषयक निवृत्तीवेतन लाभांचे प्रदान देय होते.

| अनुज्ञेय लाभ तपशिल | प्रत्यक्ष देय रकमांचा तपशिल | अनुज्ञेय केलेल्या रकमांचा तपशिल | शेरा |
|---|---|---|---|
| १ | २ | ३ | ४ |
| **निवृत्ती वेतन** | **२२१२/- प्र.म.** | **२२३८/-** | **रू.२६- प्र.म. अति प्रदान** |
| **सेवा उपदान** | **७३८३८/-** | **७३८३८/-** | **-----** |
| **अंशराशीकरण** | **१०३७४०/-** | **१०२२३२/-** | **रू.१५०८/- कमी प्रदान** |

वर नमूद तपशिलाप्रमाणे श्रीमती नावकर यांना सेवा निवृत्ती नंतर दि.०१.११.२००४ पासून निवृत्ती वेतन आणि निवृत्ती वेतनाचे इतर लाभ हे माहे फ़ेब्रुवारी २००५ मध्ये मंजूर करण्यात आलेले असून त्यानुसार रकमांचे प्रदानही माहे फ़ेब्रुवारी २००५ मध्ये करण्यात आलेले आहे. विभागाने श्रीमती नावकर यांना मंजूरीअंती वरील रकाना .क्र.३ प्रमाणे प्रदान करण्यात आलेल्या निवृत्ती वेतन लाभाविषयी पुन्हा खातरजमा करून रकाना.क्र.२ मध्ये नमूद केल्याप्रमाणे निवृत्तीवेतनातील अतिप्रदान रक्कम रू. ७१९/ वसूल करावयाची आहे, तर अंशराशीकरण रक्कम रू.१५०८/- ही प्रदान करावयाची आहे. परिणामी श्रीमती नावकर यांना निवृत्ती वेतन रकमेपोटी अति प्रदान रक्कम रू. ७१९/- वजा जाता उर्वरित रक्कम रू. ७८९/ (अंशराशिकरण रकमेचे प्रदान) प्रदान करणे आहे. तद्वतच श्रीमती नावकर यांना वर नमूद केलेल्या तपशिला प्रमाणे दि.१ मार्च २००६ पासून सुधारित दराने निवृत्ती वेतनाचे प्रदान करण्यात यावे आणि कार्यवाही अंती तसे अनुपालन सादर करण्यात यावे असे विभागास सूचित करण्यात आलेले आहे.

अद्यापपावेतो अनुपालन अप्राप्त आहे.

**परिच्छेद क्र.१६:- सेवा निवृत्ती वेतन लाभांचे कमी /अति प्रदानाबाबत:**

**श्रीमती रेवबाई कचरू हिवाळे ,सेवानिवृत्त मजूर.**

महानगरपालिका सेवेअंतर्गत सन २००४-०५ या आर्थिक वर्षात सेवानिवृत्त झालेल्या अधिकारी/कर्मचारी यांच्या सेवानिवृत्ती वेतन प्रदान प्रकरणांपैकी अभिलेख कक्षाकडून प्राप्त प्रकरणांची तपासणी हाती घेण्यात आली असता श्रीमती रेवबाई कचरू हिवाळे, सेवानिवृत्त मजूर यांच्या प्रकरणांत खालील आक्षेपार्ह बाबी निदर्शनास आल्या आहेत.

१. श्रीमती हिवाळे ह्या दि. ०६.०७.१९७५ रोजी मजूर या पदावर महापालिका सेवेत रूजू झालेल्या असून त्या दि. ३१.०७.२००४ रोजी स्वेच्छेने सेवानिवृत्त झालेल्या आहेत. श्रीमती हिवाळे यांचा मजूर या पदावरील सेवाकाळ हा २९वर्ष २५ दिवस एवढा असून स्वेच्छा सेवा निवृत्त झाल्यामुळे म.ना.से. निवृत्ती वेतन १९८२ चे नियम६६(३) प्रमाणे अर्हताकारी सेवेचा कालावधी हा जास्तीत जास्त ३ वर्ष अनुज्ञेय होत असल्याने सेवानिवृत्ती वेतन लाभासाठी त्यांची सेवा ही ३२ वर्ष २५ दिवस विचारात घेवून निवृत्तीवेतन लाभांचे प्रदान करणे

आवश्यक आहे. तथापि त्याप्रमाणे श्रीमती हिवाळे यांना लाभांचे प्रदान झालेले नाही असे संबंधित संचिकेचे /सेवा अभिलेख्यांचे अवलोकन केले असता निदर्शनास येते.

**२.** श्रीमती हिवाळे यांचा जन्मदिनांक हा ०२.०७.१९४७ असून सेवानिवृत्तीच्या दिवशी त्यांचे वय हे ५७ वर्षे २९ दिवस इतके आहे. मात्र सेवानिवृत्त झाल्याबाबतची नोंद ही श्रीमती हिवाळे यांच्या सेवापटात घेतल्याचे दिसून आलेले नाही.

३. श्रीमती हिवाळे यांचे अंतिम वेतन प्रमाणपत्राआधारे शेवटचे वेतन हे रू.३६५०/- इतके असून म.ना.से. (नि.वे.) नियम १९८२ चे नियम ११० व १११ आणि म.ना.से. (अंशराशीकरण) नियम १९८४ चे नियम ५ अंतर्गत नमूद तरतुदीनुसार त्यांना खालील प्रमाणे सेवाविषयक निवृत्तीवेतन लाभांचे प्रदान देय होते.

| अनुज्ञेय लाभ तपशिल | प्रत्यक्ष देय रकमांचा तपशिल | अनुज्ञेय केलेल्या रकमांचा तपशिल | शेरा |
|---|---|---|---|
| १ | २ | ३ | ४ |
| **निवृत्ती वेतन** | **१७७७/- प्र.म.** | **१८३२/-** | **रू.५५- प्र.म. अति प्रदान** |
| **सेवा उपदान** | **५९५२०/-** | **६१३८०/-** | **रू.१८६०/- अति प्रदान** |
| **अंशराशीकरण** | **७६५८१/-** | **७६५६७/-** | **रू.१४/- कमी प्रदान** |

वर नमूद तपशिलाप्रमाणे श्रीमती हिवाळे यांना सेवा निवृत्ती नंतर दि.०१.०८ .२००४ पासून निवृत्ती वेतन आणि निवृत्ती वेतनाचे इतर लाभ हे माहे ऑक्टोबर २००४ मध्ये मंजूर करण्यात आलेले असून त्यानुसार रकमांचे प्रदानही माहे ऑक्टोबर २००४ मध्ये करण्यात आलेले आहे. विभागाने श्रीमती हिवाळे यांना मंजूरीअंती वरील रकाना .क्र.३ प्रमाणे प्रदान करण्यात आलेल्या निवृत्ती वेतन लाभाविषयी पुन्हा खातरजमा करून

रकाना.क्र.२ मध्ये नमूद केल्याप्रमाणे निवृत्तीवेतनातील अतिप्रदान रक्कम रू. १८०९/ व उपदानातील अति प्रदान रक्कम रू. १८६०/- अशी एकूण रक्कम रू. ३६६९/- ही वसूल करावयाची आहे, तर अंशराशिकरण रक्कम रू. १४/- ही प्रदान करावयाची आहे. परिणामी श्रीमती हिवाळे यांना निवृत्ती वेतन व उपदान रकमेपोटी अति प्रदान रक्कम रू. ३६६९/- मधून देय अंशराशिकरण रक्कम रू.१४/- वजा जाता उर्वरित रक्कम रू. ३६५५/- एवढी वसूल करणे आहे. तद्वतच श्रीमती हिवाळे यांना वर नमूद केलेल्या तपशिला प्रमाणे दि.१ मार्च २००६ पासून सुधारित दराने निवृत्ती वेतनाचे प्रदान करण्यात यावे आणि कार्यवाही अंती तसे अनुपालन सादर करण्यात यावे असे विभागास सूचित करण्यात आलेले आहे.

अद्यापपावेतो अनुपालन अप्राप्त आहे.

**परिच्छेद क्र.१७:- सेवा निवृत्ती वेतन लाभांचे कमी /अति प्रदानाबाबत:**

**श्रीमती केशरबाई किसन उमप ,सेवानिवृत्त मजूर.**

महानगरपालिका सेवेअंतर्गत सन २००४-०५ या आर्थिक वर्षात सेवानिवृत्त झालेल्या अधिकारी/कर्मचारी यांच्या सेवानिवृत्ती वेतन प्रदान प्रकरणांपैकी अभिलेख कक्षाकडून प्राप्त प्रकरणांची तपासणी हाती घेण्यात आली असता श्रीमती केशरबाई किसन उमप, सेवानिवृत्त मजूर यांच्या प्रकरणांत खालील आक्षेपार्ह बाबी निदर्शनास आल्या आहेत.

१. श्रीमती उमप ह्या दि. ०६.०५.१९७५ रोजी मजूर या पदावर महापालिका सेवेत रूजू झालेल्या असून त्या दि. ३०.०६.२००४ रोजी स्वेच्छेने सेवानिवृत्त झालेल्या आहेत. श्रीमती उमप यांचा मजूर या पदावरील सेवाकाळ हा २९ वर्ष ०१ महिना २६ दिवस एवढा असून स्वेच्छा सेवा निवृत्त झाल्यामुळे म.ना.से. निवृत्ती वेतन १९८२ चे नियम ६६(३) प्रमाणे अर्हताकारी सेवेचा कालावधी हा जास्तीत जास्त १ वर्ष १ महिना वर्ष अनुज्ञेय होत असल्याने सेवानिवृत्ती वेतन लाभासाठी त्यांची सेवा ही ३० वर्ष २ महिने २६ दिवस विचारात घेवून निवृत्तीवेतन लाभांचे प्रदान करणे आवश्यक आहे. तथापि त्याप्रमाणे श्रीमती उमप यांना लाभांचे प्रदान झालेले नाही असे संबंधित संचिकेचे / सेवा अभिलेख्यांचे अवलोकन केले असता निदर्शनास येते.

**२.** श्रीमती उमप यांचा जन्मदिनांक हा ०२.०७.१९४५ असून सेवानिवृत्तीच्या दिवशी त्यांचे वय हे ५८ वर्षे ११ महिने ३० दिवस इतके आहे.

३. श्रीमती उमप यांचे अंतिम वेतन प्रमाणपत्राआधारे शेवटचे वेतन हे रू.३७२०/- इतके असून म.ना.से. (नि.वे.) नियम १९८२ चे नियम ११० व १११ आणि म.ना.से. (अंशराशीकरण) नियम १९८४ चे नियम ५ अंतर्गत नमूद तरतुदीनुसार त्यांना खालील प्रमाणे सेवाविषयक निवृत्तीवेतन लाभांचे प्रदान देय होते.

| अनुज्ञेय लाभ तपशिल | प्रत्यक्ष देय रकमांचा तपशिल | अनुज्ञेय केलेल्या रकमांचा तपशिल | शेरा |
|---|---|---|---|
| १ | २ | ३ | ४ |
| **निवृत्ती वेतन** | **१६६३/- प्र.म.** | **१८२९/-** | **रू.१६६-प्र.म.अति प्रदान** |
| **सेवा उपदान** | **५५८००/-** | **६१३८०/-** | **रू.५५८०/- अति प्रदान** |
| **अंशराशीकरण** | **५९५३८/-** | **७६४४२/-** | **रू.६९०४/- अति प्रदान** |

वर नमूद तपशिलाप्रमाणे श्रीमती उमप यांना सेवा निवृत्ती नंतर दि.०१.०७ .२००४ पासून निवृत्ती वेतन आणि निवृत्ती वेतनाचे इतर लाभ हे माहे सप्टेंबर २००४ मध्ये मंजूर करण्यात आलेले असून त्यानुसार रकमांचे प्रदानही माहे सप्टेंबर २००४ मध्ये करण्यात आलेले आहे. विभागाने श्रीमती उमप यांना मंजूरीअंती वरील रकाना .क्र.३ प्रमाणे प्रदान करण्यात आलेल्या निवृत्ती वेतन लाभाविषयी पुन्हा खातरजमा करून रकाना.क्र.२ मध्ये नमूद केल्याप्रमाणे निवृत्तीवेतनातील अतिप्रदान रक्कम रू. ५४२८/ , उपदानातील अति प्रदान रक्कम

रू.५५८०/- आणि अंशराशिकरण अतिप्रदान रक्क्म रू.६९०४/- अशी एकत्रित रक्क्म रू. १७९१२/- वसूल करावयाची आहे. तद्‌वतच श्रीमती उमप यांना वर नमूद केलेल्या तपशिला प्रमाणे दि.१ मार्च २००६ पासून सुधारित दराने निवृत्ती वेतनाचे प्रदान करण्यात यावे आणि कार्यवाही अंती तसे अनुपालन सादर करण्यात यावे असे विभागास सूचित करण्यात आलेले आहे.

अद्यापपावेतो अनुपालन अप्राप्त आहे.

**परिच्छेद क्र.१८/– सेवा निवृत्ती वेतन /कुटुंबनिवृत्ती वेतन प्रदान प्रकरणातील अनियमितता बाबत.**

१. सुखदेव भागाजी गायकवाड, सेवानिवृत्त मजूर हे दि.३०.४.२००४ रोजी नियत वयोमानानुसार सेवानिवृत्त झालेले आहेत. तथापि त्याबाबतची नोंद ही संबंधिताचे सेवापटात घेण्यात आलेली नाही.

२. श्रीमती गिताबाई किशन कांबळे, सेवानिवृत्त मजूर ह्या दि.३१.८.२००३ रोजी स्वेच्छेने सेवानिवृत्त झालेल्या आहेत. तथापि त्यांच्या सेवापटातील ०१.०१.१९८६ व ०१.०१.१९९६ रोजी करण्यात आलेल्या वेतननिश्चिती बाबतची वेतन पडताळणी ही मुख्य लेखा परीक्षक यांचेकडून करण्यात आलेली नाही.

३. श्रीमती मलिका बेगम मो.नवाझ खॉन, सेवानिवृत्त शिक्षिका ह्या दि.३१.१२.२००४ रोजी नियत वयोमाना नुसार सेवानिवृत्त झालेल्या आहेत. मात्र सेवानिवृत्त झाल्याबाबतची नोंद ही संबंधिताच्या सेवापटात घेण्यात आलेली नाही.

४. श्री. बबन कोंडीबा उमप , मजूर, हे दि.२४.९.२००४ रोजी सेवेत असतांना मयत झालेले आहेत. तथापि त्याबाबतची नोंद ही संबंधिताचे सेवापटात घेण्यात आलेली नाही.

५. श्री. दत्ता माधवराव भारती , ड्रेसर हे दि.७.५.२००४ रोजी मयत झालेले असून त्याबाबतची नोंद ही संबंधिताचे सेवापटात घेण्यात आलेली नाही.

६. श्रीमती जयंतीदेवी ललित जोशील, सहशिक्षिका ह्या दि.२५.८.२००४ रोजी मयत झालेल्या असून त्याबाबतची नोंद ही त्यांच्या सेवापटात घेण्यात आलेली नाही.

वर नमूद केलेनुसार संबंधित निवृत्त्ती वेतन/कुटुंब निवृत्ती वेतन धारकांचे मूळ सेवापटात नोंदी घेवून कार्यवाहीअंती अनुपालन सादर करावे.

**मुख्य लेखाधिकारी/ उपआयुक्त (प्र) यांनी उर्वरीत प्रकरणाचे पुनर्विलोकन करून निवृत्तीवेतन / कुटुंबनिवृत्ती वेतन लाभांचे प्रदान हे अचूक झालेले आहे याबाबत खातरजमा करावी आणि कार्यवाहीअंती तसे अनुपालन सादर करावे. शिवाय भविष्यात असे होवू नये यादृष्टीने महाराष्ट्र नागरी सेवा (निवृत्ती वेतन ) १९८२ अंतर्गत तरतुदीनुसार अचूक कार्यवाही होईल असेही पहावे.**

## आरोग्य विभाग
## जमा बाजू लेखा परीक्षण

सन २००३-२००४ या वर्षातील अभिलेख्यांचे थकीत लेखा परीक्षण व सन २००४-२००५ या वर्षाच्या नियमित लेखा परीक्षणांमध्ये जमा बाजूच्या अभिलेख्यांची तपासणी हाती घेण्यांत आली असून, त्याबाबतचा तपशील हा खालील प्रमाणे आहे.

**परिच्छेद क्र.१ :- विहीत मुदतीत नोंदणी न केल्यामुळे दंडाची रक्कम वसूलीबाबत: रू.१५००/-**

सन २००३-२००४ व २००४-२००५ मध्ये महानगरपालिका हद्दीतील नर्सिंग होम रजिस्ट्रेशन व नुतनीकरणाबाबतच्या एकूण ७५ संचिकांची तपासणी करण्यांत आली. तपासणीअंती, खालील आक्षेपार्ह बाबी निदर्शनास आल्या आहेत.

- डॉ.मनिषा गजहास , गजहास हॉस्पिटल, एन-११,औरंगाबाद यांनी सन २००३-२००४ या वर्षासाठी विहीत मुदतीत नोंदणी न केल्यामुळे, संबंधिताकडून महत्तम दंडाची रक्कम रू.५००/- वसूल करण्यांत आली नाही.
- शाकेरा हॉस्पिटल ॲन्ड मॅटेर्निटी होम, फ़ाजलपुरा,औरंगाबाद यांनी सन २००३-२००४ या वर्षासाठी विहीत मुदतीत नोंदणी न केल्यामुळे, संबंधिताकडून महत्तम दंडाची रक्कम रू.५००/- वसूल करण्यांत आली नाही.
- जबीन नर्सिंग होम, भाजी मंडी, रेल्वे स्टेशनजवळ, औरंगाबाद यांनी सन २००३-२००४ या वर्षासाठी विहीत मुदतीत नोंदणी न केल्यामुळे, संबंधिताकडून महत्तम दंडाची रक्कम रू.५००/- वसूल करण्यांत आली नाही.

  वरीलप्रमाणे एकूण दंडाची रक्कम रू.१५००/- संबंधिताकडून तात्काळ वसूल करून विभागाने अनुपालन अहवाल सादर करावा असे विभागास सूचित करण्यात आलेले आहे. विभागाने दिनांक १७.१२.२००५ रोजी अनुपालन सादर केले असून आक्षेपित रक्कम रू.१५००/- ही संबंधिताकडून वसूल करण्यात आल्यामुळे परिच्छेद वगळण्यात येत आहे.

**परिच्छेद क्र.२:- अन्न व भेसळ परवाना रकमेच्या कमी वसूलीबाबत :रू.१००/-**

सन २००३-२००४ व २००४-२००५ या कालावधीतील अन्न व भेसळ परवाना अंतर्गत ५२३ परवाने देण्यांत आले असून, तपासणीअंती एक आक्षेप निदर्शनास आला आहे.

- श्री.आसेफ़ खान युसुफ़ खान, स्टार टी हाऊस, रशिदपुरा, औरंगाबाद यांचेकडून सन १९९८-१९९९ ते २०००-२००१ या वर्षासाठी परवाना फ़ी रू.१८५/- प्रती वर्ष या प्रमाणे

रू.५५५/- ऐवजी रू,४५५/-एवढी रक्कम ही दि.१८.१.२००५ रोजी वसूल करण्यांत आले. परिणामी रू.१००/- कमी भरणा करण्यांत आले.

सदरची रक्कम ही तात्काळ वसूल करून अनुपालन अहवाल सादर करावा असे विभागास सूचित करण्यात आलेले आहे. विभागाने दिनांक १७.१२.२००५ रोजी अनुपालन सादर केले असून आक्षेपित रक्कम रू.१००/- ही पावती क्र.१३६७१८, दिनांक २८.९.२००५ अन्वये संबंधिताकडून वसूल करण्यात आल्यामुळे परिच्छेद वगळण्यात येत आहे.

**परिच्छेद क्र.३:- जन्म -मृत्यू प्रमाणपत्र वितरण कक्षाकडील अभिलेख्यांबाबत.**

- जन्म -मृत्यु प्रमाणपत्र वितरण कक्षाकडे भांडार विभागाकडून प्राप्त झालेल्या सर्वसाधारण पावती पुस्तकांसाठी स्वतंत्र साठा नोंदवही ठेवण्यांत आलेली नाही.
- जन्म-मृत्यु प्रमाणपत्र वितरण प्रित्यर्थ जमा रकमेच्या नोंद वहीमध्ये शेवटच्या पृष्ठावर सक्षम अधिकाऱ्याने पृष्ठांकित केल्याबाबतचे प्रमाणपत्र दिलेले नाही.
- सन २००३-२००४ मध्ये पावती पुस्तक क्र.३१७ ते ३२१,३८२ ते ३८६,४६४ ते ४६७, २४६ ते २४७,२५८ ते २६३,२६६,६०५ ते ६०९,६७८ ते ६८० व ६९७ असे एकूण ३२ पावती पुस्तकाद्वारे वसूली करण्यांत आली असून, पावती पुस्तक क्र.२४६ ते २४७, २५८ ते २६३ व २६६ असे एकूण ०९ पावती पुस्तके ही भांडार विभागाने माहे ऑक्टोबर-२००१ मध्ये निर्गमित केल्याचे निदर्शनास आले आहे. त्यामुळे सदरचे पुस्तके ही दोन वर्षाच्या अवधीनंतर वसूलीसाठी उपयोगात का आणण्यांत आली, याबाबत विभागाने खुलासा करणे आवश्यक आहे.
- दैनंदिन वसूली नोंदवही पृष्ठ क्र.३५ वर पुस्तक क्र.३८६ मधील पावती क्र.०३८५७६ या पावतीची दुसरी प्रत नसल्यामुळे रद्द करण्यांत आल्याची नोंद घेण्यात आली आहे. मात्र संबंधित पावती रद्द करण्याबाबत भांडार विभागाने पावती पुस्तक निर्गमित करतांना कोणताही शेरा नोंदविलेला नाही. तसेच सदरची पावती ही याच पुस्तकांमध्ये संबंधितास देण्यांत आल्याचे निदर्शनास आले आहे. मात्र सदरच्या पावती आधारे रक्कम वसूल केली किंवा कसे, याचा बोध होत नाही.
- जन्म -मृत्यु प्रमाणपत्र वितरण कक्षाकडील पावती पुस्तक क्र.४६३ अन्वये वसूल करण्यांत आलेल्या रकमेची नोंद वेळोवेळी कॅश रजिस्टर मध्ये घेवून, महानगरपालिका फ़ंडात रक्कम जमा करण्यांत आलेली आहे. मात्र सदरचे पावती पुस्तक हे लेखा परिक्षणास्तव उपलब्ध करून देण्यांत आलेले नसल्यामुळे, त्याद्वारे वसूल केलेल्या रकमेची सत्यता पडताळता आलेली नाही.

वरील सर्व आक्षेपांबाबत विभागाने पुर्तता करावी, शिवाय भविष्यात अशा प्रकारच्या त्रुटी राहणार नाहीत, याबाबत सर्व संबंधितांना सुचना करून अनुपालन सादर करावे असे सूचित करण्यात आलेले आहे. विभागाने दिनांक १७.१२.२००५ रोजी अनुपालन सादर केले

असून वसूल रकमेबाबत खातरजमा करण्यासाठी पावती पुस्तक क्र. ४६३ पडताळणीस्तव सादर करण्यात आलेले नाही.

**परिच्छेद क्र.४:-** **वसूलीअंती महानगरपालिका फ़ंडात रक्कम भरणा न केल्याबाबत: रू.४,४०५/-**

विविध आरोग्य केंद्रामार्फ़त तपासणी फ़ी, नोंदणी फ़ी इत्यादी रक्कम वसूलीबाबतचे अभिलेखे तपासण्यांत आले आहे. तपासणीअंती ज्या आरोग्य केंद्रातील अभिलेख्यांमध्ये आक्षेपार्ह बाबी निदर्शनास आलेल्या आहेत, त्याबाबतचा तपशिल खालीलप्रमाणे आहे.

- एन-८ हॉस्पिटल येथे पावती क्र.५०६/५०५२७ दि.९.१.२००४ अन्वये रू.१००/- वसूल करण्यांत आले. मात्र सदरची रक्कम अद्यापपावेतो महानगरपालिका फ़ंडात जमा करण्यांत आलेली नाही.
- एन-८ हॉस्पिटल येथे पावती क्र.३७६/३७५८५ दि.४.८.२००३ अन्वये रू.५०/- व पावती क्र.६९१/६९०५२ दि.१५.३.२००४ अन्वये रू.२५/- वसूल करण्यांत आले असून, सदरची एकत्रित रक्कम रू.७५/- अद्यापपावेतो महानगरपालिका फ़ंडात जमा करण्यांत आलेली नाही.
- कैसर कॉलनी येथील नोंदणी फ़ी वसूली कर्मचाऱ्याने दि.२७.८.२००३ ते दि.२४.९.२००३ पर्यंत नोंदणी फ़ी पोटी वसूल केलेली रक्कम रू.४,१५०/- ही अद्यापपावेतो महानगरपालिका फ़ंडात जमा करण्यांत आलेली नाही. त्यामुळे संबंधिताने सदरच्या रकमेचा अपहार केला असल्याचे निदर्शनास येते. सदरची बाब ही या विभागाकडील गोपनिय जा.क्र.मनपा/मुलेप/२००५/११४,दि.२.९.२००५ अन्वये मा.आयुक्त यांना कळविण्यात आली आहे.
- एन-११ आरोग्य केंद्र येथील पॅथॉलोजी लॅब चाचणी फ़ी ची रक्कम ही पावती क्र.३४३/३४२९५ अन्वये रू.२०/- पावती क्र.३४३/३४३०० अन्वये रू.२०/- व पावती क्र.४८०/४७९८७ अन्वये रू.४०/- वसूल करण्यांत आले. सदरची एकत्रित रक्कम रू.८०/- ही अद्यापपावेतो महानगरपालिका फ़ंडात जमा करण्यांत आलेली नाही.

वरील प्रमाणे भरणा न झालेली एकूण रक्कम रू.४,४०५/- ही संबंधिताकडून तात्काळ वसूल करून, संबंधितावर यथोचित प्रशासकीय कार्यवाही करावी व विभागाने अनुपालन अहवाल सादर करावा असे विभागास सूचित करण्यात आलेले आहे. विभागाकडील दिनांक १७.१२.२००५ रोजीचे अनुपालन असमाधानकारक असून अनुषंगिक आदेशाच्या छायाप्रती सादर करण्याची सूचना विभागास देण्यात आलेली आहे.

**परिच्छेद क्र.५:-** **वसूलीअंती महानगरपालिका फ़ंडात कमी रकमेचा भरणा केल्याबाबत रू.३४५/-**

- एन –८ आरोग्य केंद्र येथे नोंदणी रजिस्टरच्या नोंदीनुसार रू.४४०/- ही रक्कम कॅश रजिस्टरमध्ये नोंदविणे आवश्यक असतांना रू.४००/- चा भरणा केल्यामुळे रू.४०/- ही रक्कम कमी भरणा करण्यांत आलेली आहे.
- कैसर कॉलनी आरोग्य केंद्र येथील नोंदणी फ़ी वसूली कर्मचाऱ्याने दि.८.९.२००३ ते दि.११.१०.२००३ पर्यंत नोंदणी फ़ी पोटी वसूल केलेली रक्कम रू.७७०/- भरणा करण्याऐवजी दि.१८.१०.२००३ रोजी रू.६६५/- जमा केल्यामुळे रू.१०५/- चा कमी भरणा करण्यांत आलेला आहे.
- कैसर कॉलनी आरोग्य केंद्र येथील दि.९.३.२००४ ते दि.२२.३.२००४ पर्यंत नोंदणी फ़ी ची रक्कम रू.२,६९५/- ऐवजी रू.२,५९५/- इतक्या रकमेचा भरणा दि.२९.३.२००४ रोजी महानगरपालिका फ़ंडात करण्यांत आला आहे. परिणामी रू.१००/- कमी भरण्यांत आली आहे.
- कैसर कॉलनी आरोग्य केंद्र येथील दि.२३.३.२००४ ते दि.३१.३.२००४ पर्यंत नोंदणी फ़ी वसूलीची रक्कम रू.१,३४०/- भरणा करण्याऐवजी बेरजेतील चुकीमुळे दि.३१.३.२००४ रोजी रू.१,२४०/- भरणा करण्यांत आल्यामुळे, परिणामी रू.१००/- कमी भरण्यांत आली आहे.

वरील प्रमाणे कमी भरणा केलेली रक्कम रू.३४५/- ही संबंधिताकडून तात्काळ वसूल करून झालेल्या अनियमिततेबाबत संबंधितावर आवश्यक ती प्रशासकीय कार्यवाही करावी आणि कार्यवाहीअंती अनुपालन अहवाल सादर करावा असे विभागास सूचित करण्यात आलेले आहे. विभागाने दिनांक १७.१२.२००५ रोजी अनुपालन सादर केले असून आक्षेपित रक्कम रू.३४५/- ही संबंधिताकडून वसूल करण्यात आल्यामुळे परिच्छेद वगळण्यात येत आहे.

**परिच्छेद क्र.६:-** **वसूलीअंती महानगरपालिका फ़ंडात विलंबाने रक्कम भरणा केल्याबाबत रू.५७७५/-**

- कैसर कॉलनी आरोग्य केंद्र येथील पॅथॉलॉजी लॅब फ़ी वसूलीअंती संबंधिताने वेळोवेळी रक्कम भरणा न करता, विलंबाने महानगरपालिका फ़ंडात भरली आहे. त्याबाबतचा तपशील खालीलप्रमाणे.

| अ.क्र. | पावती क्र. | वसूलीचा दिनांक | रक्कम (रूपये) | रक्कम भरणा केल्याचा दिनांक | शेरा |
|---|---|---|---|---|---|
| १ | ४४००२ ते ४४०११ | २३.७.२००३ते ३१.७.२००३ | २४० | ३०.७.०३ | |
| २ | ४४०१२ ते ४४०२० | १.८.२००३ ते १८.८.२००३ | ११० | २०.८.०३ | |
| ३ | ४४०२१ ते ४४०२२ | २५.८.२००३ ते ८.९.२००३ | ३० | १५.९.०३ | ७ ते २० दिवस उशिराने रक्कम भरणा केली आहे. |
| ४ | ४४०२३ ते ४४०२५ | २६.९.२००३ ते ३.१०.२००३ | २२५ | ३.१०.०३ | |
| ५ | ४४०२६ ते ४४१०० | ३.१०.२००३ ते २१.१.२००४ | २९८० | २९.३.०४ | ६८ ते १७८ दिवस उशिराने रक्कम भरणा केली आहे. |

| | | | | | |
|---|---|---|---|---|---|
| ६ | ४४१०१ ते ४४१८८ | २१.१.२००४ ते २९.३.२००४ | २१९० | ३१.३.०४ | २ ते ७० दिवस उशिराने रक्कम भरणा केली आहे. |
| | | **एकूण** | **५७७५** | | |

वरीलप्रमाणे रकमेचा भरणा हा संबंधिताने वसूलीअंती तात्काळ अपेक्षित असतांना, साधारणत: एक आठवडा ते २५ आठवड्यानंतर रकमेचा भरणा केलेल्या असल्यामुळे, संबंधिताकडून विभागाने खुलासा घ्यावा व यथोचित प्रशासकीय कार्यवाही करावी. तसेच यापुढे अशा प्रकारच्या अनियमितता होवू नयेत, त्या दृष्टीने संबंधित सर्व वैद्यकीय अधिकारी, यांना आवश्यक त्या सुचना लेखी स्वरूपात कळवून तसे अनुपालन सादर करावे असे विभागास सूचित करण्यात आलेले आहे. विभागाने दिनांक १७.१२.२००५ रोजी अनुपालन सादर केले असून विभागाने केलेल्या प्रशासकीय कार्यवाहीबाबतच्या आदेशाच्या प्रतीसह फ़ेर अनुपालन सादर करण्याची सूचना विभागास देण्यात आली आहे.

**परिच्छेद क्र.७: इतर आक्षेपार्ह मुद्यांबाबत.**

- सर्व आरोग्य केंद्राकडील ओ.पी.डी.रजिस्टर, कॅश रजिस्टर हे पृष्ठांकित करून संबंधित वैद्यकीय अधिकारी यांनी रजिस्टरच्या शेवटी प्रमाणपत्र दिलेले नाही.
- बहुतांश आरोग्य केंद्राद्वारे दररोज वसूल होणारी नोंदणी फ़ी ची रक्कम वेळोवेळी महानगरपालिका फ़ंडात जमा केली नसून, ५ ते ८ दिवस विलंबाने जमा केली आहे.
- बहुतांश आरोग्य केंद्राकडे विहीत नमुन्यातील पावती पुस्तकांचे साठा नोंद वही ठेवण्यांत आलेली नाही.
- एन-८ हॉस्पिटल येथे दि.१०.७.२००३ रोजी संबंधित फ़ी वसूली कर्मचाऱ्याने कॅश रजिस्टरमध्ये रू.१००/- ही रक्कम जादा भरणा केली व सदरची रक्कम दि.१६.७.२००३ रोजीच्या वसूल केलेल्या रकमेमधून वजा करून उर्वरीत रक्कम भरणा केली आहे. सदरची बाब वरिष्ठांचे निदर्शनास आणून देण्यांत येवून, नियमानुसारच कार्यवाही होणे आवश्यक होते.

वरील अनियमितता व त्रुटींबाबत विभागाने आवश्यक ती कार्यवाही करून अनुपालन अहवाल सादर करावा असे विभागास सूचित करण्यात आले असता विभागाकडील दिनांक १७.१२.२००५ रोजी प्राप्त अनुपालनाआधारे परिच्छेद वगळण्यात येत आहे.

**परिच्छेद क्र.८ : लॅबोरेटरी फ़ी वसुली रक्कम महानगरपालिका फ़ंडात भरणा न केल्या बाबत रू.३२०/-**

१. एन-११, आरोग्य केंद्र येथील पॅथॉलाजी लॅब चाचणी फ़ी ची रक्कम ही पावती पुस्तक क्र.८४७/८४६२६ दि.१७.८.०४ अन्वये रू.२०/-, पावती पुस्तक क्र.८४७/८४६२७ दि.१७.८.०४ अन्वये रू.३०/-, पावती पुस्तक क्र.८४७/८४६३२ दि.१९.८.०४ अन्वये रू.५/- पावती पुस्तक क्र.८४८/८४७४५ दि.२७.१०.०४ अन्वये रू.३५/- व पावती पुस्तक क्र.८४८/८४७५९ दि.१०.११.०४ अन्वये रू.१००/- वसुल करण्यात आले. मात्र

सदरची एकत्रित रक्कम रू.१९०/- ही अद्याप पावेतो महानगरपालिका फ़ंडात जमा करण्यात आलेली नाही.

२. एन-८ हॉस्पिटल येथील पावती पुस्तक क्र.६९२/६९१२८ दि.१६.४०४ अन्वये रू.४०/- व पावती पुस्तक क्र.६९५/६९४२२ दि.१९.४.०४ अन्वये रू.४०/- वसुल करण्यात आले असून सदरची एकत्रित रक्कम रू.८०/- ही अद्याप पावेतो महानगरपालिका फ़ंडात जमा करण्यात आलेली नाही.

३. बन्सीलालनगर हॉस्पिटल येथील पॅथॉलॉजी लॅब चाचणी फ़ी ची रक्कम ही पावती पुस्तक क्र.५७३/५७२२५ दि.१२.२.०५ अन्वये रू.२५, व पावती पुस्तक क्र.५७३/५७२२६ दि.१२.२.०५ अन्वये रू.२५/- वसुल करण्यात आले. सदरची एकत्रित रक्कम रू.५०/- ही अद्याप पावेतो महानगरपालिका फ़ंडात जमा करण्यात आलेली नाही.

वरील प्रमाणे भरणा न झालेली एकूण रक्कम रू.३२०/- ही संबंधिताकडून तात्काळ वसुल करून महापालिका निधी मध्ये जमा करावी. शिवाय रक्कमेचा भरणा न करण्याबाबत संबंधितावर आवश्यक ती कार्यवाही करून त्या बाबतचा अहवाल विभागाने सादर करावा असे विभागास सूचित करण्यात आले आहे. विभागाने दिनांक ४.२.२००६ रोजी अनुपालन सादर केले असून आक्षेपित रक्कम रू.३२०/-ही संबंधिताकडून वसूल करण्यात आली असल्यामुळे परिच्छेद वगळण्यात येत आहे.

**परिच्छेद क्र.९: नागरी हिवताप योजने अंतर्गत कार्यरत कर्मचाऱ्यांच्या वेतन व भत्तेवरील थकीत अनुदान: रू.२,४७,११,६७०/– ची प्रतिपूर्ती होणे बाबत.**

आरोग्य विभागाचे सन २००३-२००४ या वर्षाचे लेखा परीक्षण दरम्यान असे निदर्शनास आले की, सन १९९९ ते सन २००३-०४ या कालावधीत नागरी हिवताप कार्यक्रमा अंतर्गत कार्यरत कर्मचाऱ्यांच्या वेतन व भत्ते, इंधन खर्च, फ़ॉगींग (धुरीकरण) डिझेल खर्च, वाहन खर्च इत्यादी बाबीवर झालेल्या खर्चाची प्रतीपूर्ती ही वेळोवेळी मागणी नोंदवून शासनाकडून प्राप्त करून घेण्याची आवश्यकता होती. मात्र आरोग्य विभागाने वेतन व भत्ते व इतर खर्च यावरील खर्चाची प्रतीपूर्ती करून घेण्याबाबत विशेष प्रयत्न केल्याचे दिसून येत नाही. परिणामी वेतन व भत्ते, इंधन खर्च ,डिझेल खर्च इत्यादी बाबीवर झालेल्या खर्चाची उक्त कालावधीतील रक्कम रू.२,४७,११,६७०/- (रू.दोन कोटी सत्तेचाळीस लक्ष अकरा हजार सहाशे सत्तर) महापालिकेस अद्याप पावेतो प्राप्त झालेली नाही, असे अभिलेख्यांवरून दिसून आले. सदरची बाब ही अत्यंत आक्षेपार्ह असून याकडे दुर्लक्ष केल्यामुळे महापालिकेचा निधी अकारण शासनाकडे पडून आहे.

वर नमुद केल्यानुसार वेतन व भत्ते यावरील खर्चाची प्रतीपूर्ती होण्यासाठी आरोग्य वैद्यकीय अधिकाऱ्यांनी वैयक्तिक पातळीवर लक्ष देऊन महापालिकेचे आर्थिक हित जोपासण्याबाबत तात्काळ कार्यवाही करण्याची आवश्यकता आहे. आरोग्य वैद्यकीय अधिकारी यांनी शासनाकडे पाठपुरावा करून निधी प्राप्त करून घेवून तसे अनुपालन सादर करावे असे विभागास सूचित करण्यात आले असून

विभागाने दि.४.२.२००६ रोजी सादर केलेले अनुपालन हे असमाधानकारक असून आक्षेपात नमूद वेतन व भत्ते यावरील रकमेची प्रतिपूर्ती अद्यापपावेतो करण्यात आलेली नाही.

**परिच्छेद क्र.१०: कुटुंब कल्याण कार्यक्रम–कार्यरत कर्मचाऱ्यांच्या थकीत अनुदानाबाबत: रू.२,८१,९४,२००/– ची प्रतिपूर्ती होणे बाबत.**

आरोग्य विभागाचे सन २००३-२००४ या वर्षाचे लेखा परीक्षणा दरम्यान असे निदर्शनास आले की, सन १९९५-९६ ते सन २००३-०४ या वर्षात कुटुंब कल्याण कार्यक्रमा अंतर्गत कार्यरत कर्मचाऱ्यांच्या वेतन व भत्ते यावर झालेल्या खर्चाची प्रतीपूर्ती ही शासनाकडे वेळोवेळी मागणी नोंदवून शासनाकडून प्राप्त करून घेणे आवश्यक असतांनाही आरोग्य विभागाने वेतन व भत्ते यावरील खर्चाची प्रतीपूर्ती करून घेण्याबाबत विशेष प्रयत्न केल्याचे दिसून येत नाहीत. परिणामी वेतन व भत्ते यावरील खर्चाची उक्त कालावधीतील रक्कम रू.२,८१,९४,२००/- (रू.दोन कोटी एक्याऐंशी लक्ष चौऱ्याण्णव हजार दोनशे) महापालिकेस अद्याप पावेतो प्राप्त झालेली नाही, असे अभिलेख्यांवरून दिसून आले. सदरची बाब ही अत्यंत आक्षेपार्ह आहे.

वर नमुद केल्यानुसार वेतन व भत्ते यावरील खर्चाची प्रतीपूर्ती होण्यासाठी आरोग्य वैद्यकीय अधिकारी यांनी वैयक्तिक पातळीवर लक्ष देऊन निधी प्राप्त करून घ्यावा आणि पुर्ततेअंती अनुपालन अहवाल सादर करावा असे विभागास सूचित करण्यात आले आहे. विभागाने दिनांक ४.२.२००६ रोजी अनुपालन सादर केले असून आक्षेपात नमूद रकमेपैकी रू.६२७७११७/- ही धनादेश क्र.९९८३७३ दिनांक ३१.१.२००६ अन्वये उपसंचालक ,आरोग्य सेवा औरंगाबाद यांचेकडून प्राप्त झाल्याचे विभागाने कळविले आहे. उर्वरित थकित अनुदान प्राप्त करून घेण्याची कार्यवाही प्रलंबित आहे.

**परिच्छेद क्र.११: वसुली अंती महानगरपालिका फ़ंडात कमी रकमेचा भरणा केल्याबाबत : रू.१००/–**

१) एन –११, आरोग्य केंद्र येथील नोंदणी रजिस्टरच्या नोंदी नुसार दि.२०.५.२००४ रोजी रू.२००/- ही रक्कम कॅश रजिस्टर मध्ये नोंदविणे आवश्यक असतांना रू.१००/- ही रक्कम कॅश रजिस्टरला नोंदविण्यात आल्याचे निदर्शनास येते. म्हणजे रू.१००/- ही रक्कम कमी भरणा करण्यात आलेली आहे.

वरील प्रमाणे कमी भरणा केलेली रक्कम रू.१००/- ही संबंधिताकडून तात्काळ वसुल करून महापालिका निधी मध्ये जमा करावी व रक्कम भरणा न करण्याबाबत समर्थनिय खुलाशासह अनुपालन अहवाल सादर करण्याची सूचना विभागास देण्यात आली आहे. विभागाने दिनांक ४.२.२००६ रोजी अनुपालन सादर केले असून आक्षेपित रक्कम रू.१००/- ही दिनांक १७.११.२००५ रोजी महापालिका फ़ंडात भरणा केली असल्यामुळे परिच्छेद वगळण्यात येत आहे.

## खर्च बाजू लेखापरीक्षण :

**परिच्छेद क्र.१२:**

**अ) कुटुंब कल्याण शस्त्रक्रिया अग्रीम रक्कम रू.९२,०००/– च्या समायोजना बाबत.**

सन २००२-२००३ या वर्षाकरीता कुटुंब कल्याण शस्त्रक्रिया करणेसाठी रू.९२,०००/- इतकी रक्कम ही प्रमाणक क्र.१२७०१, दि.१९.३.२००३ अन्वये अग्रीम स्वरूपात घेण्यात आली असून सदर खर्चाची संचिका तपासणी अंती खालील आक्षेपार्ह बाबी निदर्शनास आल्या आहेत.

१. सन २००२-२००३ या वर्षात कुटूंब कल्याण शस्त्रक्रिया कार्यक्रमासाठी वैद्यकीय अधिकारी डॉ.सौ.ए.बी.शिंदे यांचे नावे प्रमाणक क्र.१२७०१ दि.१९.३.२००३ द्वारे रू.९२,०००/- एवढी रक्कम ही अग्रिम स्वरूपात मंजुर करण्यात आली.

२. संबंधीत कार्यक्रमावर रू.९२०००/- पैकी झालेला खर्च रक्कम रू.७५,२३५/- चे समायोजन हे प्रमाणक क्र.३७२३ दि.२५.८.२००४ अन्वये करण्यात आले असून उर्वरीत रक्कम रू.१६,७६५/- चे समायोजन हे लगेचच म्हणजे सन २००२-०३ या आर्थिक वर्षात होणे आवश्यक होते. परंतु संबंधीताने पावती क्र.८७३१५ दि.१०.८.२००४ अन्वये रक्कम रू.१६७६५/- ही महानगरपालिका फ़ंडात भरून समायोजन केल्याचे संचिकेवरून दिसून येते. वास्तविक सदर रकमेचे समायोजन हे एप्रिल २००३ मध्येच (म्हणजेच आर्थिक वर्ष संपल्यानंतर लगेचच) करणे आवश्यक असतांना अशा रकमेचे समायोजन हे पंधरा महिन्यांनतर करण्यात आले आहे. म्हणजेच रक्कम रू.१६७६५/- ही तेवढ्या कालावधीसाठी स्वत: जवळ ठेवून त्या रकमेचा तात्पुरता अपहार केल्याचा निष्कर्ष काढण्यात येतो. त्यामुळे सदर प्रकरणी डॉ.सौ.शिंदे यांचे स्पष्टीकरण घेऊन यथोचित प्रशासकीय कार्यवाही करावी असे लेखा परीक्षणास वाटते.

३. कुटूंब कल्याण शस्त्रक्रियासाठी रक्कम रू.७५,२३५/- इतका खर्च झाला असल्याचे संचिकेवरून दिसून येतो. तथापि शासनाकडून प्रतिपुर्तीपोटी रक्कम रू.५४,६७०/- प्राप्त झाल्याचे संचिका परिच्छेद क्र.१८ वरून दिसून येत असले तरी प्रत्यक्षात मात्र रू.३१,९७०/- इतकीच रक्कम ही पावती क्र.०३५९९६ दि.२८.४.२००३ अन्वये शासनाकडून प्राप्त झालेली आहे. म्हणजेच खर्चाच्या एकूण रक्कम रू.७५,२३५/- पैकी रू.३१,९७०/- एवढीच रक्कम प्राप्त झाली असून उर्वरीत रक्कम रू.४३,२६५/- ही अद्यापपावेतो शासनाकडून प्राप्त झालेली नाही. सदर खर्चाच्या प्रतीपूर्ती बाबत विभागाने कोणती कार्यवाही केली याचा निश्चितपणे बोध झालेला नसलेने विभागाने समर्थनिय खुलासा करणे आवश्यक ठरते.

४. कुटूंब कल्याण शस्त्रक्रिया प्रित्यर्थ माहे जुलै २००२ ते मार्च २००३ पर्यंत शस्त्रक्रिया करून घेणाऱ्या व्यक्तिंना व धोरणानुसार इतरांना रक्कम रू.७५,२३५/- वाटप करण्यात आली. मात्र यासाठी रू.९२,०००/- ही रक्कम अग्रीम स्वरूपात प्रमाणक क्रमांक १२७०१ दि.१९.३.२००३ अन्वये विभागास प्राप्त झाल्याचे निदर्शनास येते. म्हणजेच रक्कम प्राप्त होण्यापूर्वीच वाटप दर्शविण्यात आल्यामुळे सदरचा आर्थिक व्यवहार हा अनियमित स्वरूपाचा

असल्याचे दिसते. विभागाने समर्थनिय खुलासा करण्याची सूचना देण्यात आली असता विभागाकडील दिनांक ४.२.२००६ रोजीचे अनुपालन हे असमाधानकारक आहे. आक्षेपात नमूद रू.४३२६५/- इतक्या रकमेची प्रतिपूर्ती करण्यात आलेली नाही.

**परिच्छेद क्र.१३**

**कुटूंब कल्याण शस्त्रक्रिया अंतर्गत केलेल्या खर्चाबाबत : रू.४,४३,६०५/- एवढ्या खर्चाची अभिलेखे उपलब्ध न करणे.**

प्रतिवर्षी आरोग्य विभागा अंतर्गत कुटूंब कल्याण शस्त्रक्रिया कार्यक्रमासाठी अग्रीम रक्कम देण्यात येते. सन २००३-२००४ या वर्षाकरीता रू.१५,००,०००/- खर्चाची तरतूद करण्यात आली होती. त्यापैकी या वर्षात रू.४,४३,६०५/- इतका खर्च केलेला आहे. आरोग्य विभागाने वरील खर्चपैकी रक्कम रू.३३,८६६/- खर्चाच्या संचिका लेखा परीक्षणास्तव उपलब्ध करून दिल्या असून उर्वरीत रू.४,०९,७३९/- इतक्या खर्चाच्या संचिका उपलब्ध करून देण्यात आलेल्या नाहीत. उर्वरीत संचिका उपलब्ध करून देण्यासाठी आरोग्य विभागास अर्धसमास पत्र क्र.३ दि.२२.८.२००५ रोजी पत्र देण्यात आले . तरी अद्याप पावेतो उर्वरीत संचिका उपलब्ध करून देण्यात आलेल्या नाहीत. सदरची बाब अत्यंत आक्षेपार्ह आहे.

करीता रू.४,०९,७३९/- इतका खर्च कशा प्रकारे करण्यात आला याचा तपशिल व संचिका विभागाने सादर करणे आवश्यक असल्याची सूचना विभागास देण्यात आली आहे . विभागाने दिनांक ४.२.२००६ रोजी अनुपालन सादर केले असून अनुषंगिक अभिलेखे तपासणीस्तव सादर करण्याची सूचना पुनश्च देण्यात आलेली आहे.

**परिच्छेद क्र.१४**

**१) शिल्लक औषधी मालाच्या कमी परिमाणा बाबत.**

दिनांक १७.८.२००५, एन –८ सिडको हॉस्पिटल येथील शिल्लक औषधी व साठा नोंदवही यांची तपासणी केली असता खालील प्रमाणे औषधांचा साठा हा कमी असल्याचे निदर्शनास आले.

| अ.क्र. | औषधीचे नांव | रजी.नं./ पान क्र. | प्राप्त औषधी परिमाण/ संख्या | वाटप औषधी संख्या | शिल्लक औषधी संख्या | शेरा |
|---|---|---|---|---|---|---|
| १ | Tab. DicloFenace | १/३० | ५०००० | ११००० | ३८००० | १०० Tab. कमी दिसून आल्या. |
| २ | Syp. Paracetamal | १/११० | २०६९ | १९५० | ६५ | ५४ Syp. कमी दिसून आल्या. |

२) शिल्लक औषधी मालाच्या जादा परिमाणा बाबत.

दिनांक १७.८.२००५ एन-८, सिडको हॉस्पीटल येथील औषधी खरेदी संचिका व साठा नोंदवही यांची तपासणी केली असता खालील प्रमाणे औषधाचा साठा हा जादा असल्याचे निदर्शनास आले.

| अ.क्र. | औषधीचे नांव | रजी.नं./ पान क्र. | प्राप्त औषधी परिमाण/ संख्या | वाटप औषधी संख्या | शिल्लक औषधी संख्या | शेरा |
|---|---|---|---|---|---|---|
| १ | Tab. Furazadidon | १/३४ | ६७००० | १४००० | ५३००० | प्रत्यक्षात साठा तपासणी मध्ये १००० Tab. जास्त आढळून आले. |
| २ | Tab. Paracetemal 500 mg | १/६० | २१०००० | ५४००० | १५६००० | प्रत्यक्षात साठा तपासणी मध्ये २००० Tab. जास्त आढळून आले. |
| ३ | Cap. Doxycycline 100 mg | | १३९०० | ५५०० | ८४०० | प्रत्यक्षात साठा तपासणी मध्ये ५०० Cap जास्त आढळून आले. |
| ४ | Syp. Promethazine | १/११२ | ५६५ | २४० | ३२५ | प्रत्यक्षात साठा तपासणी मध्ये ५० Syp. जास्त आढळून आले. |
| ५ | Disposable Sysring 5 ml 1 E Needle | ३/७६ | १०७५० | २००० | ८७५० | प्रत्यक्षात साठा तपासणी मध्ये १०० Needle जास्त आढळून आले. |

वरील तक्ता क्र.१ व २ मधील औषधी मालाच्या तफ़ावती बाबत विभागाने समर्थनीय खुलासा सादर करण्याची सूचना विभागास देण्यात आलेली आहे. विभागाने दिनांक ४.२.२००६ रोजी अनुपालन सादर केले असून अनुपालन पडताळणीसाठी अभिलेख्यांसह उपस्थित राहण्याची सूचना पुनश्च देण्यात आलेली आहे.

**परिच्छेद क्र.१५**

**पल्स पोलिओ लसीकरण मोहिम अंतर्गत लेखे उपलब्ध न करून देणे बाबत: रू.१३,६९,१८१/-**

आरोग्य विभागा अंतर्गत पल्स पोलिओ लसीकरण मोहिम राबविणे बाबत शासनाकडून अनुदान प्राप्त होते. तरी सन २००३-२००४ व २००४-२००५ या वर्षी राबविण्यात आलेल्या मोहिमेच्या संचिका उपलब्ध करून देण्यासाठी वैद्यकीय अधिकारी यांना अर्धसमास पत्र क्र.७ दि.१२.९.२००५ रोजी पत्र देण्यात आले परंतु अद्याप पावेतो लेखे उपलब्ध करून देण्यात आलेले नाहीत. मात्र सन २००३-०४ या वर्षात रू.६४२९९७/- तर सन २००४-०५ या वर्षात रू.१३६९१८१/- इतका खर्च सदरच्या मोहिमेवर करण्यात आल्याचे निदर्शनास येते.

करीता उक्त वर्षातील सदर प्रकरणातील संपूर्ण अभिलेखे हे विभागाने तपासणीस्तव उपलब्ध करून देणे आवश्यक असतांना त्यानुषंगाने लेखा परीक्षण विभागाद्वारे कार्यालयीन पत्र क्र.मनपा/मुलेप/११६/०५, दि.३.९.२००५ अन्वये स्पष्ट सुचना दिलेल्या असतांनाही ते उपलब्ध

करून दिलेले नसल्याने झालेल्या खर्चाबाबत खातरजमा करण्यात आलेली नाही. लेखा परीक्षणास अभिलेखे उपलब्ध करून न देणे ही बाब अतिशय गंभीर असून दखलपात्र आहे.

विभागाने अनुषंगिक अभिलेखे हे तपासणीस्तव उपलब्ध करून दिले असून त्याची तपासणी करण्यात येत आहे. तपासणी बाबतचे अभिप्राय हे पुढील वार्षिक अहवालामध्ये समाविष्ट करण्यात येतील.

**परिच्छेद क्र.१६**

**अधिकारी / कर्मचारी यांच्या वैद्यकीय परताव्या बाबतच्या संचिका उपलब्ध करून न दिल्याबाबत:एकत्रित रक्कम रू.३,७१,६११/-**

सन २००३-०४ या आर्थिक वर्षातील वैद्यकीय देयक परताव्याच्या खालील प्रमाणे संचिका लेखा परीक्षणास्तव उपलब्ध करून देण्यात आलेल्या नाहीत. संचिका उपलब्ध करून देण्यासाठी दि.९.८.०५ व दि.८.९.०५ रोजी विभागास अर्धसमास पत्रही देण्यात आले होते. खालील प्रमाणे संचिका आज पावेतो उपलब्ध करून दिलेल्या नाहीत.

| अ. क्र. | अधिकारी/ कर्मचारी यांचे नांव | आदेश क्र. व दिनांक | प्रमाणक क्रमांक व दिनांक | अग्रिम रक्कम रू. |
|---|---|---|---|---|
| १ | इंदिराबाई प्रताप चावरीया, मजुर, वि.क्र.२ | ७४६/०३ २९.४.०३ | ४२८/५.५.०३ | ११२३८ |
| २ | अंजली अशोक देशपांडे, मु.अ.कें.प्रा.शा.मसनतपुर | १८६६/०३ १८.१०.०३ | ६७५७/०३ २०.१०.०३ | १९७४८५ |
| ३ | रा.प.दांडगे, अग्निशमन | १३१०/ ०३ ६.८.०३ | ७५२४ /०३ २४.१०.०३ | ७३६९ |
| ४ | रा.प.दांडगे, अग्निशमन | १३०९ /०३ ६.८.०३ | ७५२५ /०३ २४.१०.०३ | ५३८७ |
| ५ | मो.इकबाल आशफ़ाक हुसेन, वाहन चालक यांत्रिकी | २४१४/ ०३ २३.१२.०३ | १०५६८/ ०४ ९.१.०४ | १४३९० |

| | | | | |
|---|---|---|---|---|
| ६ | मंगला मुरलीधर कुर्तडीकर, वै.अ.आरोग्य विभाग | २४१७ /०३<br>२३.१२.०३ | ११५१३ /०४<br>६.२.०४ | ३५३०२ |
| ७ | एस.एस.कुलकर्णी, शाखा अभियंता, नगररचना | ४५२ /०३<br>३१.३.०४ | १३९५५ /०४<br>३१.३.०४ | १००४४० |
| | **एकूण** | | | ३,७१,६११ |

वरील प्रमाणे संचिका उपलब्ध करून दिलेल्या नसल्यामुळे खर्चाची सत्यता पडताळणी आलेली नाही. लेखा परीक्षणास अभिलेखे उपलब्ध करून न देणे ही बाब गंभीर असून दखलपात्र आहे. विभागाने सदरची बाब ही मा.आयुक्तांचे निदर्शनास आणून द्यावी, व समर्थनीय खुलाशासह अनुपालन सादर करावे असे सूचित करण्यात आलेले आहे.

विभागाने दिनांक ४.२.२००६ रोजी सादर केलेले अनुपालन हे असमाधानकारक असून अनुषंगिक अभिलेखे हे तपासणीस्तव उपलब्ध करून दिलेले नाहीत.

**परिच्छेद क्र.१७**

**वैद्यकीय खर्चा प्रित्यर्थ अदा केलेल्या रकमेबाबत रू.१०,८००/–**

श्री.डी.के.पंडीत, शाखा अभियंता, पाणी पुरवठा यांत्रिकी विभाग यांना आदेश जा.क्र./आरोग्य/१६७८/२००३ दि.७.१०.०३ अन्वये मुलांच्या शस्त्रक्रिया व औषधोपचारासाठी केलेल्या एकूण रू.२१८४८/- इतक्या खर्चाच्या ८०% रक्कम रू.१७४७८/- मंजुर करण्यात आली. सदरची रक्कम ही प्रमाणक क्र.६७०६ दि.१८.१०.२००३ अन्वये संबंधीतास प्रदान केलेली आहे.

संचिकेच्या तपासणी अंती असे निदर्शनास आले की, प्रदान रक्कम रू.१७४७८/- मध्ये हॉस्पिटल पावती क्र.२१०३७६७९ दि.३१.१.०३ मध्ये नमुद केल्यानुसार डॉ.डी.एन.सिधिया यांचे नांवे रक्कम रू.१०८००/- दर्शविण्यात आली होती. संबंधीतास सदरची रक्कम कोणत्या कारणास्तव अदा करण्यात आली याचा खर्चाच्या देयकामध्ये उल्लेख केलेला नाही. मात्र सदरच्या रकमेचा परतावा हा श्री.पंडीत यांना देण्यात आला आहे. सदरची बाब आक्षेपार्ह आहे.

वरील प्रमाणे रकमेच्या परताव्या बाबत विभागाने खुलासा सादर करावा.

विभागाने दिनांक ४.२.२००६ रोजी सादर केलेले अनुपालन हे असमाधानकारक आहे.

**परिच्छेद क्र.१८**

**वैद्यकीय खर्चा प्रित्यर्थ जादा अदा केलेल्या रकमेबाबत रू.४५०/–**

श्रीमती राजय्या गोपाल करूल्ला, सेविका, मनपा आरोग्य विभाग यांना आदेश क्र./आरोग्य /७७५/०३, दि.६.५.०३ अन्वये औषधोपचारासाठी प्रित्यर्थ केलेल्या रू.१३६२२/- ची ८०% रक्कम रू.१०८९८/- मंजुर करण्यात आली. सदरची रक्कम ही प्रमाणक क्र.८७८ दि.२१.५.२००३ अन्वये संबंधितास प्रदान करण्यात आली आहे.

संचिकेच्या तपासणी अंती असे निदर्शनास आले की, देयक क्र.१८ दि.८.१०.२००२ Catheterisation मध्ये साठी रू.५०/- चा खर्च दर्शविण्यात आला होता. मात्र संबंधितास देयक अदा

करतांना रू.५००/- चा खर्च दर्शविण्यात येऊन त्यानुसार रकमेचे प्रदान केल्यामुळे रू.४५०/- जादा अदा करण्यात आले आहेत.

वरील प्रमाणे जादा अदाईची रक्कम रू.४५०/- वसुल करून मनपा फ़ंडात जमा करावी व विभागाने अनुपालन सादर करावे असे सूचित करण्यात आलेले आहे.

विभागाने दिनांक ४.२.२००६ रोजी सादर केलेले अनुपालन हे असमाधानकारक आहे.

**परिच्छेद क्र.१९**

**अग्रिम रकमेचे समायोजन न करणे बाबत: रक्कम रू.५०,०००/-**

सन २००३-२००४ या आर्थिक वर्षा बाबतची उक्त संचिका लेखा परीक्षणास्तव उपलब्ध करून देण्यासाठी संबंधीत विभागास दि.९.८.०५ व ८.९.०५ अन्वये अर्धसमास पत्र देण्यात आलेले असून आज पावेतो

१. श्रीमती कांताबाई बी.भारसाकळे, मजुर, झोन क्र.२ यांना प्रमाणक क्र.६३३३ दि.८.७.२००३ अन्वये मंजुर केलेल्या रू.५०,०००/- अग्रिमाच्या समायोजनाची संचिका उपलब्ध करून देण्यात आलेली नाही.

करीता, सदरची बाब ही मा.आयुक्तांचे निदर्शनास आणून द्यावी व अनुपालन अहवाल सादर करावे असे विभागास सूचित करण्यात आलेले आहे.

विभागाने दिनांक ४.२.२००६ रोजी सादर केलेले अनुपालन हे असमाधानकारक आहे..

**परिच्छेद क्र.२०**

**सौ.सुंदराबाई प्रल्हाद थोरात (मजुर) झोन क्र.१ यांना मंजुर केलेल्या अग्रिमाचे समायोजन न करणे बाबत : रू.६८९/-**

सौ.सुंदराबाई प्रल्हाद थोरात (मजुर) झोन क्र.१ यांनी दि.१६.४.०२ रोजी विनंती अर्ज देऊन पती आजारी असल्यामुळे औषधी उपचारासाठी मनपा आदेश क्र.५६३/०२ दि.३०.३.०२ अन्वये रू.१०,०००/- अग्रिम घेतले होते. अशा अग्रिमा प्रित्यर्थ संबंधीताचा वैद्यकीय खर्च रू.११,६३८,९७/- विचारात घेता मूळ रकमेच्या ८०% प्रमाणे रक्कम रू.९३११/- एवढी रक्कम अनुज्ञेय असलेने त्यानुसार प्रमाणक क्र. दि. अन्वये समायोजन करण्यात आले. खर्च वजा जाता उर्वरीत रक्कम रू.६८९/- ही वसुल करण्याचे दृष्टीने मनपा/आरोग्य/९३१/०२ दि.२१.६.०२ अन्वये संबंधीतास आदेशित केले असता संबंधीताने अद्याप पर्यंत समायोजन केलेले नसल्याचे संचिकेवरून दिसून येते. विभागाने समर्थनीय खुलासा करून तसे अनुपालन सादर करावे असे सूचित करण्यात आलेले आहे.

विभागाने दिनांक ४.२.२००६ रोजी सादर केलेले अनुपालन हे असमाधानकारक आहे.

**परिच्छेद क्र.२१**

**श्री.फ़किर अहेमद, सह.शिक्षक यांचे वैद्यकीय देयक परतावा जादा अदाई बाबत: रू.१०००/-**

श्री. फ़किर अहेमद, सह.शिक्षक, मनपा प्राथमिक शाळा उस्मानपुरा यांचे वैद्यकीय खर्चाचे देयक रू.४१,९९९/- (रू.५२४९९/- च्या ८०% प्रमाणे) हे आदेश क्र./आरोग्य/२१६/०४ दि.१३.२.०४ अन्वये मंजुर करण्यात आले. प्रमाणक क्र.११९१९ दि.१६.२.२००४ अन्वये प्रदान केलेल्या रकमेच्या देयकात हॉस्पिटल बील क्र.२७२ दि.२१.१२.०३ अन्वये Cardiac Monitor Charges रू.२००/- प्रमाणे तीन दिवसासाठी रू.६००/- इतका होतो. मात्र संचिकेमधील पृष्ठ क्र.३, परिच्छेद क्र.७ मध्ये रक्कम रू.१६००/- ची नोंद घेण्यात आली. परिणामी संबंधीताला रक्कम रू.१०००/- ही जादा अदा करण्यात आली आहे.

करीता जादा अदाईची रक्कम रू.१०००/- ही संबंधीताकडून वसुल करून महापालिका निधीमध्ये जमा करावी व अनुपालन अहवाल विभागाने सादर करावे असे सूचित करण्यात आलेले आहे.

विभागाने दिनांक ४.२.२००६ रोजी सादर केलेले अनुपालन हे असमाधानकारक आहे.

**परिच्छेद क्र.२२**

**श्री.अंबादास अप्पा गायकवाड (वाहन चालक )यांचे वैद्यकीय देयक खर्चाच्या समायोजनाबाबत:रू.४०८६/-**

श्री.अंबादास अप्पा गायकवाड, वाहनचालक यांना औषधी उपचारासाठी मनपा प्रमाणक क्र.११०९/०१ दि.२१.७.०१ अन्वये रक्कम रू.१५०००/- अग्रिम अदा करण्यात आले. संबंधीताने वैद्यकीय उपचारापोटी सादर केलेला खर्च रू.१३६४२/- चे ८०% प्रमाणे रक्कम रू.१०,९१४/- एवढी रक्कम ही श्री.अंबादास गायकवाड यांना अनुज्ञेय असल्याने प्रमाणक क्र.५०९४ दि.५.९.२००३ अन्वये समायोजीत करण्यात आली आणि मनपा/आ.वि.४६४/०२ दि.४.३.०२ अन्वये रक्कम रू.१५०००/- वजा जाता रू.१०९१४/- समायोजन करून उर्वरीत रक्कम रू.४०८६/- मनपा कार्यालयात जमा करणे बाबत संबंधितास आदेशीत केले असता संबंधीताकडून पावती क्र.४०१०६/४०२ दि.२.७.०३ अन्वये अशी रक्कम जमा करण्यात आली. संबंधीत श्री.गायकवाड यांना रक्कम भरण्याविषयी दि.४.३.०२ रोजी आदेशित केल्यानंतर त्यांनी दि.२.७.०३ रोजी मनपा फ़ंडात रकमेचा भरणा केलेला आहे. म्हणजेच संबंधीताने १६ महिने रक्कम ही स्वत:जवळ ठेवून नंतर मनपा फ़ंडात जमा केली आहे, ही बाब आक्षेपार्ह आहे.

विभागाने समर्थनीय खुलासा सादर करावा असे सूचित करण्यात आलेले आहे.

विभागाने दिनांक ४.२.२००६ रोजी सादर केलेले अनुपालन हे असमाधानकारक आहे.

**परिच्छेद क्र.२३**

**श्री.अशोक अश्रुबा घुगे (शिपाई) यांना अदा केलेल्या अग्रिमाच्या समायोजना बाबत: रू.६४५५/-**

सन २००४-२००५ या वर्षाच्या नियमित लेखा परीक्षणा मध्ये खर्च बाजुच्या अभिलेखाची तपासणी हाती घेण्यात आली असून तेथील वैद्यकीय देयक परतावाच्या एकूण ४७ संचिकांच्या तपासणी अंती खालील आक्षेपार्ह बाबी निदर्शनास आल्या.

श्री.अशोक अश्रुबा घुगे, शिपाई यांना दि.१२.२.०२ रोजीचे विनंती अर्जाप्रमाणे स्वत:चे औषधी उपचारासाठी महापालिका प्रमाणक क्र.९४२६ दि.११.१२.०१ अन्वये रक्कम रू.२५,०००/- अग्रिम प्रदान करण्यात आले. संबंधीताचा वैद्यकीय खर्च रू.२३,१८१.२६/- विचारात ८०% प्रमाणे रक्कम रू.१८,५४५/- एवढ्या रकमेचे समायोजन हे करण्यात आले. मात्र संबंधीतास रू.२५०००/- एवढा अग्रिम मंजुर असलेने वैद्यकीय उपचारा वरील खर्च रू.१८५४५/- वजा जाता उर्वरीत रक्कम रू.६४५५/- ही तात्काळ एक रकमी वसुल करणेचे दृष्टीने संबंधीतास मनपा/आरोग्य/१७१२/०२ दि.३१.१२.०२ अन्वये उर्वरीत रक्कम रू.६४५५/- मनपा कार्यालयात जमा करण्याबाबत आदेशीत करण्यात आले. तथापि संबंधीताने लेखी अर्ज देऊन वेतनामधून दरमहा रू.५००/- कपात करावे, अशी संमती दिलेने संबंधीताच्या पगारातून रू.५००/- दरमहा प्रमाणे कपात करून एकत्रित रक्कम रू.६४५५/- ही वसुल केली किंवा कसे ? याबाबत बोध झालेला नाही. या बाबत आवश्यक त्या तपशिलासह खुलासा सादर करावा असे विभागास सूचित करण्यात आलेले आहे.

विभागाने दिनांक ४.२.२००६ रोजी सादर केलेले अनुपालन हे असमाधानकारक आहे.

**परिच्छेद क्र.२४**

**अधिकारी/ कर्मचारी यांना वैद्यकीय उपचारासाठी मंजुर केलेल्या अग्रिम रू.२,८५,०००/- चे समायोजन : अभिलेखे उपलब्ध न करणे बाबत.**

सन २००४-०५ या आर्थिक वर्षात अधिकारी/ कर्मचारी यांना मंजुर केलेल्या अग्रिम बाबतच्या संचिका लेखा परीक्षणास्तव उपलब्ध करून देण्यासाठी संबंधीत विभागास दि.९.८.०५ व दि.८.९.०५ अन्वये अर्धसमास पत्र देण्यात आलेले असून आज पावेतो खालील प्रमाणे संचिका उपलब्ध करून देण्यात आलेल्या नाहीत.

| अ.क्र. | अधिकारी/ कर्मचारी | प्रमाणक क्रमांक व दिनांक | अग्रिम रक्कम रू. |
|---|---|---|---|
| १ | श्री.सुंदरलाल के जाधव, सुरक्षा रक्षक | ८०८/२१.५.२००४ | ४५००० |
| २ | श्री.शेख इब्राहीम शे.चाँद,वाहन चालक | ६१८६ /२६.१०.२००४ | ४५००० |
| ३ | श्री.नागु हरिकेश धिल्लोड, स्विपर, वि.क्र.२ | ६४१६/ २६.१०.२००४ | ४५००० |
| ४ | श्री.म.अबेदा मुसवी, सह.शिक्षिका | ९६०७/ ३.१.२००५ | ४५००० |
| ५ | श्री.ईश्वर भातपुडे, जकात –जवान | ११६०४ /१५.२.२००५ | १५००० |
| ६ | श्रीमती कालिंदीबाई अशोक बागुल, मजुर, झोन क्र.५ | १३६१६/ १७.३.२००५ | ४५००० |
| ७ | श्रीमती वर्षा भालेराव, आरोग्य विभाग | १३६८९ /१८.३.२००५ | ४५००० |
| | | | **२,८५,०००** |

परिणामी वरील प्रमाणे रकमेचे अद्याप पावेतो संबंधीतानी समायोजन केले नसल्याचे निदर्शनास येते. त्यामुळे विभागाने आवश्यक त्या तपशिलासह खुलासा सादर करावा. शिवाय अभिलेखे उपलब्ध

करून देण्यामध्ये जी टाळाटाळ झाली त्यासाठी जबाबदार असणाऱ्या कर्मचाऱ्यांवर काय कार्यवाही करण्यात आली या बाबतही समर्थनीय खुलासा करावा. ही बाब मा.आयुक्त यांचेसमोर ठेवून अनुपालन सादर करावे असे विभागास सूचित करण्यात आलेले आहे.

विभागाने दिनांक ४.२.२००६ रोजी सादर केलेले अनुपालन हे असमाधानकारक आहे.

# शिक्षण विभाग

## <u>खर्च बाजू लेखा परीक्षण</u>

शिक्षण विभागाचे सन २००३-२००४ व २००४-२००५ या आर्थिक वर्षातील अभिलेख्यांचे लेखा परीक्षणांतर्गत शिक्षण विभागाने सन २००४-२००५ या वर्षातील खर्चाच्या काही संचिका तपासणीस्तव उपलब्ध करून दिल्या आहेत. तपासणीअंती खालीलप्रमाणे आक्षेपार्ह बाबी निदर्शनास आल्या आहेत.

**<u>परिच्छेद क्र. १:–</u> <u>लिखाण साहित्य खरेदी रू.२,४५,२९०/– व अभिलेखे उपलब्ध न करणेबाबत.</u>**

- शिक्षण विभागाने सन २००४-२००५ या आर्थिक वर्षात खरेदी केलेल्या लिखाण साहित्याबाबतची संचिका तपासण्यांत आली. या अंतर्गत, विविध ४५ नग लिखाण साहित्यासाठी रू.२,४५,२९०/- चे देयक हे संबंधित ०३ पुरवठाधारकांना एकत्रितपणे अदा करण्यांत आले. प्रमाणकनिहाय अदाईचा तपशिल खालील प्रमाणे.

| | | | |
|---|---|---|---|
| १) | प्रमाणक क्र.१२०२७ दि.२३.२.२००५ | - | रू.१,२८,४२८/- |
| २) | प्रमाणक क्र.१२२०७ दि.२५.२.२००५ | - | रू.१,०२,७१६/- |
| ३) | प्रमाणक क्र.१३४३९ दि.१६.३.२००५ | - | रू.०,१४,१४६/- |

तथापि ,ज्या दराने साहित्य खरेदी करण्यांत आले, त्याबाबची निविदा संचिका लेखा परीक्षणास्तव पाठपुरावा करूनही उपलब्ध करून देण्यांत आली नाही. त्यामुळे खरेदी करण्यांत आलेल्या वस्तुंचे दर व त्यानुषंगाने खरेदीचे परिमाण यांची सत्यता पडताळता आली नाही. आणखी असेही निदर्शनास आले आहे की, शिक्षण विभागाला लिखाण साहित्य खरेदी करण्यासाठी उपसंचालक (शिक्षण ), औरंगाबाद यांचेकडून सादिलवार अनुदान प्राप्त होत असते असे असतांनाही महानगरपालिका निधीतून लिखाण साहित्य खरेदी करणे, ही बाब आक्षेपार्ह आहे. तसेच सन २००४-२००५ या आर्थिक वर्षात जे लिखाण साहित्य खरेदी केले, त्या खरेदीपुर्वी महानगरपालिका शाळेतील मुख्याध्यापकांकडून लेखी स्वरूपात मागणी घेण्यांत येवून, त्यानुषंगानेच एकत्रित खरेदी प्रस्तावित करणे आवश्यक होते. तथापि, याबाबत कार्यवाही करण्यांत आलेली नाही. तेव्हा सन २००४-२००५ या वित्तीय वर्षातील सादीलवार अनुदानाबाबतचे काय ? ते प्राप्त झाले किंवा कसे ? याविषयी विभागाने समर्थनिय खुलासा करावा. शिवाय महानगरपालिका फ़ंडातून केलेल्या लिखाण साहित्य खरेदीच्या अनुषंगाने निविदा संचिका, मुख्याध्यापकांकडून प्राप्त मागणीपत्र संचिका व इतर अनुषंगिक अभिलेखे तपासणीस्तव उपलब्ध करून देणे हे मुंबई प्रांतिक महानगरपालिका अधिनियम १९४९ मधील अनुसूचीतील प्रकरण ३ (दोन) मधील तरतूद ६ (२) व ८ नुसार आवश्यक असतांनाही विभागाने अभिलेखे उपलब्ध करून दिलेली नाही. प्रकरणांत प्रशासनाकडून आवश्यक ती कार्यवाही होणे आवश्यक ठरते.

विभागाने दिनांक १०.३.२००६ रोजी अनुपालन सादर केले असून परिच्छेदा मध्ये नमूद खरेदी दरांची सत्यता पडताळणीस्तव निविदा संचिका सादर केलेली नाही.

**<u>परिच्छेद क्र.२:- दरपत्रके न मागविता केलेल्या रास्त खरेदीबाबत: रू.५०,०००/-</u>**

- सन २००३-२००४ या आर्थिक वर्षात १५ ऑगस्ट व २६ जानेवारी या राष्ट्रीय दिनानिमित्त महानगरपालिका शाळेतील मुलांना बिस्किटे वाटप करण्यासाठी प्रत्येक वेळी रू.२५,०००/- याप्रमाणे ०२ वेळा स्वतंत्रपणे मान्यता घेण्यांत येवून, मे.सुमेरमल ॲन्ड कंपनी, औरंगाबाद यांचेकडून अनुक्रमे देयक क्र.१४६६४ दि.१४.८.२००३ व देयक क्र.२९१५० दि.२३.१.२००४ अन्वये रास्त खरेदी करण्यांत आली. तत्पुर्वी खरेदीसाठी अनुक्रमे प्रमाणक क्र.३९९६ दि.१३.८.२००३ व प्रमाणक क्र.१०९९८ दि.२२.१.२००४ नुसार प्रत्येकी रू.२५,०००/- अग्रिम घेण्यांत आले होते. तथापि, खरेदी केलेल्या मालाची देयक हे उपआयुक्त, महानगरपालिका,औरंगाबाद यांचे नांवे असतांनाही दोन्ही देयके ही शिक्षणाधिकारी यांनीच Passed for payment असे प्रमाणित करून, अदाईस्तव सादर केल्याचे निदर्शनास येते. वास्तविक सदरचे देयक विभाग प्रमुखाने प्रमाणित करणे आवश्यक ठरते. शिक्षणाधिकारी यांनी प्रमाणित केलेल्या देयकाची अदाई लेखा विभागामार्फ़त झालेली आहे. सदरच्या अग्रिम रकमेचे समायोजन हे अनुक्रमे दि.८.१०.२००३ व दि.१७.२.२००४ रोजी करण्यांत आल्याचे निदर्शनास येते.

  खरेदीसाठी पुरवठा आदेश देण्यांत आलेला नाही, तसेच खरेदी केलेल्या मालाची नोंद ही साठा नोंदवहीमध्ये नोंदविलेली नाही. तसेच बिस्किटे वाटप केल्याबाबतच्या नोंदीही निदर्शनास येत नाहीत.

  एकूण खरेदीचा हा सर्व व्यवहार शंकास्पद असून,विभागाने समर्थनिय खुलासा सादर करावा असे सूचित करण्यात आलेले आहे. विभागाने दिनांक १०.३.२००६ रोजी अनुपालन सादर केले असून खरेदीबाबतच्या नोंदी पडताळणीस्तव अनुषंगिक साठा नोंदवही सादर करण्यात आलेली नाही.

**<u>परिच्छेद क्र.३:- महानगरपालिकेच्या शाळेतील व वर्गातील ब्लॅक बोर्डला रंग देण्यासाठी केलेल्या खर्चातील अनियमिततेबाबत रू.७३,५३०/-</u>**

१) सन २००४-२००५ या आर्थिक वर्षात महानगरपालिका शाळेअंतर्गत ३५६ ब्लॅक बोर्डला रंग देण्यासाठी रू.२५,०००/- चे अंदाजपत्रक हे <u>फ़र्निचर खरेदी व दुरूस्ती</u> या लेखाशिर्षातून प्रस्तावित करण्यांत आले. त्यानुसार दि.२४.१२.२००४ रोजी प्रशासकीय मान्यता घेवून, भांडार लेखापाल यांनी दरपत्रक सूचना दि.२८.१२.२००४ रोजी प्रसिध्द केली. अशा सुचनेनुसार दि.२८.१२.२००४ रोजी प्राप्त झालेल्या तीन दरपत्रकांपैकी मे.ए.सी.एन्टरप्रायजेस, औरंगाबाद यांचे दर हे तुलनात्मक दृष्ट्या कमी असल्याने, ते स्विकारून संबंधितास दि.२९.१२.२००४ रोजी पुरवठा आदेश देण्यांत आला. त्यानुषंगाने देयक क्र.१६ दि.३१.१२.२००४ प्रमाणे रू.२४,५१०/- ही रक्कम प्रमाणक क्र.९५२९ दि.३१.१२.२००४ अन्वये अदा करण्यांत आली. प्राप्त दरपत्रकांचे अवलोकन केले असता,

असे निदर्शनास आले की, दरपत्रके ही भांडार लेखापाल यांनी उघडली आहेत. तथापि, शिक्षणाधिकारी,यांनी त्यावर दि.२५.११.२००४ नमुद करून स्वाक्षरी केल्याचे दिसून येते. दरपत्रकावर कोठेही विभाग प्रमुख या नात्याने उपआयुक्त (प्र) यांची स्वाक्षरी नाही. तसेच संचिका पृष्ठ क्र.४ वरील परिच्छेद क्र.१६ व १७ चे अवलोकन केले असता, असे निदर्शनास येते की, वरीलप्रमाणे खरेदी करण्यांत आलेला रंग हा ३५६ पैकी १६० ब्लॅक बोर्डला पुरला असून, उर्वरित बोर्डांना रंग देण्यासाठी पुन्हा रू.२५,०००/- खर्च अपेक्षित धरून, लिखाण साहित्य, या लेखाशिर्षातून खरेदी प्रस्तावित करण्यांत आली असल्याचे दिसून येते. अशा प्रस्तावास उपआयुक्त (प्र) यांनी दि.१४.१.२००५ रोजी प्रशासकीय मान्यता दिली व त्यानुसार त्यादिवशी मे.ए.सी.एन्टरप्रायजेस, औरंगाबाद यांना पुन्हा पुरवठा आदेश देण्यांत आला. आदेशानुसार मालाचा पुरवठा करून देयक क्र.२२ दि.१८.१.२००५ अन्वये प्रमाणक क्र.१०६५६ दि.२५.१.२००५ नुसार संबंधितास रू.२४,५१०/- अदा करण्यांत आलेले आहेत. एकूणच वर नमुद तपशिलाप्रमाणे रू.४९,०२०/- एवढ्या रकमेची रंग खरेदी करण्यांत आली असून, यामध्ये कोठेही तांत्रिक अभिप्राय घेतल्याचे दिसून येत नाही. शिवाय देयक अदा करण्यापूर्वी आदेशानुसार काम पुर्ण झाले आहे किंवा कसे, याबाबतही कागदपत्राच्या प्रकाशात खातरजमा करता आलेली नाही.

२. वर नमुद परिच्छेद १ प्रमाणे कार्यवाही करण्यांत आली असतांनाही, पुन्हा सन २००४-२००५ या आर्थिक वर्षात महानगरपालिकेच्या ८१ शाळेतील व वर्गातील एकूण ३६० ब्लॅक बोर्डला काळा रंग देण्यासाठी रू.२५,०००/- च्या अंदाजपत्रकास लिखाण साहित्य या लेखाशिर्षाअंतर्गत उपआयुक्त (प्र) यांची दि.१.३.२००५ रोजी मान्यता घेण्यांत आली. तत्पुर्वी, सदरचे काम हे तांत्रिक स्वरूपाचे असल्याने, तांत्रिक अभिप्राय घेणे आवश्यक होते. परंतू तसे या ठिकाणी झालेले नाही. अशा मान्यतेनुसार ०३ पुरवठाधारकांकडून दरपत्रके मागविण्यांत आली. वास्तविक सदरच्या प्रस्तावास दि.१.३.२००५ रोजी प्रशासकीय मान्यता मिळाली असतांना, जी दरपत्रके प्राप्त झाली त्या तिन्ही दरपत्रकावर दि.२८.२.२००५ असा दिनांक टाकलेला आहे. म्हणजेच प्रशासकीय मान्यतेपुर्वीच दरपत्रके प्राप्त झाली, असल्याचे स्पष्ट होते. मागविण्यांत आलेल्या दरपत्रकातील मे.ए.सी.एन्टरप्रायजेस,औरंगाबाद यांचे दर तुलनात्मक दृष्ट्या कमी असल्याने, संबंधितास दि.२९.३.२००५ रोजी कार्यादेश देवून दि.३०.३.२००५ रोजी संबंधित पुरवठाधारकाने देयक क्र.३० सादर केल्याचे निदर्शनास आले. त्यानुसार प्रमाणक क्र.१४७२१ दि.३१.३.२००५ अन्वये रू.२४,५१०/- हे संबंधितास अदा करण्यांत आले.

३. वरील विवेचनावरून असे स्पष्ट होते की, एकाच आर्थिक वर्षात व तीन महिन्याच्या कालावधीतच एकाच प्रकारच्या कामासाठी कुठलेही अंदाजपत्रक तयार न करता किंवा तांत्रिक अभिप्राय न घेता, दोन विविध संचिकांमधून नियमबाह्य खरेदी करण्यांत येवून, रू.७३,५३०/- संबंधितास अदा करण्यांत आलेले आहेत. विशेषत: परिच्छेद २ प्रमाणे

करण्यांत आलेली रू.२४,५१०/- एवढ्या रकमेची खरेदी, ही तर पुर्णत: अनावश्यक असतांना करण्यांत आल्याने याबाबत जबाबदारी निश्चित करून रू.२४,५१०/- एवढी रक्कम ही संबंधिताकडून वसूल करून महानगरपालिका फ़ंडात जमा करणे आवश्यक ठरते. कारण वरील परिच्छेद क्र.१ प्रमाणे कार्यवाही झालेली असतांनाही (अर्थात अनियमित कार्यवाही ) पुन्हा स्वतंत्र संचिकेतून रू.२४,५१०/-एवढ्या रकमेचा रंग खरेदी करण्याची गरज नव्हती, असे लेखा परीक्षणास सकृत दर्शनी वाटते. या शिवाय रू.७३,५३०/- एवढ्या रकमेचा रंग खरेदी करून, ब्लॅक बोर्डसाठी त्याचा विनियोग केला किंवा कसे, याबाबत कुठलेही कागदपत्रे लेखा परीक्षणास्तव उपलब्ध करून देण्यांत आलेले नाही. त्यामुळे वरील परिच्छेद १ प्रमाणे करण्यांत आलेली खरेदी ही संशयास्पद असल्याने, यामध्ये चौकशी होवून, जबाबदारी निश्चित करणे आवश्यक आहे. तर परिच्छेद २ प्रमाणे रक्कम रू.२४,५१०/- ही संबंधित जबाबदार अधिकारी/कर्मचाऱ्यांकडून वसूल करून महानगरपालिका फ़ंडात जमा करणे गरजेचे वाटते.

एकूणच प्रस्तुत खरेदी प्रकरणी, कामासाठी तांत्रिक अभिप्राय वा अंदाजपत्रक तयार न करणे, परिच्छेद २ मध्ये नमुद केल्यानुसार प्रशासकीय मंजुरीपूर्वीच दरपत्रके मागविणे, दरपत्रके ही भांडार लेखापालाचे स्वाक्षरीने मागविणे आणि त्यांनीच उघडणे, दि.२८.१२.२००४ प्रमाणे प्राप्त दरपत्रकावर शिक्षणाधिकारी यांच्या दि.२५.११.२००४ रोजीच्या स्वाक्षऱ्या असणे, परिच्छेद २ नुसार गरज नसतांना खरेदी करणे आणि खरेदीचा विनियोग केल्याबाबतची खाजरजमा न होणे इत्यादी बाबी ह्या गंभीर स्वरूपाच्या असल्याने, प्रशासनाद्वारे वरील परिच्छेद ३ प्रमाणे कार्यवाही करून, कार्यवाहीअंती अनुपालन सादर करावे असे लेखा परीक्षणास वाटते.

विभागाने दिनांक १०.३.२००६ रोजी अनुपालन सादर केले असून ते असमाधानकारक आहे. कारण रू.४९०२०/- इतक्या रकमेच्या खरेदीबाबत आक्षेपानुसार तांत्रिक अभिप्राय घेतलेला नाही. तसेच आक्षेपित रक्कम रू.२४५१०/- ही संबंधित अधिकारी कर्मचारी यांचेकडून वसूल करणेबाबत कार्यवाही झालेली नाही.

**परिच्छेद क्र.४:– कलाकुसर,पुस्तके ८०० प्रती खरेदी केल्याबाबत: रू.१७,०००/–**

- विविध प्रकारच्या रंगोळीचे पुस्तक, कलाकुसर खरेदी करण्यासाठी प्रती पुस्तक रू.२५ प्रमाणे एकूण किंमतीवर १५ टक्के सुट वजा जाता, रू.६,३७५/- च्या खर्चास दि.४.२.२००५ रोजी प्रशासकीय मान्यता देण्यांत आली. सदरची खरेदी ही शालेय ग्रंथालय या लेखाशिर्षांतर्गत तरतूदीतून प्रस्तावित करण्यांत आली असून, सदरची पुस्तके ही शालेय शिक्षणांतर्गत आवश्यक नसतांना, खरेदीसाठी प्रस्तावित करण्यांत आल्याचे निदर्शनास येते. संचिकेत सदर पुस्तकाची प्रत जोडण्यात आली असून, त्यावर किंमतीचा उल्लेख नाही,या बाबीकडे शिक्षण विभागाने दुर्लक्ष करून पुस्तक खरेदी प्रस्तावित केली आहे. प्रशासकीय मान्यतेआधारे दि.४.२.२००५ रोजी सौ.मिना माळी, कनिष्ठ लिपीक, महानगरपालिका,औरंगाबाद यांना

पुरवठा आदेश देण्यांत येवून, त्याआधारे रू.६,३७५/- एवढी रक्कम ही प्रमाणक क्र.११४४८ दि.१०.२.२००५ अन्वये संबंधितास अदा करण्यांत आलेली आहे. तद्नंतर माहे फ़ेब्रुवारी –२००५ मध्ये अन्य संचिकेच्या माध्यमातून कलाकुसर याच पुस्तकाच्या ५०० प्रती वाचनालयासाठी खरेदी करण्याबाबत प्रस्ताव सादर करण्यांत येवून, त्यास दि.१०.३.२००५ रोजी उपआयुक्त (प्र) यांनी मान्यता दिली. तत्पुर्वी, सांस्कृतिक अधिकारी, यांनी वाचनालयाला ५०० प्रती ऐवजी १०० प्रती लागतील, असा अभिप्राय दिला आहे. प्रशासकीय मान्यतेआधारे दि.१०.३.२००५ रोजीच संबंधितास पुरवठा आदेश देण्यांत आला. त्यानुषंगाने ५०० प्रतीसाठी रू.२५/- या दराने १५ टक्के सुट वजा जाता, रू.१०,६२५/- चे देयक प्रमाणक क्र.१४०६३ दि.२४.३.२००५ अन्वये संबंधितास अदा करण्यांत आले. खरेदी संचिकेत जोडण्यांत आलेल्या पुस्तकाच्या प्रतीवर स्पष्टपणे छापील किंमत कुठेही निदर्शनास आली नाही.

वरील विवेचनावरून असे स्पष्ट होते की, आवश्यक नसतांनाही एकूण रू.१७,०००/- एवढ्या रकमेची पुस्तके खरेदी ही सौ.मिना माळी, कनिष्ठ लिपीक,महानगरपालिका औरंगाबाद यांचेकडून करण्यांत आली असून, सदरचा आर्थिक व्यवहार हा अत्यंत शंकास्पद व नियमबाह्य आहे, असे दिसून येते. त्यामुळे सदरच्या प्रकरणांची सखोल चौकशी करण्यांत यावी व त्यानुसार संबंधितावर प्रशासकीय कार्यवाही करावी, असे लेखा परीक्षणास वाटते.

- सौ.मिना माळी, ह्या महानगरपालिका,औरंगाबाद येथे कनिष्ठ लिपीक या पदावर कार्यरत आहेत. त्यामुळे मुंबई प्रांतिक महानगरपालिका अधिनियम १९४९ मधील कलम ५९ (२) नुसार सौ.मिना माळी, यांचकडून केलेली पुस्तक खरेदी ही नियमबाह्य आहे.

  प्रशासनाने सदर प्रकरणी शहानिशा करून उचित कार्यवाही करावी, असे अपेक्षित आहे.

  विभागाने दिनांक १०.०३.२००६ रोजी सादर केलेले अनुपालन हे असमाधानकारक आहे.

**परिच्छेद क्र.५: अस्वच्छ काम करणाऱ्या कामगारांच्या पाल्यांसाठी शिष्यवृत्ती वाटपाबाबत: रू.३७,०००/– चे प्रदान.**

शिक्षण विभागाअंतर्गत मनपा केंद्रीय प्राथमिक शाळा रोकडा हनुमान कॉलनी येथील सन २००३-२००४ या शैक्षणिक वर्षाचे लेखा परीक्षण करतांना असे निदर्शनास आले आहे की, या वर्षात समाज कल्याण विभागातर्फ़े अस्वच्छ काम करणाऱ्या कामगारांच्या पाल्यांसाठी शिष्यवृत्तीचे रू.३७,०००/- एवढ्या रकमेचे दि.३१.३.२००४ रोजी वाटप करण्यात आले. अशा रकमेच्या वाटपाचे वाटप पत्रक / देयक तपासणी करतांना वर्ग १ ते ४ वर्गाच्या विद्यार्थ्यांना शासन धोरणानुसार रू.७५०/- ते रू.९५०/- चे वाटप केल्याचे दर्शविण्यात आले. परंतु रक्कम वाटप करतांना वाटप पत्रकावर केवळ त्या विद्यार्थ्यांची नांवे किंवा पालकांचे अंगठ्याचा ठसा / स्वाक्षरी म्हणून घेण्यात आले. परंतु हे काम करतांना रसिद टिकीट (Revenue Stamp) चिकटवून त्यावर अंगठ्याचा ठसा, स्वाक्षरी

घेण्यात आलेले नाही. परिणामी शिष्यवृत्ती ही रक्कम रू.३७,०००/- ही गरजु विद्यार्थ्यांना प्राप्त झाली किंवा नाही याचा बोध झालेला नाही.

वरील प्रमाणे तपासणी ही चाचणी स्वरूपात करण्यात आली असून उर्वरीत शाळांमध्ये सदर वर्षात वाटप करण्यासाठी समाज कल्याण विभागातर्फे शिष्यवृत्तीसाठी जी काही रक्कम देण्यांत आली असेल अशा रकमांचे वाटप नियमानुसार विद्यार्थ्यांना करण्यात आले असल्याबाबतची खातरजमा शिक्षण विभागाने करावी व त्या बाबतचा अहवाल ३० दिवसात लेखा परीक्षणास पाठविण्यात यावा.

विभागाने दिनांक ०६.०३.२००६ रोजी सादर केलेले अनुपालन हे समर्थनिय नाही.

**परिच्छेद क्र.६: सन २००३-०४ मधील केंद्रीय प्राथमिक शाळा (मॉडेल मिडल स्कुल) गांधीनगर येथील सादिलवार खर्चाच्या रकमेतून करण्यात आलेल्या स्टेशनरी साहित्य खरेदीबाबत अनियमितता.**

उपसंचालक (शिक्षण) औरंगाबाद यांचे मार्फत महापालिकेच्या केंद्रीय प्राथमिक शाळेसाठी सादिलवार खर्चाची ठराविक रक्कम प्रतीवर्षी मंजुर करण्यात येते / प्राप्त होते. सन २००३-०४ या आर्थिक वर्षात धनादेश क्र.७५२७११ दि.१५.३.२००४ अन्वये सादिलवार खर्चासाठी रू.५.०० लक्ष प्राप्त झाल्याचे निदर्शनास आले आहे. सदर रकमेपैकी रू.४.०० लक्ष शाळा निहाय वाटप हे शिक्षण विभागाकडील जा.क्र./मनपा/शिक्षण/४०५/२००४, दि.३१.३.२००४ रोजीच्या पत्रान्वये करण्यात आल्याचेही निदर्शनास आले आहे. सदर रकमेमधून कशा प्रकारे खर्च करण्यात यावा तसेच कोणत्या बाबीवर खर्च करण्यात यावा याबाबत सूचनाही सदर पत्रान्वये निर्गमित करण्यात आल्या आहेत. चाचणी स्वरूपात केलेल्या तपासणी अंती असे निदर्शनास आले की, केंद्रीय प्राथमिक शाळा, गांधीनगर येथे रू.६०००/- चे वाटप हे सादिलवार खर्चासाठी मंजूर करण्यात आले असून या रकमेमधून शालेय स्तरावर रू.४२२०/- इतक्या रकमेची खरेदी ही मे.ए.सी.एन्टरप्राईझेस, औरंगाबाद यांचेकडून बील क्र.२५, दि.२५.०१.२००५ अन्वये करण्यात आली आहे. खरेदीचा तपशिल खालील प्रमाणे आहे.

| अ.क्र. | साहित्याचे नांव | संख्या /नग | प्रती नगाचा खरेदी दर (रू) | सन २००३-०४ मधील मान्य दर (रू) | खरेदीची किंमत (रू) | जादा खरेदी केल्यामुळे झालेले अतिप्रदान (रू) |
|---|---|---|---|---|---|---|
| १ | रूलींग पेपर | ६ रीम | १५० | १२८ | ९०० | १३२ |
| २ | कुलूप | ५ नग | ५८ | -- | २९० | -- |
| ३ | व्हाईटनर | ५ नग | १४ | -- | ७० | -- |
| ४ | कार्बन | ५ बॉक्स | १३० | ९४ | ६५० | १८० |
| ५ | डस्टर | ३० नग | १९ | ६.९० | ५७० | ३६३ |
| ६ | कॅलक्युलेटर | ६ नग | २९० | २८० | १७४० | ६० |
| | | | | **एकूण** | **४२२०** | **७३५** |

शिक्षण विभागाने सन २००३-०४ या शैक्षणिक वर्षातील साहित्याच्या मान्य दराने खरेदी करण्याबाबत सूचना निर्गमित केलेल्या असतांनाही मे.ए.सी.एन्टरप्राईझेस औरंगाबाद यांचेकडून केलेल्या रू.४२२०/- इतक्या रकमेच्या रास्त खरेदीमुळे रू.७३५/- इतका खर्च अनावश्यक करण्यात आला आहे. तसेच ६ नग कॅलक्युलेटर खरेदी करण्याची आवश्यकता काय होती ? व आजमितीला सहाही कॅलक्युलेटर शाळेकडे असल्याबाबत शंका निर्माण होते. कारण की, सदरील शाळेचे कॅश रजिस्टर,साठा रजिस्टर इत्यादी अभिलेखे अद्ययावत ठेवण्यात आलेले नाहीत. तसेच ते सक्षम अधिकारी यांनी प्रमाणितही केलेले नाहीत.

१. करीता भांडार विभाग, महानगरपालिका स्तरावर दर करार उपलब्ध असतांना आणि त्यानुसार खरेदीची कार्यवाही करावी अशा सुचना असतांनाही स्थानिक स्थरावर रास्त खरेदी केलेली आहे. ही बाब गंभीर असून त्याबाबत संबंधित विभागाने समर्थनिय खुलासा करावा. शिवाय वर नमुद तपशिलानुसार रू.७३५/- एवढ्या रकमेचे अतिप्रदानही हे संबंधिताकडून वसुल करून मनपा फ़ंडात भरणा करावे.
२. कॅलक्युलेटर खरेदीच्या आवश्कतेबाबत संबंधित मुख्याध्यापक यांचा खुलासा घ्यावा.
३. शिक्षणाधिकारी यांनी सादिलवार खर्चाच्या रकमेतून शाळांनी केलेल्या खर्चाची तपासणी करावी.
४. सादिलवार खर्चाबाबतचे सन २००३-०४ मधील व २००४-०५ मधील उपयोगिता प्रमाणपत्र ही सर्व शाळेकडून घेण्यात यावीत.

वरील मुद्यांबाबत शिक्षण विभागाने कार्यवाही करून ३० दिवसांत अनुपालन अहवाल लेखा परीक्षणास सादर करावा.

विभागानेदिनांक ०६.०३.२००६ रोजी सादर केलेले अनुपालन पडताळण्यात आले आहे. परिच्छेदामध्ये मुद्या क्र.१ व २ चे अनुपालन समाधानकारक असून मुद्या क्र.३ व ४ बाबत पूर्तता केलेली नाही.

**परिच्छेद क्र.७: उन्हातल्या चांदण्या या पुस्तकाच्या १०० प्रती खरेदी बाबत:खर्च रू.८०००/-**

अ) सन २००४-२००५ या वर्षात सौ.सुनंदा गोरे, लिखीत उन्हातल्या चांदण्या या पुस्तकाच्या १०० प्रती खरेदी करण्याबाबत शिक्षण विभागाद्वारे प्रस्तावित करून प्रकरण मान्यतेस्तव मा.उपआयुक्त (प्रशासन) यांना सादर करण्यात आले. सदर प्रस्तावास मा.उपआयुक्त (प्रशासन) यांची दि.५.१.२००५ रोजी प्रशासकीय मान्यता दिली. उन्हातल्या चांदण्या या पुस्तकाची किंमत प्रती नग रू.१००/- असून लेखिकेने २० % सुट दिल्याने प्रती खरेदीसाठी प्रती नग रू.८०/- प्रमाणे रू.८०००/- ची पुस्तके पुरवठा करण्याचे आदेश जा.क्र./मनपा/सांस्कृतिक/२००५/४१०, दि.५.१.२००५ सौ.सुनंदा गोरे यांच्या नांवे देण्यात आले. तथापि प्रमाणक क्र.१२६७३ दि.३.३.२००५ द्वारे रू.८०००/- चे प्रदान हे मे.प्रतिमा प्रकाशन औरंगाबाद यांना करण्यात आले. कारण पुरवठा आदेश हा श्रीमती गोरे यांना

दिलेला असतांना मे.प्रतिमा प्रकाशन औरंगाबाद यांना रू.८०००/- चे प्रदान करणे ही बाब नियमबाह्य आहे.

ब) संचिकेचे अवलोकन केले असता असे निदर्शनास आले की, सौ.सुनंदा गोरे या महानगरपालिकेच्या शिक्षण विभागात सहशिक्षिका म्हणून कार्यरत आहेत असे पृ.क्र.१, परिच्छेद क्र.१ वर नमुद केलेले आहे. मुंबई प्रांतिक महानगरपालिका अधिनियम १९४९ चे कलम ५९ (२) नुसार सौ.सुनंदा गोरे यांना देण्यात आलेला कार्यादेश हा नियमबाह्य असल्याचे निदर्शनास येते. तसेच सदर प्रकरणी मे.प्रतिमा प्रकाशन,औरंगाबाद रू.८०००/- एवढ्या रकमेचे प्रदान हेही नियमबाह्य असल्याचे निदर्शनास येते.

वरील अनियमिततेबाबत जबाबदारी निश्चित करून शिक्षण विभागाने समर्थनीय खुलासा सादर करावा असे सूचित करण्यात आले आहे.

विभागाने दिनांक ०६.०३.२००६ रोजी सादर केलेले अनुपालन हे असमाधानकारक आहे.

**परिच्छेद क्र.८: सक्षम मान्यता नसतांना परिक्षेसाठी लागणारे साहित्य खरेदी करणे बाबत: रक्कम रू.१,००,९६०/-**

सन २००४-२००५ या आर्थिक वर्षात महानगरपालिकेच्या ८१ ऊर्दू व मराठी माध्यमांच्या शाळासाठी लागणाऱ्या लिखान साहित्याच्या खरेदीसाठी (एकूण आठ नग) रू.१,००,९६०/- या रकमेच्या प्रस्तावास उपआयुक्त (प्रशासन) यांनी दि.१८.३.२००५ रोजी प्रशासकीय मान्यता दिली आहे. सदर साहित्य हे मे.विजय जनरल स्टोअर्स, औरंगाबाद यांचेकडून खरेदी करण्याचे दृष्टीने त्यांना जा.क्र./मनपा/शिक्षण/३०८/२००५,दि.२२.३.२००५ अन्वये देऊन प्रमाणक क्र.१४३१८, दि.३०.३.२००५ द्वारे रू.१,००,९६०/- एवढ्या रकमेचे प्रदान हे मे.विजय जनरल स्टोअर्स, औरंगाबाद यांना अदा करण्यात आलेले आहे.

शिक्षण विभागाकडील लेखन साहित्य खरेदीची संचिका तपासण्यात आली असता असे दिसून येते की, साहित्य खरेदी ही भांडार विभागाने, सन २००४-२००५ या वित्तीय वर्षात मंजुर केलेल्या दरावर करण्यात आलेली आहे. अधिकचे तपशिलासाठी भांडार विभागाकडील संचिकेचे अवलोकन केले असता सन २००४-२००५ मधील भांडार विभागाकडील साहित्याचे जे दर मान्य करण्यात आलेले आहेत त्यास मा.आयुक्त यांची मान्यता घेण्यात आलेली नाही. शिक्षण विभागाने अशा दराने साहित्य खरेदी करतांना मा.आयुक्तांची मान्यता घेणे आवश्यक होते. मात्र तसे या ठिकाणी झालेले नसल्याने शिक्षण विभागाद्वारे करण्यात आलेली खरेदी ही नियमबाह्य असून अशा खरेदी बाबत जबाबदारी निश्चित करून आवश्यक ती प्रशासकीय कार्यवाही अनुसरणे अनिवार्य ठरते. शिवाय आता सदर खरेदीस मा.आयुक्त यांची कार्योत्तर मंजुरी घेणेही आवश्यक ठरते.

विभागाने दिनांक ६.३.२००६ रोजी अनुपालन सादर केले असून परिच्छेदात नमूद आर्थिक व्यवहारासंबंधी / खरेदीस मा.आयुक्त यांची कार्योत्तर मान्यता घ्यावी असे विभागास सूचित करण्यात आले आहे.

**परिच्छेद क्र.९:नियमबाह्य पध्दतीने स्वच्छता साहित्य खरेदी बाबत: खर्च रू.२,३६,०३७/-**

सन २००४-०५ या आर्थिक वर्षात शिक्षण विभागाने स्वच्छता साहित्य खरेदी करण्याबाबत एकाच संचिकेच्या माध्यमातून दोन वेळा खरेदी केल्याचे संचिकेवरून निदर्शनास आले. सदर खरेदी प्रित्यर्थ रू.९९,९०८/- व रू.१,३६,१२९/- अशा एकूण रू.२,३६,०३७/- या रकमेचे स्वच्छता साहित्य खरेदी करण्यात आले. त्यानुसार अनुक्रमे मे.इश्नशा ट्रेडींग कंपनी औरंगाबाद यांना प्रमाणक क्र.१६५३, दि.१८.६.२००४ व प्रमाणक क्र.८१४२, दि.२५.११.२००४ अन्वये रकमेचे प्रदान करण्यात आले. स्वच्छता साहित्य खरेदी बाबत संचिकेच्या तपासणी अंती खालील आक्षेपार्ह बाबी निदर्शनास आल्या.

१. सन २००३-२००४ या वर्षासाठी स्वच्छता साहित्याचे दर हे भांडार विभागाने निविदा मागवून दि.३१.३.२००४ पर्यंत निश्चित केल्याचे निदर्शनास आले असून अशा दरांना मा.आयुक्त यांनी दि.११.६.२००३ रोजी मान्यता दिली आहे. शिक्षण विभागाने साहित्य खरेदी करतांना संचिका पृष्ठ क्र.१ वर नमुद केल्यानुसार सन २००३-२००४ या वर्षासाठीचे स्वच्छता साहित्याचे दर मान्य असून त्या दरानेच शाळांसाठी साहित्य खरेदी करण्याचे प्रस्तावित केले होते. सदरच्या दोन्ही प्रस्तावास म्हणजेच रू.९९,९०८/- व रू.१,३६,१२९/- या रकमेच्या साहित्य खरेदीस उपआयुक्त (महसूल) व उपआयुक्त (प्रशासन) यांनी अनुक्रमे दि.२९.५.२००४ व दि.१८.११.२००४ रोजी प्रशासकीय मान्यता दिल्याचे निदर्शनास येते. वास्तविक सदरची खरेदी निविदा पध्दतीने करणे आवश्यक असतांनाही त्यानुसार खरेदी करण्यात आलेली नाही. सन २००३-२००४ या वर्षीच्या मंजुर दरानुसार वरील प्रमाणे खरेदी प्रस्तावित करण्यात येऊन त्यास उप आयुक्तांची मान्यता घेण्यात आली जी नियमबाह्य आहे. कारण सन २००३ –२००४ या वर्षातील दरांना मान्यता ही आयुक्त यांनी प्रदान केलेली असल्यामुळे आणि असे दर हे दि.३१.३.०४ अखेर पर्यंतच अस्तित्वात असल्याने अशा मान्य दरावर दुसऱ्या वर्षी करण्यात आलेल्या खरेदी दरास मा.आयुक्तांची मान्यता घेऊनच खरेदी करावयास हवी होती. परंतु तसे या ठिकाणी झालेले नाही. ही बाब अतिशय गंभीर असून दखलपात्र आहे. त्यामुळे प्रकरणांत अनियमिततेबाबत जबाबदारी निश्चित करून आवश्यक ती कार्यवाही अनुसरणे आवश्यक ठरते. खरेदी प्रकरणांतील अन्य अनियमितता खालील प्रमाणे नमुद करण्यात आलेली आहे.

२.अ) सन २००४-२००५ या आर्थिक वर्षात शिक्षण विभागाने स्वच्छता साहित्य पुरवठा करण्याबाबत मे.इंशा ट्रेडींग कंपनी यांना कार्यालयीन पुरवठा आदेश जा.क्र./मनपा/भांडार/०४/५९५, दि.१.६.२००४ हा निर्गमित करण्यात आला. त्यानुसार साहित्य पुरवठा केल्यानंतर मे.इंशा ट्रेडींग कंपनी यांना प्रमाणक क्र.१६५३ दि.१८.६.२००४ अन्वये रू.९९,९०८/- अदा करण्यात आले. सदरचे साहित्य हे स्वच्छ शाळा सुंदर शाळा या लेखा शिर्षांतर्गत असलेल्या तरतुदीतून करण्यात आला. दि.१.६.२००४ रोजीच्या पुरवठा आदेशाद्वारे ज्या साहित्याची खरेदी करण्यात आली, ते साहित्य हे वर्षभर सर्व शाळांना पुरेल या उद्देशाने खरेदी करण्यात आल्याचे निश्चितपणे म्हणता येईल. तरीही पुरवठा आदेश

क्र.जा.क्र./मनपा/भांडार/०४/१४५८ दि.१८.११.०४ अन्वये मे.इंशा ट्रेडींग कंपनी औरंगाबाद यांचेकडून रू.१,३६,१२९/- इतक्या रकमेचे स्वच्छता साहित्य पुन्हा खरेदी करण्यात आले. सदरचे साहित्य हे शैक्षणिक साहित्य निर्मिती या लेखा शिर्षाअंतर्गत करण्यात आले असून त्यानुसार संबंधितास प्रमाणक क्र.८१४२ दि.२५.११.२००४ अन्वये रू.१,३६,१२९/- अदा करण्यात आले. दि.१८.११.२००४ रोजीच्या वरील प्रमाणे आदेशानुसार खरेदी करण्यात आलेल्या साहित्यामध्ये खालील प्रकारचे साहित्य हे गरज नसतांना (मागील वर्षातील सरासरी गरज पाहता) खरेदी करण्यात आल्याचे निदर्शनास येते.

| अ.क्र. | साहित्याचे नांव | साहित्याचे परिमान नग | दर रू.प्रती नग | प्रत्यक्ष खर्च |
|---|---|---|---|---|
| १ | खराटे (उच्च प्रतीचे) पांढरी दांडी | ३००० | ४.१० | १२३०० |
| २ | कुंचा झाडु | २००० | ७.२० | १४४०० |
| ३ | सेंटेड फ़िनेल(५ लि.कॅन) | ३०० | ३७ प्र.कि. | ११९०० |
| ४ | क्लिनींग ॲसीड (५ लि.कॅन) | २०० | २५ प्र.कॅन | ५००० |
| | **एकूण** | | | **४२८००** |

वरील तपशिलानुसार असा निष्कर्ष निघतो की, रू.४२,८००/- इतक्या रकमेचे साहित्य हे एकाच वर्षात खरेदी करण्यात आल्यामुळे व अतिरिक्त परिमानाने खरेदी करण्यात आल्यामुळे माहपालिकेचा निधी निष्कारण अडकुन ठेवण्यात आला. त्यामुळे सदर खरेदी प्रकरणाची सखोल तपासणी करण्यात येऊन संबंधितावर जबाबदारी निश्चित करावी शिवाय अतिरिक्त रू.४२,८००/- चे अनाठाई खर्चाबाबत विभागाने समर्थनीय खुलासाही सादर करावा.

ब) सन २००४-२००५ या आर्थिक वर्षात मागील आर्थिक वर्षीच्या मंजुर दरानुसार म्हणजेच २००३-२००४ या वर्षातील मंजुर दरानुसार रू.१,३६,१२९/- इतक्या रकमेचे स्वच्छता साहित्य विविध शाळांसाठी खरेदी करण्यासाठी पुरवठा आदेश क्र.मनपा/भांडार (शिक्षण)/२००४/१४५८ दि.१८.११.२००४ अन्वये मे.इंशा ट्रेडींग कंपनी औरंगाबाद यांचेकडून खरेदी करण्यात येऊन प्रमाणक क्र.८१४२ दि.२५.११.०४ अन्वये रू.१,३६,१२९/- संबंधितास अदा करण्यात आले. सदर खरेदीतील स्वच्छता साहित्यापैकी काही साहित्याचे दर हे मंजुर दरापेक्षा अधिक असल्याचे व त्यानुसार देयकाचे प्रदान झाल्याचे निदर्शनास आले आहे. सदरची बाब खालील तपशिलावरून स्पष्ट होते.

| **अ.क्र.** | **स्वच्छता साहित्याचे नांव** | **सन ०३–०४ मधील मंजुर दर रू.(खरेदी)** | **सन ०४–०५ मधील खरेदी दर (रू)** | **परिमाण /नग** | **प्रतीनग फ़रक रक्कम रू.** | **जादा अदा केलेली रक्कम रू.** |
|---|---|---|---|---|---|---|
| १ | फ़ावडे (लोखंडी) | ३१.८० | ४५.१२ | २०० | १३.३२ | २६६४ |
| २ | टोपले (लोखंडी) | २९.५० | ५०.४० | ५० | २०.९० | १०४५ |
| ३ | सुपर मॉब | १८.०० | ५३.०० | १०० | ३५.०० | ३५०० |
| ४ | गोदरेज लॉक, ७ लिवर | ९८.५० | १०८.०० | २०० | ९.५० | १९०० |
| | | | | | | **९१०९** |

वरील प्रमाणे जादा दराचे साहित्य खरेदी केल्यामुळे रू.९१०९/- इतक्या रकमेचे महापालिकेचे आर्थिक नुकसान झाल्याचे निदर्शनास येते. त्यामुळे याबाबत संबंधितावर जबाबदारी निश्चित करून जादा अदाईची रक्कम रू.९१०९/- ही संबंधिताकडून वसूल करून मनपा निधीत जमा करून विभागाने अनुपालन अहवाल सादर करावा.

क) सन २००३-२००४ या आर्थिक वर्षात खरेदी करण्यात आलेले काही साहित्य हे दिर्घकाल टिकणारे असतांनाही व त्याची आवश्यकता नसतांनाही तशाच प्रकारचे काही साहित्य हे सन २००४-०५ मध्ये खरेदी करण्यात येऊन महापालिकेचे आर्थिक नुकसान झाल्याचे दिसते. त्याबाबत खालील प्रमाणे तपशिल देण्यात येत आहे.

| अ.क्र. | साहित्याचे नांव | सन ०३-०४ मधील खरेदीची संख्या व मान्य दर | खरेदीची किंमत रू. | सन ०४-०५ मधील खरेदीची संख्या व मान्य दर | खरेदीची किंमत | अतिरिक्त खर्च |
|---|---|---|---|---|---|---|
| १ | लोखंडी बकेट | ५० संख्या ७५.०० रू.प्रती नग | ३७५० | १०० संख्या ७५.०० रू.प्रती नग | ७५०० | ५१७५ |
| २ | लोखंडी टोपले | २०० संख्या २९.३५ प्रती नग | ५८७० | ५० संख्या ५०.४० प्रती नग | २५२० | ६०१२ |
| | | | | **एकूण** | **१००२०/-** | **१११८७/-** |

वरील तक्त्यात नमुद केल्याप्रमाणे रू.१११८७/- इतकी रक्कम आवश्यकता नसतांनाही दिर्घकाळ टिकणाऱ्या स्वच्छता साहित्यावर खर्च केल्याचे निदर्शनास आले आहे. सदरच्या खरेदी व्यवहार हा सुध्दा संशयास्पद असल्याचे मत आहे. त्यामुळे सदरच्या अतिरिक्त खर्चाबाबत स्वतंत्रपणे तपासणी करण्यात येऊन जबाबदारी निश्चित होण्याची आवश्यकता वाटते.

ड) शिक्षण विभागाच्या भांडार कडील साठा रजिस्टरवर वाटप करण्यात आलेल्या साहित्याबाबत बहुतांश नोंदी या पेन्सिलने घेण्यात आल्याचे निदर्शनास येते. असे प्रकार भविष्यात घडु नयेत त्यासाठी विहीत नमुन्यातील मागणी पत्रकाद्वारे (indent) साहित्याची मागणी व वाटप करण्यात यावे असे सुचित करण्यात येते. वरील साहित्य खरेदी व वाटप याची सखोल शहानिशा / चौकशी होण्याची आवश्यकता आहे. तसेच जे साहित्य शाळांना प्राप्त झालेले नाही त्या साहित्याची किंमत निश्चित करण्यात येऊन संबंधिताकडून वसुल करण्याची गरज आहे.

इ) सन २००३-२००४ व २००४-२००५ या आर्थिक वर्षात खरेदी केलेल्या स्वच्छता साहित्याचे वाटप हे त्या त्या शाळांना झाले किंवा नाही याबाबत खातरजमा करण्यासाठी शिक्षण विभागाकडील साठा रजिस्टर आधारे चाचणी स्वरूपात सहा शाळाकडील साठा रजिस्टरवरील नोंदी तपासण्यात आल्या. सदर नोंदी तपासल्यानंतर शिक्षण विभागाने वाटप केलेले साहित्य व शाळांना प्राप्त झालेले साहित्य यामध्ये बरीच मोठी तफ़ावत आढळून आली.

काही शाळांना साहित्य वाटप केल्याचे शिक्षण विभागाने त्यांच्याकडील साठा रजिस्टरला दर्शविले आहे. मात्र प्रत्यक्षात ज्या शाळेला साहित्य वाटप केल्याचे दर्शविले त्या शाळेस असे साहित्य प्राप्त न झाल्याचे शाळांकडील साठा रजिस्टर वरून दिसते. सदरील बाब ही सोबतच्या परिशिष्ट अ वरून स्पष्ट होते. वरील विवेचना वरून असे निदर्शनास येते की, स्वच्छता साहित्य वाटपामध्ये गंभीर त्रुटी / अनियमितता झालेल्या आहेत.

## (परिशिष्ट –अ)

## साठा रजिस्टर आधारे स्वच्छता साहित्य वाटप तपासणीचा तपशिल

| अ.क्र. | शाळेचे नांव | स्वच्छता साहित्याचे नांव | सन ०३–०४ | | सन ०४–०५ | |
|---|---|---|---|---|---|---|
| | | | शिक्षण भांडार विभागातून वाटप | शाळांना प्राप्त साहित्य | शिक्षण भांडार विभागातून वाटप | शाळांना प्राप्त साहित्य |
| १ | केंद्रीय प्राथमिक शाळा एन-७ सिडको | १)झाडु<br>२)खराटे<br>३)फ़िनेल<br>४)ॲसीड<br>५)लोखंडी बकेट<br>६)लोखंडी टोपले<br>७)फ़ावडे | २५ नग<br>२५ नग<br>५ कॅन<br>४ कॅन<br>२ नग<br>२ नग<br>निरंक | १० नग<br>१० नग<br>२ कॅन<br>२ कॅन<br>निरंक<br>निरंक<br>निरंक | ४५ नग<br>५० नग<br>६ कॅन<br>४ कॅन<br>१ नग<br>निरंक<br>निरंक | प्राप्त नही |
| २ | केंद्रीय प्राथमिक शाळा एन-६ सिडको | १)झाडु<br>२)खराटे<br>३)फ़िनेल<br>४)लोखंडी बकेट<br>५)लोखंडी टोपले<br>६)फ़ावडे | २५ नग<br>२५ नग<br>निरंक<br>१ नग<br>२ नग<br>निरंक | ४५ नग<br>४५ नग<br>निरंक<br>१ नग<br>२ नग<br>निरंक | ४५ नग<br>३० नग<br>६ कॅन<br>४ कॅन<br>१ नग<br>निरंक | निरंक<br>निरंक<br>१ कॅन<br>निरंक<br>१ नग<br>निरंक |
| **अ.क्र.** | **शाळेचे नांव** | **स्वच्छता साहित्याचे नांव** | **सन ०३–०४** | | **सन ०४–०५** | |
| | | | **शिक्षण भांडार विभागातून वाटप** | **शाळांना प्राप्त साहित्य** | **शिक्षण भांडार विभागातून वाटप** | **शाळांना प्राप्त साहित्य** |
| **३** | **केंद्रीय प्राथमिक शाळा एन–९, एम–२ हडको** | १)झाडु<br>२)खराटे<br>३)फ़िनेल<br>४)ॲसीड<br>५)लोखंडी बकेट<br>६)लोखंडी टोपले<br>७)फ़ावडे | २५ नग<br>२५ नग<br>४ कॅन<br>२ कॅन<br>१ नग<br>३ नग<br>निरंक | १० नग<br>१० नग<br>निरंक<br>निरंक<br>१ नग<br>निरंक<br>निरंक | ४५ नग<br>५० नग<br>६ कॅन<br>४ कॅन<br>निरंक<br>निरंक<br>२ नग | १० नग<br>१० नग<br>२ कॅन<br>१ कॅन<br>निरंक<br>निरंक<br>१ नग |

| | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|
| ४ | **केंद्रीय प्राथमिक शाळा चेलीपुरा** | १)झाडु<br>२)खराटे<br>३)फ़िनेल<br>४)अॅसीड<br>५)लोखंडी बकेट<br>६)लोखंडी टोपले<br>७)फ़ावडे | ५० नग<br>३० नग<br>५ कॅन<br>२ कॅन<br>१ नग<br>२ नग<br>निरंक | १२ नग<br>निरंक<br>निरंक<br>२ नग<br>२ नग<br>निरंक<br>निरंक | ४० नग<br>५० नग<br>६ कॅ्न<br>५ कॅन<br>२ नग<br>निरंक<br>निरंक | १५ नग<br>१५ नग<br>२ कॅन<br>१ कॅन<br>१ नग<br>निरंक<br>निरंक |

| | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|
| **५** | **केंद्रीय** | १)झाडु | २५ नग | १५ नग | ४५ नग | ५ नग |
| | **प्राथमिक** | | २५ नग | १० नग | ५० नग | ५ नग |
| | **शाळा बडी** | २)खराटे | ६ कॅन | निरंक | ६ कॅन | २ कॅन |
| | **गिरणी** | ३)फ़िनेल | ३ कॅन | निरंक | ५ कॅन | १ कॅन |
| | **मिलकॉर्नर** | ४)ॲसीड | १ नग | निरंक | २ नग | निरंक |
| | | ५)लोखंडी बकेट | १ नग | निरंक | निरंक | निरंक |
| | | ६)लोखंडी टोपले | निरंक | निरंक | निरंक | १ नग |
| | | ७)फ़ावडे | | | | |
| **६** | **केंद्रीय** | १)झाडु | २५ नग | १० नग | ४५ नग | १० नग |
| | **प्राथमिक** | २)खराटे | २५ नग | १० नग | ५० नग | १५ नग |
| | **शाळा** | ३)फ़िनेल | ६ कॅन | निरंक | ६ कॅन | १ कॅन |
| | **नागेश्वरवा** | ४)ॲसीड | ३ कॅन | निरंक | ४ कॅन | २ कॅन |
| | **डी** | ५)लोखंडी बकेट | निरंक | १ नग | २ नग | १ नग |
| | | ६)लोखंडी टोपले | ३ नग | निरंक | निरंक | निरंक |
| | | ७)फ़ावडे | निरंक | निरंक | निरंक | निरंक |

वरील तपशिलाआधारे असे स्पष्ट होते की, शिक्षण विभागाने स्वच्छता साहित्याचे वाटप केल्याचे वितरण रजिस्टर नुसार दर्शविले असले तरीही वरील शाळांना त्या-त्या प्रमाणात स्वच्छता साहित्य प्राप्त झालेले नाही. त्यामुळे शिक्षण विभागाने स्वच्छता साहित्याचे जे वाटप केलेले आहे त्या विषयी शंका घेण्यास पूर्णत: वाव आहे. करीता शिक्षणाधिकारी यांनी वैयक्तिक रित्या उर्वरीत शाळांना भेटी देऊन वाटपाबाबत खात्री करावी व तसा अनुपालन अहवाल लेखा परीक्षणास सादर करावा.

एकूणच वरील प्रमाणे स्वच्छता साहित्य खरेदी प्रक्रिये मधील अनियमिततेबाबत मुद्येनिहाय खालील प्रमाणे कार्यवाही करणे आवश्यक आहे असे मत आहे.

१. परिच्छेद १ प्रमाणे खरेदी दरास सक्षम अधिकारी यांची मान्यता घेण्यात आलेली नसल्यामुळे अशा नियमबाह्य खरेदीबाबत आयुक्तांची कार्योत्तर मान्यता घेऊन अनुपालन सादर करावे.

२. परिच्छेद क्र.२ मधील (अ, क व ड) बाबत समर्थनीय खुलासा करावा.

२. परिच्छेद २ (ब) नुसार जादा दराने खरेदी केल्यामुळे झालेले रू.९१०९/- इतक्या रकमेच्या नुकसानी बाबत जबाबदारी निश्चित करून रक्कम वसुल करावी.

३. परिच्छेद २ (इ) बाबत विभागाने तपासणी करून अनियमिततेबाबत जबाबदारी निश्चित करावी असे सूचित करण्यात आलेले आहे.

विभागाने दिनांक ६.३.२००६ रोजी अनुपालन सादर केले असून परिच्छेदामधील मुद्या क्र.२ (ब )नुसार ९१०९/- ही रक्कम वसूल करण्यात आलेली नाही. मुद्या क्र.२ (अ) व (क) नुसार एकत्रित रक्कम रू.५३९८७/- च्या अतिरिक्त खर्चाबाबत जबाबदारी निश्चित करून कार्यवाहीअंती फ़ेर अनुपालन सादर करण्याची सूचना विभागास देण्यात आलेली आहे.

**प रिच्छेद क्र.१०: सन २००३-०४ या वर्षातील गणवेश खरेदी रू.३,७०,५३५/- अतिरिक्त परिमाणात गणवेश खरेदीमुळे झालेल्या वाढीव खर्चाबाबत रू.६०४०/-**

सन २००३-२००४ या शैक्षणिक वर्षात गणवेश खरेदीसाठी रू.४२.०० लक्ष इतक्या आर्थिक तरतूदी मधून अंदाजीत परिमाणासाठी खरेदी दर निश्चित करणे या सदराखाली दि.३०.४.२००३ रोजी आयुक्तांचे द्वारा प्रशासकीय मान्यता प्रदान करण्यात आली. त्यानुषंगाने मागविलेल्या निविदांमध्ये चार निविदा प्राप्त झाल्या. चारही निविदाधारक पात्र ठरल्यामुळे त्यांचेकडील कापडाचे नमुने Coding करून मे.सरकॉट, मुंबई यांचेकडे प्रमाणित करण्यासाठी पाठविण्यात आले. तपासणी अंती मे. सरस्वती महिला विविध उद्यो सह.संस्था, जळगांव व मे.शुभम इंडस्ट्रीज, पैठण यांचे कापड प्रमाणित करण्यात आलेले असल्याचे संचिका पृष्ठ क्र.१२ वर नमुद करण्यात आलेले आहे. त्यानुसार विभागाने रू.१४,९५,८३४/- इतक्या रकमेची खरेदी प्रस्तावित करून सदर खरेदीस स्थायी समिती ठराव क्र.२८, दि.२.९.२००३ अन्वये अंतिम मान्यता घेण्यात आली.

उपरोक्त मान्यतेनुसार रू.३,७०,५३५/- इतक्या रकमेचे गणवेश पुरवठा करण्यासाठी मे.शुभम इंडस्ट्रीज, पैठण यांना आदेश मनपा/शिक्षण-भांडार/२००३/३४२,दि.१०.९.२००३ निर्गमित करण्यात आला. पुरवठा आदेशानुसार देयक रू.३,७०,५३५/- मधून १०% रक्कम राखून व Testing Charges वजा जाता रू.३,३१,४३०/- इतकी रक्कम प्रमाणक क्र.४५० दि.७.५.२००४ अन्वये संबंधितास अदा करण्यात आली. संचिकेच्या तपासणी अंती असे निदर्शनास आले आहे की, दि.३१.७.२००३ रोजीची बालवाडीतील विद्यार्थी संख्या ही शिक्षण विभागाने प्रमाणित केलेली असून ती २१५४ आहे. मात्र दि.१०.९.२००३ रोजीच्या कार्यादेशामध्ये २५५४ अशी विद्यार्थी संख्या विचारात घेऊन २५५४ खाकी हाफ़पॅन्ट पुरवठा करण्याबाबत नमुद केल्यामुळे ४०० नग खाकी हाफ़पॅन्टची अतिरिक्त खरेदी करण्यात आली आहे असे दिसून येते. परिणामी, मान्य निविदा दर रू.१५.१०×४०० =रू.६०४०/- इतक्या रकमेचा अतिरिक्त / अनावश्यक खर्च झालेला आहे.

वरील बाबत जबाबदारी निश्चित करण्यात येऊन रू.६०४०/- च्या वसूली बाबत कार्यवाही करणे आवश्यक वाटते. शिक्षण विभागाने समर्थनीय खुलासा सादर करावा असे सूचित करण्यात आले आहे. विभागाने दिनांक ६.३.२००६ रोजी अनुपालन सादर केले असून ते असमाधानकारक आहे. अनुषंगिक अभिलेखे हे पडताळणीस्तव सादर करण्याची सूचना पुनश्च देण्यात आली आहे.

**परिच्छेद क्र.११: शिक्षण विभागाकडील सन २००४-२००५ या वर्षातील गणवेश खरेदी रू.३९,७७,९०८/- गणवेश पुरवठा विलंबाने केल्यामुळे दंडाची रक्कम रू.२८,६४४/- वसुल न झाल्याबाबत:रू.२८६४४/-**

सन २००४-०५ या आर्थिक वर्षात शालेय विद्यार्थ्यांसाठी गणवेश खरेदी करणे या सदराखाली रू.४०.०० लक्ष या अंदाजपत्रकीय तरतूदीमधून खरेदी प्रस्तावित करण्यात आली. तथापि, शिल्लक तरतूद ही रू.३६.०० लक्ष इतकीच असल्यामुळे दर निश्चितीनंतर एकूण खरेदीस

आवश्यक असलेली रक्कम रू.४३,९०,७४३/- उपलब्ध होण्यासाठी उर्वरीत तरतूद रू.८.०० लक्ष एवढी रक्कम ही इतर लेखाशिर्षातून वळती करून घेण्यासाठी प्रस्तावित करण्यात येऊन त्यास दि.१७.७.२००४ रोजी आयुक्तांचे द्वारा प्रशासकीय मान्यता देण्यात आली.

सदरचा प्रस्ताव हा स्थायी समिती समोर सादर करण्यात येऊन त्यास ठराव क्र.५८, दि.२१.७.२००४ अन्वये मान्यता देण्यात आली. तसेच प्राप्त निविदामधून निविदाधारकांशी झालेल्या वाटाघाटीअंती ठरल्यानुसार मे.शुभम इंडस्ट्रीज, पैठण व मे. MSSIDC, औरंगाबाद यांचेकडून खरेदी करण्यासाठी मान्यता देण्यात आल्याचे निदर्शनास आले. त्यानुसार रू.३६,३८,४३८/- इतक्या रकमेचे गणवेश पुरवठ्याबाबत मे.शुभम इंडस्ट्रीज, पैठण यांना पुरवठा आदेश क्र.मनपा/भांडार/२००४/९०३, दि.२६.७.२००४ निर्गमित करण्यात आला तर उर्वरीत गणवेश पुरवठ्यासाठी रू.३,४०,८८२/- साठी मे. MSSIDC, औरंगाबाद यांना पुरवठा आदेश क्र.मनपा/भांडार/निरंक/२००४, दि.२६.७.२००४ हा निर्गमित करण्यात आला. पुरवठा आदेशानुसार प्राप्त गणवेशापोटी मे.शुभम इंडस्ट्रीज,पैठण यांना १०% रक्कम व तपासणी फ़ी रक्कम वगळून रू.३२,७८,४२९/- इतक्या रकमेचे प्रदान हे प्रमाणक क्र.६९१८ दि.८.११.२००४ अन्वये करण्यात आले तर मे MSSIDC औरंगाबाद यांनाही वरील प्रमाणे रकमा कपात करून रू.२,९५,६४१/- इतक्या रकमेचे प्रदान हे प्रमाणक क्र.६९१९ दि.८.११.२००४ अन्वये करण्यात आलेले आहे.

तत्पूर्वी निविदा सूचना क्र.मनपा/भांडार/२००४/५०७ दि.१८.५.२००४ अन्वये प्रसिध्द करण्यात येऊन त्यानुषंगाने दरपत्रके मागविण्यात आली होती. दरपत्रकासोबत जोडलेल्या अटी/शर्तीनुसार पुरवठा कालावधी मध्ये ३० दिवस मालाचा पुरवठा न झाल्यास उशिरा पुरवठा केलेल्या मालाच्या किंमतीवर अर्धा टक्का प्रती आठवडा याप्रमाणे दंड आकारणयाबाबत तरतूद ठेवण्यात आली होती. संचिकेच्या तपासणीअंती संबंधीत पुरवठादराने आदेश प्राप्तीच्या दिनांकानंतर ३० दिवसात पुरवठा केला नसल्याचे निदर्शनास आले आहे. मात्र निविदा अटी/शर्तीनुसार उशिराने पुरवठा केल्यामुळे संबंधीताकडून दंड वसूल करणयात आलेला नाही. त्याबाबतचा तपशिल खालील प्रमाणे आहे.

| अ.क्र. | पुरवठादाराचे नांव | कार्यादेश क्र./दिनांक | मालाचा पुरवठा दिनांक | साठा नोंदवही पृ.क्र.५ व ६ नुसार साहित्य प्राप्तीचा दिनांक | विलंब कालावधी | पुरवठा मालाची रक्कम (रू) | निविदा अटी नुसार दंडनिय रक्कम (रू) |
|---|---|---|---|---|---|---|---|
| १ | मे.शुभम इंडस्ट्रीज, पैठण | मनपा/भांडार/९०३/०४, दि.२६.७.०४ | ३.९.०४ | ८.११.०४ | १ आठवडा (आठ दिवस) | ६८३१८४ | ३४१६ |
| | | | ४.९.०४ | ८.११.०४ | १ आठवडा (नऊ दिवस) | ११४७५१० | ५७३७ |
| | | | १४.९.०४ | ८.११.०४ | ३ आठवडे (१९ दिवस) | ४१७४९९ | ६२६२ |
| २ | मे.MSSIDC औरंगाबाद | मनपा/भांडार/२००४ निरंक | २०.१०.०४ | ८.११.०४ | ८ आठवडे (५६ दिवस) | ३३०७२५ | १३२२९ |
| | | | | | | **एकूण** | **२८६४४** |

वरील तपशिलानुसार गणवेशाचा विलंबाने पुरवठा केल्यामुळे मे.शुभम इंडस्ट्रीज,पैठण यांचेकडून रू.१५,४१५/- व मे.मे.MSSIDC औरंगाबाद यांचेकडून रू.१३२२९/-ही रक्कम वसुल करणे आवश्यक होते. मात्र सदर खरेदी प्रकरणी अशी कार्यवाही केलेली नाही.

करीता, विभागाने संबंधीताकडून वरील प्रमाणे एकत्रित दंडाची रक्कम रू.२८६६४/- वसूल करून महापालिका फ़ंडात भरून ३० दिवसात अनुपालन अहवाल लेखा परीक्षणास सादर करावा. तसेच संबंधीतावर जबाबदारीही निश्चित करण्यात यावी असे सूचित करण्यात आलेले आहे.

विभागाने दिनांक ६.३.२००६ रोजी अनुपालन सादर केले असून ते असमाधानकारक आहे. अनुषंगिक अभिलेखे हे पडताळणीस्तव सादर करण्याची सूचना पुनश्च देण्यात आली आहे.

**परिच्छेद क्र.१२: भविष्य निर्वाह निधी लेखे तपासणीतील अनियमिततेबाबत.**

सन २००४-२००५ या आर्थिक वर्षात शिक्षण विभागाकडील अभिलेख्यांच्या तपासणी अंतर्गत भविष्य निर्वाह निधी कॅश रजिस्टर मधील नोंदीची चाचणी स्वरूपात तपासणी करण्यात आली. तपासणी दरम्यान दि.३१.३.२००५ रोजीची शिल्लक रू.५५,४७,६६२/- इतकी आहे. तर बँक पासबुकावरून तपासणी केली असता खाते क्र.५१० वर दि.३१.३.२००५ रोजी रू.५४,८३,६७४/- इतकी शिल्लक असल्याचे निदर्शनास आले आहे. त्यामुळे एकूण आर्थिक व्यवहारा अंतर्गत रू.६३९८८/- इतक्या रकमेची तफ़ावत असल्याचे निदर्शनास आले आहे.

अ) भविष्य निर्वाह निधी नोंदवही (लेजर) तील वर्गणी दारांच्या खात्यावरील दि.३१.३.२००५ अखेरची शिल्लक ही व्याजासह निर्धारीत केल्याचे दिसून आले. नमुना दाखल तपासणी

करण्यात आली असता श्रीमती रेखा धोंगडे यांच्या सन २००४-२००५ या वर्षातील सुरूवातीची शिल्लक रू.१,८५,१९८/- इतकी असून वर्षभरात रू.२४,०००/- वर्गणी जमा करण्यात आली. अशा प्रकारे एकूण रू.२,०९,१९८/- रकमेवरील ८% दराने रू.१५,८५५/- मिळून रू.२,२५,०५३/- ही रक्कम दि.३१.३.२००५ रोजी शिल्लक दर्शविण्यात आली आहे. सदरील रक्कम व व्याजाची आकारणी ही बरोबर असल्याचे निदर्शनास आले आहे.

ब) वरील परिच्छेद (अ) नुसार संबंधित वर्गणीदारांचे हिशोब पूर्ण केलेले असल्याचे दिसून आले असले तरीही सर्व वर्गणीदारांना सन २०००-०१ पासून वर्षनिहाय विवरणपत्राचे वाटप करण्यात आलेले नाहीत. महाराष्ट्र भविष्य निर्वाह निधी नियम १९९८ मधील नियम क्र.३६ नुसार वर्गणीदाराला प्रत्येक वर्षाच्या ३१ मार्च नंतर निधीतील शिल्लक रकमेचे विवरणपत्र पाठविणे आवश्यक असतांनाही त्यानुसार कार्यवाही करण्यात आलेली नाही.

शिक्षण विभागाने दि.३१.३.२००५ पर्यंतच्या शिल्लक रकमेचे विवरणपत्र संबंधीत वर्गणीदारांना ३० दिवसांत निर्गमित करून तसा अहवाल लेखा परीक्षणास सादर करावा. तसेच रक्कम रू.६३९८८/- च्या तफ़ावती बाबतही विभागाने खुलासा सादर करावा. असे सूचित करण्यात आले आहे.

विभागाने दिनांक ६.३.२००६ रोजी सादर केलेले अनुपालन हे असमाधानकारक आहे. आक्षेपानुसार पूर्तता करून फ़ेर अनुपालन सादर करण्याची सूचना विभागास देण्यात आलेली आहे.

**परिच्छेद क्र.१३:नियमबाह्य फ़र्निचर खरेदी बाबत : रक्कम रू.१०,८७,०६०/-**

सन २००३-०४ व २००४-०५ या आर्थिक वर्षात एकत्रितपणे मनपा शाळांसाठी फ़र्निचर खरेदीसाठी रक्कम रू.१५ लक्ष इतक्या रकमेची खरेदी प्रस्तावित करण्यात येवून त्यास दि.९.१.२००४ रोजी मा.आयुक्तांची मान्यता घेण्यात आलेली आहे. तथापि सदरचा प्रस्ताव स्थायी समितीच्या अंतिम मंजुरीसाठी सादर करणे आवश्यक असतांनाही फ़र्निचर खरेदीबाबत जाहीर निविदा मागविण्यात आल्या असता एकूण सात निविदा प्राप्त असल्याचे नमुद करण्यात आल्या असून मे.नॅशनल फ़ॅब्रिकेटर्स ॲन्ड ट्रेडर्स, औरंगाबाद व मे.एस.एन.प्रॉडक्टस्,औरंगाबाद व मे.महाराष्ट्र स्मॉल स्केल इंडस्ट्रीज डेव्हलपमेंट कॉर्पोरेशन,औरंगाबाद (एम.एस.एस.आय.डी.सी.) यांचे दर तुलनात्मक दृष्ट्या व विवरणा नुसार कमी असल्याने त्यांना दराच्या वाटाघाटीस बोलविण्यात आले. वाटाघाटी अंती संचिका परिच्छेद क्र.१२० मधील दरांना दि.२२.६.२००४ रोजी मा.आयुक्तांनी मान्यता दिल्याचे निदर्शनास आले. तथापि प्रस्तावित खरेदी ही रू.१५ लक्ष इतक्या रूपयांची असल्याने दर निश्चितीस स्थायी समितीची मान्यता आवश्यकता असतांना केवळ मा.आयुक्त यांनी दिलेल्या प्रशासकीय मान्यते आधारे मे.एस.एस.एस.आय.डी.सी., औरंगाबाद यांना रू.२९५६००/- इतक्या रकमेची फ़र्निचर साहित्य पुरवठा करणे तर मे.नॅशनल फ़ॅब्रिकेटर्स ॲन्ड ट्रेडर्स,औरंगाबाद यांना रू.४६८८५०/- इतक्या रकमेचे फ़र्निचर साहित्य पुरवठा करणे बाबत अनुक्रमे

जा.क्र./मनपा/भांडार/२००४/९१० दि.२७.७.२००४ व जावक क्र.मनपा/भांडार/२००४/९९७, दि.१२.८.२००४ अन्वये पुरवठा आदेश निर्गमित करण्यात आल्याचे दिसले. तत्पूर्वी मे.नॅशनल फ़ॅब्रिकेटर्स ॲन्ड ट्रेडर्स, औरंगाबाद यांनी दि.२४.६.२००४ व मे.एस.एस.एस.आय.डी.सी., औरंगाबाद यांनी दि.२९.६.२००४ रोजी करारनामा केल्याचे निदर्शनास आले आहे.

अ) पुरवठा आदेशानुसार मे.एम.एस.एस.आय.डी.सी., औरंगाबाद यांनी विहीत मुदतीत मालाच्या पुरवठा केला असून त्यांना रू.२९५६००/- इतकी रक्कम ही प्रमाणक क्र.७०६८ दि.१०.११.०४ व प्रमाणक क्र.१०६५७ दि.२५.०१.०५ अन्वये प्रदान करण्यात आलेली आहे. (१४४०००/- अधिक १५१६००/-)

तसेच मे.नॅशनल फ़ॅब्रिकेटर्स ॲन्ड ट्रेडर्स, औरंगाबाद यांनीही विहीत मुदतीत मालाचा पुरवठा केल्यामुळे त्यांना रक्कम रू.६९३४६०/- ही प्रमाणक क्र.६८६८ दि.८.११.०४ व प्रमाणक क्र.११८६७ दि.२१.२.०५ अन्वये अदा करण्यात आलेली आहे. (रू.४६८८५०/- व रू.२२४६१०/-) संचिकेचे अवलोकन केले असता असे निदर्शनास आले की, मे.नॅशनल फ़ॅब्रिकेटर्स ॲन्ड ट्रेडर्स, औरंगाबाद यांनी कार्यदेशातील परिमाणा नुसार साहित्य पुरवठा करणे आवश्यक असतांना काही साहित्य हे जादा परिमाणाने पुरवठा केला असून पुरवठ्यानुसारच संबंधितास देयक अदा करण्यात आले आहे. सदरची बाब ही खालीलप्रमाणे तपशिलात नमुद करण्यात आलेली आहे. (परिशिष्ट - अ नुसार) तेव्हा परिशिष्ट-अ नुसार जादा परिमाणामुळे फ़र्निचर खरेदीवर करण्यात आलेल्या रक्कम रू.७४७००/- इतक्या रकमेचा अनावश्यक खर्च करण्यात आल्याचे लेखा परीक्षणाअंती निदर्शनास येते.

**परिशिष्ट –अ**

| अ.क्र. | कार्यादेश क्र. व दिनांक | साहित्याचे नांव | निविदा नुसार अंदाजित खरेदी परिमाण | कार्यादेशा नुसार परिमाण/ संख्या | प्रत्यक्षात पुरवठा केलेल्या साहित्याच्या परिमाण संख्या | साहित्याचे जादा परिमाण | परिमाणाची किंमत |
|---|---|---|---|---|---|---|---|
| १ | मनपा/भांडार/९१० दि.२७.७.०४ मनपा/शिक्षण/१३४/०५ दि.३.२.०५ | स्टील बुक केस | १५ | ३५ | ३५ | १० | ५६५०० |
| २ | भांडार/९१०/०४ दि.२७.७.०४ मनपा/भांडार/९९७/०४ दि.१२.८.०४ मनपा/भांडार/शिक्षण/१३४ | स्टील अलमारी लहान | ८० | ९० | ९० | १० | १७९०० |

| | | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|
| | /०५ दि.३.२.०५ | | | | | | |
| | | | | | | **एकूण** | **७४७००** |

ब) मे.एम.एस.एस.आय.डी.सी.,औरंगाबाद यांनी दि.२७.७.२००४ रोजीच्या कार्यादेशानुसार ८०×१८९५ स्टील टेबल या साहित्याचे खरेदी बील क्र.१८० दि.निरंक नुसार रू.१५१६००/- सादर केले असता त्या साहित्याची नोंद ही साठा रजिस्टर मध्ये घेण्यात आलेली नाही असे निदर्शनास आले. सदरच्या खरेदीची नोंद ही संबंधित साठा रजिस्टरला घेणे आवश्यक होते.

क) उपआयुक्त (प्रशासन),यांच्या दि.१६.९.२००४ रोजीच्या मान्यतेनुसार ४०० नग फ़ायबर खुर्च्या खरेदी करण्यासाठी मे.एस.एन.प्रॉडक्टस्, औरंगाबाद यांना पुरवठा आदेश मनपा/भांडार/२११८/२००४ दि.२०.९.२००४ अन्वये निर्गमित करण्यात आला आहे. मान्य दरानुसार रू.२४५/- प्रती नग या प्रमाणे ४०० नगांसाठी रू.९८०००/- हे प्रमाणक क्र.१६६५ दि.१५.२.०५ अन्वये संबंधितास प्रदान करण्यात आलेले आहेत.

उपरोक्त पुरवठा आदेशामध्ये सदरचे साहित्य १५ दिवसांत पुरवठा करण्याबाबत आदेशीत करण्यात आले होते त्यानुसार सदरचे साहित्य हे दि.५.१०.२००४ रोजी प्राप्त होणे आवश्यक होते, मात्र सदरचे साहित्य हे दि.२८.१.२००५ रोजी म्हणजेच ११४ दिवस विलंबाने प्राप्त झाल्याचे बील क्र.१५८५ दि.२८.१.२००५ अन्वये निदर्शनास येते.

सदरचे साहित्य प्राप्त झाल्याविषयी डिलेव्हरी चालन हे तपासणीस्तव उपलब्ध होऊ शकले नाही. तसेच सदरच्या साहित्याची नोंदही साठा रजिस्टरवर घेण्यात आलेली नाही. त्यामुळे निविदा अट क्रमांक ७ नुसार पुरवठा मालाचे किंमतीवर अर्धा टक्के प्रती आठवडा याप्रमाणे दंड रू.७८४०/- संबंधिताकडून वसूल करणे आवश्यक होते. मात्र दंड वसुली करण्यात आलेली नाही.

वरील विवेचना वरून असे नमुद करण्यात येते की,

१. मुद्या क्र.अ,ब व क मध्ये दर्शविल्यानुसार फ़र्निचर साहित्याची केलेली रू.१०,८७,०६०/- इतक्या रकमेची खरेदी ही स्थायी समितीच्या मंजुरीशिवाय करण्यात आल्यामुळे नियमबाह्य आहे. अशा अनियमित खरेदी बाबत जबाबदारी निश्चित करणे आणि कार्योत्तर मंजूरी घेणे आवश्यक वाटते.

२. मुद्या क्र. अ मध्ये दर्शविल्यानुसार रू.७४७००/- इतक्या रकमेच्या अनावश्यक खरेदी बाबत विभागाने समर्थनीय खुलासा सादर करावा.

३. मुद्या क्र.ब मध्ये नमुद केल्यानुसार खरेदी केलेल्या मालाची नोंद ही संबंधित साठा रजिस्टर मध्ये घेण्यात आली आहे किंवा कसे ? या बाबत खुलासा सादर करावा.

४. मुद्या क्र.क मध्ये नमुद केल्यानुसार संबंधित पुरवठाधारका कडून दंडनिय रक्कम रू.७८४०/- वसुल करण्यात येऊन महापालिका फ़ंडात भरावी व अनुपालन सादर करावे असे विभागास

सूचित करण्यात आले आहे. विभागाने दिनांक ६.३.२००६ रोजी सादर केलेले अनुपालन हे असमाधानकारक आहे. परिच्छेदात नमूद ज्या साहित्याची नोंद घेण्यात आलेली आहे अशी नोंदवही आणि खरेदीची मूळ संचिका सादर करण्याची सूचना विभागास पुनश्च देण्यात आलेली आहे.

## जनसंपर्क विभाग

## खर्च बाजू लेखा परीक्षण

या विभागाचे सन २००३-२००४ व २००४-२००५ या आर्थिक वर्षाचे लेखा परीक्षण हाती घेण्यांत आले असून, यादरम्यान माहे एप्रिल-२००३ ते जून २००३ तसेच जानेवारी-२००४ ते मार्च २००४ या महिन्यातील अभिलेख्यांचे चाचणीस्वरूपात लेखा परीक्षण करण्यांत आले. या दरम्यान जाहीरात प्रकाशित करण्याबाबतचे आदेश व अदा केलेल्या देयकांची तपासणी करण्यांत आली, यामध्ये खालील प्रमाणे आक्षेपार्ह बाबी निदर्शनास आल्या आहेत.

**परिच्छेद क्र.१:- वाढीव परिमाणामुळे झालेल्या अतिप्रदानाबाबत :रक्कम रू.२,०२,२५०/-**

१) लेखा परीक्षण कालावधीत माहे एप्रिल ते जून,२००३ व जानेवारी ते मार्च,२००४ या दरम्यान उर्दू दैनिक औरंगाबाद टाईम्स, रहेबर, मुफ़स्सीर, मुकदस या वर्तमानपत्रातून वेळोवेळी दिलेल्या जाहीरातीच्या आदेशाप्रमाणे /दराप्रमाणे जाहीरातीचे देयके अदा न करता, एकूण परिमाणामध्ये ३० टक्के वाढ करून, देयके मंजूर केल्याचे दिसून येते. परिणामी उक्त कालावधीत रू.३६,५८२/- एवढ्या रकमेचे अतिप्रदान झालेले आहे. याबाबत दि.२.८.१९८९ रोजी मा.आयुक्त यांची मंजूरी घेतल्याचे दिसून येते. परंतु जिल्हा माहिती कार्यालयाकडून शासनाचे उर्दू दैनिकासाठी ३० टक्के वाढीव दराचे आदेश /परिपत्रक असल्याचे दिसून येत नाही. सदरच्या जादा अदाईच्या रकमेबाबत माहिती संचालनालयाकडील सुचनांच्या अनुषंगाने समर्थनिय खुलासा करावा. शिवाय बाब ही स्थायी समिती /सर्वसाधारण सभेसमोर ठेवून पुढील आवश्यक ते आदेश घेणे आवश्यक ठरते.

२) दैनिक महाराष्ट्र टाईम्समधून वेळोवेळी विभागामार्फ़त जाहीरात प्रसिध्दीबाबत खालील प्रमाणे अनियमितता दिसून येते.

| अ.क्र. | आर.ओ.क्र. व दिनांक | विभागा कडील व्हाऊचर क्र. | आर.ओ.मध्ये नमुद से.मी. | देयक मध्ये नमुद से.मी. | फ़रक से.मी. | दर | आर.ओ. प्रमाणे अदा करावयाची रक्कम (रूपये) | अदा केलेली रक्कम (रूपये) | फ़रक /जादा अदा रक्कम (रूपये) |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| १ | १८१<br>३.१.०४ | ७३५ | ५० | २०० | १५० | १९५ | ९७५० | ३९००० | २९२५० |
| २ | १८८<br>१५.१.०४ | ७३६ | २४ | ९६ | ७२ | १९५ | ४६८० | १८७२० | १४०४० |
| ३ | १८७<br>१५.१.०४ | ७३७ | १६ | ६४ | ४८ | ७९५ | ३१२० | १२४८० | ९३६० |
| ४ | ११४<br>१३.१०.०३ | ६१९ | ५० | २०० | १५० | १९५ | ९७५० | ३९००० | २९२५० |
| ५ | १७०<br>२४.१२.०३ | ७३४ | ९६ | ३८४ | २८८ | १९५ | १८७२० | ७४८८० | ५६१६० |
| | | | | | | एकूण | ४६०२० | १८४०८० | १३८०६० |

३) दैनिक लोकसत्ता, मुंबई या वर्तमानपत्रा मध्ये जाहिरात प्रसिध्दीकरीता विभागामार्फ़त वेळोवेळी आदेश देण्यांत आलेले आहेत. सदर जाहीरात प्रसिध्दीबाबत संबंधितास प्रमाणक क्र.१४०८१ दि.३१.३.२००४ अन्वये प्रदान केलेल्या देयकाचा तपशील पुढील प्रमाणे आहे.

| अ.क्र. | आर.ओ.क्र. व दिनांक | विभागा कडील व्हाऊचर क्र. | आर.ओ.मध्ये नमुद से.मी. | देयक मध्ये नमुद से.मी. | फ़रक से.मी. | दर | आर.ओ. प्रमाणे अदा करावयाची रक्कम (रूपये) | अदा केलेली रक्कम (रूपये) | फ़रक /जादा अदा रक्कम (रूपये) |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| १ | १६० / १२.१२.०३ | ७३८ | ३० | १२० | ९० | ३०६.७५ | ९२०२ | ३६८१० | २७६०८ |

वरील प्रमाणे रू.१,६५,६६८/- इतकी रक्कम ही जादा अदा केल्याचे निदर्शनास येते. तथापि, वरील परिच्छेद क्र.२ मध्ये नमुद रू.१,३८,०६०/- चे खर्चापैकी लेखा विभागाकडील प्रमाणक क्र.१४०८२ दि.३१.३.२००४ अन्वये रू.५२,६५०/- संबंधितास अदा करण्यांत आलेली आहे, असे मुळ प्रमाणकावरून दिसून येते. उर्वरित रक्कम रू.८५,४१०/- च्या अदाईचे मुळ प्रमाणके हे जनसंपर्क विभागाने तपासणीस्तव उपलब्ध करून दिलेले नाहीत.

एकूणच संबंधित विभागाने दिलेल्या आदेशातील परिमाणाप्रमाणे देयके ही अदाईस्तव सादर न करता, वर्तमानपत्र कार्यालयाकडून प्राप्त झालेली देयके ही दर व परिमाण, याबाबत कोणतीही शहानिशा न करता अदाईस्तव सादर केल्यामुळे रू.१,६५,६६८/- इतक्या रकमेचे अतिप्रदान झाल्याचे दिसून येते. वाढीव परिमाणाबाबत अदाईच्या दृष्टीने शासन आदेश वा कुठल्याही सुचना असल्याचे लेखा परीक्षणाच्या वेळी निदर्शनास आणून देण्यांत आलेले नसल्याने, झालेल्या खर्चाबाबतची सत्यता पडताळता आली नाही.

वाढीव परिमाणानुसार झालेल्या खर्चाबाबत शासन आदेशाच्या अनुषंगाने विभागाने समर्थनिय खुलासा करून अनुपालन सादर करण्याची सूचना विभागास देण्यात आलेली आहे.

अद्यापपावेतो अनुपालन अप्राप्त आहे.

**परिच्छेद क्र.२ : वाढीव दराने छायाचित्रांचे देयके पारित केल्यामुळे झालेले अतिप्रदान: रू.१२८५/-**

सन २००३-२००४ या आर्थिक वर्षात जनसंपर्क विभागामार्फ़त विविध कार्यालयीन कामाच्या छायाचित्रांची देयके ही जिल्हा माहिती कार्यालय, औरंगाबाद यांच्याकडून प्राप्त झालेल्या दि.१५.१०.२००३ रोजीचे पत्रासोबत जोडलेल्या डि.एस.आर.दरानुसार तपासणी करण्यात आली.

तपासणी अंती असे निदर्शनास आले की, डि.एस.आर.अ.क्र.६८ (३) मध्ये ५ × ७ या आकाराच्या तीन फ़ोटो प्रतीसाठी रू.१२५/- असा दर निश्चित करण्यात आलेला आहे. मात्र संबंधीत छायाचित्रकाराने जी देयके सादर केली आहेत त्यामध्ये ५ × ७ या आकाराचा एक फ़ोटोसाठी वरील प्रमाणे दरानुसार रू.४२/- ऐवजी रू.५०/- असा दर आकारून देयके सादर केल्यामुळे रू.१२८५/-

इतक्या रकमेचे संबंधीतास अति प्रदान करण्यात आल्याचे निदर्शनास आलेले आहे. अतिप्रदान तपशिल हा खालील **परिशिष्ट ड** नुसार नमुद करण्यात आलेला आहे.

## परिशिष्ट ' ड '

| अ.क्र. | विभागा कडील देयक क्र. | छायाचित्रकाराने सादर केलेले देयक क्र. व दिनांक | छायाचित्र | | देयकातील रक्कम रू | डी.एस.आर. नुसार अदा करावयाची रक्कम रू. | जादा अदाईची रक्कम रू. | शेरा |
|---|---|---|---|---|---|---|---|---|
| | | | संख्या | साईज | | | | |
| १ | ३१ | रविराज कलेक्शन, बील .नं. ३५६/८.९.०३ | ५ | ५ × ७ | २५० | २१० | ४० | |
| २ | २४ | बील नं.३३४/२४.७.०३ | २५ | ५ × ७ | १२५० | १०५० | २०० | |
| ३ | २६ | बील नं ३३३/२४.७.०३ | २५ | ५ × ७ | १२५० | १०५० | २०० | |
| ४ | २२ | बील नं ३२४/१८.६.०३ | ५ | ६ × ८ | २५० | १२५ | १२५ | |
| ५ | २० | बील नं ३२३/१.७.०३ | २५ | ५ × ७ | १२५० | १०५० | २०० | |
| ६ | १७ | बील नं ८६/१२.५.०३ | २० | ५ × ७ | १००० | ८४० | १६० | |
| ७ | १३ | बील नं ८४/१२.५.०३ | १५ | ५ × ७ | ७५० | ६३० | १२० | |
| ८ | ११ | बील नं ८८/१२.५.०३ | १५ | ५ × ७ | ७५० | ६३० | १२० | |
| ९ | २५ | रंगनाथ पाटील, बील नं.४९०/७.८.०३ | १५ | ५ × ७ | ७५० | ६३० | १२० | |
| | | | | | | | **१२८५** | |

वरील मुद्या बाबत जनसंपर्क विभागाला अर्धसमास पत्र क्र.२ दि.३.१०.२००५ अन्वये खुलासा सादर करण्याबाबत कळविण्यात आले होते. मात्र अद्याप पर्यंत विभागाने खुलासा सादर केलेला नाही. तसेच सदर वर्षातील मुळ प्रमाणके ही तपासणीस्तव उपलब्ध करून दिलेली नाहीत. अन्यथा सोबतच्या तपशिलानुसार मे.रविराज कलेक्शन, औरंगाबाद यांचेकडून रू.११६५/- व मे.रंगनाथ पाटील, औरंगाबाद यांचेकडून रू.१२०/- याप्रमाणे अतिप्रदानाची रक्कम वसुल करून महापालिका फ़ंडात भरावी व त्याबाबतचा अनुपालन अहवाल सादर करण्याची सूचना विभागास देण्यात आलेली आहे.

अद्यापपावेतो अनुपालन अप्राप्त आहे.

**परिच्छेद क्र.३: वाढीव दराने छायाचित्रांचे देयके पारित केल्यामुळे झालेले अतिप्रदान: रू.१९०४/-**

सन २००४-२००५ या आर्थिक वर्षात जनसंपर्क विभागामार्फ़त विविध कार्यालयीन कामाच्या छायाचित्रांचे देयके ही जिल्हा माहिती कार्यालय, औरंगाबाद यांचेकडून प्राप्त झालेल्या

दि.१५.१०.२००३ रोजीचे पत्रासोबत जोडलेल्या डी.एस.आर.मधील दरानुसार तपासणी करण्यात आली.

तपासणी अंती असे निदर्शनास आले की, डी.एस.आर.अ.क्र.६८(३) मध्ये ५×७ या आकाराच्या तीन फ़ोटो प्रतीसाठी रू.१२५/- असा दर निश्चित करण्यात आलेले आहे. मात्र संबंधित छायाचित्रकाराने जी देयके सादर केली त्या मध्ये ५×७ या आकाराच्या एक फ़ोटोसाठी वरील प्रमाणे दरानुसार रू.४२/- ऐवजी रू.५०/- असा दर आकारून देयके सादर केल्यामुळे रू.१९०४/- इतक्या रकमेचे संबंधितास अतिप्रदान करण्यात आले असल्याचे निदर्शनास आले आहे. सदरची बाब खालील प्रमाणे परिशिष्ट इ नुसार नमुद केलेली आहे.

## परिशिष्ट – इ

| अ.क्र. | विभागा कडील देयक क्र. | छायाचित्रकाराने सादर केलेले देयक क्र. व दिनांक | छायाचित्र | | देयकातील रक्कम रू | डी.एस.आर. नुसार अदा करावयाची रक्कम रू. | जादा अदाईची रक्कम रू. | शेरा |
|---|---|---|---|---|---|---|---|---|
| | | | संख्या | साईज | | | | |
| १ | ८ | रवीराज कलेक्शन, बील नं.४२६/१३.५.०५ | ५ | ५×७ | २५० | २१० | ४० | |
| २ | १८ | बील नं.४२९/११.६.०४ | ३५ | ५×७ | १७५० | १४७० | २८० | |
| ३ | २८ | बील नं.४५७ /२९.६.०४ | २० | ५×७ | १००० | ८४० | १६० | |
| ४ | ३० | बील नं.४४८ /३१.७.०४ | १० | ५×७ | ५०० | ४२० | ८० | |
| ५ | ३१ | बील नं.४५३ /२.८.०४ | १८ | ५×७ | ९०० | ७५६ | १४४ | |
| ६ | ४ | भीमा शंकर नावंदे बील नं.४२६ /१३.५.०४ | २० | ५×७ | १००० | ८४० | १६० | |
| ७ | १० | बील नं.००७ /२६.५.०४ | २० | ५×७ | १००० | ८४० | १६० | |
| ८ | १४ | रंगनाथ पाटील बील नं.५९८/९.६.०४ | १५ | ५×७ | ७५० | ६३० | १२० | |
| ९ | ७१ | आर.व्ही.पाटील बील नं.९२/३०.१.०५ | १० | ५×७ | ५०० | ४२० | ८० | |
| १० | ७५ | आर.व्ही.पाटील बील नं.८८/२५.१.०५ | १० | ५×७ | ५०० | ४२० | ८० | |
| ११ | ८१ | आर.व्ही.पाटील, बील नं.९४/२८.१.०५ | १० | ६×८ | ५०० | ४२० | ८० | |
| १२ | ८५ | बील नं.७९/१७.१.०५ | १५ | ६×८ | ७५० | ६३० | १२० | |
| १३ | ७२ | रवीराज कलेक्शन, बील नं.५००/३०.१.०५ | १० | ६×८ | ५०० | ४२० | ८० | |

| | | | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|
| १४ | **७४** | बील नं.९७/३१.१.०५ | १० | ६×८ | ५०० | ४२० | ८० | |
| १५ | **७३** | बील नं.४९८/३०.१.०५ | १५ | ६×८ | ७५० | ६३० | १२० | |
| १६ | **२४** | बील नं.०१८/१४.७.०४ | १५ | ५×७ | ७५० | ६३० | १२० | |
| | | **एकूण** | | | | | **१९०४** | |

वरील मुद्यांबाबत जनसंपर्क विभागात अर्धसमास पत्र क्र.२ दि.३.१०.२००५ अन्वये खुलासा सादर करण्याबाबत कळविण्यात आले होते. मात्र अद्यापपावेतो विभागाने खुलासा सादर केलेला नाही. तसेच सदर वर्षातील मुळ प्रमाणके तपासणीस्तव उपलब्ध करून दिलेले नाहीत.

सदरच्या आक्षेपित मुद्यांबाबत विभागाने खुलासा करावा. अन्यथा वरील तपशिलानुसार मे.रविराज कलेक्शन, औरंगाबाद यांचेकडून रू.११०४/- मे.भिमाशंकर नावंदे, औरंगाबाद यांचेकडून रू.३२०/-व मे.आर.व्ही.पाटील, औरंगाबाद यांचेकडून रू.४८०/- या प्रमाणे अतिप्रदानाची रक्कम वसुल करून महापालिका फ़ंडात जमा करावी व अनुपालन अहवाल सादर करण्याची सूचना विभागास देण्यात आलेली आहे.

अद्यापपावेतो अनुपालन अप्राप्त आहे.

**परिच्छेद क्र.४: वाढीव परिमाणामुळे झालेल्या अतिप्रदानाबाबत : रक्कम रू.५३,२४७/-**

या विभागाने सन २००४-०५ या आर्थिक वर्षाचे लेखा परीक्षण हाती घेण्यात आले असून या दरम्यान माहे ४.१०.२००४ ते ५.३.२००५ या वर्षातील अभिलेख्याचे चाचणी स्वरूपात लेखा परीक्षण करण्यात आले. या दरम्यान जाहीरात प्रकाशित करण्याबाबतचे आदेश व अदा केलेल्या देयकांची तपासणी करण्यात आली या मध्ये खालील प्रमाणे आक्षेपार्ह बाबी निदर्शनास आल्या आहेत.

लेखा परीक्षण कालावधीत माहे ४.१०.०४ ते ५.३.०५ या दरम्यान उर्दु दैनिक औरंगाबाद टाईम्स मुफ़स्सिर व मुकद्यस या वर्तमान पत्रातून वेळोवेळी दिलेल्या जाहीरातच्या आदेशाप्रमाणे/ दराप्रमाणे जाहीरातीचे देयक अदा न करता एकूण परिमाणामध्ये ३०% वाढ करून देयके मंजूर केल्याचे दिसून येते. परिणामी उक्त कालावधीत रू.५३,२४७/- एवढ्या रकमेचे अतिप्रदान झालेले आहे. सदरचीबाबही सोबतच्या **परिशिष्ट अ ते क** मधील तपशिलावरून स्पष्ट होते.या बाबत दि.२.८.१९८९ रोजी मा.आयुक्त यांची मंजुरी घेतल्याचे दिसून येते. तथापि जिल्हा माहिती कार्यालयाकडून उर्दु दैनिकासाठी ३०% वाढीव दराचे शासकीय परिपत्रक/ आदेश असल्याचे दिसून येत नाही. सदरच्या जादा अदाईच्या रकमेबाबत माहिती संचालनालयाकडील सुचनांच्या अनुषंगाने समर्थनीय खुलासा करावा. शिवाय ही बाब स्थायी समिती /सर्व साधारण सभेसमोर ठेवून पुढील आवश्यक ते आदेश घेणे आवश्यक ठरते.

उक्त कालावधीतील वरील प्रमाणे करण्यात आलेले लेखा परीक्षण हे चाचणी स्वरूपातील असून उर्वरीत कालावधीतील अभिलेख्यांची आढावा /तपासणी विभागीय स्तरावर होऊन त्यामधील आक्षेपार्ह मुद्दे निदर्शनास आल्यास उचित कार्यवाही करून त्याचा अहवाल विभागाने लेखा परीक्षण विभागास सादर करावा असे सूचित करण्यात येते.

अद्यापपावेतो अनुपालन अप्राप्त आहे.

## उद्यान विभाग

### जमा बाजू लेखा परीक्षण

**परिच्छेद क्र.१:– लेखा परीक्षणास्तव अभिलेखे, पावती पुस्तके उपलब्ध करून न दिल्याबाबत.**

सन २००३-०४ व सन २००४-०५ या आर्थिक वर्षातील उद्यान विभागाकडील खालील अभिलेखे तपासण्यांत आले आहेत.

- मिनी ट्रेन (तिकीट रू.२ प्रत्येकी) बुक क्र.७२४ ते १९९४ अशा एकूण १२३६ पावती पुस्तकांपैकी पावती पुस्तक क्र.१११९,१२४०,१४५१ ते १४६०,१६५२ व १९५२ अशी एकूण १४ पावती पुस्तके भांडार विभागाकडून उपलब्ध झालेली नाही. त्यामुळे एकूण १२२२ पावती पुस्तकाआधारे वसूल केलेल्या रकमेची तपासणी संबंधित कॅश रजिस्टरप्रमाणे करण्यांत आली.
- मेरी गो-राऊन्ड (तिकीट रू.२ प्रत्येकी) पावती बुक क्र.१६३२ ते २०३० अशा एकूण ५०६ पावती पुस्तकांपैकी १८२१ व २०३१ अशी दोन पावती पुस्तके भांडार विभागातून उपलब्ध झालेली नाही. उर्वरीत ५०४ पुस्तकांद्वारे वसूल केलेली रक्कम संबंधित कॅश रजिस्टरप्रमाणे तपासणी करण्यात आली. वेळोवेळी वसूलीची रक्कम ही महानगरपालिकेच्या फ़ंडात जमा करण्यांत आलेली आहे.
- संगीत कारंजे (तिकीट रू.३ प्रत्येकी) पावती पुस्तक क्र.२०४ ते ३३० असे एकूण १२६ पावती पुस्तकाद्वारे वसूल करण्यांत आलेली रक्कम संबंधित कॅश रजिस्टरप्रमाणे तपासणी करण्यांत आली. वेळोवेळी वसूलीची रक्कम ही महानगरपालिकेच्या फ़ंडात जमा करण्यांत आलेली आहे.
- संगीत कारंजे (तिकीट रू.५ प्रत्येकी) पावती पुस्तक क्र.९४२ ते १३८७ असे एकूण ४४५ पावती पुस्तकाद्वारे वसूल करण्यांत आलेली रक्कम ही संबंधित कॅश रजिस्टरप्रमाणे तपासण्यांत आली असून, वेळोवेळी वसूलीची रक्कम ही महानगरपालिकेच्या फ़ंडात जमा करण्यांत आलेली आहे.
- उद्यान प्रवेश फ़ी (तिकीट रू.३ प्रत्येकी) पावती पुस्तक क्र.५३४० ते १०००० असे एकूण ४६६१ व पावती पुस्तक क्र.१ ते ४४६२ असे एकूण ९१२३ पावती पुस्तकाद्वारे वसूल करण्यांत आलेल्या रकमेची संबंधित कॅश रजिस्टरप्रमाणे तपासणी करण्यांत आली. वेळोवेळी वसूलीची रक्कम ही महानगरपालिकेच्या फ़ंडात जमा करण्यांत आलेली आहे.
- स्वामी विवेकानंद उद्यान वाहनतळ (तिकीट रू.२ प्रत्येक वाहनासाठी) पावती पुस्तक क्र.१४०,१५१ ते १६०,२५४ ते २५६ असे एकूण १४ पावती पुस्तकाद्वारे वसूल करण्यांत आलेली रक्कम संबंधित कॅश रजिस्टरप्रमाणे तपासणी करण्यांत आली. वेळोवेळी वसूलीची रक्कम महानगरपालिकेच्या फ़ंडात जमा करण्यांत आलेली आहे.

मात्र सन २००४-२००५ या आर्थिक वर्षात भांडार विभागाने उद्यान विभागासाठी वितरीत केलेल्या पावती पुस्तकांपैकी पावती पुस्तक क्र.९१९,११७१ ते ११७४ व १७५२ अशी ०६ पुस्तके लेखा परीक्षणास्तव विभागाकडून उपलब्ध करून देण्यांत आलेली नाही. त्यामुळे सदरच्या पावती पुस्तकांद्वारे रक्कम वसूल केली किंवा कसे व केली असल्यास महानगरपालिका फ़ंडात जमा केली किंवा कसे, याबाबतची सत्यता पडताळता येवू शकली नाही. संबंधित विभागाने अशा ०६ पुस्तकांचा शोध घेवून, त्याद्वारे वसूल झालेली रक्कम ही महानगरपालिकेच्या फ़ंडात जमा करण्यांत आलेली आहे, याबाबत खातरजमा करून तसा अनुपालन अहवाल सादर करण्याची सूचना विभागास देण्यात आली आहे.

अद्यापपावेतो अनुपालन अप्राप्त आहे.

**परिच्छेद क्र.२:-** **मुळ मंजूर कामाव्यतिरिक्त अन्य कामावर केलेल्या खर्चाबाबत रू.४५,९३७/-**

- साईनगर विकास कामाकरीता रू.२४,५०९/- चे अंदाजपत्रक तयार करण्यांत येवून, त्यास प्रशासकीय मान्यता घेवून, मागविलेल्या निविदेनुसार तुलनात्मक दृष्ट्या कमी दराच्या ठेकेदारास दि.२०.०९.२००३ रोजी कार्यादेश देण्यांत आला. सदर कामासाठी रू.४,९१८/- इतका खर्च झाल्याचे मोजमाप पुस्तिकेवरून स्पष्ट होते. उर्वरीत रक्कम रू.१९,०२२/- अन्य कामा प्रित्यर्थ खर्च करण्यांत आली आहे. सदरच्या कामासाठी एकूण रू.२३,९४०/- इतका खर्च झाला असून, प्रमाणक क्र.६३१३ दि.७.१०.२००३ अन्वये संबंधितास रकमेचे प्रदान झाले आहे. विभागाने एकूण खर्चास मान्यता घेतांना, प्रत्येक कामासाठी स्वतंत्र खर्च दर्शविणे अपेक्षित आहे.

- काबरानगर येथील उद्यान विकसित करण्यासाठी रू.२४,६५९/- चे अंदाजपत्रक तयार करण्यांत येवून, त्यास प्रशासकीय मान्यता घेवून, मागविलेल्या निविदेनुसार तुलनात्मक दृष्ट्या कमी दराच्या ठेकेदारास दि.२७.०२.२००४ रोजी कार्यादेश देण्यांत आला. सदर कामासाठी रू.३,०४५/- इतका खर्च झाल्याचे मोजमाप पुस्तिकेवरून स्पष्ट होते. उर्वरीत रक्कम रू.२१,१०५/- अन्य कामा प्रित्यर्थ खर्च करण्यांत आली आहे. सदरच्या कामासाठी एकूण रू.२४,१५०/- इतका खर्च झाला असून, प्रमाणक क्र.४८७८ दि.३१.३.२००४ अन्वये संबंधितास रकमेचे प्रदान झाले आहे. विभागाने एकूण खर्चास मान्यता घेतांना, प्रत्येक कामासाठी स्वतंत्र खर्च दर्शविणे अपेक्षित आहे.

- स्वामी विवेकानंद उद्यान विकसित करण्यासाठी रू.२४,७९१/- चे अंदाजपत्रक तयार करण्यांत येवून, त्यास प्रशासकीय मान्यता घेवून, मागविलेल्या निविदेनुसार तुलनात्मक दृष्टया कमी दराच्या ठेकेदारास दि.३१.०७.२००३ रोजी कार्यादेश देण्यांत आला. सदर कामासाठी रू.८,०३४/-इतका खर्च झाल्याचे मोजमाप पुस्तिकेवरून स्पष्ट होते. उर्वरित रक्कम रू.१५,८०८/- ही अन्य कामा प्रित्यर्थ खर्च करण्यांत आली आहे. सदरच्या कामासाठी एकूण

रू.२३,८४२/- इतका खर्च झाला असून, प्रमाणक क्र.५११२ दि.५.९.२००३ अन्वये संबंधितास रकमेचे प्रदान झाले आहे. विभागाने एकूण खर्चास मान्यता घेतांना,प्रत्येक कामासाठी स्वतंत्र खर्च दर्शविणे अपेक्षित आहे.

वरील मुद्यांबाबतचे अनुपालन अद्यापपावेतो अप्राप्त आहे.

**परिच्छेद क्र.३:- वृक्ष संवर्धन पिंजरे (Tree Guards) खरेदीबाबत.**

- सन २००३-२००४ या वर्षाकरीता वृक्ष संवर्धन पिंजरे खरेदीसाठी मे.नॅशनल फ़ॅब्रीकेशन एजन्सी, औरंगाबाद यांना दि.३.१२.२००३ पर्यंत २२०० पिंजरे पुरविण्यासाठी कार्यादेश देण्यांत आला होता. सदरच्या कालावधीनंतर संबंधिताने एक महिना मुदतवाढ घेवूनही, फ़क्त १९०० पिंजरे पुरवठा केल्याचे स्टॉक रजिस्टरवरून निदर्शनास येते. उर्वरीत ३०० पिंजऱ्यांचा पुरवठा विहीत मुदतीत न करता, दि.२०.१.२००४ रोजी १०० पिंजरे, दि.२७.२.२००४ रोजी १०० पिंजरे व दि.२८.२.२००४ रोजी १०० पिंजरे, याप्रमाणे पुरवठा केल्याचे निदर्शनास आले. त्यामुळे संबंधिताने विहीत मुदतीत पुरवठा न केल्यामुळे, कार्यादेशातील अटीनुसार प्रती दिन दंड आकारणे आवश्यक होते. तथापि,संबंधिताकडून कोणताही दंड वसूल करण्यांत आलेला नाही. तसेच दंड वसूलीबाबत रक्कमही निश्चित करण्यांत आलेली नाही.

विभागाने दंडाची रक्कम संबंधिताकडून वसूल करावी किंवा सक्षम मान्यता घेवून अनुपालन अहवाल सादर करण्याची सूचना देण्यात आलेली आहे.

अद्यापपावेतो अनुपालन अप्राप्त आहे.

**परिच्छेद क्र.४:- आयुर्वेदिक उद्यान येथे पी.यु.सी.पंप लाईनचे मुदतबाह्य काम करणेबाबत: रू.४८,१९२/-**

सन २००३-२००४ या आर्थिक वर्षात आयुर्वेदिक उद्यान येथे ६३ एम.एम.ची पी.यु.सी. पंप लाईन टाकणे या कामासाठी अंदाजपत्रक रक्कम रू.४८,१९२/- या रकमेस प्रशासकीय मान्यता घेवून, मागविलेल्या निविदांमध्ये कमी दराचे निविदाधारक श्री.एन.आर.घोडेले, यांना आदेश क्र.मनपा/उद्यान/२१३/२००३,दि.२९.४.२००३ रोजी कामाचा आदेश देण्यांत आलेला आहे.

संबंधित ठेकेदारांने विहीत मुदतीत (१५) दिवस काम पूर्ण केलेले नाही. त्यासाठी नियमा प्रमाणे दंडनिय कार्यवाही करणे आवश्यक होते. संबंधितास प्रमाणक क्र.५१७० दि.५.९.०३ रोजी रू.३३,६००/- रक्कम अदा केलेली आहे. सदर ठेकेदाराने तीन महिने काम मुदतबाह्य केल्याचे संचिकेवरून दिसून येते. त्यामुळे नियमानुसार दंडात्मक कार्यवाही करणे अपेक्षित होते, मात्र तसे झालेले नाही. याबाबत विभागाने खुलासा सादर करण्याची सूचना विभागास देण्यात आलेली आहे.

अद्यापपावेतो अनुपालन अप्राप्त आहे.

**परिच्छेद क्र.५:- उद्यानाचे नकाशे करणेबाबत (मुदतबाह्य काम करणे ) रू.१९,१४०/-.**

वरील विभागाचे सन २००४-२००५ या आर्थिक वर्षाचे खर्च बाजूचे लेखा परीक्षण करीत असतांना, विविध उद्यानांचे नकाशे तयार करण्यासाठी रू.२०,०००/- च्या अंदाजपत्रकास प्रशासकीय मान्यतेअंती निविदा मागविण्यांत आल्या. तुलनात्मक दृष्ट्या कमी दराच्या ठेकेदारास आदेश क्र.मनपा/उद्यान/१००७/२००४, दि.२२.८.२००४ द्वारे देण्यांत आला. करारनाम्यानुसार सदरचे काम हे एक महिन्यात करावे, असे विहीत केलेले असतांनाही, सदर काम विहीत मुदतीत पूर्ण न करता, एक महिना १९ दिवस उशीरा केल्याचे दि.९.११.२००४ रोजीच्या पूर्णत्वाच्या प्रमाण पत्रावरून दिसून येते. याबाबत विभागाने नियमाप्रमाणे दंडनिय कार्यवाही करणे गरजेचे होते. परंतू संचिकेवरून तसे दिसून येत नाही. संबंधितास प्रमाणक क्र. ७१७८ , दि. १० .११ .२००४ धनादेश क्र.३०९३९८७, दि.१०.११.२००४ द्वारे रू.१९,१४०/- अदा केलेले आहेत.

सदर प्रकरणी संबंधिताकडून विलंबाबाबत दंडात्मक कार्यवाही का करण्यांत आली नाही, याबाबत विभागाने खुलासा सादर करावा अशी सूचना देण्यात आलेली आहे.

अद्यापपावेतो अनुपालन अप्राप्त आहे.

**<u>परिच्छेद क्र.६: विहीत नोंदवह्या न ठेवणेबाबत:</u>**

या विभागाचे सन २००३-२००४ या आर्थिक वर्षाचे लेखा परीक्षण करीत असतांना, असे निदर्शनास आले आहे की, खालीलप्रमाणे विविध लेखे विहीत नमुन्यात अद्यावत ठेवण्यांत आलेले नाही.

१. विहीत नमुन्यातील **Budget Provision Register** ठेवण्यांत आलेले नाही.

२. कोऱ्या तिकीट पुस्तकांसाठी ठेवण्यांत आलेली नोंदवही विहीत पध्दतीने नोंदविलेली नाही. प्राप्त तिकीट पुस्तके व वापरलेली तिकीट पुस्तके एकत्रित नोंदविण्यात आलेली आहेत. तसेच वर्षअखेर शाखा प्रमुखांनी शिल्लक साठा पडताळलेला नसून, त्यावर स्वाक्षरी केलेली नाही.

३. विभागाअंतर्गत आवक रजिस्टर ठेवण्यांत आलेले नाही.

४. उद्यानाकरिता पाणी देण्यासाठी रबरी पाईपबाबत शिल्लक /डेड स्टॉक रजिस्टर ठेवण्यांत आलेले नाही, वितरणांबाबत नोंदी नाही.

५. शेतकी औषध / रासायनिक खत खरेदीबाबत स्टॉक /डेड स्टॉक रजिस्टर ठेवण्यांत आलेले नाही, वितरण केल्याची नोंद नाही.

विभागाने विहीत नोंदवह्या ठेवाव्यात व त्याबाबतचे अनुपालन सादर करावे असे सूचित करण्यात आलेले आहे.

अद्यापपावेतो अनुपालन अप्राप्त आहे.

## मालमत्ता विभाग

## आठवडी बाजार

**परिच्छेद क्र.१:- सन २००२–०३ ते २००४–०५ या कालावधीतील चिकलठाणा आठवडी बाजार फ़ी वसुली बाबत अनियमितता.**

### सन २००२–२००३

सन २००२-०३ या आर्थिक वर्षासाठी म्हणजेच दि.१.४.२००२ ते दि.३१.३.२००३ या कालावधीसाठी जाहीर निविदा पध्दतीचा अवलंब करण्यात येऊन प्राप्त निविदांमध्ये श्री.अब्दुल मजिद शेख चाँद, औरंगाबाद यांनी अधिकतम दराची म्हणजेच रू.४३९९८०/- इतक्या रकमेची निविदा सादर केली होती. दर वाटाघाटी अंती रू.४,६०,०००/- इतक्या रकमेस ठेका देण्यास आयुक्तांनी दि.३०.३.२००२ रोजी मान्यता दिल्याचे निदर्शनास आले आहे. मात्र सदर प्रस्तावास / दरास स्थायी समितीची अंतिम मंजुरी घेण्यात आलेली नाही. प्रशासकीय मान्यतेच्या आधारे निविदा अट क्र.३ नुसार ठेक्याची २५% रक्कम रू.११५०००/- ही पावती क्र.४२८/४२७५८ दि.३१.३.२००२ अन्वये श्री.अब्दुल मजिद यांचेकडून वसुल करण्यात आल्याचे निदर्शनास आले आहे. संबंधिताकडून दि.७.९.२००२ रोजी करारनामा करून घेण्यात आला असून तत्पुर्वी दि.६.८.२००२ रोजी वसुलीसाठी आदेश देण्यात आला आहे. त्यामुळे दि.१.४.२००२ ते ५.८.२००२ पर्यंत बाजार फ़ी वसुलीचे अधिकार कोणास होते किंवा वसुली कोणा मार्फ़त करण्यात आली याचा बोध होऊ शकला नाही. तसेच कार्यादश विलंबाने देण्याची जबाबदारी निश्चित करणे आवश्यक आहे. संबंधीताकडून ठेक्याच्या उर्वरीत रकमेपैकी रू.२५८४००/- ही वेळोवेळी भरणा झालेली असून रू.८६६००/- ही अद्याप पावेतो भरणा केलेली नसून त्यामुळे महापालिकेचे आर्थिक नुकसान झालेले आहे.

### सन २००३–२००४

सदर वर्षासाठी बाजार फ़ी वसुलीसाठी निविदा पध्दतीचा अवलंब करण्यात येऊन प्राप्त निविदांमध्ये श्री.शेख मसुद शेख महेमुद औरंगाबाद यांनी अधिकतम दराची म्हणजेच रू.६१७७८६/- एवढ्या रकमेची निविदा प्राप्त झाली होती. दर वाटाघाटी अंती रू.२०००/- वाढ करून रू.६१९७८६/- इतक्या रकमेस ठेका देण्याबाबत मा.आयुक्तांनी दि.८.४.२००३ रोजी प्रशासकीय मान्यता दिल्याचे निदर्शनास आले. मात्र सदर प्रस्तावास/दरास स्थायी समितीची अंतिम मंजुरी घेण्यात आलेली नाही. निविदा अटी नुसार २५% रक्कम रू.१५५०००/- ही पावती क्र.३०८/३०७५४ दि.५.५.२००३ अन्वये रू.१०५०००/- व पावती क्र.४०८/४०७३३ दि.२६.६.२००३ अन्वये रू.५००००/- अशी वसुल करण्यात आल्याचे निदर्शनास आले आहे. उर्वरीत रक्कम रू.१३५०००/- ही वेळोवेळी भरणा करण्यात आल्याचे निदर्शनास आले आहे. उर्वरीत रक्कम रू.३२९७८६/- ही संबंधीताकडून वसुल करण्यात आलेली नसल्यामुळे तितक्याच रकमेचे

महापालिकेचे आर्थिक नुकसान झाले आहे. संबंधीत ठेकेदार श्री.शेख मसुद शेख महेमुद यांचेकडून ठेक्याची मुदत संपपर्यंत (म्हणजेच दि.३१.३.२००४ पर्यंत) करारनामा करून घेणयात आलेला नाही. तसेच बाजार फ़ी वसुलीचा आदेहशी दिलेला नसल्याचे निदर्शनास आले, असे असतांनाही संपूर्ण वर्षभर संबंधीताने बाजार फ़ी वसुल केली आहे ही तीव्र आक्षेपार्ह बाब आहे.

याच संचिकेत दि.१.४.२००४ ते ३०.६.२००४ पर्यंत श्री.दुर्रानी रजा मो.खान, औरंगाबाद यांना आयुक्तांचे दि.२.४.२००४ रोजीच्या मान्यतेने निविदे शिवाय त्याच रोजी ठेका आदेश देण्यात आला आहे. सदर कालावधीतील निश्चित केलेली वसुलीची रक्कम रू.१६९८९७/- ही प्रथम जमा करून व करारनामा करून घेण्याच्या अटीवर संबंधीतास वसुलीची मान्यता देण्यात आलेली असतांनाही त्यांचेकडून उक्त कालावधीत रू.३९२०४/- वसुल झाले असून उर्वरीत रक्कम रू.१३०६९३/- इतक्या रकमेचे आर्थिक नुकसान झाल्याचे निदर्शनास येते.

## <u>सन २००४-२००५</u>

दिनांक १६.६.२००४ ते ३१.३.२००५ या कालावधीसाठी (४१ आठवड्यांसाठी) रू.५३७५५१/- ही आधारभुत किंमत निश्चित करून त्याआधारे निविदा काढण्यासाठी दि.२४.५.२००४ रोजी आयुक्तांनी प्रशासकीय मान्यता दिल्याचे निदर्शनास येते. निविदा प्रक्रियेअंती (चार वेळा) त्यास प्रतिसाद न मिळाल्यामुळे पाचव्या वेळी आधारभुत किंमत रू.४०६४४१/- ही ३१ आठवडी बाजारासाठी (प्रती बाजर रू.१३१११/-) गृहीत धरून मागविलेल्या निविदांमध्ये श्री.शेख हुसेन शेख महेबुब, औरंगाबाद यांची रू.२८१६००/- या अधिकतम दराची निविदा प्राप्त झाली होती त्या दरास दि.८.९.२००४ रोजी मा.आयुक्तांनी मंजुरी दिल्याचे दिसले. सदरच्या प्रस्तावास स्थायी समितीची अंतिम मंजुरी घेणे आवश्यक होते. संबंधीतास त्या अनुषंगाने जा.क्र./मनपा/मामअ/१५४३/२००४, दि.१०.९.२००४ अन्वये दि.१०.९.२००४ ते ३१.३.२००५ पर्यंत २९ बाजारासाठी रू.९०८४/- प्रती बाजार याप्रमाणे रू.२६३४३६/- वसुलीची मान्यता देण्यात आली आहे. संबंधीताने दि.३१.३.२००५ पर्यंत रू.१३६२६०/- ही रक्कम महापालिकेत भरणा केली असुन उर्वरीत रक्कम रू.१२७१७६/- ही संबंधीताने अद्यापपावेतो भरणा केलेली नसल्यामुळे तितक्याच रकमेचे महापालिकेचे आर्थिक नुकसान झाल्याचे निदर्शनास येते. (पावती क्र.९२८/९२७०४, दि.१३.९.०४, नुसार रू.७२६७२/- व पावती क्र.११२३४५ दि.२८.३.०५ नुसार रू.६३५८८/- असे एकत्रित रू.१३६२६०/- भरणा झालेली आहे.)

वरील विवेचनावरून असे निदर्शनास येते की, सन २००२-२००३ मधील थकीत रक्कम रू.८६६००/-, सन २००३-०४ मधील थकीत रक्कम रू.४६०४८०/- व सन २००४-०५ मधील थकीत रक्कम रू.१२७१७६/- अशी एकत्रित रक्कम रू.६७४२५५/- ही संबंधीत ठेकेदारांनी महापालिकेकडे भरणा न केल्यामुळे महापालिकेचे आर्थिक नुकसान झालेले आहे. शिवाय वरील आर्थिक वर्षात दर निश्चितीस स्थायी समितीची मान्यता न घेणे, करारनामा करून वेळीच रितसर आदेश न देणे वसुलीच्या दृष्टीने पाठपुरावा न ठेवणे व अनुषंगिक संचिका व नोंदवह्या ह्या

अद्ययावत निप्रमाणित नसणे इत्यादी स्वरूपाच्या गंभीर अनियमितता निदर्शनास आल्या असून त्या दखलपात्र आहेत.

वरील अनिमितता बाबत विभागाने खुलासा करावा. तसेच थकित रक्कम रू.६,७४,२५५/- ही संबंधिताकडून वसूल करण्यात येऊन अनुपालन सादर करावे असे विभागास सूचित करण्यात आलेले आहे.

विभागाने जा.क्र.मनपा/मामअ/१५८४/२००६, दिनांक १२.७.२००६ नुसार अनुपालन सादर केले आहे मात्र पडताळणीस्तव पावती पुस्तके व इतर अनुषंगिक अभिलेखे उपलब्ध करून देण्यात आलेले नाहीत. त्यामुळे अनुपालन पडताळणी करणे शक्य झालेले नाही. आवश्यक ते अभिलेखे पडताळणीस्तव उपलब्ध करून द्यावेत असे लेखा परीक्षण विभागाकडील जा.क्र.मनपा/मुलेप/२००६/३१२,दिनांक २५.७.२००६ अन्वये विभागास कळविण्यात आले आहे.

**परिच्छेद क्र.२ :- सन २००२-०३ ते सन २००४-२००५ या आर्थिक वर्षातील जाफ़रगेट बाजार फ़ी वसूली बाबत अनियमितता.**

**सन २००२-२००३**

सन २००२-२००३ या आर्थिक वर्षासाठी म्हणजेच दि.०१.०४.२००२ ते दि.३१.३.२००३ या कालावधीसाठी जाहीर निविदा पध्दतीचा अवलंब करण्यात येऊन प्राप्त निविदा मध्ये श्री. सय्यद उस्मान सय्यद रज्जाक, मु.पो.सावंगी (हर्सुल) यांची अधिकतम दराची म्हणजेच रू.१२,०४,५००/- इतक्या रकमेची निविदा प्राप्त झाली होती. दर वाटाघाटी अंती रू.१२,१९,५००/- इतक्या रकमेस ठेका देण्यास मा.आयुक्तांनी दि.३०.३.२००२ रोजी प्रशासकीय मान्यता देऊन सदरचा प्रस्ताव स्थायी समिती समोर ठेवण्याचे आदेश दिल्याचे निदर्शनास आले असून प्रस्ताव हा स्थायी समिती समोर ठेवण्यात येऊन अंतिम मंजुरी घेण्यात आलेली नाही. प्रशासकीय मंजुरीच्या आधारेच निविदा अट क्र.६ नुसार ठेक्याची २५% रक्कम रू.३,०५,०००/- (रू.३,०४,८७५/- ऐवजी) ही पावती क्र.४२८/४२७५७, दि.३१.३.२००२ अन्वये श्री.सय्यद उस्मान यांचेकडून वसूल करण्यात आल्याचे निदर्शनास आले आहे. संबंधिताकडून करारनामा करून न घेताच जा.क्र./मनपा/मामअ/६६९/२००२, दि.६.८.२००२ रोजी वसुलीसाठी आदेश देण्यात आला आहे. त्यामुळे दि.१.४.२००२ ते दि.५.८.२००२ पर्यंत बाजार फ़ी वसुलीचे अधिकार कोणास होते किंवा वसुली कोणा मार्फ़त करण्यात आली याचा बोध होऊ शकला नाही. तसेच कार्यादेश विलंबाने देण्याची जबाबदारी निश्चित करणे आवश्यक आहे.

संबंधिताकडून एकूण रू.८,०५,०००/- ही रक्कम वेळोवेळी वसूल केलेली असून उर्वरीत रक्कम रू.४,१४,५००/- ही अद्यापपावेतो वसूल करण्यात आलेली नाही. त्यामुळे महापालिकेचे आर्थिक नुकसान झालेले आहे असे निदर्शनास येते.

**सन २००३-२००४**

सन २००३-२००४ या आर्थिक वर्षासाठी म्हणजेच दि.१.४.२००३ ते दि.३१.३.२००४ या कालावधीसाठी जाहीर निविदा पध्दतीचा अवलंब करण्यात येऊन प्राप्त निविदांमध्ये श्री.अख्तर हुसेन

मोहम्मद हुसेन, औरंगाबाद यांची अधिकतम दराची म्हणजेच रू.१५,०१,१०१/- इतक्या रकमेची निविदा प्राप्त झाली होती. दर वाटाघाटी अंती रू.१५,०६,१०१/- इतक्या रकमेस ठेका देण्यास मा.आयुक्तांनी दि.८.४.२००३ रोजी प्रशासकीय मान्यता दिल्याचे निदर्शनास आले आहे. सदरच्या प्रस्तावास स्थायी समितीची अंतिम मंजुरी घेणे आवश्यक असतांना अशी मंजुरी घेतली नसल्याचे निदर्शनास आले आहे. प्रशासकीय मान्यतेच्या आधारे संबंधीतास जा.क्र./मनपा/मामअ/४८०/२००३ दि.२३.४.२००३ अन्वये दि.१.४.२००३ ते दि.३१.३.२००४ या कालावधीसाठी वसूलीचा ठेका देण्यात आल्याचे निदर्शनास आले आहे. तत्पूर्वी निविदा अट क्र.३ नुसार करारनामा करून घेणे व मंजुर दराच्या २५% रक्कम वसुल होणे आवश्यक असतांनाही तसे झालेले नाही, ही बाब तीव्र आक्षेपार्ह आहे. ठेकेदार श्री.अख्तर हुसेन मोहमंद हुसेन हे दि.२०.४.२००३ रोजी मयत झाल्याचे संचिकेतील मृत्यू प्रमाणपत्रावरून दिसून येते. असे असतांनाही दि.२६.१२.२००३ पर्यंत मयताचे नावानेच थकीत रक्कमेची नोटीस पाठविल्याचे दिसून आले. म्हणजेच ठेकेदाराच्या मृत्यूनंतर बाजार फ़ी वसूली कोणी केली या बाबत विभागाकडून खुलासा घेणे योग्य वाटते. ठेक्याची मुदत संपेपर्यंत (दि.३१.३.२००४) संबंधिताने महापालिकेकडे रू.७,०२,०००/- इतकी रक्कम भरणा केल्याचे निदर्शनास आले असून उर्वरीत रक्कम रू.८,०४,१०१/- ही आजपावेतो भरली नसल्याचे निदर्शनास येते. या बाबतही विभागप्रमुखांकडून खुलासा घेण्यात यावा असे मत आहे. म्हणजेच रू.८,०४,१०१/- इतक्या रकमेचे महापालिकेचे आर्थिक नुकसान झाल्याचे निदर्शनास येते.

तद्नंतर सौ.शशिकला खोबरे, औरंगाबाद यांना दि.१.५.२००४ ते ३१.५.२००४ या कालावधीसाठी रू.२२,०००/- प्रतीबाजार या प्रमाणे रक्कम वसूलीसाठी व एकत्रित रू.१,१०,०००/- रोखीने भरण्यासाठी दि.६.५.२००४ रोजी आदेश देण्यात आला. तत्पूर्वी मा.आयुक्तांनी सदर प्रस्तावास दि.३०.४.२००४ रोजी मान्यता दिल्याचे निदर्शनास आले आहे.
त्यानुसार सौ.खोबरे यांनी वेळोवेळी एकत्रित रक्कम रू.८८,०००/- महापालिकेत भरणा केल्याचे निदर्शनास आले आहे.

**<u>सन २००४-२००५</u>**

सदर वर्षात दि.१६.६.२००४ ते ३१.३.२००५ या कालावधीतील ४१ आठवडी बाजारासाठी रू.१६,५६,७११/- ही आधारभूत किंमत ठरवून रू.१३,०६,२६०/- इतक्या रकमेसाठी निविदा काढण्यास्तव दि.२४.५.२००४ रोजी मा.आयुक्तांनी मान्यता दिल्याचे दिसून आले. त्या अनुषंगाने चार वेळा मागविलेल्या निविदांमध्ये अपेक्षित दर प्राप्त न झाल्यामुळे पाचव्या वेळी प्राप्त निविदांमध्ये श्री.अब्दुल रफ़ीक अब्दुल रहीम, औरंगाबाद यांनी रू.७,८६,०००/- रकमेची निविदा दि.२३.८.२००४ रोजी प्राप्त झाली असल्याचे दिसले. त्यानुसार रू.२६,२००/- प्रती बाजार याप्रमाणे ३० बाजारासाठी अशा वसूली बाबत प्रस्तावित करण्याऐवजी संचिकेतील टिपणी मध्ये संबंधित मालमत्ता अधिकारी यांनी प्राप्त दराचा उल्लेख न करता रू.२५,३५५/- अशा दराने (प्रती बाजार) प्रस्ताव सादर करून दि.८.९.२००४ रोजी प्रस्तावास मा.आयुक्तांची मान्यता घेतल्याचे

निदर्शनास आले आहे. सदरचा प्रस्ताव स्थायी समिती समोर अंतिम मंजुरीस्तव सादर करणे आवश्यक होते. मात्र तसे झालेले नाही. प्रशासकीय मंजुरीच्या आधारे दि.१०.०९.२००४ रोजी करारनामा करून घेण्यात आला व जा.क्र./मनपा/मामअ/१५४४/२००४ दि.१०.९.२००४ अन्वये श्री.अब्दुल रफ़ीक अब्दुल रहिम यांना दि.१२.९.२००४ ते ३१.३.२००५ पर्यंत एकूण ३० बाजारासाठी प्रती बाजार रू.२५,३५५/- वसूलीसाठी मान्यता/ठेका देण्यात आला. तत्पूर्वी अन्य समांतर संचिकेमध्ये श्री.मो.रफ़ीक मो.खाजा यांचेकडून दि.६.६.२००४ ते निविदा अंतिम होईपर्यंत रू.२०,०००/- प्रती बाजार या दराने वसूलीसाठी प्रस्ताव सादर करण्यात आला व त्यास दि.११.६.२००४ रोजी मा.आयुक्तांची मान्यता घेण्यात आली . मात्र संबंधितास कार्यादेश न देताच नियमबाह्य पध्दतीने संबंधिताने वसूली केल्याची शंका निर्माण होते, त्यामुळे संबंधिताकडून कोणत्या कालावधी पासून कोणत्या कालावधी पर्यंतची किती रक्कम वसुल करण्यात आली या बाबत विभाग प्रमुखांचा खुलासा घेणे योग्य होईल.

श्री. अब्दुल रफ़ीक अब्दुल रहिम यांचेकडून निविदेची ५०% रक्कम रू.३,८०,३२५/- (विभागाने सदर कालावधीसाठी दि.१२.९.२००४ ते ३१.३.२००५ पर्यंत रू. ७,६०,६५०/- ही निविदा रक्कम निश्चित केल्यामुळे) ही कार्यादिशाच्या पूर्वी भरून घेणे आवश्यक असतांना व त्या शिवाय फ़ी वसुलीचा अधिकार दिला जाणार नाही असे निविदा अट क्र.४ मध्ये नमूद केलेले असतांनाही रक्कम भरणा करून घेतलेली नाही. ठेक्याची मुदत संपेपर्यंत म्हणजे दि.३१.३.२००५ पर्यंत संबंधिताने फ़क्त रू.१,५०,०००/- हे पावती क्र.९२८/९२७०२ दि.१३.९.२००४ अन्वये भरणा केल्याचे संचिकेवरून दिसून येते. संबंधिताच्या नावाची नोंद व वसुलीची नोंद मागणी रजिस्टर मध्ये घेण्यात आलेली नाही. त्यामुळे निविदा कालावधीतील थकीत रक्कम रू.६,१०,६५०/- ही वसुल झालेली नसल्याचे निदर्शनास येते. संचिका पृष्ठ क्र.२१ वर नमुद करण्यात आलेले आहे की, संबंधिताने या रकमेपैकी रू.२,५०,०००/- या रकमेचा दि.२९.३.२००५ रोजी भरणा केला आहे. मात्र त्याबाबतचा तपशिल मिळू शकला नाही. संचिकेचे अवलोकन केले असता असे निदर्शनास आले आहे की, संबंधिताकडील थकीत रक्कम रू.६,१०,६५०/- ही अदा करण्यासाठी संबंधिताने धनादेश क्र.४४१८७ दि.१७.३.२००५ रोजी दिला होता मात्र ज्या बँकेचा धनादेश देण्यात आला ती बँक औरंगाबाद पिपल्स को-ऑप बँक शाखा टिळकपथ-दिवाळखोर म्हणून घोषित झालेली असल्यामुळे रक्कम रू.६,१०,६५०/- ही महापालिकेस प्राप्त होऊ शकली नाही. सदरची बाब ही जा.क्र./मनपा/लेखा/२००५/१०९६, दि.२१.३.२००५ अन्वये लेखाधिकारी महानगरपालिका औरंगाबाद यांनी मालमत्ता अधिकारी यांना अवगत करून दिलेली आहे.

वरील विवेचना आधारे असे नमुद करण्यात येते की, सन २००२-०३ या वर्षातील थकीत रक्कम रू.४,१४,५००/- सन २००३-०४ या वर्षातील थकीत रक्कम रू.८,०४,१०१/- व सन २००४-०५ या वर्षातील थकीत रक्कम रू.६,१०,६५०/- अशी एकत्रित रक्कम रू.१८,२९,२५१/- ही वसूल झालेली नसल्याचे प्रथमदर्शनी निदर्शनास आले आहे. शिवाय वरील

आर्थिक वर्षात दर निश्चितीस स्थायी समितीची मान्यता न घेणे, करारनामा करून वेळीच रितसर आदेश न देणे, वसुलीच्या दृष्टीने पाठपुरावा न ठेवणे व अनुषंगिक संचिका व नोंदवह्या ह्या अद्ययावत नि प्रमाणित नसणे इत्यादी स्वरूपाच्या गंभीर अनियमितता निदर्शनास आल्या असून त्या दखलपात्र आहेत.

सदर प्रकरणी सखोल चौकशी करून संबंधीतावर यथोचित प्रशासकीय कार्यवाही होणे आवश्यक वाटते.

विभागाने जा.क्र.मनपा/मामअ/१५८४/२००६, दिनांक १२.७.२००६ नुसार अनुपालन सादर केले आहे मात्र पडताळणीस्तव पावती पुस्तके व इतर अनुषंगिक अभिलेखे उपलब्ध करून देण्यात आलेले नाहीत. त्यामुळे अनुपालन पडताळणी करणे शक्य झालेले नाही. आवश्यक ते अभिलेखे पडताळणीस्तव उपलब्ध करून द्यावेत असे लेखा परीक्षण विभागाकडील जा.क्र.मनपा/मुलेप/२००६/३१२,दिनांक २५.७.२००६ अन्वये विभागास कळविण्यात आले आहे.

**परिच्छेद क्र.३:-पीरबाजार आठवडी बाजार फ़ी वसुली बाबत अनियमितता:-.**

पीर बाजार आठवडी बाजार फी वसूली बाबत सन २००२-०३ ते २००४-०५ या आर्थिक वर्षातील संचिका, कॅश रजीस्टर व मागणी नोंदवही यांच्या तपासणीअंती खालील आक्षेपार्ह बाबी निदर्शनास आल्या आहेत.

१) **सन २००२-०३ :-** सदर वर्षात फी वसूली बाबत श्री.मोहमंद मजाज मो.मुसा यांना रू.९,८०,०००/- इतक्या रकमेस ठेका देण्यात आला. मालमत्ता विभागाकडील संचिका तपासणी अंती असे निदर्शनास आले की, दि.२३.१२.२००२ पर्यंत संबंधिताकडे रू.५,३५,०००/- इतकी रक्कम शिल्लक होती. मात्र मागणी रजीस्टर वरील नोंदी नुसार रू.५,४५,०००/- इतकी रक्कम संबंधिताकडून वसूल झाली असून उर्वरीत रक्कम रू.४,३५,०००/- थकीत असल्याचे निदर्शनास आले आहे.

२) सन २००३-२००४ :- सदर वर्षात फी वसूलीसाठी श्री.दुर्रानी रजा मो.खान यांना रू.१३,८०,७८६/- इतक्या रकमेस ठेका देण्यात आला. अभिलेख्यांच्या तपासणी अंती असे निदर्शनास आले आहे की, संबंधिताकडून रू.१२,८०,७८६/- इतकी रक्कम वसूल झाली असून रू.१,००,०००/- अद्यापपर्यंत थकीत आहेत.

३) सन २००४- २००५ :- सदर वर्षात दि.१.४.०४ ते ३०.६.०४ या कालावधीतील १३ आठवडी बाजारासाठी रू.२९,२०९/- प्रती बाजार नुसार श्री.दुर्रानी रजा मो.खान यांना दि.२.४.२००४ रोजीच्या पत्रानुसार मुदतवाढ देवून फी वसूली बाबत आदेशित करण्यात आल्याचे दिसते. उक्त कालावधीसाठी रू.३,७९,७१७/- ही रक्कम वसूल होणे आवश्यक असतांना संबंधिताकडून रू.३,३८,२०९/- ही रक्कम वसूल झाल्याचे निदर्शनास आले आहे. सदरची रक्कम ही दि.२.४.२००४ ते ५.८.२००४ या कालावधीत वसूल झाल्याचेही निदर्शनास येते. म्हणजेच रू.४१,५०८/- इतकी रक्कम वसूल झालेली नाही. तद्नंतर, दि.२३.८.२००४ रोजीच्या मा.आयुक्त यांचे मंजुरी आधारे श्री.रमेश कावळे यांना फी वसूली बाबत ठेका देण्यात

आला. दि.२३.८.२००४ ते दि.६.९.२००४ पर्यंत संबंधिताने प्रती बाजार रू.३१,०००/- प्रमाण रू.९३,०००/- (३ बाजारासाठी) भरणा करण्या ऐवजी रू.७९,०००/- एवढी रक्कम भरणा केल्याचे निदर्शनास आले आहे. परिणामी रू.१४,०००/- अद्यापपावेतो वसूल झालेले नाहीत.

**तसेच दि.१.७.२००४ ते दि.२२.८.२००४ पर्यंत फी कोणी वसूल केली व किती वसूल झाली याबाबतचे अभिलेखे उपलब्ध करून दिलेले नाहीत. तसेच श्री.कावळे यांच्याकडील वसूली बाबत मागणी रजीस्टर मधे नोंद घेण्यात आलेली नाही.**

तद्नंतर, श्री.शेख शफीक शेख यासिन यांना दि.१३.९.२००४ ते ३१.१०.२००४ पर्यत फी वसूलीचा ठेका देण्यात आला. मात्र संबंधिताने यानंतरही म्हणजेच दि.१.११.२००४ ते ३१.३.२००५ पर्यंत करारनाम्याशिवाय व आदेशाशिवाय फी वसूल केल्याचे दिसते. त्यामुळे दि.१३.९.२००४ ते ३१.३.२००५ पर्यंतची रक्कम रू.४,२०,९९०/- (प्रतीबाजार रू.२८,०००/-) अद्यापपावेतो संबंधिताकडे थकीत आहे.

वरील प्रमाणे ठेका देतांना सक्षम मान्यता घेण्यात आलेली नसल्याचे निदर्शनास आले आहे.

उक्त तीनही वर्षातील अनियमिततेबाबत समर्थनीय खुलासा सादर करणेसाठी विभागास अर्धसमास पत्र क्र.१२ दि.१६.११.२००५ अन्वये सुचित करण्यात आले आहे. मात्र अद्यापपावेतो अनुपालन अप्राप्त आहे. एकंदरीत श्री.मोहम्मद मजाज मो.मुसा यांचेकडून रूपये ४,३५,०००/- , श्री.दुर्रानी रजा मो.खान यांचेकडून रूपये १,४१,५०८/-, श्री.रमेश कावळे यांचेकडून रूपये १४,०००/- व श्री.शेख शफ़िक शेख यासीन यांचेकडून रूपये ४,२०,९९०/- अशी एकूण रक्कम रूपये १०,११,४९८/- वसूल झालेली नाही असे दिसून येते. शिवाय दिनांक १.७.२००४ ते २२.८.२००४ पर्यंतच्या कालावधीतील वसूलीबाबतचा आर्थिक व्यवहारही संशयास्पद आहे.

विभागाने समर्थनीय खुलाश्यासह अनुपालन सादर करावे असे सूचित करण्यात आलेले आहे.

विभागाने दिनांक १२.७.२००६ रोजी सादर केलेले अनुपालन हे असमाधानकारक आहे.

## वाहनतळ

**परिच्छेद क्र.४:- सिध्दार्थ उद्यान वाहनतळ फ़ी वसूलीतील अनियमितता :**

**१) सन २००२-०३ :-** दि.११.४.२००२ रोजीच्या प्रशासकीय मान्यतेआधारे जादा दराचे निविदाधारक श्री.सोमनाथ उदावंत यांना रू.२९,१०५/- प्रती माह या प्रमाणे २००२-२००३ या पूर्ण आर्थीक वर्षासाठी ठेका देण्यात आला. वसूली बाबतचे पत्र हे दि.३१.७.२००२ रोजी निर्गमीत केले असून तोपर्यंत संबंधिताने कार्यादेशा शिवाय फी वसूल केल्याचे निदर्शनास येते. उक्त कालावधी मध्ये श्री.उदावंत यांनी रू.३,४९,२६०/- ही एकूण रक्कम महापालिकेकडे भरणा करणे आवश्यक असतांना रू.२,९१,४२०/- इतकी रक्कम वसूल झाल्याचे अभिलेख्यांआधारे निदर्शनास येते. म्हणजेच रू.५७,८४०/- इतकी रक्कम थकीत असल्याचे दिसते.

**२) सन २००३ – २००४ :–** सदर वर्षात श्री.बी.एन.ढमाले यांची जादा दराची निविदा रू.२२,२५०/- प्रती माह प्राप्त झाल्यामुळे सदरचे दर हे दि.१८.७.२००३ रोजीच्या प्रशाासकीय मान्यते आधारे स्विकृत करण्यात येवून संबंधितास दि.१४.८.२००३ ते दि.३१.३.२००४ पर्यंत फी वसूलीचा अधिकार देण्यात आला. मागणी रजीस्टर आधारे संबंधिताकडून रू.१,५५,७५०/- इतकी रक्कम भरणा केल्याचे निदर्शनास येते. म्हणजेच रू.४४,५५०/- थकीत आहेत. तत्पूर्वी एप्रिल २००३ ते जुन २००३ पर्यंत फी वसूलीचे काम महापालिकेमार्फत करण्यात येवून तीन महिन्याच्या कालावधीतील सात दिवसात रू.९४००/- इतकीच वसूली करण्यात आलेली आहे, असे संचिके आधारे निदर्शनास येते. त्यामुळे माहे एप्रिल ते जून २००३ मधिल सात दिवस वगळून उर्वरीत ८४ दिवसांची प्रतीदिन सरासरी रू.१३४२/- प्रमाणे रू.१,१२,७२८/- वसूली बाबत शंका निर्माण होते.तसेच दि.१.७.२००३ ते १३.८.२००३ पर्यंत किती वसूली झाली आहे व कोणी वसूली केली आहे याचाही बोध झालेला नाही.

४) **सन २००४–२००५ :–** सदर वर्षात निविदा काढणे आचारसंहितेमुळे शक्य नसल्याने श्री.ढमाले यांनाच दि.१.४.०४ ते ३०.६.२००४ पर्यंत मुदतवाढ देण्यात आली. संबंधिताकडून रू.७३,४२५/- हे उक्त कालावधीसाठी वसूल होणे आवश्यक होते. मात्र संचिकेचे अवलोकन केले असता सदरची रक्कम वसूल झालेली नाही असे दिसून आले. तसेच जुलै २००४ मधिल रक्कम रू.२४,४७५/- ही सुध्दा वसूल झालेली नाही. म्हणजेच एकत्रित रक्कम रू.९७,९००/- थकीत असल्याचे निदर्शनास येते. त्याचप्रमाणे माहे ऑगस्ट २००४ मध्ये वसूल झालेल्या रकमेचाही बोध झालेला नाही.

तद्नंतर, श्री.देवेंद्र मोरे यांना दि.१.९.२००४ ते ३१.३.२००५ पर्यंत फी वसूलीचे अधिकार हे रू.२५,१०५/- प्रतीमाह या प्रमाणे देण्यात आले. संबंधिताने रू.७५,३१५/- ही रक्कम दि.२५.८.२००४ रोजी व रू.२५,१०५/- ही दि.२४.८.२००५ रोजी भरणा केल्याचे निदर्शनास येते. उर्वरीत रक्कम रू.७५,३१५/- ही अद्यापपावेतो थकीत असल्याचे निदर्शनास येते. वेळोवेळी ठेका देतांना सक्षम मान्यता घेतली नसल्याचे निदर्शनास आले आहे.

वरील तीनही वर्षातील अनियमिततेबाबत समर्थनीय खुलासा करून आवश्यक ते अभिलेखे/पावती पुस्तके तपासणीस्तव उपलब्ध करून देण्याबाबत अर्धसमास पत्र क्र.१३, दिनांक १६.११.२००५ नुसार विभागास सुचित करण्यात आले आहे. मात्र अद्यापपावेतो अनुपालन अप्राप्त आहे. परिणामी श्री.उदावंत यांचेकडून रू. ५७,८४०/-, श्री.ढमाले यांचेकडून रू.१,४२,४५० /- व श्री.देवेंद्र मोरे यांचेकडून रू.७५३१५/- अशी एकत्रित रक्कम रू. २,७५,६०५/- वसूल झालेली

नसल्याचे दिसून येते. शिवाय दि.१.४.२००३ ते दि.३०.६.२००३ पर्यतच्या कालावधीतील ८४ दिवसाची सरासरी प्रमाणे निश्चित केलेली रक्कम रू. १,१२,७२८/- ही महापालिका कर्मचाऱ्यांकडून झाली असल्याचे मानून त्यांचेवर जबाबदारी

निश्चित करून रक्कम वसूल करणे आवश्यक ठरते. त्याचप्रमाणे दि.१.७.२००३ ते दि.१३.८.२००३ या कालावधीत झालेल्या वसूलीबाबत रक्कम निश्चित करून अशी रक्कम ही संबंधिताकडून वसूल करणे क्रमप्राप्त ठरते.

विभागाने जा.क्र.मनपा/मामअ/१५८४/२००६, दिनांक १२.७.२००६ नुसार अनुपालन सादर केले आहे मात्र पडताळणीस्तव पावती पुस्तके व इतर अनुषंगिक अभिलेखे उपलब्ध करून देण्यात आलेले नाहीत. त्यामुळे अनुपालन पडताळणी करणे शक्य झालेले नाही. आवश्यक ते अभिलेखे पडताळणीस्तव उपलब्ध करून द्यावेत असे लेखा परीक्षण विभागाकडील जा.क्र.मनपा/मुलेप/२००६/३१२,दिनांक २५.७.२००६ अन्वये विभागास कळविण्यात आले आहे.

**परिच्छेद क्र.५:-पैठणगेट वाहनतळ फ़ी वसुली बाबत अनियमितता:-**

**१) सन २००२-२००३ :-** सदर वर्षात फी वसूलीसाठी निविदा मागविण्यात येवून श्री.शेख अफसर शेख छोटेमियाँ यांची रू.१६१५/- प्रती माह दराची एकच निविदा प्राप्त झाल्याचे दिसून आले. सदर दरास दि.२८.५.२००२ रोजी मा.आयुक्तांची मान्यता घेण्यात येवून दि.१.४.२००२ ते दि.३१.३.२००३ पर्यंत वाहनतळ वसूलीसाठी संबंधितास दि.१.६.२००२ रोजी आदेश देण्यात आला. उक्त वर्षात एकूण रू.१९,३८०/- इतकी रक्कम संबंधिताकडून वसूल होणे आवश्यक असतांना रू.९६९०/- वसूल करण्यात आले. म्हणजेच रू.९६९०/- ही रक्कम थकीत आहे.

**२) सन २००३-२००४ :-** सदर वर्षात निविदा प्रक्रिये अंती एकही निविदा अंतिम न होवू शकल्यामुळे पूर्ण वर्षभर वाहनतळ फी वसूली किती करण्यात आली ? याबाबतचे संपूर्ण अभिलेखे उपलब्ध करून देण्यात आलेले नाहीत. मात्र सदर ठिकाणी सक्षम कर्मचारी नेमुन वसूली करण्याचे प्रस्तावित करून दि.१८.७.२००३ रोजी मा.आयुक्तांनी त्यास मान्यता दिल्याचे निदर्शनास येते. मात्र वसूलीचा तपशिल उपलब्ध न झाल्यामुळे त्या बाबतची सत्यता पडताळता आलेली नाही.

**३) सन २००४-२००५ :-** सदर वर्षात सन २००४-२००५ मधे माहे एप्रिल २००४ ते जून २००४ पर्यंत निविदा अंतिम न होवू शकल्याने सदरच्या कालावधीत किती रक्कम वसूल करण्यात आली या बाबतचा खुलासा विभागाने करणे आवश्यक आहे. तसेच त्या कालावधीतील अभिलेखे उपलब्ध करून देणे सुध्दा आवश्यक ठरते.

दि.१.७.२००४ ते ३१.३.२००५ या कालावधीसाठी मागविण्यात आलेल्या निविदांमधे रू.१८००/- प्रती माह दराची श्री.शेख अय्युब शेख अफसर यांची निविदा प्राप्त झाली होती. सदर

दरास दि.२४.६.२००४ रोजी मा.आयुक्त व दि.१२.७.२००४ रोजी स्थायी समितीची दि.२.८.२००४ ते ३१.३.२००५ पर्यंतच्या कालावधीसाठी मान्यता घेण्यात आली. मात्र संबंधिताकडून किती रक्कम वसूल झाली याचाही बोध झालेला नाही. तसेच दि.१.४.२००४ ते १.८.२००४ पर्यंत किती रक्कम वसूली झाली याबाबतचाही तपशिल प्राप्त होवू शकला नाही. परिणामी सदर तीनही वर्षात किती रक्कम वसूल करण्यात आली व सदरची वसूली ही कोणा मार्फ़त करण्यात आली याबाबतचा खुलासा करण्याविषयी विभागास अर्धसमास पत्र क्र.१४, दि.१६.११.२००५ अन्वये कळविण्यात आले आहे. मात्र अद्याप पावेतो अनुपालन अप्राप्त आहे. एकूणच पैठणगेट वाहनतळ . फी वसूलीच्या अनुषंगाने सन २००२-२००३ या वर्षातील रू.९६९०/- ही श्री.शे.अफ़सर शे.छोटेमियॉ यांचेकडून वसूल व्हावयाची आहे. तर सन २००३-२००४ व २००४-०५ या वर्षातील वसुलींबाबतचा तपशिल उपलब्ध न झाल्याने जबाबदारी निश्चित करून रक्कम वसूल करणे आवश्यक ठरते.

विभागाने जा.क्र.मनपा/मामअ/१५८४/२००६, दिनांक १२.७.२००६ नुसार अनुपालन सादर केले आहे मात्र पडताळणीस्तव पावती पुस्तके व इतर अनुषंगिक अभिलेखे उपलब्ध करून देण्यात आलेले नाहीत. त्यामुळे अनुपालन पडताळणी करणे शक्य झालेले नाही. आवश्यक ते अभिलेखे पडताळणीस्तव उपलब्ध करून द्यावेत असे लेखा परीक्षण विभागाकडील जा.क्र.मनपा/मुलेप/२००६/३१२,दिनांक २५.७.२००६ अन्वये विभागास कळविण्यात आले आहे.

**परिच्छेद क्र.६:-संत एकनाथ रंगमंदिर वाहनतळ फ़ी वसूलीतील अनियमितता:.**

वाहनतळ फ़ी वसूली बाबतच्या अभिलेख्यांच्या तपासणी दरम्यान सन २००२-०३ ते सन २००४-०५ या तीन आर्थिक वर्षातील संत एकनाथ रंगमंदिर येथील ठेक्या बाबतच्या संचिका तपासण्यात आल्या असता खालील प्रमाणे आक्षेपार्ह बाबी निदर्शनास आल्या आहेत.

१. सन २००२-०३ या वर्षासाठी वाहनतळ फ़ी /ठेका रक्कम निश्चित करण्यासाठी मागविण्यात आलेल्या निविदांमध्ये रू.८१५१.७५/- प्र.म. या जादा दराची श्री.प्रभाकर गणपतराव जाधव यांची निविदा प्राप्त झाली होती असे दिसून आले. त्यानुसार निविदा दर मान्यतेस्तव प्रस्तावित करतांना रू.८१५१/- प्र.म. असे प्रस्तावित करून सदर दरांना दि.११.०४.२००२ रोजी आयुक्तांनी मान्यता दिलेली आहे, तद्नंतर स्थायी समितीची मान्यता घेतलेली नाही. सदर मान्यते आधारे दि.३१.०७.२००२ रोजीच्या पत्रानुसार विभागाने श्री.जाधव यांना वर्षासाठी वाहनतळ फ़ी वसुलीचे अधिकार प्रदान केले मात्र संबंधिताकडून करारनामा करून घेतलेला नाही. तपासणी अंती सन २००२-०३ या आर्थिक

वर्षातील ठेक्याची रक्कम रू.२४५१५/- ही श्री.प्रभाकर जाधव यांचेकडे आजपर्यंत थकित असल्याचे निदर्शनास आले आहे.

२. सन २००३-०४ या वर्षासाठी वाहनतळ फ़ी /ठेका रक्कम निश्चित करण्यासाठी मागविण्यात आलेल्या निविदांमध्ये रू.८२००/- प्र.म. या जादा दराची निविदा प्राप्त झाल्याचे दिसून आले आहे. मात्र श्री.मोरे यांनी निविदेनुसार रक्कम भरणा केली नसल्यामुळे त्यांची अनामत रक्कम रू.१०,०००/- जप्त करण्याबाबत प्रस्तावित करण्यात येवून त्यास दि.११.०६.२००३ रोजी उप आयुक्त (म), यांनी मान्यता दिलेली आहे. तद्नंतर सौ.सविता घुले या दुसऱ्या क्रमांकाच्या निविदाधारकास रू.८२००/- प्र.म.या दराने वसूलीसाठी उपआयुक्त(म), यांनी दि.११.०६.२००३ रोजीच मान्यता दिली आहे. मात्र सदर प्रकरणांत सक्षम मान्यता घेतलेली नाही.

सन २००३-०४ या आर्थिक वर्षातील ठेक्याची रक्कम रू.३२८००/- ही रक्कम सौ.सविता घुले, ठेकेदार यांचेकडे थकित असल्याचे निदर्शनास आले आहे. तसेच सौ.घुले यांचेकडून करारनामा करून घेण्यात आला नाही व कोणत्या कालावधीसाठी ठेका देण्यात आला याचाही बोध झालेला नाही. मात्र संबंधित ठेकेदाराने दिनांक ११.०६.२००३ ते दिनांक २३.१०.२००३ पर्यंत रू.४९२००/- ही रक्कम भरणा केल्याचे मागणी

रजिस्टरवरून निदर्शनास आले आहे. उर्वरित कालावधीमध्ये किती रक्कम वसूल करण्यात आली याचा तपशील उपलब्ध करून दिलेला नाही. त्यामुळे संपूर्ण वर्षातील वसूलीचा तपशील न मिळाल्यामुळे वसूलीची सत्यता पडताळता आलेली नाही.

३. सन २००४-०५ या आर्थिक वर्षातील ठेक्याची रक्कम रू.२७०६०/- ही संबंधित ठेकेदाराकडून अद्यापपर्यंत थकित असल्याचे निदर्शनास येते. या आर्थिक वर्षात दिनांक ०१.०४.२००४ ते दिनांक ३०.०६.०४ या कालावधीसाठी सौ.सविता घुले यांना मुदतवाढ देण्यात आली होती. सदरच्या कालावधीनंतर वाहनतळ फ़ी वसूल कोणी केली व किती रक्कम वसूल झाली याचाही बोध झालेला नाही. संचिकेचे अवलोकन केले असता असे निदर्शनास आले आहे की, दिनांक २५.०८.२००४ पासून वाहनतळ वसूलीचे काम हे महापालिकेच्या कर्मचाऱ्याकडून सुरू केल्याचे दिनांक २४.८.०४ रोजीच्या पत्राआधारे दिसून आले.

तद्नंतर मागविण्यात आलेल्या निविदा अंतिम करून दिनांक २१.०१.२००५ ते दिनांक ३१.०३.२००५ या कालावधीसाठी श्री.देवेंद्र मोरे यांना रू.९०२५/- प्र.म. ठेका देण्यात

आला. मात्र श्री. मोरे यांनी सदर कालावधीतील रू.२१२२७/- इतकी रक्कम भरणा करणे आवश्यक असतांना काहीच रक्कम भरणा केलेली नाही.

सदर वर्षात किती रक्कम वसूल करण्यात आली व सदरची वसूली कोणा मार्फ़त करण्यात आली याचा बोध झालेला नाही वरील तीनही वर्षातील अनियमिततांबाबत खुलासा करण्याविषयी विभागास अर्धसमास पत्र क्र.११, दि.१४.११.२००५ अन्वये कळविण्यात आले आहे. मात्र अद्याप पावेतो अनुपालन अप्राप्त आहे. परिणामी सन २००२-०३ मधील थकित रक्कम रू.२४५१५/- ही श्री.प्रभाकर जाधव यांचेकडून सन २००३-०४ मधील थकित रक्कम रू.३२८००/- व सन २००४-०५ मधील थकित रक्कम रू.२७०६०/- ही सौ. सविता घुले यांचेकडून व सन २००४-०५ मधील थकित रक्कम रू.२१२२७/- ही श्री.देवेंद्र मोरे यांचेकडून वसूल करणे आवश्यक आहे.

विभागाने जा.क्र.मनपा/मामअ/१५८४/२००६, दिनांक १२.७.२००६ नुसार अनुपालन सादर केले आहे मात्र पडताळणीस्तव पावती पुस्तके व इतर अनुषंगिक अभिलेखे उपलब्ध करून देण्यात आलेले नाहीत. त्यामुळे अनुपालन पडताळणी करणे शक्य झालेले नाही. आवश्यक ते अभिलेखे पडताळणीस्तव उपलब्ध करून द्यावेत असे लेखा परीक्षण विभागाकडील जा.क्र.मनपा/मुलेप/२००६/३१२,दिनांक २५.७.२००६ अन्वये विभागास कळविण्यात आले आहे.

## माती विक्री

**परिच्छेद क्र.७:-हर्सूल तलावाच्या ठेका रक्कम वसुली बाबत अनियमितता:-**

**(१)सन २००२-०३:**

सदर वर्षात माती विक्री ठेका देण्याबाबत फ़ेर निविदा मागविण्यात आल्या असता त्यामध्ये श्री. मो. सोहेल सिद्यीकी औरंगाबाद यांची जादा दराची – रू. १६१०००/- इतक्या रकमेची निविदा प्राप्त झाली असता वाटाघाटी अंती रू.१६८०००/- इतक्या रकमेस ठेका देण्यास्तव प्रस्तावित करून दिनांक ०४.०४.२००२ रोजी आयुक्तांनी सदर दरास प्रशासकीय मान्यता प्रदान केल्याचे दिसून आले. मात्र सदर दरांना स्थायी समितीची मान्यता घेण्यात आल्याचे दिसून आले नाही.

प्रशासकीय मान्यतेआधारे दिनांक ०६.०४.२००२ रोजीच्या पत्रानुसार दिनांक ०१.०४.२००२ ते दिनांक ३१.०३.२००३ पर्यंत संबंधितास ठेका देण्यात आला. सदर पत्राच्या तारखेपासून ठेक्याची पूर्ण रक्कम संबंधिताकडून तीनदिवसात वसूल करणे आवश्यक होते. मात्र रू.२५०००/- अनामत रकमे व्यतिरिक्त रू.८००००/- ही रक्कम धनादेश क्र. ४२४०३८, दिनांक ०४.०४.२००२ अन्वये वसूल करण्यात आल्याची नोंद दिसून आली. मात्र वरील धनादेश वटविण्यात आला किंवा कसे ? याचा बोध झालेला नाही. ठेक्याची उर्वरीत रक्कम रू.८८०००/- थकित असल्याचे दिसून येते.

(२) **सन २००३-०४:**

सदर वर्षात निविदा प्रक्रियेअंती श्री. किसन गोविंद साखरे यांची रू.६८०००/- इतक्या रकमेची /जादा दराची प्राप्त निविदा ही उपआयुक्त (म) यांच्या दिनांक १३.०४.२००३ रोजीच्या मान्यते आधारे स्विकृत करण्यात आली. सदर दरांना मा.आयुक्त व स्थायी समितीची मान्यता नाही. त्यामुळे सदरची बाब तिव्र आक्षेपार्ह आहे. सन २००२-०३ या वर्षातील ठेका रक्कम रू.१६८०००/- इतकी असतांना सन ०३-०४ मधील माहे नोव्हेंबर ०३ ते जून २००४ पर्यतच्या आठ महिन्यांसाठी रू.६८०००/- इतक्या रकमेची निविदा मंजूर करणे संयुक्तिक नव्हते. मागील वर्षीच्या दरांच्या तुलनेत आठ महिन्यांसाठी दर वाटाघाटी करून अधिकतम रक्कम रू.१.०० लक्ष ते रू.११२०००/- पर्यंत ठेका रक्कम निश्चित करणे आवश्यक होते असे वाटते. मात्र अशी कार्यवाही करण्यात आलेली नसल्यामुळे रू.४०,०००/- इतके अंदाजित आर्थिक नुकसान झाल्याचे नमूद करण्यात येते. संचिकेचे अवलोकन केले असता असे दिसून आले आहे की, दिनांक ०२.१२.२००३ पावेतो संबंधिताने ठेक्याची रक्कम रू.६८०००/- जमा केलेली नव्हती व करारनामाही करून दिलेला नव्हता तसेच त्यास माती विक्रीची परवानगी दिल्याचेही दिसून येत नाही. संबंधितास दिनांक २७.१२.२००३ रोजी माती विक्रीचा अधिकार देण्यात आला.

संबंधिताकडून पा.क्र.५४६/५४५०१, दिनांक २२.१०.२००३ अन्वये रू.४३०००/- वसूल केल्याची नोंद संचिकेत आहे. तसेच अनामत रक्कम रू.२५०००/- वळती करून घेण्यासाठी दि.१९.०१.२००४ रोजी उपआयुक्त (म), यांनी मान्यता दिलेली आहे. म्हणजेच ठेक्याची रक्कम पूर्णपणे वसूल झाल्याचे दिसून आले.

(३) **सन २००४-०५:**

सदर वर्षातील माती विक्री ठेक्याबाबतची संचिका लेखापरीक्षणास्तव उपलब्ध करून देण्यात आलेली नाही. सदर वर्षात किती रक्कम वसूल करण्यात आली व सदरची वसूली कोणा मार्फ़त करण्यात आली याचा बोध झालेला नाही.

वरील तीनही वर्षातील अनियमिततांबाबत खुलासा करण्याविषयी अर्धसमास पत्र क्र.१७, दि.२२.११.२००५ अन्वये विभागास कळविण्यात आले आहे. मात्र अद्याप पावेतो अनुपालन अप्राप्त आहे.

विभागाने जा.क्र.मनपा/मामअ/१५८४/२००६, दिनांक १२.७.२००६ नुसार अनुपालन सादर केले आहे मात्र पडताळणीस्तव पावती पुस्तके व इतर अनुषंगिक अभिलेखे उपलब्ध करून देण्यात आलेले नाहीत. त्यामुळे अनुपालन पडताळणी करणे शक्य झालेले नाही. आवश्यक ते अभिलेखे पडताळणीस्तव उपलब्ध करून द्यावेत असे लेखा परीक्षण विभागाकडील जा.क्र.मनपा/मुलेप/२००६/३१२,दिनांक २५.७.२००६ अन्वये विभागास कळविण्यात आले आहे.

**परिच्छेद क्र.८:- मौजे सावंगी तलाव माती विक्री ठेका रक्कम वसुली बाबत अनियमितता:**

सन २००२-०३ ते सन २००४-०५ या आर्थिक वर्षातील सावंगी तलाव माती विक्रीबाबतच्या संचिका,मागणी रजिस्टर व कॅश रजिस्टर यांच्या तपासणीअंती खालील आक्षेपार्ह बाबी निदर्शनास आल्या आहेत.

**(१) <u>सन २००२–०३:–</u>**

सदर वर्षात माती विक्रीसाठी निविदा मागविण्यात आलेल्या नव्हत्या असे सन २००३-०४ या वर्षीच्या संचिकेत नमूद करण्यात आलेले आहे. त्यामुळे सदर वर्षात माती विक्री बाबत महापालिकेच्या कर्मचाऱ्यांमार्फ़त वसूली करण्यात आली किंवा कसे ? या बाबतचा खुलासा विभागाने करावा. असे सूचित करण्यात आले आहे मात्र अद्यापपावेतो अनुपालन अप्राप्त आहे.

**(२) <u>सन २००३–०४:–</u>**

सदर वर्षात जून २००५ पर्यंत माती विक्रीचा ठेका देण्यासाठी दिनांक २०.०१.२००४ रोजीच्या प्रशासकीय मान्यते आधारे निविदा मागवून त्या मध्ये श्री.रामकुमार किशनलाल डोंगरे यांची जादा दराची रू.१५७७८६/- इतक्या दराची निविदा स्विकृतीस मा.आयुक्त यांनी दिनांक ०९.०२.२००४ रोजी मान्यता प्रदान केली. सदरच्या निविदेवर श्री.डोंगरे यांची स्वाक्षरी नसल्याचे दिसून आले. सदरच्या दरास स्थायी समितीची मान्यता घेण्यात आलेली नाही. प्रशासकीय मान्यतेआधारे दिनांक ११.०२.२००४ रोजी संबंधितास माती विक्रीचा अधिकार देण्यात आला. संबंधिताकडून करारनामा करून घेतांना त्यावर सक्षम अधिकाऱ्यांची स्वाक्षरी नाही असे दिसून आले.

संबंधिताकडून अनामत रक्कम रू.२५०००/- व्यतिरिक्तची रक्कम रू.१३२७८६/- वसूल झाल्याचे दिसून येते.

**(३) <u>सन २००४–०५:–</u>**

सदर वर्षात मागविलेल्या निविदांमध्ये श्री.अ.साजेद अ.हमीद औरंगाबाद यांची जादा दराची – रू.३१२०००/- इतक्या दराची निविदा प्राप्त झाली असता त्यास प्रशासकीय मान्यतेअंती व स्थायी समितीची मान्यता दिनांक १३.०१.२००५ रोजी मिळाली असल्याचे निदर्शनास आले. त्यानुसार श्री.अ.साजेद अ.हमीद यांना दिनांक १९.०१.२००५ रोजी आदेश देण्यात आला. निविदा अटी/शर्तीनुसार माती विक्रीचा अधिकार हा दिनांक ३०.०६.२००४ पर्यंत देण्यात येईल असे नमूद करण्यात आले आहे. त्यानंतरच्या कालावधीमध्ये माती विक्री कोणी केली ? व किती रक्कम महापालिकेस प्राप्त झाली याचा बोध झालेला नाही.

संबंधिताने रू.१५६०००/- ही रक्कम महापालिकेकडे भरणा केली असून रू.१५६०००/- या उर्वरित रकमेचा धनादेश क्र.२१२६५० ,दिनांक १५.०२.२००५ हा न वटता परत आला असे दिसून येते. त्यामुळे रू.१५६०००/- इतकी रक्कम संबंधिताकडे थकित असल्याचे निदर्शनास येते.सदर तीनही वर्षात किती रक्कम वसूल करण्यात आली व सदरची वसूली कोणा मार्फ़त करण्यात आली याबाबतचा खुलासा करण्याविषयी विभागास अर्धसमास पत्र क्र.१८, दि.२२.११.२००५ अन्वये कळविण्यात आले आहे. मात्र अद्याप पावेतो अनुपालन अप्राप्त आहे.

परिणामी सन २००२-०३ या आर्थिक वर्षातील वसूलीबाबत खुलासा करून सन २००४-०५ मधील थकित रक्कम रू.१५६०००/- बाबत जबाबदारी निश्चित करून वसूलीची कार्यवाही करणे आवश्यक ठरते.

विभागाने जा.क्र.मनपा/मामअ/१५८४/२००६, दिनांक १२.७.२००६ नुसार अनुपालन सादर केले आहे मात्र पडताळणीस्तव पावती पुस्तके व इतर अनुषंगिक अभिलेखे उपलब्ध करून देण्यात आलेले नाहीत. त्यामुळे अनुपालन पडताळणी करणे शक्य झालेले नाही. आवश्यक ते अभिलेखे पडताळणीस्तव उपलब्ध करून द्यावेत असे लेखा परीक्षण विभागाकडील जा.क्र.मनपा/मुलेप/२००६/३१२,दिनांक २५.७.२००६ अन्वये विभागास कळविण्यात आले आहे.

## होर्डिंग्ज बाबत

**परिच्छेद क्र.९:– अतिप्रदान रकमेबाबत :.**

सन २००२-०३ या आर्थिक वर्षात जाहीरात धोरण ठरविण्याबाबत सर्वेक्षणासाठी निविदा मागविण्यात येवून दर वाटाघाटी अंती प्राप्त निविदाधारक मे.टंडन ॲण्ड असोसिएटस्, मुंबई यांची रू.४.५० लक्ष इतक्या रकमेची निविदा स्विकारण्यास दिनांक ०१.०१.२००२ रोजी आयुक्तांनी प्रशासकीय मान्यता प्रदान केल्याचे दिसते. त्यानुसार संबंधितास दिनांक २८.०१.२००२ रोजी कार्यादेश निर्गमित करण्यात आला आहे. संचिकेचे अवलोकन केले असता असे दिसून आले की,

संबंधित एजन्सीने दिनांक १४.०१.२००२ रोजी पत्र देवून सदरचे काम पूर्ण झाल्याचे कळविले आहे. या सर्वेक्षण कामा व्यतिरिक्त माहिती पुस्तिका व टेंडर फ़ॉर्म विहीत नमुन्यात तयार करून त्याचे देयक रू.६५६५६/- एजन्सीने सादर केले. सदरची रक्कम ५% कमी करून उर्वरित रक्कम अदा करण्यासाठी मा.आयुक्त यांनी दिनांक २८.०१.२००३ रोजी मान्तता दिली असल्याचे दिसून आले. सदरची रक्कम ही पूर्णपणे संबंधितास अदा केल्याचे प्रमाणक क्र. १२०३९, दिनांक २०.०२.२००३ नुसार निदर्शनास येते. म्हणजेच ५% रक्कम रू.३२८३/- संबंधितास जादा अदा करण्यात आली आहे.

सदरची जादा अदाईची रक्कम रू.३२८३/- संबंधिताकडून तात्काळ वसूल करून अनुपालन अहवाल पाठवावा, असे अर्धसमास पत्र क्र.२६, दि.०७.१२.२००५ अन्वये विभागास सूचित केलेले आहे. विभागाकडील खुलासा असमाधानकारक आहे.

विभागाने जा.क्र.मनपा/मामअ/१५८४/२००६, दिनांक १२.७.२००६ नुसार अनुपालन सादर केले असून ते असमाधानकारक आहे.

**परिच्छेद क्र.१०:– होर्डिंगच्या ठिकाणाच्या वर्गवारीबाबत:**

मालमत्ता विभागाकडील सन २००२-२००३ ते सन २००४-०५ या तीन आर्थिक वर्षातील होर्डिंग फ़ी वसूलीबाबत संचिकेच्या तपासणी अंतर्गत विभागाकडून सन २००४-०५ या वर्षीच्या संचिका लेखा परीक्षणास्तव उपलब्ध न करून देण्यात आल्या. तपासणी दरम्यान असे निदर्शनास आले आहे की, दिनांक २४.४.२००२ रोजीच्या सर्वसाधारण सभेतील ठरावानुसार होर्डिंगचे दर हे रस्त्याच्या वर्गवारीनुसार निश्चित करण्यात आलेले आहेत. मात्र विभागामार्फ़त रस्त्यांच्या वर्गवारी अंतर्गत करण्यात आलेल्या वर्गवारीचा तपशिल (म्हणजेच कोणत्या भागासाठी/रस्त्यासाठी कोणती वर्गवारी निश्चित करण्यात आली आहे.) विभागाकडून उपलब्ध करून देण्यात आलेला नाही. त्यामुळे

विभागामार्फ़त आकारण्यात आलेल्या होर्डिंगच्या दराबाबत व वर्गवारी बाबत तंतोतंत पडताळणी करणे शक्य झालेले नाही. विभागाने सादर केलेला खुलासा हा समाधानकारक नाही.

विभागाने जा.क्र.मनपा/मामअ/१५८४/२००६, दिनांक १२.७.२००६ नुसार अनुपालन सादर केले आहे मात्र पडताळणीस्तव पावती पुस्तके व इतर अनुषंगिक अभिलेखे उपलब्ध करून देण्यात आलेले नाहीत. त्यामुळे अनुपालन पडताळणी करणे शक्य झालेले नाही. आवश्यक ते अभिलेखे पडताळणीस्तव उपलब्ध करून द्यावेत असे लेखा परीक्षण विभागाकडील जा.क्र.मनपा/मुलेप/२००६/३१२,दिनांक २५.७.२००६ अन्वये विभागास कळविण्यात आले आहे.

**परिच्छेद क्र.११:– होर्डिंग फ़ी प्रित्यर्थ कमी वसुलीच्या रक्कमेबाबत अनियमितता:**

विभागाकडून सन २००४-०५ या आर्थिक वर्षातीलच संचिका उपलब्ध करून देण्यात आल्या अशा संचिकांची तपासणी केली असता खालील प्रमाणे अनियमितता निदर्शनास आल्या आहेत.

१. मे. उपेंद्र पब्लिसिटी,औरंगाबाद यांची सन २००४-०५ या आर्थिक वर्षातील होर्डिंग फ़ी बाबतची संचिकाची तपासणी केली असता असे निदर्शनास आले की, शहरातील विविध ठिकाणी सन १.४.२००४ ते ३१.३.२००५ या कालावधीसाठी विविध आकाराच्या होर्डींगसाठी प्रचलित दरानुसार रोषनाई प्रित्यर्थ २०% रक्कम वसूल केलेली नाही. त्याबाबतचा तपशिल खालील प्रमाणे.

(अ) S.F.S. कंपाऊन्ड जालना रोड ८०० चौ.फ़ुट रू.१७६४ X १२ = २११६८, २०% रोषणाई दर रू. ४२३४/- एकूण रू.२५४०२/- वसूल होणे आवश्यक होते मात्र रोषणाई प्रित्यर्थ २०% रक्कम रू. ४२३४/- वसूल केलेली नाही.

(ब) S.F.S. कंपाऊन्ड जालना रोड ८०० चौ.फ़ुट २६५० X १२ = ३१८००/- २०% रोषणाई दर रू.६३६०/- एकूण रू. ३८१६०/- वसुल होणे आवश्यक होते. मात्र रोषणाई प्रित्यर्थ २०% रक्कम रू. ६३६०/- केलेली नाही. परिणामी रक्कम रू.४२३४ + ६३६० = १०५९४/- कमी वसूल झालेली आहे.

सदरची रक्कम रूपये १०५९४/- तात्काळ वसूल करून अनुपालन सादर करण्याविषयी अर्धसमास पत्र क्र.२४, दि.०३.१२.२००५ अन्वये विभागास सूचित केले असता विभागाने सादर केलेले अनुपालन असमाधानकारक असल्याने आक्षेपित रक्कम वसूल करणे आवश्यक ठरते.

२. मे. हिन्दुस्थान पेट्रोलियम कार्पो.लि. यांची सन २००४-०५ या आर्थिक वर्षातील होर्डिंग फ़ी वसूलीबाबतची संचिका तपासली असता असे निदर्शनास आले की, क्रांती चौक येथे सन २००४-०५ साठी म्हणजेच दिनांक ०१.०७.२००४ ते दिनांक ३१.०३.२००५ पर्यंतच्या कालावधीसाठी ४५० चौ.फ़ू. व ८०० चौ.फ़ू. आकाराच्या होर्डिंगसाठी प्रचलित दरानुसार प्रतिवर्ष रू.४०६५६/- ही रक्कम वसूल केलेली नसल्याचे दिसून येते.

अर्धसमास पत्र क्र.२२, दि.०२.१२.२००५ च्या उत्तरी विभागाने सादर केलेला खुलासा हा समाधानकारक नाही.

३. मे.नागपाल प्रोजेक्टस व कन्स्ट्रक्शन यांची सन २००४-०५ या आर्थिक वर्षातील होर्डिंग फ़ी वसूली बाबतची संचिका तपासल्या असता असे निदर्शनास आले की, एजन्सी मार्फ़त शहरातील विविध ठिकाणी सन २००४-०५ साठी म्हणजेच दिनांक १.६.०४ ते ३१.३.०५ पर्यंतच्या कालावधीसाठी विविध आकाराच्या होर्डिंगसाठी प्रचलित दरानुसार रू.१९,९४३/- वसुल केलेली नसल्याचे दिसून येते .

अर्धसमास पत्र क्र.२३, दि.२.१२.२००५ च्या उत्तरी विभागाने सादर केलेला खुलासा हा समाधानकारक नाही.

४. श्री.कैलास पंडीत, औरंगाबाद यांचे कडील औरंगाबाद महानगरपालिका हद्दीतील तापडीया सिटी सेंटर निराला बाजार येथील सन २००२-२००३ या आर्थिक वर्षातील होर्डिंग फ़ी वसूली बाबतची संचिका तपासली असता खालील प्रमाणे आक्षेपार्ह बाबी निदर्शनास आल्या आहेत.

सन २००२-२००३ या वर्षातील चार विविध होर्डिंगसाठी एकूण रक्कम रूपये ४३२००.०० भाडे भरणा जरूरीचे होते मात्र संबंधिताकडून फ़क्त रक्कम रूपये ३२४००/- ही पावती क्रमांक ९५८९ दिनांक २६.८.२००२ रोजी वसूल झालेली आहे. म्हणजेच रूपये १०८०० /- कमी वसूल करण्यात आले आहेत.

संबंधिताकडील थकीत रक्कम वसूली बाबत अनुपालन अहवाल उलट टपाली कळविण्याबाबत अर्धसमास पत्र क्र.४५, दि.२१.१२.२००५ अन्वये विभागास सूचित करण्यात आले असून अनुपालन अद्यापपावेतो अप्राप्त आहे.

विभागाने जा.क्र.मनपा/मामअ/१५८४/२००६, दिनांक १२.७.२००६ नुसार अनुपालन सादर केले आहे मात्र पडताळणीस्तव पावती पुस्तके व इतर अनुषंगिक अभिलेखे उपलब्ध करून देण्यात आलेले नाहीत. त्यामुळे अनुपालन पडताळणी करणे शक्य झालेले नाही. आवश्यक ते अभिलेखे पडताळणीस्तव उपलब्ध करून द्यावेत असे लेखा परीक्षण विभागाकडील जा.क्र.मनपा/मुलेप/२००६/३१२,दिनांक २५.७.२००६ अन्वये विभागास कळविण्यात आले आहे.

**परिच्छेद क्र.१२:- होर्डिंग, ॲडपोल्स इ.साठी निविदा मागविणे बाबत.**

सन २००३-०४ या वर्षात विषयांकित प्रकरणी निविदा रक्कम (आधारभूत किंमत) रू.४३,४४६१८/- निश्चित करून निविदा मागविण्यात आल्या असता तीन निविदा प्राप्त झाल्या असून त्यामध्ये रू.४३,९७,८५१/- इतक्या अधिक रकमेची निविदा प्राप्त झाल्याचे दिसून येते. त्यामध्ये वर्गवारी निहाय निविदा (Group wise) मागविण्यात आली असता खालील प्रमाणे दर प्राप्त झालेले आहेत.

(१) होर्डिंगसाठी रू.२८,४४,६१६/- ही निर्धारित रक्कम असून त्यामध्ये १९ Group आहेत. त्या प्रित्यर्थ तीन एजन्सी मिळून एकूण रू.२८,९७,८५१/- असे दर प्राप्त झाले असून ते रू.५३२३५/- ने जादा प्राप्त झाले आहेत.

(२) ॲडपोल्स, कियोस्क्स साठी अनुक्रमे रू.५.०० लक्ष व रू.१०.०० लक्ष रक्कम निर्धारित करून तितक्याच रकमेची निविदा प्राप्त झाली आहे. त्याचप्रमाणे सन २००४-०५ या वर्षासाठीचे दर रू.४३,४४,६१८/- इतके निर्धारित केले असता तीनही एजन्सीकडून प्राप्त दर हे एकूण रू.४५,६२,७६२/- प्राप्त झाल्याचे निदर्शनास येते. सदरचे दर हे रू.२१८१४४/- इतक्या जादा रकमेने प्राप्त झाले आहेत असे दिसते.

महानगरपालिकेने निविदा मागवितांना ५ वर्षासाठी निविदा दर मागविण्यात आल्याचे दिसून येते . त्यानुसार सन २००३-०४ ते सन २००७-०८ पर्यंत विविध जाहीरात फ़लकासाठी दर प्राप्त झाले आहेत. मात्र सन २००३-०४ व सन २००४-०५ या आर्थिक वर्ष संपल्यामुळे याच वर्षाबाबत तपासणी करण्यात आली असून त्या मधील बाबी खालील प्रमाणे निदर्शनास आल्या आहेत.

होर्डिंग व ग्लो-साईन साठीच्या ग्रुप (१) व (२)साठी मे.न्यूक्लियस साईटस,मुंबई

यांचे तुलनात्मकदृष्ट्या दर जास्त आहेत , ग्रुप (३) करिता मे.न्यू नंदा पब्लीसिटी, नागपुर (रू.१५७०००) व ग्रुप (४) ते (२१) साठी मे.सेल ॲडस ,औरंगाबाद यांचे दर तुलनात्मक-दृष्ट्या जादा प्राप्त झाले आहेत.(रू.४०,२८,७६२/-). सदरचे दर हे सन २००३-०४ व सन २००४-०५ साठीचे आहेत. त्यानुसार स्थायी समिती ठराव क्र.८९ दिनांक १३.०३.२००३ नुसार निविदादरास मान्यता प्राप्त झाल्याचे दिसून येते. स्थायी समितीसमोर मात्र खालीलप्रमाणे वर्षनिहाय दर प्राप्त झाल्यानुसार प्रस्ताव सादर करण्यात आला असून त्यास मान्यता प्राप्त झाली आहे.

| | | |
|---|---|---|
| १ | सन २००३-०४ | रू.४३,९७८५१/- |
| २ | सन २००४-०५ | रू.४६,६२,७२२/- |
| ३ | सन २००५-०६ | रू.५०,४१,५१८/- |
| ४ | सन २००६-०७ | रू.५२,७६,४३०/- |
| ५ | सन २००७-०८ | रू.६१,६७,४२१/- |

(३) मे.सेल ॲडस्,औरंगाबाद यांचेकडून दिनांक ०८.०७.२००३ रोजी करारनामा करून घेण्यात आला. अटी/शर्तीनुसार ५०% रक्कम रू.१९४०९२६/- ही रक्कम पा.क्र.४०३४०, दिनांक ११.०७.२००३ अन्वये वसूल करण्यात आल्याचे दिसून येते.

तद्नंतर दिनांक ११.०७.२००३ रोजीच मे.सेल ॲडस् यांना दोन वर्षासाठी होर्डिंग, ॲडपोल्स व इतर लावण्यासाठी कार्यादेश देण्यात आला आहे.

(४) मे.न्यूक्लीयस साईटस्, मुंबई यांचेकडूनही करारनामा करून घेण्यात आला आहे. मात्र त्यावरील दिनांक नमूद करण्यात आलेला नाही. संबंधिताने अद्यापपावेतो ५०% रक्कम रू.१८०,५००/- महापालिकेकडे भरणा केलेला नाही तसेच त्यांना कार्यादेशही दिलेला नाही असेही दिसून येते. व त्यांचेकडून रक्कम वसूल करण्यात आलेली नाही.

(५) मे.न्यू नंदा पब्लीसिटी,नागपुर यांचेकडून करारनामा करून घेतलेला नाही. त्यांना कार्यादेशही देण्यात आलेला नाही असे दिसून आले. तसेच त्यांचेकडून रक्कम वसूल करण्यात आलेली नाही.

वरील विवेचनावरून असे नमूद करण्यात येते की, मे.सेल ॲडस औरंगाबाद यांचेकडून सन २००३-०४ या वर्षातील थकित रक्कम रू.१९४०,९२६/- वसूल झालेली नाही. तसेच सन २००४-०५ या वर्षातील आधारभूत रक्कम/निविदा रकमेनुसार रू.४५,६२,७६२/- ही रक्कम सुध्दा वसूल झालेली नाही असे दिसते.

निविदा अटी/शर्ती व करारनामा अटी/शर्ती नुसार निविदेनुसार निश्चित केलेली रक्कम ही दोन समान हप्त्यामध्ये निविदा धारकाने महापालिकेस अदा करावी, तसेच अशी रक्कम ही दर सहा महिने या कालावधी मध्ये व सहा महिने संपण्यापूर्वी १५ दिवस अगोदर अदा करावी व अशी रक्कम विहीत कालावधीमध्ये अदा न केल्यास त्यावर १८% प्रतिवर्ष या दराने व्याज आकारून वसूल करण्यात येईल असे नमूद केलेले असतांनाही सन २००३-०४ या वर्षातील नंतरच्या सहा महिन्यांसाठीची रक्कम रू.१९,४०,९२६/- आणि १८% व्याज सहा महिन्यांसाठी रू.१७४६८३/- अशी मिळून रू.२११५६०९/- ही रक्कम वसूल करणे आवश्यक आहे.

(६) सन २००४-०५ या आर्थिक वर्षातील मे.सेल ॲडस यांचेकडून निविदा रक्क्म रू.४०२८७६२/- ही रक्कम वसूल झालेली नाही असे दिसून आले आहे.

विभागाने जा.क्र.मनपा/मामअ/१५८४/२००६, दिनांक १२.७.२००६ नुसार अनुपालन सादर केले असून ते असमाधानकारक आहे.

## लीजवर /भाडेपट्टयाने दिलेल्या जागेच्या भाडे वसूलीतील अनियमितता:

### परिच्छेद क्र.१३:– औरंगाबाद जिल्हा मराठी पत्रकार परिषद– पत्रकार भवनास जागा देणे बाबत:

वरील विषयी संचिकेच्या तपासणीअंती खालील आक्षेपार्ह बाबी निदर्शनास आल्या आहेत.

महानगरपालिका स्थायी समिती ठराव क्र. ३६७/४, दिनांक २५.१०.१९९६ अन्वये समर्थनगर येथील वरद गणेश मंदीरा जवळील नाल्याची जमीन ३० वर्षासाठी रू.१५५/- प्रती चौ.मी. या दराने देण्याबाबत मंजूरी मिळाली आहे. तद्नंतर सदर प्रकरणी सर्वसाधारण सभा ठराव क्र.

१७०/१, दिनांक ११.०१.२००० अन्वये रू.१५५/- प्रति चौ.मी. ऐवजी रू.२५/- प्रती चौ.मी. या दराने वार्षिक भाडे निश्चित करण्यात आल्याचे दिसून आले. संबंधितास एकूण १२९० चौ.मी. जागा भाडेतत्वावर दिल्याचे दिसते. दिनांक २४.०१.२००१ रोजी याबाबत करारनामा करण्यात आला असून त्याच दिवशी संबंधितास ताबा पावती देण्यात आली आहे. मात्र १२९० चौ.मी. क्षेत्रफ़ळासाठी रू.१५५/- या प्रमाणे रू.१९९५०/- वार्षिक भाडे निश्चित करण्यात आले असून दिनांक २०.०१.२००० ते दिनांक १९.०२.२००५ पर्यंतचे भाडे रू.५९९८५०/- थकित आहे. मागणी रजिस्टरची तपासणी केली असता सन २००२-०३ पासून वसूल केलेल्या रकमेच्या नोंदी नसल्याचे निदर्शनास आले.

विभागाने सदरची रक्कम थकित असल्याबाबत दिनांक ०२.१२.२००४ रोजीच्या पत्रानुसार/अंतिम नोटीस नुसार अध्यक्ष, जिल्हा मराठी पत्रकार परिषद, औरंगाबाद यांनी कळविले आहे.

आजपावेतो किती रक्कम वसूल झाली याबाबतचा खुलासा उलटटपाली द्यावा असे अर्धसमास पत्र क्र.२७, दि.०९.१२.२००५ अन्वये विभागास कळविले आहे. मात्र, अद्यापपावेतो खुलासा अप्राप्त आहे.

विभागाने जा.क्र.मनपा/मामअ/१५८४/२००६, दिनांक १२.७.२००६ नुसार अनुपालन सादर केले असून ते असमाधानकारक आहे.

**परिच्छेद क्र.१४:– उस्मानपुरा चौकातील कै.विनायकराव पाटील यांच्या पुतळ्याजवळ भाडे पट्टयाने जागा देणे बाबत.**

उस्मानपुरा चौकातील कै.विनायकराव पाटील यांच्या पुतळ्याजवळील ८ ‘ X १०’ = ८० चौ.फ़ू. जागा ही रूपये ३२०/- प्रति महा (३८४०/-प्र.वर्ष) या दराने श्री.सुरजितसिंग खुंगर यांना भाडे पट्टयाने देण्याबाबत आयुक्तांची मान्यता घेण्यात आली. तद्नंतर दिनांक १६.८.१९९५ रोजी स्थायी समितीची मान्यता घेण्यात आल्याचे दिसून येते.

करारनामा दिनांक ११.७.१९९५ नुसार दिनांक १७.७.१९९५ पासून ५ वर्षासाठी रूपये ३२०/- प्र.म.दोन वर्षासाठी व तद्नंतर प्रत्येक वर्षी मुळ दराच्या २५% भाडेवाढ करण्यात येईल असे ठरल्याचे दिसते. स्थायी समिती सभा दिनांक २४.१०.२००२ मधील निर्णयानुसार सन १९९८ पासून ३ X १७ या जागेसाठी श्री.सुरजितसिंग खुंगर यांना रूपये १७६८/- प्र.म. वसूल करून जागा भाडे पट्टयाने पाच वर्षासाठी नुतनीकरणास मान्यता देण्यात आली. मात्र विधी सल्लागार यांचे टिपणी दिनांक १४.०१.२००५ नुसार या बाबत अभिप्राय घेण्यात येवून पूर्वीच्या कालावधी ऐवजी दिनांक २४.१०.२००२ पासून सुधारित भाडे वाढ अंमलात आणावी असे नमूद करण्यात आले आहे.तथापि सदरील वाढ ही स्थायी समितीच्या निदर्शनास आणून देणे आवश्यक होते. तसेच मा.आयुक्त यांच्याही निदर्शनास आणून देणे अगत्याचे होते परंतु तसे या ठिकाणी झालेले नाही. त्यामुळे दि.२४.१०.२००२ रोजीच्या स्थायी समिती ठरावाची अंमलबजावणी करणे आवश्यक आहे.

परिणामी दि.०१.०४.९८ ते दि.३१.०३.२००१ या कालावधीतील प्रतिमहा रू.१७६८/- नुसार सुधारित भाडे आकारून त्यामधील फ़रकाची रक्कम रू.११६१६ प्रतिवर्ष (रू.२१२१६-रू.९६००) या प्रमाणे ३ वर्षासाठी रू.३४८४८/- वसूल करणे आवश्यक ठरते. दि.१.४.२००१ ते दि.३१.३.२००३ या दोन वर्षातील भाडे रक्कम ही संबंधिताने भरणा केली आहे. तद्नंतरच्या कालावधीतील म्हणजेच दि.१.४.२००३ ते दि.३१.३.२००५ या दोन आर्थिक वर्षासाठी रू.१७६८/- प्र.म.याप्रमाणे रू.४२४३२/- वसूल करणेही आवश्यक आहे. त्यामुळे संबंधिताकडून एकत्रित थकित रक्कम रू.३४८४८ +४२४३२ = ७७२८० वसूल होणे क्रमप्राप्त आहे. तसेच दिनांक १.४.२००५ ते ३०.११.२००५ पर्यंतची रक्कम रूपये १४१४४/- असे एकूण रक्कम रूपये ९१४२४/- थकित असल्याचे दिसून येते. मागणी रजिस्टरची तपासणी केली असता दिनांक ११.२.२००३ पासून वसूलीच्या नोंदी घेतलेल्या नाहीत असे दिसून आले.

विभागाने वरील अनियमितते बाबत खुलासा हा चोवीस तासात द्यावा, असे अर्धसमास पत्र क्र.२८, दि.१२.१२.२००५ अन्वये कळविण्यात आलेले आहे. मात्र अनुपालन अद्यापपावेतो अप्राप्त आहे.

विभागाने जा.क्र.मनपा/मामअ/१५८४/२००६, दिनांक १२.७.२००६ नुसार अनुपालन सादर केले असून ते असमाधानकारक आहे.

**<u>परिच्छेद क्र.१५:– बॉम्बे मर्कन्टाईल को.ऑप.बॅंकेस लीजवर दिलेल्या जागेबाबत:</u>**

बॉम्बे मर्कन्टाईल बॅंकेस जुना बाजार येथील १२९४ स्क्वे .मी. ही महापालिकेच्या मालकीची जागा दिनांक ३० जून १९७५ रोजीच्या करारनाम्यानुसार माहे जुलै १९५५ पासून रू.१.०० प्रति स्क्वे .मी. या दराने (वार्षिक) ९० वर्षासाठी भाडेपट्टयाने दिल्याचे दिसून येते.

संचिकेचे अवलोकन केले असता खालील आक्षेपार्ह बाबी निदर्शनास आल्या आहेत.

(१) सन १९८५ ते सन १९९५ (दिनांक २७.०६.१९८५ ते २६.०६.१९९५, पर्यतचे एकत्रित भाडे रू.१२९४०/- संबंधिताकडून वसूल करण्यात आलेले नाही असे दिसून येते.

(२) करारनाम्यातील अटीनुसार ३० वर्षांनी १००% पर्यंत भाडे वाढ करण्याचा अधिकार महापालिकेस असून त्यानुसार माहे जुलै २००५ रोजी ३० वर्ष संपल्यामुळे करारनामा नुतनीकरण करणे गरजेचे आहे. तसेच १००% पर्यंत भाडे वाढ करणे अथवा बाजारभावानुसार भाडेसमितीने निश्चित केलेले भाडे संबंधिताकडून वसूल करणे आवश्यक आहे. मात्र विभागाकडून वरीलबाबत कार्यवाही झालेली नाही, ही गंभीर बाब आहे. करिता संबंधिताकडून थकित रक्कम रू. १२९४०/- तात्काळ वसूल करावी .

तसेच भाडेवाढ करण्याबाबत तात्काळ कार्यवाही करावी व कार्यवाहीबाबतचा अहवाल त्वरीत या विभागाकडे पाठवावा असे अर्धसमास पत्र क्र.३०, दि.१२.१२.२००५ अन्वये विभागास सूचित केलेले आहे. मात्र अद्यापपावेतो अनुपालन अप्राप्त आहे.

विभागाने जा.क्र.मनपा/मामअ/१५८४/२००६, दिनांक १२.७.२००६ नुसार अनुपालन सादर केले असून ते असमाधानकारक आहे.

**परिच्छेद क्र.१६ :शहागंज येथील महापालिकेच्या मालकीची जागा मे. भारत पेट्रोलियम कॉर्पोरेशन लि. यांना भाड्याने देणे बाबत.**

विषयांकित प्रकरणांची संचिका तपासली असता खालील आक्षेपार्ह बाबी निदर्शनास आल्या आहेत.

(१) भारत पेट्रोलियम कार्पो लि. यांना माहे ऑक्टोबर १९३० पासून शहागंज येथील जागा ही आठ आणे प्रति महा या दराने भाड्याने दिली असल्याचे करारनामा सत्यप्रतीवरून दिसून येते.

(२) सदरची जागा ही कोणत्या दिनांकापासून प्रत्यक्षात भाड्याने दिली आहे याचा बोध झालेला नाही. तसेच ताबा पावतीही संचिकेत नाही.

(३) भाड्याने दिलेल्या जागेचे क्षेत्रफ़ळ किती आहे ? याचाही बोध झालेला नाही.

(४) सद्यस्थितीत संबंधिताकडून प्रतिवर्ष रू.२४०/- इतके भाडे आकारण्यात येत आहे. मात्र त्याबाबतचे मागणी रजिस्टर उपलब्ध करून दिलेले नाही.

(५) करारनामा करतांना भाडेवाढ करण्याचा अधिकार महापालिकेस असल्याबाबत कुठेही उल्लेख दिसून येत नाही.

(६) सदरची जागा ही ७५ वर्षापासून मे.भारत पेट्रोलियम कॉर्पो.लि.यांच्या ताब्यात असल्याचे निदर्शनास येते, मात्र नियमानुसार वेळोवळी भाडेवाढ करण्यात आलेली नाही असे दिसते. वास्तविक सदरची कंपनी ही नफ़ा कमविणारी कंपनी आहे, त्यामुळे सदरची बाब ही अत्यंत आक्षेपार्ह आहे. मागणी रजिस्टरची तपासणी केली असता असे दिसून आले की, सन १९९६-९७ पर्यंत वसूल केलेल्या रकमेच्या नोंदी घेण्यात आलेल्या आहेत.

वरील मुद्यांबाबतचा खुलासा देण्याविषयी अर्धसमास पत्र क्र. ३१, दि.१२.१२.२००५ अन्वये विभागास कळविले आहे. मात्र अद्यापपावेतो अनुपालन अप्राप्त आहे.

विभागाने जा.क्र.मनपा/मामअ/१५८४/२००६, दिनांक १२.७.२००६ नुसार अनुपालन सादर केले असून ते असमाधानकारक आहे.

**परिच्छेद क्र.१७:- श्री.मुरलीधर गवळी यांना भाड्याने देण्यात आलेल्या जागेबाबत:**

विषयांकित संचिकेच्या तपासणीअंती खालील आक्षेपार्ह बाबी निदर्शनास आल्या आहेत.

(१) श्री.गवळी यांना सी.टी.एस.क्र.५०६७ मधील पैठणगेट येथील ११८.०० चौ.मी. जागा भाड्याने दिल्याचे दिसून येते. मात्र सदरची जागा ही केव्हापासून व किती रकमेच्या भाड्याने देण्यात आली याचा बोध होत नाही.

(२) संबंधिताकडून करारनामा केल्याची प्रत संचिकेत नाही तसेच ताबा पावतीही दिसून येत नाही.

(३) संबंधितास देण्यात आलेल्या जागेचे सस्थितीत भाडे रू.४८०/- प्रतिवर्ष असे असल्याचे संचिकेतील टिपणी वरून दिसून येते.

(४) करारनामा व आदेशाची प्रत संचिकेत नसल्यामुळे भाड्याची रक्कम किती कालावधीनंतर वाढविण्यात यावी याचाही बोध होत नाही.

(५) संबंधिताकडून सन २००५ पर्यंतचे भाडे वसूल करण्यात आले आहे असे दिसून येते. मात्र भाडेवसूलीचे मागणी रजिस्टर उपलब्ध करून देण्यात आलेले नाही.

मागील रजिस्टरची तपासणी केली असता असे दिसून आले की,सन २००० पर्यत वसूल केलेल्या रकमेच्या नोंदी घेण्यात आलेल्या आहेत.

वरील मुद्यांबाबतचा खुलासा देण्याविषयी अर्धसमास पत्र क्र. ३२, दि.१२.१२.२००५ अन्वये विभागास कळविले आहे. मात्र अद्यापपावेतो अनुपालन अप्राप्त आहे.

विभागाने जा.क्र.मनपा/मामअ/१५८४/२००६, दिनांक १२.७.२००६ नुसार अनुपालन सादर केले असून ते असमाधानकारक आहे.

**परिच्छेद क्र.१८:– <u>योग विद्याधाम,औरंगाबाद या संस्थेला मौजे गारखेडा सर्वे क्र.१ भाग शिवनेरी कॉलनी येथील जागा भाडे पट्टयावर देणे बाबत.</u>**

वरील विषयी संचिकेच्या तपासणी अंती खालील आक्षेपार्ह बाबी निदर्शनास आल्या आहेत.

(१) गारखेडा येथील सर्व्हे क्र.१ भाग शिवनेरी कॉलनी येथील महापालिकेची खुली जागा ही योग विद्याधाम यांना भाडे पट्टयावर देण्यासाठी स्थायी समिती ठराव क्र. ११५/७ दि.२६.६.१९९७ नुसार मान्यता दिलेली आहे. सदर जागेचे भाडे प्रति वर्ष रूपये १००/- असे निश्चित करण्यात आलेले आहे. परंतू संबंधिताकडून अद्यापपावेतो भाडे वसूल करण्यात आल्याचे दिसून येत नाही. सदर बाब ही अत्यंत आक्षेपार्ह आहे.

(२) संचिके मध्ये संबंधिताने मुद्रांक पेपरवर नियमानुसार करारनामा केल्याचे दिसून येत नाही. तसेच संबंधितास जागा ताब्यात दिली किंवा कसे ? याचा बोध होत नाही.

(३) सदर जागेबाबत अटी/शर्तीनुसार दर पाच वर्षानी नुतनीकरण करणे आवश्यक असतांना त्याबाबत कोणतीही कार्यवाही केल्याचे संचिकेमध्ये दिसून येत नाही.

(४) संचिकेचे अवलोकन केले असता परिच्छेद क्र.६७ नुसार सदर जागेस संरक्षित भिंत व तत्सम अन्य बाबीच्या कार्यापोटी रूपये १७६०००/- संस्थेकडून तातडीने वसूल करणेस्तव दर्शविलेले आहे. परंतु तशी कार्यवाही झाल्याचे दिसून येत नाही.

संबंधिताकडून वेळोवेळी वसूल केलेल्या रकमेच्या नोंदी ह्या मागणी नोंदवही मध्ये घेण्यात आलेल्या नाहीत. वरील मुद्यांबाबतचा खुलासा देण्याविषयी अर्धसमास पत्र क्र. ३३, दि.१२.१२.२००५ अन्वये विभागास कळविले आहे. मात्र अद्यापपावेतो अनुपालन अप्राप्त आहे.

विभागाने जा.क्र.मनपा/मामअ/१५८४/२००६, दिनांक १२.७.२००६ नुसार अनुपालन सादर केले असून ते असमाधानकारक आहे.

**परिच्छेद क्र.१९:– औरंगाबाद महानगरपालिकेची जागा (समर्थनगर येथील) व्यायामशाळेसाठी भाड्याने देणे बाबत.**

विषयांकित संचिकेच्या तपासणीअंती खालील आक्षेपार्ह बाबी निदर्शनास आल्या आहेत.

(१) मुळ संचिका तपासणीसाठी उपलब्ध करून देण्यात आलेली नाही. त्यामुळे जागेचे क्षेत्रफ़ळ व मासिक भाडे याचा बोध होत नाही.

(२) संस्थेला (मराठवाडा युवक शरीर सौष्ठव संघटना) जागा भाड्याने देण्यात आलेली असून त्याबबात अटी व शर्ती स्पष्ट नमूद केलेल्या नाहीत. कोणताही करारनामा वगैरे करण्यात आलेला नाही. (सुरूवातीचे टिपणी पृष्ठे झेरॉक्स प्रतीत आहेत.)

(३) दिनांक ६.६.९४ पासून मराठवाडा युवक शरीर सौष्ठव संघटनेला व्यायाम शाळेसाठी ताब्यात देण्यात आलेली आहे असे संचिकेतील पत्रानुसार दिसून आले.

(४) दिनांक ६.६.९४ ते ३१.३.२००५ असे एकूण १३० महिन्यासाठी रू.११०० X १३० = १४३०००/ (One Lac Forty Three Thousand) इतकी रक्कम संबंधिताकडे आज पावेतो थकित आहे, ही बाब आक्षेपार्ह आहे. तसेच संबंधिताकडून वेळोवेळी वसूल केलेल्या रकमेच्या नोंदी ह्या मागणी नोंदवही मध्ये घेण्यात आलेल्या नाहीत.

वरील मुद्यांबाबतचा खुलासा देण्याविषयी अर्धसमास पत्र क्र. ३४, दि.१३.१२.२००५ अन्वये विभागास कळविले आहे. मात्र अद्यापपावेतो अनुपालन अप्राप्त आहे.

विभागाने जा.क्र.मनपा/मामअ/१५८४/२००६, दिनांक १२.७.२००६ नुसार अनुपालन सादर केले असून ते असमाधानकारक आहे.

**परिच्छेद क्र.२०:– औरंगाबाद महानगरपालिकेची खुली जागा (नविन समर्थनगर येथील) भाड्याने देणे बाबत.**

विषयांकित संचिकेच्या तपासणीअंती खालील आक्षेपार्ह बाबी निदर्शनास आल्या आहेत.

(१) औरंगाबाद महानगरपालिकेच्या मालकीच्या भू.मा.क्र. .२०५९२/४८ व ३२ समर्थनगर येथील जागेच्या एकूण क्षेत्रफ़ळापैकी १०% जागा विकसित करण्यासाठी प्रति वर्ष रक्कम रूपये १०० या दराने जिवन कला मंडळ, औरंगाबाद यांना भाड्याने दिल्याचे दिसून येते. तथापि संबंधिताने करून दिलेला करारनामा, संबंधितास देण्यात आलेला आदेश व ताबापावती संचिकेत नाही. त्यामुळे उक्त ठिकाणी जागा केव्हा पासून भाड्याने दिली आहे व त्या जागेचे क्षेत्रफ़ळ किती आहे याचा बोध झालेला नाही.

सदर प्रकरणी जागा भाड्याने दिल्याबाबत सक्षम अधिकारी /प्राधिकारी यांची मान्यताही दिसून येत नाही.

(२) संबंधिताकडून किती रक्कम व कोणत्या कालावधी साठी वसूल केली याचाही उल्लेख संचिकेत नाही. तसेच मागणी नोंदवहीची तपासणी केली असता सन १९९६ मधील रक्कम रूपये १७१४०/-वसूलीची एकमात्र नोंद असल्याचे निदर्शनास आले आहे.

वरील मुद्यांबाबतचा खुलासा देण्याविषयी अर्धसमास पत्र क्र. ३५, दि.१३.१२.२००५ अन्वये विभागास कळविले आहे. मात्र अद्यापपावेतो अनुपालन अप्राप्त आहे.

विभागाने जा.क्र.मनपा/मामअ/१५८४/२००६, दिनांक १२.७.२००६ नुसार अनुपालन सादर केले असून ते असमाधानकारक आहे.

**परिच्छेद क्र.२१:– प्रयागधाम ट्रस्ट सत्संग आश्रम,औरंगाबाद यांना भाडेपट्टयावर दिलेल्या जागेबाबत:**

वरील विषयांकित संचिकेच्या तपासणीअंती खालील आक्षेपार्ह बाबी निदर्शनास आल्या आहेत.

(१) प्रयागधाम ट्रस्ट सत्संग आश्रम यांना बन्सिलाल नगर भागातील गोविंदनगर येथील रेखांकनातील महापालिकेच्या मालकीची खुली जागा क्षेत्रफ़ळ ७९९.५० चौ.मी – सर्वसाधारण सभा ठराव क्र.६१/१०, दिनांक २०.१०.१९९२ नुसार रू.९५४६/- प्रतिवर्ष या दराने भाड्याने देण्यात आल्याचे निदर्शनास येते. (जागेचा ताबा दि.२६.११.१९९३ रोजी दिल्याचे दिसते.) तद्‌नंतर सर्वसाधारण सभा ठराव क्र.१६०/१, दिनांक २०.११.१९९६ अन्व्ये प्रतिवर्ष भाडे रू.९५४६/- ऐवजी रू.१००/- प्रतीवर्ष इतके आकारण्यास मान्यता मिळाली असून भाडे पट्टयाची मुदत ही ३० वर्षे ठेवण्यात येवून दर ५ वर्षांनी भाडेपट्टयाचे नुतनीकरण करण्यासाठी स्थायी समिती ठराव क्र.१२१/१३ दिनांक ०५.०७.९७ अन्वये मान्यता देण्यात आली आहे.

संचिकेचे अवलोकन केले असता असे दिसून येते की, सन ९१-९२ व सन ९२-९३ मध्ये प्रत्येकी रू.९५४६/- या रकमेची वसूली संबंधिताकडून करण्यात आलेली आहे. मात्र सन १९९३ –९४ ते नोव्हेंबर १९९६ पर्यंतचे भाडे (तद्‌नंतर रू.१००/-प्रतिवर्ष आकारल्यान) रू.३५००२/- संबंधिताकडून वसूल केलेले नाही असे दिसून येते. भाडे वसूलीबाबतचे अभिलेखे/मागणी रजिस्टर इ. तपासणीस्तव उपलब्ध करून देणे आवश्यक आहे.

(२) सुधारित करारनामा दि.१४.१०.१९९५ नुसार दर ५ वर्षांनी भाडेपट्टयाचे नुतनीकरण आवश्यक असतांना त्याप्रमाणे कार्यवाही झालेली नाही.

(३) उपआयुक्त (म), महानगरपालिका,औरंगाबाद यांचेकडील पत्र क्र.१९२५/०४, दिनांक ०२.११.२००४ नुसार सदरील आश्रमास खुल्या जागेच्या १०% प्रमाणे ७९.९५ चौ.मी. जागा भाडेतत्वावर दिल्याचा उल्लेख आहे. त्यामुळे सदर आश्रमाच्या ताब्यात प्रत्यक्ष किती जागा आहे या बाबतही खुलासा होणे आवश्यक आहे.

(४) संबंधिताकडून दिनांक २२.०९.२००४ पर्यंतचे भाडे वसूल करण्यात आल्याचे दिसून येते. मात्र दिनांक २३.०९.२००४ ते आजपावेतोचे भाडे वसूल झालेले नाही.मागणी रजिस्टरची तपासणी केली असता सन २०००-२००१ पर्यंतच्या भाडे वसूलीची नोंद घेण्यात आलेली आहे.

वरील मुद्यांबाबतचा खुलासा देण्याविषयी अर्धसमास पत्र क्र. ३६, दि.१४.१२.२००५ अन्वये विभागास कळविले आहे. मात्र अद्यापपावेतो अनुपालन अप्राप्त आहे.

विभागाने जा.क्र.मनपा/मामअ/१५८४/२००६, दिनांक १२.७.२००६ नुसार अनुपालन सादर केले असून ते असमाधानकारक आहे.

**परिच्छेद क्र.२२:– उस्मानपुरा येथील जागा भाड्याने दिल्याबाबत.**

(१) उस्मानपुरा येथील बी ॲण्ड सी क्वार्टर लगतची महापालिकेच्या मालकीची १०२ चौ.मी. जागा श्री.रूपचंद अहीर व श्री.सतिश प्रकाश लाहोट यांना ३० वर्षाच्या भाडेपट्टयाने देण्याबाबत सर्वसाधारण सभा दिनांक १९.०७.१९८९ नुसार मंजूरी देण्यात आलेली

आहे. त्यानुसार संबंधिताकडून दिनांक १७.०१.१९९० रोजी करारनामा करण्यात आला तत्पूर्वी म्हणजे दिनांक १६.०९.१९८९ रोजी संबंधितास जागेचा ताबा दिल्याचे दिसून येते. करारनाम्यानुसार रू.५३९६/- हे वार्षिक भाडे निश्चित करण्यात आले आहे.

(२) करारनाम्यातील अटीनुसार दहा वर्षांनी म्हणजेच दिनांक १६.०९.१९९९ पासून भाडेवाढ ही १५% ने करण्यात येवून रू.६२०५/- प्रतिवर्ष भाडे निश्चित करण्यात आलेले आहे.

संचिकेचे अवलोकन केले असता असे दिसून येते की, श्री.एस.पी.लाहोट यांचेकडे मार्च २००५ पर्यंत रू.८८२९/- थकित असून श्री.रूपचंद अहीर यांचेकडे रू.२१८२५/- थकित आहेत. मागणी नोंदवहीची तपासणी केली असता असे दिसून आले की, श्री.लाहोट यांचेकडील डिसेंबर १९९४ पर्यंतच्या वसूलीबाबत नोंद आहे. श्री.अहिर यांच्याकडून कोणत्या कालावधीपर्यंत वसूली झाली आहे याची नोंद नाही.

संबंधिताकडून वेळोवेळी वसूल केलेल्या रकमेबाबतचे अभिलेखे,मागणी रजिस्टर इ. तपासणीस्तव तात्काळ उपलब्ध करून द्यावेत व एकत्रित थकित रक्कम रू.३०६५४/- ही सुध्दा तात्काळ वसूल करावी. असे विभागास अर्धसमास पत्र क्र.३७, दि.१४.१२.२००५ अन्वये कळविण्यात आलेले आहे. अद्यापपावेतो अनुपालन अप्राप्त आहे.

विभागाने जा.क्र.मनपा/मामअ/१५८४/२००६, दिनांक १२.७.२००६ नुसार अनुपालन सादर केले आहे मात्र पडताळणीस्तव पावती पुस्तके व इतर अनुषंगिक अभिलेखे उपलब्ध करून देण्यात आलेले नाहीत. त्यामुळे अनुपालन पडताळणी करणे शक्य झालेले नाही. आवश्यक ते अभिलेखे पडताळणीस्तव उपलब्ध करून द्यावेत असे लेखा परीक्षण विभागाकडील जा.क्र.मनपा/मुलेप/२००६/३१२,दिनांक २५.७.२००६ अन्वये विभागास कळविण्यात आले आहे.

**परिच्छेद क्र.२३:– औरंगाबाद महानगरपालिका हद्दीतील खुली जागा (गारखेडा येथील ) भाड्याने देणे बाबत.**

विषयांकित संचिकेच्या तपासणी अंती खालील आक्षेपार्ह बाबी निदर्शनास आल्या आहेत.

(१) औरंगाबाद महानगरपालिकेच्या मालकी हक्काची जमीन भु.मा.क्र. १५३०८/७३, व १५३०८/७४ गारखेडा औरंगाबाद येथील जागेच्या एकूण क्षेत्रफ़ख १४८०० चौ.फु. जागा प्रति वर्ष रक्कम रूपये १००% या दराने सारंग हाऊसिंग सोसायटी गारखेडा रोड यांना सर्व साधारण सभा ठराव क्रमांक १६०/१ दिनांक २०.११.१९९६ नुसार भाड्याने दिल्याचे संचिकेवरून दिसून येते.तथापि संबंधिताने करून दिलेला करारनामा संचिकेत असून ताबा पावती नसल्याचे दिसून येते.

(२) दिनांक २० नोव्हेंबर १९९६ ते २००१ पर्यंत असे एकूण पाच वर्ष २ महिन्याची भाडे रक्कम रूपये ५०० +१७ = ५१७.०० भाडे आजपावेतो थकीत असल्याचे संचिकेवरून दिसून येते.

(३) संचिकेचे अवलोकन केले असता ११५/१३ वर असे नमूद करण्यात आले आहे की, एकूण क्षेत्रफ़ळ १३७५.४६ चौ.मि.च्या १०% जागा म्हणजेच १३७.५४ चौ.मी.विकसित करणे गरजेचे होते परंतू सदर संचिकेवरून संस्थेने ४४७.०० चौ.मी. मध्ये बांधकाम केल्यामुळे करारनामा अटी व शर्तीचा भंग झाल्याचे दिसते त्यामुळे विभागाने संबंधिताविरूध्द कोणती प्रशासकीय कार्यवाही केली याचा कोठेही बोध होत नाही. सदर जागेची नोंद ही संबंधित मागणी नोंदवही मध्ये घेण्यात आलेली नाही.

वरील मुद्यांबाबतचा खुलासा देण्याविषयी अर्धसमास पत्र क्र. ३८, दि.१४.१२.२००५ अन्वये विभागास कळविले आहे. मात्र अद्यापपावेतो अनुपालन अप्राप्त आहे.

विभागाने जा.क्र.मनपा/मामअ/१५८४/२००६, दिनांक १२.७.२००६ नुसार अनुपालन सादर केले असून ते असमाधानकारक आहे.

**परिच्छेद क्र.२४:– श्री.मधुकर यंदे,औरंगाबाद यांना भाडेपट्टयाने दिलेल्या जागेबाबत:**

विषयांकित प्रकरणाची संचिका तपासली असता खालील प्रमाणे आक्षेपार्ह बाबी निदर्शनास आल्या आहेत.

(१) जाफ़रगेट येथील महापालिकेच्या मालकीची मोकळी जागा क्षेत्रफ़ळ १३४४ चौ.फ़ू. - महानगरपालिका ठराव क्र. ११०, दिनांक ०९.०७.१९७४ अन्वये रू.१५/ प्र.म. या दराने श्री.यंदे यांना देण्यात आल्याचे दिसून येते. संबंधितास दिलेल्या जागेचे भाडे हे मा.प्रशासकांच्या दिनांक २९.०१.१९९४ रोजीच्या मंजुरीनुसार रू.४७००/- प्र.म.इतके वाढविण्यात आले. तद्नंतर संबंधिताने प्रकरण न्यायप्रविष्ट केल्यामुळे न्यायालयाने दावा क्र. १२७/९४ नुसार रू.६००/- प्र.म. भाडे निश्चित करण्याचे आदेश दिले आहेत असे संचिका पृ.क्र.६४ वर नमूद करण्यात आले आहे. मात्र संबंधिताकडून अद्यापपावेतो करारनामा करून घेतलेला नाही असेही दिसून आले.

(२) संबंधिताकडून करारनामा केलेला नसल्यामुळे किती वर्षासाठी संबंधितास जागा भाड्याने दिली आहे याचा बोध होत नाही.

(३) संचिका पृ.क्र.६४ वरील टिपणीनुसार संबंधिताच्या ताब्यात २११६.५० चौ.फू. जागा आहे. त्यामुळे श्री.यंदे हे ७७२.५० चौ.फू. जागा अतिरिक्त व नियमबाह्यपणे वापरत आहेत असे दिसून येते. सदरची बाब आक्षेपार्ह असून विभागाने आजपावेतो ठोस प्रशासकीय कार्यवाही केली नसल्याचे दिसते.

(४) मागणी नोंदवहीची तपासणी केली असता संबंधिताने मार्च-०५ पर्यंतचे भाडे भरणा केले आहे. मात्र सदरचे भाडे कोणत्या दराने वसूल करण्यात येत आहे. याबाबतचे अभिलेखे/पावती पुस्तके सादर केलेली नाहीत, अभिलेखे उपलब्ध करून देणे आवश्यक ठरते.

वरील मुद्यांबाबतचा खुलासा देण्याविषयी अर्धसमास पत्र क्र. ४१, दि.१६.१२.२००५ अन्वये विभागास कळविले आहे. मात्र अद्यापपावेतो अनुपालन अप्राप्त आहे.

विभागाने जा.क्र.मनपा/मामअ/१५८४/२००६, दिनांक १२.७.२००६ नुसार अनुपालन सादर केले असून ते असमाधानकारक आहे.

**परिच्छेद क्र.२५:- औरंगाबाद जिल्हा निवृत्त सेवा संघास भाड्याने दिलेल्या जागेबाबत.**

विषयांकित प्रकरणाची संचिका तपासली असता खालील प्रमाणे आक्षेपार्ह बाबी निदर्शनास आल्या आहेत.

औरंगाबाद जिल्हा निवृत्त सेवा संघास –

(१) बन्सीलालनगर येथील महानगरपालिकेच्या मालकीची ३० X ३० =९०० चौ.फू. जागा ही स्थायी समिती ठराव क्र. ३४३/२, दिनांक ०६.०१.१९९६ अन्वये रू.१००/- प्र.म. या दराने पाच वर्षासाठी भाड्याने देण्यात आल्याचे निदर्शनास येते. तद्नंतर संबंधितास जागा केव्हा भाड्याने देण्यात आली याबाबतचे आदेश व करारनामा संचिकेत नाही. मात्र ताबा दिनांक २०.५.१९९६ रोजी दिला असे संचिका प्र.क. (१२) वर नमूद करण्यात आलेले आहे.

(२) मागणी रजिस्टर मध्ये संबंधिताकडील किती रक्कम वसूल झाली याबाबत एकही नोंद घेण्यात आलेली नाही. संचिकेची तपासणी केली असता असे दिसून आले की, मार्च २००३ पर्यंत संस्थेकडून/ सेवासंघाकडून वसूल झालेली आहे.

(३) दिनांक २४.०७.२००३ रोजीच्या संस्थेच्या पत्रात असे नमूद करण्यात आले आहे की, दिनांक ०१.०८.२००३ पासून सदरची जागा रिकामी करीत आहे. मात्र सदरची जागा ही पाच वर्षाने भाड्याने दिली असल्याने दिनांक २०.०५.२००१ रोजीच रिकामी करणे आवश्यक होते. म्हणजेच संस्थेने जागा ताब्यात देण्यास विलंब केला आहे.

(४) दिनांक २०.०५.१९९६ ते दिनांक ३१.०७.२००३ पर्यंत संस्थेकडून रू.८६००/- वसूल होणे आवश्यक होते. मात्र संचिकेतील नोंदी वरून फ़क्त रू.६०००/- वसूल झाल्याचे दिसून येते. म्हणजेच रू.२६००/- ही रक्कम थकित असल्याचे दिसून येते.

(५) संस्थेकडून त्यांच्या दिनांक २४.०७.२००३ रोजीच्या पत्रानुसार जागा रिकामी करण्यात आली आहे काय ? याचा बोध होत नाही.

वरील मुद्यांबाबतचा खुलासा देण्याविषयी अर्धसमास पत्र क्र. ४३, दि.१७.१२.२००५ अन्वये विभागास कळविले आहे. मात्र अद्यापपावेतो अनुपालन अप्राप्त आहे.

विभागाने जा.क्र.मनपा/मामअ/१५८४/२००६, दिनांक १२.७.२००६ नुसार अनुपालन सादर केले असून ते असमाधानकारक आहे.

**परिच्छेद क्र.२६:- समर्थकृपा सहकारी गृहनिर्माण संस्थेच्या स.न.५९ सि.टी.एस.नंबर १५७२७ मधील मोकळी जागा समाज मंदीर बांधकामा करीता नाममात्र भाडे पट्टयाने दिले बाबत.**

महानगरपालिकेची गारखेडा येथील १५०५ चौ.मी. क्षेत्रफ़ळाची मोकळी जागा ही सन १९९८ मध्ये समर्थकृपा स.गृ.नि.संस्थेस ३० वर्षासाठी स्थायी समिती ठराव क्र.५०३/१२, दिनांक २०.३.९८ व सर्व साधारण सभेच्या ठराव क्र.१६०/०१, दिनांक १६.११.९६ नुसार रू.१०० प्रति वर्ष भाडेपट्टयाने देण्यात आली.

(१) संबंधिताकडून दिनांक ५.६.१९९८ रोजी करारनामा करून घेतल्याचे करारनामा छायांकित प्रतिवरून दिसते. मूळ करारनामा संचिकेत नाही.

(२) संबंधितास कोणत्या दिवशी जागेचा ताबा दिला याचा बोध झालेला नाही.

(३) स्थायी समिती ठराव व करारनामा अटी नुसार दर पाच वर्षांनी भाडेपट्टयाचे नुतनीकरण आवश्यक असतांना माहे जून २००३ पासून भाडे वाढ /करारनामा नुतनीकरण करण्यात आलेले नाही.

(४) संचिकेचे अवलोकन केले असता संचिकेतील टिपणीमध्ये भाडे वसूल करण्यात आल्याचा कुठेही उल्लेख नाही.

(५) मागणी रजिस्टरची तपासणी केली असता असे दिसून आले की, संबंधिताकडून कोणतीही भाडे वसूली करण्यात आल्याचे दिसून येत नाही.

वरील मुद्यांबाबतचा खुलासा देण्याविषयी अर्धसमास पत्र क्र. ४४, दि.१९.१२.२००५ अन्वये विभागास कळविले आहे. मात्र अद्यापपावेतो अनुपालन अप्राप्त आहे.

विभागाने जा.क्र.मनपा/मामअ/१५८४/२००६, दिनांक १२.७.२००६ नुसार अनुपालन सादर केले असून ते असमाधानकारक आहे.

**परिच्छेद क्र.२७:- लिजवर दिलेल्या जागेबाबत इतर अनियमितता :**

वर नमूद ११ ते २४ मधील आक्षेपार्ह मुद्यांशिवाय सन २००१-०२ या वर्षीच्या लेखापरीक्षण अहवाला मध्येही १२ ठिकाणच्या लीजवर देण्यात आलेल्या जागेबाबत आक्षेप

नोंदविण्यात आलेले आहेत. मात्र त्याचेही अनुपालन अद्यापपावेतो विभागाकडून प्राप्त झालेले नाही. लिजवर दिलेल्या जागेबाबतचा  तपशील हा खालील प्रमाणे आहे.

| अ.क्र. | संस्थेचे/ व्यक्तिचे नांव | जागेचे ठिकाण | अहवाल मुद्दा क्र. |
|---|---|---|---|
| १ | श्री.टिकाराम डोकराजी फुलवाडे | केळी बाजार | **३** |
| २ | श्रीमती बिस्मील्ला बी मो. उस्मान कुरैशी | सब्जी मंडी | **६** |
| ३ | त्रिवेणी को.ऑप.हॉ.सोसायटी | कटकट गेट | **७** |
| ४ | श्री.प्रेम सुराणा | टिळक रोड वरील नाला | **८** |
| ५ | श्री. कल्याणजी जीवभाई | --- | **१०** |
| ६ | अध्यक्ष, समर्थ महिला मंडळ | समर्थनगर | **१२** |
| ७ | श्री. करसन भावजी पटेल<br>श्री. लालदास पन्नालाल<br>श्री. हरविंदरसिंग रघुविरसिंग<br>श्री. देवेंद्रसिंग जग्गी<br>श्री. कल्याणजीभाई जीवाभाई | क्रांतीचौक (सॉ मिल) येथील मोकळी जागा | **१४** |
| ८ | श्री. जगन्नाथ अप्पा वाडकर | दशमेशनगर | **१५** |
| ९ | श्री. रामचरण टाक | जाफ़रगेट | **१६** |
| १० | औरंगाबाद फ़र्निचर मेकर्स को.ऑप.इंडस्ट्रीज सोसा. ली. | --- | **२०** |
| ११ | अध्यक्ष, शिशुविकास मंदीर महिला मंडळ | उस्मानपुरा | **२१** |
| १२ | औरंगाबाद जिल्हा आर्म रेसलिंग असो. | बसैय्ये नगर | **२२** |

विभागाने जा.क्र.मनपा/मामअ/१५८४/२००६, दिनांक १२.७.२००६ नुसार अनुपालन सादर केले असून ते असमाधानकारक आहे.

## गाळेभाडे वसूली

**परिच्छेद क्र.२८: विविध गाळेधारकांकडील भाड्याच्या थकित रकमेबाबत :-**

(I) महानगरपालिकेच्या मालकीच्या विविध १३ ठिकाणच्या गाळ्यांबाबतची संख्या ही मागणी नोंदवही आधारे एकूण ३०५ असल्याचे निदर्शनास आले आहे. त्यापैकी १७३ संचिका तपासणीस्तव उपलब्ध करून दिल्या असून १३२ संचिका तपासणीस्तव उपलब्ध झालेल्या नाहीत. उपलब्ध संचिकांच्या व मागणी रजिस्टरच्या तपासणीअंती मार्च २००५ अखेर रूपये १०१९२६७/- इतकी रक्कम भाड्यापोटी थकित असल्याचे निदर्शनास आले आहे. (सोबतच्या परिशिष्ट **१ व २** चे अवलोकन व्हावे.)

उर्वरित १३२ संचिका तपासणीस्तव उपलब्ध करून द्याव्यात तसेच थकित रक्कम रूपये १०१९२६७ बाबत खुलासा करावा असे अर्धसमास पत्र क्र.२०, दि.२८.११.२००५ अन्वये विभागास सूचित करण्यात आले असता अद्यापपावेतो अनुपालन अप्राप्त आहे .

वरील प्रमाणे थकित रक्कम वसूल करणेसाठी प्रशासनाने कडक कार्यवाही करणे आवश्यक ठरते.

(II) महापालिकेच्या मालकीच्या क्रांतीचौक व्यापारी संकुल, नाथसुपर मार्केट व अन्य ठिकाणी असलेल्या गाळ्यांबाबत मागणी रजिस्टर व संचिका यांची तपासणी केली असता खालील आक्षेपार्ह बाब निदर्शनास आली आहे.

मागणी रजिस्टरच्या आधारे या क्षेत्रा अंतर्गत असलेल्या १० मार्केट मधील एकूण २०६ गाळ्यापैकी ९८ गाळेधारकांच्या संचिका लेखा परीक्षणास्तव उपलब्ध करून देण्यात आल्या असून उर्वरित १०८ संचिका तपासणीस्तव उपलब्ध करून दिलेल्या नाहीत. संचिका उपलब्ध करून देण्यास्तव या विभागाकडील अर्धसमास पत्र क्र.४ ,दिनांक १५.१०.२००५ अन्वये मालमत्ता अधिकारी यांना सूचित केले आहे. मात्र अद्यापपावेतो अनुपालन अप्राप्त आहे.

वर नमूद २०६ गाळ्यापैकी ४७ गाळाधारकांनी ताबा घेतलेला नसून १६ गाळे हे अद्यापपावेतो रिक्त असल्याचे दिसून येते . उपलब्ध संचिका व मागणी नोंदवहीची तपासणी केली असता असे निदर्शनास आले की, मार्च २००५ अखेर एकूण ८१ गाळेधारकांकडे थकित रक्कम ही रूपये १६०५४६०/- इतकी आहे. (सोबतच्या परिशिष्ट **३ व ४** चे अवलोकन व्हावे.)

वरील प्रमाणे थकित रक्कम ही संबंधित गाळेधारकाकडून वसूल करणेसाठी प्रशासनाने कडक कार्यवाही करणे आवश्यक ठरते. शिवाय रिक्त असलेल्या /ताबा न दिलेले गाळे भाड्याने देण्याबाबत विभागाने तात्काळ कार्यवाही करावी जेणे करून महापालिकेचे उत्पन्न वाढण्यास मदत होईल.

**(III) मनपा हद्दीतील टपरी धारकांच्या परवानगी संचिका उपलब्ध करून देण्याबाबत.**

मालमत्ता विभागाचे सन २००२ ते २००५ पर्यंतचे आर्थिक वर्षाचे लेखापरिक्षणाचक काम हाती घेतले असून मालमत्ता वितरित केलेल्या टपरी धारकाचे संचिका उपलब्ध करून संबंधित टपरी धारकाकडून अद्याप पावेतो किती वसूली करण्यात आली व एकूण किती टपऱ्या आहेत याबाबतची सविस्तर माहिती व टपरीधारकांचे अभिलेखे त्वरीत लेखापरिक्षणासाठी उपलब्ध करून देण्यात यावे, असे अर्धसमास पत्र क्र.२५, दि.०६.१२.२००५ अन्वये विभागास सूचित करण्यात आले आहे, मात्र त्याबाबतचे अनुपालन अप्राप्त आहे.

विभागाने जा.क्र.मनपा/मामअ/१५८४/२००६, दिनांक १२.७.२००६ नुसार अनुपालन सादर केले आहे मात्र पडताळणीस्तव पावती पुस्तके व इतर अनुषंगिक अभिलेखे उपलब्ध करून देण्यात आलेले नाहीत. त्यामुळे अनुपालन पडताळणी करणे शक्य झालेले नाही. आवश्यक ते अभिलेखे पडताळणीस्तव उपलब्ध करून द्यावेत असे लेखा परीक्षण विभागाकडील जा.क्र.मनपा/मुलेप/२००६/३१२,दिनांक २५.७.२००६ अन्वये विभागास कळविण्यात आले आहे.

**<u>परिच्छेद क्र.२९:-थकित रकमेतून मागणीची रक्कम वगळून टाकणे बाबत:</u>**

सन २००३-०४ व सन २००४-०५ या वर्षातील मागणी रजिस्टर आधारे केलेल्या तपासणी अंतर्गत मार्च २००४ अखेर Closing Balance व सन २००४-०५ या वर्षातील सुरवातीची रक्कम (Opening Balance) यांची तपासणी केली असता असे निदर्शनास आले की, १० गाळेधारकाकडील मार्च २००४ रोजीची थकित रक्कम/ वसूली योग्य रक्कम रूपये ९२२२५ /- ही सन २००४-०५ या वर्षातील एकूण मागणी मध्ये समाविष्ट केलेली नाही. परिणामी रूपये ९२२२५/- इतक्या रकमेचे महापालिकेचे आर्थिक नुकसान झाल्याचे दिसून येते. (सोबतच्या परिशिष्ट **१ व २** चे अवलोकन व्हावे) वरील अनियमिततेबाबतचा खुलासा देण्याविषयी अर्धसमास पत्र क्र.२०, दि.२८.११.२००५ अन्वये विभागास सूचित करण्यात आलेले आहे. मात्र अद्यापपावेतो अनुपालन अप्राप्त आहे.

सदरच्या आर्थिक नुकसानीस जबाबदार असणाऱ्या अधिकारी/कर्मचारी यांच्यावर जबाबदारी निश्चित करून थकित रक्कम वसूल करणेसाठी प्रशासनाने कडक कार्यवाही करणे आवश्यक ठरते.

विभागाने जा.क्र.मनपा/मामअ/१५८४/२००६, दिनांक १२.७.२००६ नुसार अनुपालन सादर केले आहे मात्र पडताळणीस्तव पावती पुस्तके व इतर अनुषंगिक अभिलेखे उपलब्ध करून देण्यात आलेले नाहीत. त्यामुळे अनुपालन पडताळणी करणे शक्य झालेले नाही. आवश्यक ते अभिलेखे पडताळणीस्तव उपलब्ध करून द्यावेत असे लेखा परीक्षण विभागाकडील जा.क्र.मनपा/मुलेप/२००६/३१२,दिनांक २५.७.२००६ अन्वये विभागास कळविण्यात आले आहे.

<u>महानगरपालिका निवासस्थान - भाडे वसूलीतील अनियमितता:</u>

महापालिका कार्यक्षेत्रा अंतर्गत अधिकारी व कर्मचारी यांचेसाठी ठिकठिकाणी निवासस्थाने बांधण्यात आलेली आहेत. मालमत्ता विभागाचे लेखापरीक्षण कालावधीत ज्या अधिकारी/कर्मचारी यांना निवासस्थाने उपलब्ध करून देण्यात आलेली आहेत अशा सर्व निवासस्थानांचा तपशील उपलब्ध करून देण्याविषयी तसेच रिक्त निवासस्थानांबाबतचा तपशील, निवासस्थान ताब्यात दिल्याचा तपशील आणि वेतनातून कपात होणाऱ्या रकमेचा तपशील हा या विभागाकडील अर्धसमास पत्र क्र.३९, दिनांक १५.१२.२००५ अन्वये मागविण्यात आला आहे. अद्याप अशा अर्धसमास पत्राचे अनुपालन प्राप्त झालेले नाही. परंतु मालमत्ता विभागाकडून एकूण १८६ निवासस्थाने असल्याबाबतचा तपशिल उपलब्ध करून देण्यात आलेला आहे. शिवाय अशा १८६ निवासस्थानापैकी १२५ कर्मचारी हे अनधिकृत तर उर्वरीत कर्मचारी हे अधिकृतरित्या निवासस्थाना मध्ये रहात असल्याबाबतचाही तपशील उपलब्ध करून दिलेला आहे. सदर तपशीलाचे अवलोकन केले असता असे निदर्शनास आले की, निवासस्थानात वास्तव्य करणाऱ्या कर्मचाऱ्यांना निवासस्थान हे केव्हापासून ताब्यात देण्यात आले आणि त्यांच्या वेतनातून कोणत्या दराने व किती रक्कम वसूल होते याबाबतचा तपशील त्यामध्ये दिसून येत नाही किंवा विभागाकडून या अनुषंगाने कुठलेही अभिलेखे उपलब्ध झालेले नाहीत. विभागाकडून अनधिकृतपणे

राहणाऱ्या १२५ तर अधिकृतपणे राहणाऱ्या ५३ कर्मचाऱ्यांच्या यादीची तपासणी केली असता खालील प्रमाणे आक्षेपार्ह बाबी निदर्शनास आल्या आहेत.

**परिच्छेद क्र.३०:– अनधिकृपणे वास्तव्यास असलेल्या कर्मचाऱ्यांबाबत :**

महापालिकेच्या १८६ निवासस्थानांपैकी १२५ निवासस्थानामध्ये अनधिकृपणे कर्मचारी राहत आहेत. तथापि, सदर निवासस्थानामध्ये असे कर्मचारी हे नेमके कोणत्या दिनांकापासून राहत आहेत, त्यांच्या वेतनातून घरभाडे कपात होते किंवा कसे ? घरभाडे कपात होत असल्यास ती प्रचलित दरानुसार होते किंवा कसे ? इत्यादी बाबींची खातरजमा करण्यासाठी विभागाकडे कुठलीही माहिती नसल्याने काही कर्मचाऱ्यांची आस्थापना व लेखाविभागाकडील सेवाभिलेखे व वेतनपत्रके यांची तपासणी करण्यात आली असता एकूण २५ कर्मचाऱ्यांच्या वेतनातून प्रचलित दराने घरभाडे रक्कम ही वसूल करण्यात येत नसून उलट अशा कर्मचाऱ्यांना घरभाडे भत्ताही वेतनातून अदा करण्यात येत आहे असे निदर्शनास आलेले आहे. (सोबतच्या **परिशिष्ट ५** चे अवलोकन व्हावे. )

सदर परिशिष्टामध्ये समाविष्ट असलेल्या २५ कर्मचाऱ्यांपैकी नमुना दाखल १० कर्मचाऱ्यांबाबत वेतनपत्रकाआधारे व मालमत्ता विभागाकडून उपलब्ध तपशीलाआधारे

त्यांच्याकडील वसूलपात्र घरभाडे रक्कम व वसूलपात्र अनुज्ञप्ती शुल्क (Licence Fee) रक्कम निर्धारित करण्यात आली असून ती रू.४९८६३४/- एवढी आहे. वसूलपात्र अनुज्ञप्ती शुल्क तपशील हा खालील प्रमाणे आहे.

| अ.क्र. | कर्मचाऱ्याचे नांव पदनाम /विभाग | निवासस्थानाचे ठिकाण | मालमत्ता विभागाने प्रमाणित केलेला निवासाचा कालावधी | वसूलीचा कालावधी | वसूलपात्र रक्क्म. (रू.) |
|---|---|---|---|---|---|
| १ | श्रीमती कुसुमबाई दोडके , मजूर , **वॉर्ड अ** | बायजीपुरा | ३ वर्ष | १.४.०२ ते ३१.१२.०५ | ५३,३६८/- |
| २ | जयश्री पगारे, शिपाई वॉर्ड अ | दिल्लीगेट | ५ वर्ष | १.४.२००० ते ३१.१२.०५ | ८३९४३/- |
| ३ | श्री.अशोक बनकर, मजूर , वॉर्ड अ | बनेवाडी | विभागाकडून तपशिल उपलब्ध झालेला नाही. | १.४.२००५ ते ३१.१२.०५ | ८७७३/- |
| ४ | श्री.राजय्या कृष्णा स्वामी, मजूर पा.पु., | भडकलगेट | ३ वर्ष | १.४.२००२ ते ३१.१२.०५ | ३०१५८/- |

| | | | | | |
|---|---|---|---|---|---|
| ५ | श्री.मोहन बन्सी आहेरकर, लाईनमन, पा.पु. वॉर्ड अ | हर्सुल | ३ वर्ष | १.४.२००२ ते ३१.१२.०५ | ३८६८०/- |

| | | | | | |
|---|---|---|---|---|---|
| ६ | श्री.रामभाऊ जनार्धन पिवळ, मजूर ,वॉर्ड फ़ | बनेवाडी | ५ वर्ष | १.४.२००० ते ३१.१२.०५ | ४९५८५/- |
| ७ | श्रीमती देवगंगा शेळके , परिचारिका,आरोग्य विभाग | बायजीपुरा | २ वर्ष | १.४.२००३ ते ३१.१२.०५ | ५१४८८/- |
| ८ | श्री.पी.बी.चव्हाण, स्व.नि.वॉर्ड फ़ | रेल्वेस्टेशन | २ वर्ष | १.४.२००३ ते ३१.१२.०५ | ४८०३१/- |
| ९ | सुरेश माणिकराव कदम, सुरक्षा रक्षक | रेल्वेस्टेशन | ५ वर्ष | १.४.२००० ते ३१.१२.०५ | ९१२२८/- |
| १० | श्री. राजु साठे, वाहन चालक, यांत्रिकी विभाग | कोटला कॉलनी | ३ वर्ष | १.४.२००२ ते ३१.१२.०५ | ४३३८०/- |
| | | | | **एकूण** | **४९८६३४/-** |

वरील तपशीलानुसार नमूद कर्मचाऱ्यांकडील वसूलपात्र रक्कम ही नमुनादाखल दर्शविण्यात आलेली आहे. विभागाने परिशिष्ट ५ मध्ये नमूद केल्यानुसार उर्वरित १५ कर्मचाऱ्यांकडील वसूलपात्र रकमेचे निर्धारण (मालमत्ता विभागाने) करून ती रक्कम महापालिका फ़ंडात जमा करावी. तसेच वर नमूद १० कर्मचाऱ्यांकडून येणे असलेली रक्कम रू.४,९८,६३४/- ही सुध्दा तात्काळ वसूल करण्याची कार्यवाही करून रक्कम ही महापालिका फ़ंडात जमा होईल अशी व्यवस्था करावी. वरील प्रमाणे तपशिल हा उदाहरणादाखल दिलेला असून विभागाने सर्व प्रकरणाचा आढावा घेवून कर्मचाऱ्यांना निवासस्थान दिलेल्या तारखेपासून रकमेचे निर्धारण करून वसूलीची कार्यवाही करणे अगत्याचे आहे.

विभागाने जा.क्र.मनपा/मामअ/१५८४/२००६, दिनांक १२.७.२००६ नुसार अनुपालन सादर केले आहे मात्र पडताळणीस्तव पावती पुस्तके व इतर अनुषंगिक अभिलेखे उपलब्ध करून देण्यात आलेले नाहीत. त्यामुळे अनुपालन पडताळणी करणे शक्य झालेले नाही. आवश्यक ते अभिलेखे पडताळणीस्तव उपलब्ध करून द्यावेत असे लेखा परीक्षण विभागाकडील जा.क्र.मनपा/मुलेप/२००६/३१२,दिनांक २५.७.२००६ अन्वये विभागास कळविण्यात आले आहे.

**परिच्छेद क्र.३१:– प्रचलित दरानुसार अनुज्ञप्ती शुल्क (Licence Fee) वसूल न होणे बाबत.**

महानगरपालिका निवासस्थानात **अनधिकृतपणे** असलेल्या कर्मचाऱ्यांबाबत मालमत्ता विभागाकडून जो तपशील प्राप्त झालेला आहे, त्या आधारे लेखा विभागाकडील देयकांची तपासणी केली असता असे निदर्शनास आले आहे की, २५ कर्मचाऱ्यांकडून प्रचलित दराने प्रतिमाह घरभाडे रक्कम / अनुज्ञप्ती शुल्क वसूल करण्यात येत नाही. अशा कर्मचाऱ्यांचा तपशील व त्यांचेकडील वसूलपात्र रक्कम ही सोबतच्या **परिशिष्ट ६** मध्ये दर्शविण्यात आलेली आहे. सदर तपशीलानुसार एकूण वसूलपात्र रक्कम रू.२५६४७०/- निर्धारित करण्यात आली असून संबंधित कर्मचाऱ्यांकडून त्यांचे नावासमोर दर्शविलेल्या थकित रकमेची वसूली करण्याबाबत विभागाने वास्तव्य कालावधी व वसूलपात्र रकमेची खातरजमा करून तात्काळ कार्यवाही करणे आवश्यक ठरते. लेखापरीक्षण विभागाने निर्धारित केलेली रक्कम ही विभागाने प्रमाणित केलेल्या तपशीलाआधारे केली असून ज्या कर्मचाऱ्यांबाबत निवासस्थानातील वास्तव्याचा कालावधी हा निरंक दर्शविलेला आहे अशा कर्मचाऱ्यांकडील वसूल पात्र रकमेचे निर्धारण हे केवळ दि.०१.०४.२००५ ते दि.३१.१२.२००५ पर्यंत करण्यात आलेले आहे. मागील कालावधीबाबत विभागाने अभिलेख्यांची तपासणी करून खातरजमा करणे आणि तद्नंतरच वसूलीची कार्यवाही अनुसरणे आवश्यक ठरते.

वरील मुद्या क्र.२८ व २९ मध्ये समावेश असलेल्या ५० कर्मचाऱ्यांशिवाय उर्वरित ७८ कर्मचाऱ्यांकडील थकित रकमेचे निर्धारण हे मालमत्ता विभागाने करून वसूलीची कार्यवाही करणे आवश्यक ठरते. तसेच जानेवारी २००६ पासून शासननिर्णयानुसार घरभाडे रक्कम वसूलीची कार्यवाही करण्यात येईल या दृष्टीनेही प्रयत्न करणे अगत्याचे आहे.

प्रशासनाने यथोचित कार्यवाही करून अनुपालन सादर करावे असे सूचित करण्यात आलेले आहे. मात्र अद्यापपावेतो अनुपालन अप्राप्त आहे.

**परिच्छेद क्र.३२:– प्रचलित दरानुसार अनुज्ञप्ती शुल्क (Licence Fee) वसूल न होणे बाबत.**

महानगरपालिका निवासस्थानात **अधिकृतपणे** रहात असलेल्या कर्मचाऱ्यांबाबत मालमत्ता विभागाकडून जो तपशील प्राप्त झालेला आहे, त्याआधारे लेखा विभागाकडील देयकांची तपासणी केली असता असे निदर्शनास आले आहे की, १९ अधिकारी /कर्मचाऱ्यांकडून प्रचलित दराने प्रतिमहा अनुज्ञप्ती शुल्क वसूल करण्यात येत नाही. अशा कर्मचाऱ्यांचा तपशील व त्यांचेकडील वसूलपात्र रक्कम ही सोबतच्या **परिशिष्ट (७)** मध्ये दर्शविण्यात आलेली आहे. सदर तपशीलानुसार एकूण वसूलपात्र रक्कम ही ७८१६०/- इतकी येते. लेखापरीक्षण विभागाने निर्धारित केलेली

रक्कम ही मालमत्ता विभागाने प्रमाणित केलेल्या तपशीला आधारे केली असून सदरचे निर्धारण हे दिनांक ०१.०४.२००५ ते दिनांक ३१.१२.२००५ पर्यंत करण्यात आलेले आहे. मालमत्ता विभागाने वरील कर्मचाऱ्यांच्या निवासस्थानातील वास्तव्याचा कालावधी निश्चित करून वसूलपात्र रक्कम निर्धारित करावी व निर्धारित केलेल्या रकमेची (आक्षेपार्ह रकमेसह) वसूली करून ती महापालिका फ़ंडात जमा करावी तसेच जानेवारी २००६ पासून शासन निर्णयानुसार घरभाडे रक्कम वसूलीची कार्यवाही होईल अशीही व्यवस्था करावी.

प्रशासनाने यथोचित कार्यवाही करून अनुपालन सादर करावे असे सूचित करण्यात आलेले आहे. मात्र अद्यापपावेतो अनुपालन अप्राप्त आहे.

## वॉर्ड –ड

सन २००३-२००४ या वर्षातील अभिलेख्यांचे थकीत लेखा परीक्षण व सन २००४-२००५ या वर्षाच्या नियमित लेखापरीक्षणामध्ये जमा बाजूंच्या अभिलेख्यांची तपासणी हाती घेण्यात आली असून तपासणी कालावधीत खाली नमूद केलेनुसार पावती पुस्तकांची पडताळणी करण्यात आली. तपासणी करण्यात आलेल्या पावती पुस्तकांबाबतचा तपशिल हा खालील प्रमाणे आहे.

| | | | |
|---|---|---|---|
| १. | मालमत्ता कर वसूली पावती पुस्तके | = | २१६ |
| २. | पाणी पट्टी कर वसूली पावती पुस्तके | = | १८८ |
| ३. | जनरल पावती पुस्तके | = | ६५ |

उक्त पावती पुस्तकांद्वारे वसूल करण्यात आलेली रक्कम ही वेळोवेळी संबंधिताने कॅश रजिस्टर मध्ये घेवून महापालिका फ़ंडात जमा केले बाबत तपासणी करण्यात आली. तसेच संबंधित मालमत्ता धारकांकडील वसूल करावयाच्या कर नोंदी ह्या मागणी रजिस्टर प्रमाणे घेतलेल्या आहेत/नाहीत याबाबतची खातरजमा करण्याच्या दृष्टीने चाचणी लेखापरीक्षण ही करण्यात आले. चाचणी लेखा परीक्षणा अंतर्गत रमानगर, उस्मानपुरा, खोकडपुरा, बापुनगर, सब्जीमंडी व चेतनानगर येथील मालमत्ता मागणी रजिस्टर क्र.बी-३१ ते बी-३७ , बी-३९व बी-४० , बी-७० व बी-७१ तसेच ए-१,२,७,८,१०,११,१२,१४,१५,१७,२०,२१,२२,२४ असे एकूण २५ मागणी रजिस्टरची चाचणी स्वरूपात तपासणी करण्यात आली. तपासणी दरम्यान निदर्शनास आलेल्या आक्षेपार्ह बाबींचा तपशिल हा खालील प्रमाणे आहे.

**परिच्छेद क्र.१: वसूल केलेल्या रकमेचा कमी भरणा करणे बाबत. रू.५६४६/-:**

सन २००३-०४ या आर्थिक वर्षात मालमत्ता कर, पाणी पट्टी वसूली व इतर वसूली पुस्तकांची तपासणी ही संबंधित कॅश रजिस्टर आधारे करण्यात आली. तपासणीअंती खालील आक्षेपार्ह बाबी निदर्शनास आलेल्या आहेत.

* जनरल पावती पुस्तक क्र.५०० पा.क्र.४९९४५/ दिनांक २२.१२.२००३ द्वारे वसूल करण्यात आलेली रक्कम रू.६५०/- ही महापालिका फ़ंडात लेखा परीक्षण कालावधीपर्यंत भरणा केली नाही.
* पाणी पट्टी कर वसूली पुस्तक क्र.१०८६ पा.क्र. १०८५२१/ दि.२६.३.२००४ द्वारे वसूल रक्कम रू.८३३१/- पैकी महापालिका फ़ंडात रू.८३३/- भरणा केलेला आहे म्हणजेच रू.७४९८/- इतक्या रकमेचा कमी भरणा करण्यात आलेला आहे.
* पाणी पट्टी कर पा.पु.क्र.७१६ पा.क्र.०७१५९८ दिनांक २१.५.२००३अन्वये रू.१२००/- वसूल करण्यात आले आहेत मात्र सदर रकमेचा महापालिका फ़ंडात भरणा झाला नाही.
* मालमत्ता कर वसूली पुस्तक क्र. ४५९/४५८०९, दिनांक १६.६.२००३अन्वये रू.४७९५/- वसूल करण्यात आले असून रू.४७५९/- भरणा केल्यामुळे रू.३६ कमी भरणा झालेला आहे.

✻ पाणी पट्टी कर वसूली पुस्तक क्र.१५४२/१५४१७६ दि.१९.३.२००५ अन्वये रू.४२००/- वसूल करण्यात आले मात्र रू.४००० /-महापालिका फंडात भरणा केल्यामुळे रू.२००/- कमी भरणा झालेला आहे.

वरिल प्रमाणे रू.९५८४/- इतक्या रकमेपैकी संबंधिताकडून जनरल पावती क्र.१४३७/१४३६९४ दि.१६.११.२००५ अन्वये रू.३९३८ इतक्या रकमेचा भरणा आक्षेपाअंती केला आहे. त्यामुळे रू.५६४६/-अद्यापपावेतो वसूल झालेले नाहीत.

वरील प्रमाणे आक्षेपित रक्कम रू.५६४६/- ही तात्काळ महापालिका फंडात जमा करावी. तसेच संबंधितावर जबाबदारी निश्चित करून अनुपालन लेखापरीक्षणास सादर करावे असे विभागास सूचित करण्यात आलेले आहे. विभागाने दिनांक १५.७.२००६ रोजी सादर केलेले अनुपालन हे परिच्छेदनिहाय नसून आक्षेपानुसार संबंधितावर शिस्तभंगाची कार्यवाहीअंती अभिलेख्यांसह अनुपालन सादर करावे असे पुनश्च सूचित करण्यात आलेले आहे.

**परिच्छेद क्र.२: कॅश रजिस्टरच्या बेरजेतील चूकीमुळे कमी रकमेचा भरणा झाल्याबाबत . रू.२३००/-:**

सन २००४-०५ या आर्थिक वर्षातील जमा रकमेच्या नोंदी बाबत कॅश रजिस्टरची तपासणी केली असता खालील प्रमाणे रकमेचा कमी भरणा झाल्याचे दिसून आले आहे.

| कॅश रजि.क्र. | दिनांक | प्रत्यक्षात वसूलीची रक्कम | दर्शविलेली / भरणा केलेली रक्कम | फ़रक रक्कम रू. | शेरा |
|---|---|---|---|---|---|
| ७ | ९.३.२००५ | २,६६,०८८/- | २,६४,१८८/- | १९००/- | |
| ८ | १९.३.२००५ | १,२०,५९५/- | १,२०,४९५/- | १००/- | |
| ८ | २९.३.२००५ | १,६८,५३७/- | १,६८,२३७/- | ३००/- | |
| | | | एकूण | २३००/- | |

सदरची रक्कम रू.२३००/- ही संबंधिताकडून तात्काळ वसूल करून महापालिका . फंडात जमा करावी. तसेच संबंधितावर आवश्यक ती कार्यवाही करून अनुपालन सादर करावे असे विभागास सूचित करण्यात आलेले आहे.

विभागाने दिनांक १५.७.२००६ रोजी सादर केलेले अनुपालन हे आक्षेपानुसार नाही.

**परिच्छेद क्र.३: दैनंदिन वसूल रक्कम मनपा फ़ंडात जमा झाल्याबाबत पोच नसणे: रू.२८,८५,२००.००/-**

सन २००३-०४ व सन २००४-०५ या आर्थिक वर्षातील मालमत्ता कर, पाणीपट्टी व जनरल वसूली पोटीची रक्कम ही वेळोवेळी महापालिका फ़ंडात भरणा झाल्याबाबत संबंधित रोखपालाची रक्कम मिळाल्याबाबत नोंदवहीत स्वाक्षरी नसल्याचे तपासणी अंती निदर्शनास आले आहे. त्याबाबतचा तपशिल खालील प्रमाणे देण्यात येत आहे.

| अ.क्र. | दिनांक | रक्कम रूपये | कॅश रजि.क्र. | शेरा |
|---|---|---|---|---|
| | **२००३–२००४** | | | |
| १ | ६.६.२००३ | ५६,७७६.०० | २ | |
| २ | २.१.२००४ | २,२५,०३७.०० | ६ | |
| | **२००४–२००५** | | | |
| ३ | १७.५.२००४ | १,१२,९००.०० | १ | |
| ४ | ३०.६.२००४ | १,०५,१७४.०० | २ | |
| ५ | ५.११.२००४ | १,६८,२८७.०० | ४ | |
| ६ | १९.११.२००४ | १,५३,०७२.०० | ४ | |
| ७ | ३१.१२.२००४ | २,०१,२०५.०० | ५ | |
| ८ | १५.१.२००५ | २,५४,५९९.०० | ५ | |
| ९ | ३.२.२००५ | ३,७१,९६७.०० | ६ | |
| १० | ३.३.२००५ | ५,१०,४२३.०० | ७ | |
| ११ | ८.३.२००५ | १,५९,९९१.०० | ७ | |
| १२ | २८.३.२००५ | ५,६५,७६९.०० | ८ | |
| | **एकूण** | **२८,८५,२००.००** | | |

वरील प्रमाणे वसूल रक्कम ही रोखपाल यांना प्राप्त झाल्याची पोच /स्वाक्षरी कॅश रजिस्टरवर घेतल्याचे निदर्शनास येत नाही. तसेच वरील रक्कम ही वेळोवेळी महापालिका फ़ंडात जमा झाल्याबाबतचे चालान तपासणीस्तव उपलब्ध करून देण्यात आलेले नाहीत. त्यामुळे सदरची रक्कम वसूल झाली किंवा कसे याचा बोध झालेला नाही.

वरील बाबत खातरजमा करावी तसेच भविष्यात अशा प्रकारची अनियमितता होणार नाही याबाबत खबरदारी घ्यावी. कार्यवाहीअंती अनुपालन सादर करावे असे विभागास सूचित करण्यात आलेले आहे.

विभागाने दिनांक १५.७.२००६ रोजी अनुपालन सादर केले असून त्यासोबत अनुषंगिक अभिलेखे हे पडताळणीस्तव सादर केलेले नाहीत.

**परिच्छेद क्र.४:–मालमत्ता कर व इतर कर वसूलीअंती रकमेचा उशिरा भरणा केल्याबाबत : रू.३,८७,६१६/–**

मालमत्ता कर , पाणीपट्टी व जनरल कर वसूल करून तो वेळीच महापालिका फ़ंडात भरणा न करता ५ ते ३५ दिवस उशिरा भरणा केल्याचे तपासणीअंती दिसून आले आहे. उशिरा भरणा केलेल्या रकमांबाबतचा सविस्तर तपशिल हा खालील प्रमाणे आहे.

| अ.क्र. | पावती पुस्तक क्र. पावती क्र. | वसूलीचा दिनांक | भरणा दिनांक | उशिरा भरणा दिवस | रक्कम रूपये | शेरा |
|---|---|---|---|---|---|---|
| १ | ७१२/७११०१ | ४.४.२००३ | १९.४.०३ | १६ | ४२००/- | |
| २ | ७१२/७११०२ | ८.४.२००३ | १९.४.०३ | १२ | ४२००/- | |
| ३ | ७१२/७११०३ | ९.४.२००३ | १९.४.०३ | ११ | ४२००/- | |
| ४ | ७१२/७११०४ | १२.६.०३ | १९.६.०३ | ०८ | ४२००/- | |
| ५ | ७१२/७११०६ | १९.६.०३ | १.७.०३ | १२ | ४२००/- | |
| ६ | ७१२/७११०७ | २४.६.०३ | १.७.०३ | ०८ | ४२००/- | |
| ७ | ७१२/७१४९४ ते ९८ | ८.५.०३ | २१.५.०३ | १४ | ८४५०/- | |
| ८ | ७१५/७१४९९ | १२.५.०३ | २१.५.०३ | १० | २४००/- | |
| ९ | ७४१/७४०९० ते ७४१०० | २६.६.०३ | ३.७.०३ | ०८ | २६,९११/- | |
| १० | ७४३/७४२०१ ते ०७४२२२ | ५.७.२००३ | १४.७.०३ | १० | ३८,८८२/- | |
| ११ | ७७६/७७५०१ ते ०७७५२१ | १४.८.०३ | २५.८.०३ | १२ | ४१,६४४/- | |
| १२ | ७७८/७७७०१ ते ०७७७१२ | २५.८.०३ | ३०.८.०३ | ०६ | २७,७२५/- | |
| १३ | ७८७/०७८६०४ | १८.९.०३ | २३.१०.०३ | २८ | २,०२५/- | |
| १४ | ७८७/०७८६०१ | १८.९.०३ | २३.१०.०३ | ३५ | १६१७०/- | |
| १५ | ७८७/०७८६०२ | १८.९.०३ | २३.१०.०३ | ३५ | १६१४८/- | |
| १६ | ७८७/७८६०३ | २२.९.०३ | २३.१०.०३ | ३१ | ५५७५/- | |
| १७ | ७८७/०७८६०५ | २६.९.०३ | २३.१०.०३ | २८ | २०२५/- | |
| १८ | ७८७/०७८६०६ | २६.९.०३ | २३.१०.०३ | २८ | २०२५/- | |
| १९ | ७८७/०७८६०७ | २६.९.०३ | २३.१०.०३ | २८ | २०२५/- | |
| २० | ७८७/७८६०८ | २६.९.०३ | २३.१०.०३ | २८ | २०२५/- | |
| २१ | ७८७/७८६०९ | २९.९.०३ | २३.१०.०३ | २५ | १२००/- | |
| २२ | ७८७/७८६१० | २९.९.०३ | २३.१०.०३ | २५ | ३४५०/- | |
| २३ | ७८७/७८६११ | ३.१०.०३ | २३.१०.०३ | २० | १५४२५/- | |
| २४ | ५५५/५५४०१ | १.१०.०३ | १४.१०.०३ | १३ | ३९३०४/- | |
| २५ | ४५१/४५०९० व ९१ | ७.५.२००३ | १७.५.०३ | १० | ३७९८/- | |
| २६ | ४५१/४५०९२ ते ४५१०० | १२.५.०३ | १७.५.०३ | ५ | २०३३४/- | |
| २७ | ८३२/८३१७२ | २२.१०.०३ | २७.१०.०३ | ६ | २३,२००/- | |

| | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|
| | ते ८१ | | | | | |

| | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|
| २८ | ८३२/८३१८२ ते ८३ | २३.१०.०३ | २७.१०.०३ | ५ | ७२००/- | |
| २९ | ८३२/८३१८४ | २३.१०.०३ | ३०.११.०३ | १२ | १२००/- | |
| ३० | ८३२/८३१८५ ते ८७ | २७.१०.०३ | ३.११.०३ | ०८ | ५६००/- | |
| ३१ | ८३१/८३०९७ ते ८३१०० | ३.११.०३ | १०.११.०३ | ०७ | ९०००/- | |
| ३२ | ८३७/८३६०१ ते ८३६१५ | २४.११.०३ | २९.११.०३ | ०६ | २९०७५/- | |
| ३३ | ९०७/९०६०१ | २८.११.०३ | ३.१२.०३ | ०६ | ९,६००/- | |
| | | | | **एकूण** | **३,८७,६१६/-** | |

वास्तविकत: वसूलीअंतीच्या रकमा ह्या विनाविलंब म्हणजेच जास्तीत जास्त २४ तासात महापालिका फ़ंडात भरणा करणे आवश्यक आहेत. तथापि असे या ठिकाणी झालेले नाही. त्यामुळे सदर गैरप्रकारास जबाबदार असणाऱ्या कर्मचाऱ्यांवर जबाबदारी निश्चित करून कार्यवाहीअंती अनुपालन सादर करावे.

विभागाने दिनांक १५.७.२००६ रोजी सादर केलेले अनुपालन हे असमाधानकारक आहे.

**परिच्छेद क्र.५: मालमत्ता मागणी रजिस्टर मध्ये वसूल रकमेच्या संशयास्पद नोंदी घेतल्याबाबत. रू.१६०००८/-**

वार्ड **ड** या कार्यालयाचे सन २००३-०४ व सन २००४-०५ या आर्थिक वर्षाचे लेखा परीक्षण करीत असतांना मालमत्ता मागणी रजिस्टर ची तपासणी केली असता खालील प्रमाणे आक्षेपार्ह बाबी निदर्शनास आल्या आहेत.

१. मागणी रजि.क्र.बी-७० पान –१८२, नुसार श्री.एच.एम.कल्याणी, दु.क्र.३ रविकिरण अपार्टमेंट,यांचेकडून सन १९९७-२००२ या कालावधीसाठी , पावती क्र.३६२/ ३६१८० दि.१७.३.२००३ अन्वये रू.९०३०/- वसूलीची नोंद घेवून कर भरणा केल्याचे दर्शविले आहे. सदर नोंद ही कॅश रजि. सोबत तपासणी केली असता दिसून आली नाही. म्हणजेच सदरची नोंद ही संशयास्पद आहे. मूळ नोंद ही श्री.भास्कर दि.रासणे यांचे नांवे असून सदर पावती द्वारे रू.१०४५३/- वसूल केल्याची नोंद कॅश रजिस्टर मध्ये आहे.

२. मागणी रजि.क्र.ए-२२ पान क्र.३२ नुसार श्रीमती ताराबाई किसन नागले, यांचेकडून सन १९८४-९८ पर्यंतची थकित रक्कम ही रू.३२३०५/- आहे. परंतु सदर नोंद रद्द करून ती मागणी रजि.क्र.ए-१८ पान क्र.१७५ वर घेतली आहे असे नोंदवून रजिस्टर क्र.ए-१८ वर नोंद घेतांना उक्त थकीत रक्कम दर्शविलेली नाही.

सन १९९८-२००१ या वर्षाचे मालमत्ता कर वसूली अंतर्गत पावती क्र.४१९/४१८३४ दिनांक ३१.३.२००० अन्वये रू.७९०८/- वसूल केल्याची नोंद घेतली आहे मात्र कॅश

रजि.ची तपासणी केली असता तशी नोंद आढळून आली नाही. म्हणजेच सदरची नोंद ही संशयास्पद आहे.

३. मागणी रजि.क्र.ए-२२ पान क्र.१४० वर श्रीमती सुमित्राबाई सुभाष शेळके, यांनी सन १९८८-९७ पासून रू.८८४०/- कर बाकी अशी नोंद आहे. परंतु सदर नोंद रद्द करून रजि.ए-१८ पान क्र.१३५ पहा असे दर्शवून सदर ठिकाणी उक्त थकीत रकमेची नोंद घेतली नाही.

४. मागणी रजिस्टर क्र.ए-१८ पान क्र.१५४ नुसार श्री.चव्हाण भिकाजी बंडूजी, घर क्र .५.२४.९०/पी यांचेकडून पावती क्र.५४९/५४८४९, दिनांक ३०.३.९८ द्वारे रू.५०००/- इतकी रक्कम वसूल केल्याची नोंद कॅश रजिस्टरवरून दिसून येते. मात्र मागणी रजिस्टरला नोंद घेतांना रू.१५०००/- भरणा केल्याचे दर्शविलेले आहे. म्हणजे रू.१०,०००/- ची जास्तीची नोंद घेतली आहे. म्हणजेच सदरची नोंद ही संशयास्पद आहे.

५. मागणी रजि.क्र. ए-१८, पान क्र.१७८ नुसार सन १९९५-९६,नुसार श्रीमती सय्यदा बेगम मो.जावेद, घर क्र.५.२५.८/२ खोकडपुरा यांचेकडून सन १९९५-९६ या कालावधीसाठी पावती क्र.६९/६८५५, दिनांक २८.६.९६ अन्वये रू.२०२२/- वसूल केल्याची नोंद आहे. परंतू संबंधित कॅश रजिस्टर वर नोंद दिसून येत नाही. म्हणजेच सदरची नोंद ही संशयास्पद आहे.

६. मागणी रजि.क्र.ए-१७ पान क्र.९६ नुसार नुसार श्री.बबनराव बाजीराव उगळे, घर क्र.५-२४-७१/पी यांचेकडील सन १९९६-९८ मधील थकीत कर रक्कम रू.१०,९६२/-ही पावती क्र.८८१ /८८८६४, दिनांक ३.६.९९ द्वारे भरणा केल्याची नोंद आहे. परंतु सदर नोंदींची कॅश रजि.प्रमाणे तपासणी केली असता, सदर क्रमांकाच्या पावतीवर श्री.भगवान जी.पुराणिक असे नांव आहे व रू.१४१६/- चा भरणा केल्याची नोंद आहे. म्हणजे सदरची नोंद ही संशयास्पद आहे.

७. मागणी रजि.क्र.ए-१२ पान-१७२, नुसार श्री. अब्दुल रहेमान अ.करीम, घर क्र.५-१९-३३ सब्जीमंडी यांचेकडील सन १९८९-९८ मधील थकीत कर रू.२०,४८७/- असल्याची नोंद आहे. पावती क्र.८६०/८५९८६ दिनांक ३१.३.१९९८ अन्वये रू.२५,४७७/- वसूल केल्याची नोंद घेतली आहे. सदर नोंद कॅश रजि.सोबत तपासली असता उक्त नोंद किंवा पुस्तक क्रमांक दिसून येत नाही. म्हणजे सदर नोंद संशयास्पद आहे.

८. मागणी रजि.क्र.ए-१२ पान क्र.१९२ ,नुसार पावती क्र.९८७ /९८६७९ दि.२८.३.९८ अन्वये श्री.सांडु शहा लाल शहा, घर क्र.५-१९-६१, यांचेकडून थकीत कर रू.११,२७८/- वसूल केल्याची नोंद आहे. सदर नोंद कॅश रजिस्टर सोबत तपासली असता उक्त नोंद किंवा पुस्तक क्र. दिसून येत नाही. म्हणजे सदर नोंद संशयास्पद आहे.

९. मागणी रजि.क्र.ए-८,पान क्र.–१६, नुसार श्रीमती शरीफ़ा बेगम/ एस.ए.कादर, घर क्र.५-१७-३३/३८० समतानगर यांचेकडून सन १९९३-९८ मधील थकीत कराची रक्कम रू.९८१०/- ही पावती क्र.८३४/८३३२८६ दिनांक निरंक अन्वये वसूल केल्याची नोंद आहे.. सदर नोंद कॅश रजिस्टर सोबत तपासली असता उक्त नोंद किंवा पुस्तक क्र. दिसून येत नाही. म्हणजेच सदरची नोंदही संशयास्पद आहे.

१०. मागणी रजि.क्र.ए-२२, पान क्र.७९,नुसार नुसार श्रीमती शमसूबी भ्र.उस्मान, घर ५-२४-३३ उस्मानपुरा, यांचेकडील सन १९८९-९६ मधील थकीत कराची रक्कम रू.३१७२/- ही पावती क्र. ६३०/१२९८३ , दिनांक १०.१२.१९९८ अन्वये वसूल केल्याची नोंद आहे. उक्त नोंद कॅश रजिस्टर सोबत तपासली असता अशी नोंद किंवा पुस्तक क्र. दिसून येत नाही. म्हणजेच सदरची नोंद ही संशयास्पद आहे.

११. १) मागणी रजि.क्र.ए-१० पान क्र .७२, नुसार नुसार श्री.दादामियॉ बाबामिर्या, घर क्र.५-२०-३५, सब्जीमंडी यांचेकडील सन १९९५-९८ मधील मालमत्ता कर रक्कम रू.६६४३/- ही पावती क्र.९५४/९५३५८ दिनांक निरंक अन्वये वसूलीची नोंद घेण्यात आली आहे.

२) मागणी रजि .क्र. ए-१०, पान क्र. ७६, नुसार श्री. उत्तमराव अन्नी होजी, घर क्र. ५-२०-३०, सब्जीमंडी , यांचेकडील सन १९८५-९२ मधील थकित कराची रक्कम रू .६६४३/- ही पावती क्र.९५४/९५३५८ दिनांक - अन्वये वसूलीची नोंद घेण्यात आली आहे. मात्र सदर दोन्ही मालमत्ता धारकांनी एकाच पावती अन्वये कर भरणा केल्याचे दर्शविले आहे. सदर बाब ही अत्यंत आक्षेपार्ह आहे.

१२. मागणी रजि.क्र. ए-१०, पान क्र. १२१ नुसार श्री.शेख महेमूद शे.करीम घर क्र.५-२०-७०/१ सब्जीमंडी यांचेकडील सन १९८७-९८ मधील थकीत कराची रक्कम रू.६१२५/- ही पावती क्र. ७८३/७८४८६ दिनांक निरंक अन्वये वसूल केल्याची नोंद घेतली आहे. सदर नोंद कॅश रजिस्टर .सोबत तपासली असता अशी नोंद किंवा पुस्तक क्र. दिसून येत नाही. म्हणजेच सदरची नोंद ही संशयास्पद आहे.

१३. मागणी रजि.क्र.डी-१२ पान क्र.४८ नुसार श्री.एस.पी.पाटील (सुभाष पाटील) एफ़-२, चेतनाानगर यांचेकडील सन १९८७-९८ मधील थकित कराची रक्कम रू.९७९३/- ही पावती क्र. ४६३/४६२७० दिनांक १८.२.९८ अन्वये वसूल केल्याची नोंद आहे. सदर नोंद कॅश रजि.सोबत तपासली असता दिसून येत नाही म्हणजेच सदरची नोंद ही संशयास्पद आहे.

वरील प्रमाणे मुद्या क्र.१ ते १३ हे तिव्र आक्षेपार्ह असून अशा मुद्यांबाबत खातरजमा करून संबंधितावर प्रशासकीय कार्यवाही करून अनुपालन सादर करावे. तसेच वरील प्रमाणे अभिलेख्यांची तपासणी ही चाचणी स्वरूपात करण्यात आली असून उर्वरित मागणी रजिस्टर

मधिल नोंदीची तपासणी ही विभागीय स्तरावर होणे आवश्यक असल्याने त्याप्रमाणे कार्यवाही करण्यात येऊन त्याबाबतचा अहवाल लेखापरीक्षणास सादर करावा असे विभागास सूचित करण्यात आलेले आहे. मात्र अद्यापावेतो अनुपालन अप्राप्त आहे.

**परिच्छेंद क्र.६: पाणीपट्टी मागणी रजिस्टर मध्ये वसूल रकमेच्या संशयास्पद नोंदी घेतल्याबाबत. रू.५८००/-**

१. पाणी पट्टी मागणी रजि.क्र.४०, पान क्र.२८ वर पावती पुस्तक क्र.१४३२ पा.क्र.१४३१७०,दि. २१.८.९८ नुसार श्री.भगवान देवराव सुर्यवंशी, घर क्र.५-२-२३, उस्मानपुरा यांचेकडून रू.१४००/- वसूलीची नोंद घेण्यात आलेली आहे. परंतु सदर नोंदीची कॅश रजि. प्रमाणे तपासली असता उक्त पावती ही श्री.ताराचंद जेठमल यांचे नांवे दिसून आली. म्हणजे सदरची नोंद ही संशयास्पद आहे.

२. मागणी रजि.क्र.४०, पान क्र.२७ नुसार पावती पुस्तक क्र.१७४३ पावती क्र.१७४२४८ दिनांक २६.४.१९९९ अन्वये श्री.ताराचंद जेठमल यांचेकडून रू.१७००/- वसूलीची नोंद घेण्यात आलेली आहे. सदर नोंद कॅश रजि.सोबत तपासली असता दिसून येत नाही. म्हणजे सदरची नोंद ही संशयास्पद आहे.

३. मागणी रजि.क्र.४०, पान क्र.३२, नुसार पावती क्र.४१/४०१०, दिनांक १७.८.९९ अन्वये श्री.विठ्ठलसिंग गोविंदसिंग परदेशी, घर क्र.५-२-२९, उस्मानपुरा नळ खाते क्र.६३२४ यांचेकडून रू.१७००/- वसूल केल्याची नोंद घेण्यात आली आहे. कॅश रजिस्टरची तपासणी केली असता ही पावती श्री.ओमप्रकाश तुळशीराम अग्रवाल यांचे नांवे आहे. म्हणजे सदर नोंद ही संशयास्पद आहे.

४. रजि.क्र.४०, पान-२६ नुसार पावती पुस्तक क्र.१०४ पा.क्र.१०३२६, दिनांक २९.१०.९९ अन्वये श्रीमती, इंद्रजितकौर, महेंद्रसिंग संधू, घर क्र.५-२-२१ उस्मानपुरा नळ खाते क्र.८८७२ यांचेकडून रू.१०००/- वसूल केल्याची नोंद आहे. परंतु कॅश रजिस्टरची तपासणी केली असता सदरची नोंद ही श्री.भगवान सुर्यवंशी यांचे नांवे दिसून येते. म्हणजेच सदरची नोंद ही संशयास्पद आहे.

वरील प्रमाणे आक्षेपीत एकूण रक्कम रू.५८००/- इतकी असून सदरचे मुद्दे हे तीव्र आक्षेपार्ह आहेत. विभागाने खातरजमा करून संबंधितावर प्रशासकीय कार्यवाही प्रस्तावित करावी व कार्यवाहीअंती अनुपालन सादर करावे असे विभागास सूचित करण्यात आलेले आहे. मात्र अद्यापपावेतो अनुपालन अप्राप्त आहे.

**परिच्छेद क्र.७: करनिर्धारण मुल्य रू.९८१६/- कमी करून रू.२३९८/- या करमूल्या आधारे कर वसूली करणे बाबत.**

वार्ड **ड** अंतर्गतच्या मागणी रजिस्टर क्रमांक ६९ पान नं १० वरील नोंद रद्द करून त्याच रजिस्टरवरील “पान क्रमांक ८३ वर पहा” अशी नोंद घेवून प्रस्तुतचे ठिकाणी १.४.८९ पासूनच्या नोंदी ऐवजी १.४.९१ पासून रू.२३९८/- या करनिर्धारण मुल्यावर आधारीत मालमत्ता कर वसूली करण्यात आली आहे.

सदरची मालमत्ता श्रेयनगर या वसाहतीत मंथन सहकारी गृहनिर्माण संस्थे अंतर्गत (भुखंड क्रमांक अ-२) श्री.बी.एस.डोडले यांच्या मालकीची असून त्यांना यापूर्वी १.४.८९

पासून ९८१६/- या करनिर्धारण मुल्यावर मालमत्ता कर आकारण्यांत आला होता. तद् अनुषंगाने १.४.८९ ते ३१.३.९१ पर्यंतच्या दोन वर्षाच्या मालमत्ता कर माफ़ केला किंवा कसे याचा बोध होत नाही. कार्यालयीन आदेश क्रमांक मनपा/क.आ.२/५६९/०३, दिनांक २१.६.२००३ नुसार दि.१.४.९१ पासून सुधारीत आदेश कर आकारणी विभागा मार्फ़त निर्गमित झालेला आहे. परिणामी दि.१.४.१९८९ ते ३१.३.१९९१ या दोन वर्षाची मालमत्ता कराची रक्कम प्रतिवर्ष रू.३८२७/- प्रमाणे रू.७६५४/- वसूल झालेले नाही.

सदरची रक्कम वसूल करून महापालिका फ़ंडात जमा करावी व अनुपालन अहवाल सादर करावा असे विभागास सूचित करण्यात आलेले आहे. विभागाने दिनांक १५.७.२००६ रोजी सादर केलेले अनुपालन हे असमाधानकारक असल्याने ते अमान्य करण्यात आलेले आहे.

**परिच्छेद क्र.८: विविध मालमत्ता धारकांकडील मार्च २००५ अखेर थकित रकमेबाबत. रू.७३७७४२८/-:**

विभागाकडील थकित मालमत्ता कर व पाणीपट्टी प्रित्यर्थ रकमेबाबत आढावा घेण्यात आला असता विभागाअंतर्गत एकूण १६९१९ इतके मालमत्ता धारक असून त्यांचेकडे मार्च -२००५ अखेर रू.११.८२ कोटी इतकी रक्कम येणे असल्याचे दिसून आले. सदरच्या रकमेमध्ये थकित मागणी रू.८.०५ कोटी व चालु मागणी रू.३.७७ कोटी समाविष्ट आहे. त्यानुषंगाने अर्धसमास पत्र क्र.१३ दि.२७.१.२००६ अन्वये रू.२५०००/- व त्यावरील थकित कराची रक्कम असलेल्या मालमत्ताधारक व पाणीपट्टी धारकांचा तपशिल देण्याबाबत विभागास सूचित केले असता विभागाकडील दि.१.२.२००६ रोजीच्या पत्रासोबत २७९ मालमत्ता धारकांची यादी प्राप्त झाली असून नमुना दाखल रू.५०,०००/- व त्यावरील थकित रक्कम असलेल्या ९२ मालमत्ता धारकांचा तपशिल यासोबत देण्यात आला असून त्याची एकत्रित रक्कम ही रू.७३,७७,४२८/- इतकी आहे. सोबतच्या **परिशिष्ट अ** चे अवलोकन व्हावे.

वरिल प्रमाणे थकित रक्कम ही मोठ्या प्रमाणावर असल्याने अशी रक्कम वसूल करण्यासाठी विभागाने/ प्रभागाने कडक अंमलबजावणी करावी असे लेखा परीक्षणाचे मत आहे. त्यानुषंगाने कार्यवाही करून अनुपालन सादर करावे असे विभागास सूचित करण्यात आलेले आहे.

विभागाने दिनांक १५.७.२००६ रोजी अनुपालन सादर केले असून थकित रकमेबाबत सद्यस्थितीसह अंतिम अनुपालन सादर करण्याची सूचना पुनश्च देण्यात आलेली आहे.

**परिच्छेद क्र.९: सेवा निवृत्ती प्रकरणांच्या पडताळणीबाबत:**

विभागाअंतर्गत सन २००४-०५ या आर्थिक वर्षात सेवा निवृत्त झालेल्या कर्मचाऱ्यांच्या सेवानिवृत्ती प्रकरणांच्या पडताळणीअंती विभागाकडील ३ प्रकरणे उपलब्ध करून देण्यात आली असून त्यामध्ये खालील आक्षेपार्ह बाब निदर्शनास आली आहे. श्री. केसरबाई किसन उमप (मजूर) यांनी स्वेच्छा सेवानिवृत्त होण्यासाठी दि .०८.०१.२००४ रोजी विनंती अर्ज

सादर केला आहे. सदर अर्जाआधारे श्रीमती उमप यांना आदेश जा.क्र. मनपा / आस्था-२ / ११८५ / २००४, दि.१७.०६.२००४ अन्वये दि.३०.०६.२००४ पासून स्वेच्छा सेवानिवृत्त करण्यात आलेले आहे. ही बाब आक्षेपार्ह आहे. म.ना.से. (निवृत्ती वेतन) नियम १९८२ मधील नियम ६६(२) नुसार संबंधिताच्या विनंती अर्जाच्या दिनांकापासून तीन महिन्यात स्वेच्छा सेवानिवृत्ती देणे आवश्यक असून त्यानुसार श्री.उमप यांना दि. ०७ . ०४ . २००४ रोजी मध्यान्हानंतर स्वेच्छा सेवानिवृत्त करणे आवश्यक होते. तथापि, त्यानुसार कार्यवाही झाल्याचे दिसून येत नाही. सदर अनियमिततेबाबत विभागाने समर्थनीय खुलासा करावा व भविष्यात नियमानुसारच स्वेच्छा सेवानिवृत्तीची प्रकरणे अंतिम होण्याबाबत/ करण्याबाबत विभागाने दक्षता घ्यावी असे सूचित करण्यात आलेले आहे.

विभागाने दिनांक १५.७.२००६ रोजी सादर केलेले अनुपालन हे असमाधानकारक आहे.

**परिच्छेद क्र.१०:- अर्जित रजा रोखीकरणा प्रित्यर्थ कमी रकमेचे प्रदान करणे: रू.३७९**

विभागाअंतर्गत सन २००४-०५ या आर्थिक वर्षात सेवानिवृत्त झालेल्या कर्मचाऱ्यांच्या अर्जित रजा रोखीकरण प्रकरणांची तपासणी ही सेवापट, अंतिम वेतन प्रमाणपत्र व लेखा विभागाकडील प्रमाणक यांचेसोबत करण्यात आली असता त्यामध्ये खालील आक्षेपार्ह बाबी निदर्शनास आल्या आहेत.

१. श्रीमती म्हाळसाबाई सांडू नावकर (मजूर) ह्या दि.३१.१०.२००४ रोजी स्वेच्छा सेवानिवृत्त झाल्या असून त्यांना त्यांचे खाती शिल्लक ९७ दिवस अर्जित रजेच्या रोखीकरणा प्रित्यर्थ रू.१८,८९५/- ही रक्कम प्रमाणक क्र.९२७२ दि.२४.१२.२००४ अन्वये प्रदान करण्यात आली आहे. सेवापटाचे अवलोकन केले असता असे दिसून आले की, संबंधिताचे शेवटचे वेतन हे रू.३५८०/- इतके असून रजा रोखीकरण प्रयोजनार्थ शेवटचे वेतन हे रू.३५१०/- इतके विचारात घेवून रकमेचे प्रदान करण्यात आलेले आहे. परिणामी संबंधितास रू.१९२७४/- ऐवजी रू.१८८९५/- अदा केल्यामुळे रू.३७९/- इतक्या रकमेचे कमी प्रदान झाल्याचे निदर्शनास येते.

२. संबंधिताच्या रजा रोखीकरणाची नोंद ही सेवापटात घेतली नसल्याचेही दिसून आले. सदर प्रकरणी विभागाने पुनश्च तपासणी करून खातरजमा करावी व कार्यवाहीअंती अनुपालन सादर करावे असे सूचित करण्यात आलेले आहे.

आक्षेपित कमी प्रदान रकमेबाबतचे अनुपालन सादर करण्यात आलेले नाही.

**परिच्छेद क्र.११:- अर्जित रजा रोखीकरणा प्रित्यर्थ कमी रकमेचे प्रदान करणे: रू.१५१५**

विभागाअंतर्गत सन २००४-०५ या आर्थिक वर्षात सेवानिवृत्त झालेल्या कर्मचाऱ्यांच्या अर्जित रजा रोखीकरण प्रकरणांची तपासणी ही सेवापट, अंतिम वेतन प्रमाणपत्र व लेखा विभागाकडील प्रमाणक यांचेसोबत करण्यात आली असता त्यामध्ये खालील आक्षेपार्ह बाबी निदर्शनास आल्या आहेत.

१. श्रीमती रेऊबाई कचरू हिवाळे (मजूर) ह्या दि.३१.०७.२००४ रोजी स्वेच्छा सेवानिवृत्त झाल्या असून त्यांना त्यांचे खाती शिल्लक १३७ दिवस अर्जित रजेच्या रोखीकरणाप्रित्यर्थ रू.२५८३५/- ही रक्कम प्रमाणक क्र५८०१ दि.१५.१०.२००४ अन्वये प्रदान करण्यात आली आहे. सेवापटाचे अवलोकन केले असता असे दिसून आले की , संबंधिताचे शेवटचे वेतन हे रू.३७२०/- इतके असून रजा रोखीकरण प्रयोजनार्थ शेवटचे वेतन हे रू.३६५०/- इतके विचारात घेवून रकमेचे प्रदान करण्यात आलेले आहे. परिणामी, संबंधितास रू. २७३५०/- ऐवजी रू. २५८३५/- ही रक्कम अदा केल्यामुळे रू.१५१५/- इतक्या रकमेचे कमी प्रदान झाल्याचे निदर्शनास येते.

२. संबंधिताच्या रजा रोखीकरणाची नोंद ही सेवापटात घेतली नसल्याचेही दिसून येते . सदर प्रकरणी विभागाने पुनश्च तपासणी करून खातरजमा करावी व तसे अनुपालन सादर करावे असे सूचित करण्यात आलेले आहे.

आक्षेपित कमी प्रदान रकमेबाबतचे अनुपालन सादर करण्यात आलेले नाही.

**परिच्छेद क्र.१२: अर्जित रजा रोखीकरणा प्रित्यर्थ कमी रकमेचे प्रदान करणे: रू.९१८**

विभागाअंतर्गत सन २००४-०५ या आर्थिक वर्षात सेवानिवृत्त झालेल्या कर्मचाऱ्यांच्या अर्जित रजा रोखीकरण प्रकरणांची तपासणी ही सेवापट, अंतिम वेतन प्रमाणपत्र व लेखा विभागाकडील प्रमाणक यांचेसोबत करण्यात आली असता त्यामध्ये खालील आक्षेपार्ह बाबी निदर्शनास आल्या आहेत.

१. श्रीमती केसरबाई किसन उमप (मजूर) ह्या दि.३०.०६.२००४ रोजी स्वेच्छा सेवानिवृत्त झाल्या असून त्यांना त्यांचे खाती शिल्लक ६७ दिवस अर्जित रजेच्या रोखीकरणाप्रित्यर्थ रू. १२४५७/- ही रक्कम प्रमाणक क्र. ३८०६ दि. १३.०८.२००४ अन्वये प्रदान करण्यात आली आहे. सेवापटाचे अवलोकन केले असता असे दिसून आले की, संबंधिताचे शेवटचे वेतन हे रू. ३७२०/- इतके असून रजा रोखीकरण प्रयोजनार्थ शेवटचे वेतन रू.३५८०/- इतके विचारात घेवून रकमेचे प्रदान करण्यात आले आहे. परिणामी संबंधितास रू.१३३७५/- ऐवजी रू.१२४५७/- ही रक्कम अदा केल्यामुळे रू.९१८/- कमी प्रदान झालेले आहे.

२. संबंधिताच्या स्वेच्छा सेवानिवृत्तीची व रजा रोखीकरणाची नोंद ही सेवापटात घेण्यात आलेली आहे परंतू ती प्रमाणित केलेली नाही.

सदर प्रकरणी विभागाने पुनश्च तपासणी करून खातरजमा करावी व तसे अनुपालन सादर करावे असे सूचित करण्यात आलेले आहे.

आक्षेपित कमी प्रदान रकमेबाबतचे अनुपालन सादर करण्यात आलेले नाही.

वरील तिन्ही प्रकरणांची तपासणी ही नमुनादाखल करण्यात आली असून उर्वरित प्रकरणांची तपासणी ही विभागीय स्तरावर करावी व कार्यवाहीअंती तसे अनुपालन सादर करावे असे सूचित करण्यात येते.

## परिशिष्ट अ

### वॉर्ड ड मधील मार्च २००५ अखेर रू.५००००/– वरील मालमत्ता कर थकबाकीदारांची यादी.

| अ.क्र. | थकबाकी दाराचे नांव | घर क्रमांक | थकबाकी वर्ष | एकूण थकबाकी | पर्यंतची शिल्लक |
|---|---|---|---|---|---|
| १ | भिमराव पुंजाजी मिसाळ | ५-१७-३३/४२८ समतानगर | ८८-०५ | ६३४३८ | |
| २ | सोपान कान्होजी गवळे | ५-१७-३३/१३३ समतानगर | ९०-०५ | १६८५१५ | |
| ३ | मो.अकीलखॉ मो.खलील | ५-१७-३३/१८४ समतानगर | ९७-०५ | ५५३४८ | |
| ४ | नरेन्द्र लक्ष्मणदास कारडा | ४-१२-७२ नागेश्वरवाडी | ००-०५ | ६०७२२ | |
| ५ | अजीज अहमद अब्दुल कादर | ४-३-७४ मोतीकारंजा | ८७-०५ | ६२०९६ | |
| ६ | श्री.प्रभाकर श्रीरामपंत काथार | ४-६-९१ दिवाणदेवडी | ०३-०५ | ५४८३३ | |
| ७ | अध्यक्ष वक्फ़ बोर्ड | ४-६-९३ दिवाणदेवडी | ८१-०५ | ५३७१३ | |
| ८ | देवराव श्यामराव इंगळे | ५-२३-९४ दलालवाडी | ८२-०५ | ८८५३२ | |
| ९ | रामनाथ पंडीतराव कचकुरे | ५-६-७२/पी उस्मानपुरा | ८९-०५ | ५८९७२ | |
| १० | भिमराव नारायण देशपांडे | ५-६-७३/पी उस्मानपुरा | २००२-०५ | ५१०२८ | |
| ११ | विठ्ठलराव अप्पाराव कुलकर्णी (क्वार्टर्स) | ५.७.४ उस्मानपुरा | मार्च ०५ | ७१७३७ | |
| १२ | श्री.मन्नालाल हिरालाल अग्रवाल | ५-१४-६३ अदालत रोड | ८९-०५ | ५८०५६ | |
| १३ | प्रो.चुन्नीलाल आसाराम ॲडक (तळघर) | ५-१४-१० अदालत रोड | ९४-०५ | ८०८५२ | |
| १४ | श्रीमती मोहनाबाई श्रीनिवास सिकची | रेल्वेस्टेशन आनंद विलास हॉटेल | ८४-०५ | ९०९२७ | |
| १५ | डॉ.सतिष रामनारायण मुंदडा | प्रिन्ट ट्रॅव्हल चौक मुंदडा हॉस्पिटल | ०४-०५ | ५२९९२ | |
| १६ | डॉ.शिवकुमार जगन्नाथ लाहोटी | ९/ए बन्सीलालनगर | ०३-०५ | ५६११३ | |
| १७ | श्रीमती नूरजहॉ बेगम महमद आबेद | ५-५-२४ उस्मानपुरा | ८९-०५ | १०९११९ | |

| | | | | | |
|---|---|---|---|---|---|
| १८ | आशा सुरेश बोधनकर | एफ़-२<br>धनलक्ष्मी कॉम्पलेक्स, न्यू उस्मानपुरा | ०१-०५ | ५४७०१ | |

| अ.क्र. | थकबाकी दाराचे नांव | घर क्रमांक | थकबाकी वर्ष | एकूण थकबाकी | पर्यंतची शिल्लक |
|---|---|---|---|---|---|
| १९ | गुरूसिंग साहेब | ५-६-९२<br>उस्मानपुरा | ८८-०५ | १५२५८३ | |
| २० | बी.टी.तनवाणी | शॉप नं.३६<br>सिंधी कॉलनी | ८४-०५ | ५२५७४ | |
| २१ | गोपीचंद दयालानी | शॉप नं.३९<br>सिंधी कॉलनी | ८९-०५ | ३९०३१ | |
| २२ | टी.एच. | शॉप नं.५०/बी<br>सिंधी कॉलनी | ८९-०५ | ५३८०४ | |
| २३ | टी.एच | शॉप नं.५९<br>सिंधी कॉलनी | ९३-०५ | ७६०३४ | |
| २४ | चैनमल पन्नालाल लोहारी | ४१ ए-२<br>कुशलनगर | ०१-०५ | ८१८१० | |
| २५ | अजीज अहमद अब्दुल कादर | ४.३.७४<br>मोतीलालनगर | | ६२०९६ | |
| २६ | छबीलदास जमनादास नागर | ४-२-९२<br>सु.ह.रोड | ८५-०५ | ६५४६६ | |
| २७ | राजमल सुमेरमल सुराणा | ४-१-२३<br>भाजीबाजार | | १६९६९९ | |
| २८ | अ.कय्युम रहिम बक्ष | ३-८-१<br>धावणी मोहल्ला | ७४-०५ | ७१२३६ | |
| २९ | हैदर अली तय्यब अली | ३-८-१३ | ७४-०५ | ७८१३७ | |
| ३० | कुन्नुलाल भैय्यालाल सिध्द,<br>राधाबाई कुन्नुलाल ,<br>गंगालाल सिध्द, सदानंद सिध्द | ३-८२८/१<br>धावणी मोहल्ला | ९७-०५ | १०१५७४ | |
| ३१ | बाबुसिंग मोहनसिंग | ३-८-७५-७६<br>धावणी मोहल्ला | ८४-०५ | ६५२५५ | |
| ३२ | लक्ष्मणराव पांडुरंगराव भाले | ४-१०-२२-२३<br>औरंगपुरा | ८९-०५ | ५३९५४ | |
| ३३ | बाबुराव शंकरराव उबाले | ५-२०-९९<br>पैठणगेट | ९८-०५ | ५१३७३ | |
| ३४ | रूख्मणबाई कचरू साळवे | ५-२०-१००<br>पैठणगेट | ८२-०५ | ६१०६० | |
| ३५ | अध्यक्ष सरस्वती भुवन शिक्षण संस्था | ५-२१-१६/पी<br>एस.बी.कॉलनी | ९१-०५ | ७१५९४२ | |

| | | | | | |
|---|---|---|---|---|---|
| ३६ | अलेकाबाई कांतीलाल मुथीयान | ५-२२-३०<br>पैठणगेट | ८९-०५ | ९८२०६ | |

| अ.क्र. | थकबाकी दाराचे नांव | घर क्रमांक | थकबाकी वर्ष | एकूण थकबाकी | पर्यंतची शिल्लक |
|---|---|---|---|---|---|
| ३७ | श्रीमती लिलाबाई मुथीयान | ५-२२-३० पैठणगेट | ९६-०५ | ६९५७९ | |
| ३८ | जगन्नाथ लक्ष्मण मुरेकर | ५-२२-५०/१ पैठणगेट टिळकपथ | ९७-०५ | ६४२२९ | |
| ३९ | मुक्तार अहमद खान रज्जा मो. खॉन मुर्तुझा खान पिता उमरदराज खान | ५-२२-५७ पैठणगेट | ९१-०५ | ६७०६१ | |
| ४० | निरंजनसिंग सुंदरसिंग आनंद | ५-२२-५९ पैठणगेट | ८९-०५ | १०१३८७ | |
| ४१ | निरंजनसिंग सुंदरसिंग आनंद | ५-२२-५९ पैठणगेट | ९२-०५ | ८०१९० | |
| ४२ | श्री.गिरधर शिवराज बलदवा | ४-८-४४/पी दिवाणदेवडी | ८९-०५ | ८०४६० | |
| ४३ | श्री.ए.एम.समदानी | ४-८-४४/पी दिवाणदेवडी | ०४-०५ | १२१०६९ | |
| ४४ | द्वारकादास बबनलाल | ४-८-५३ दिवाणदेवडी | ०१-०५ | ८४७१४ | |
| ४५ | भालचंद्रराव नरहरराव जहागीरदार | ४-८-८१ टिळकपथ,औरंगपुरा | ७५-०५ | ३७२४१५ | |
| ४६ | दि.सांगली बँक | ४-८-८१/पी टिळकपथ | ८९-०५ | ११७९०८ | |
| ४७ | श्री.ग्यानसिंग प्यारासिंग | ४-९-६३ औरंगपुरा | ७५-०५ | ८३२४० | |
| ४८ | देवगिरी तरूण भारत (कामगार भवन) | मालजीपुरा,शक्तीनगर | ९४-०५ | ७६१९७ | |
| ४९ | श्री.अशोक जयनारायण | गाळा क्र.२१ ते २७ मालजीपुरा | ०२-०५ | १०५४०८ | |
| ५० | विजयकुमार जैन | ४-१-२ गोकुळ अपार्टमेंट | ०१-०५ | ९११०९ | |
| ५१ | अमेय डेव्हलपर्स | अमेय अपार्टमेंट | ०२-०५ | १३९९८६ | |
| ५२ | शे.रेहमान | ४-२-५९/पी मछलीखडक (खिंवसरा अपार्ट) | ८८-०५ | ७५८०८ | |
| ५३ | चंपालाल खिंवसरा | ४-२-५९/२ | ८९-०५ | ८२३६० | |

| | | | | | |
|---|---|---|---|---|---|
| | | अरिहंत मार्केट | | | |

| अ.क्र. | थकबाकी दाराचे नांव | घर क्रमांक | थकबाकी वर्ष | एकूण थकबाकी | पर्यंतची शिल्लक |
|---|---|---|---|---|---|
| ५४ | मे.जेथलिया कन्स्ट्रक्शन लि.,जेथलिया टॉवर | न्यु गुलमंडी | ९८-०५ | ८०५६४७ | |
| ५५ | शंकरलाल सांडुलाल | ४-५-५८ नवा मोंढा | ८९-०५ | ९६८३५ | |
| ५६ | बाबुराव तेली | ४-५-७९ जाधवमंडी | ७७-०५ | ५१२२० | |
| ५७ | बालाजी मंदीर | ४-५-८२ जाधवमंडी | ८३-०५ | ५५०९४ | |
| ६० | जदनानाथ जगन्नाथ पांडे | ४-११-३६ कुंभारवाडा | ८४-०५ | १४५४२८ | |
| ६१ | दिगंबर जगन्नाथ पांडे (दिनानाथ जगन्नाथ पांडे, युनियन बँक) | ४-११-३६/३७ कुंभारवाडा | ०५-०६ | ४७६६० | |
| ६२ | दिगंबर जगन्नाथ पांडे | ४-११-३/१ कुंभारवाडा | ८९-०५ | १९६२४६ | |
| ६३ | दिगंबर जगन्नाथ पांडे | ४-११-४७/पी कुंभारवाडा | ९७-०५ | ५६२१८ | |
| ६४ | डी.बलदवा | बी-१ महाराजा अपार्ट | ९३-०५ | ६३९५५ | |
| ६५ | मे.डब्ल्यू एल.हायटेक इलेक्ट्रीकल्स | न्यू समर्थ अपार्ट निराला बाजार | ९७-०५ | ३३५६२ | |
| ६६ | किशन गोविंद भुतडा | न्यु समर्थ नगर | ९३-०५ | ९१५२० | |
| ६७ | काशिनाथ रामजी मोरे-शिंदे | ५-१७-३३/३४ समतानगर | ८९-०५ | ५१३३२ | |
| ६८ | निरंजनलाल जैस्वाल | २६, शॉपिंग सेंटर समर्थनगर | ८९-०५ | ८१९७७ | |
| ६९ | रामचंद्र तुकाराम पंतदेव | १२७/६ समर्थनगर | ००-०५ | १२९८०७ | |
| ७० | शेषमल बी.देवडा | ५-९-१५/पी स्टेशनरोड हमालवाडी | ००-०५ | ३५०६१८ | |
| ७१ | माणिकचंद शेषमल देवडा | ५-९-१७ स्टेशनरोड (धर्मशाळा) | ८६-०५ | १०२३५० | |
| ७२ | सौ.सुमित्राबाई मोहनराव | सीटीसी १९१५९ | ९२-०५ | २२५७४८ | |

| | | | | | |
|---|---|---|---|---|---|
| | | स्टेशनरोड | | | |

| अ.क्र. | थकबाकी दाराचे नांव | घर क्रमांक | थकबाकी वर्ष | एकूण थकबाकी | पर्यंतची शिल्लक |
|---|---|---|---|---|---|
| ७३ | मनमोहन बन्सीलाल अग्रवाल | बन्सीलालनगर | ८८-०५ | ५४४६० | |
| ७४ | मनमोहन बन्सीलाल अग्रवाल | बन्सीलालनगर | ८९-०५ | ७१३६९ | |
| ७५ | कौशल्यादेवी सी.तापडीया | बन्सीलालनगर | ०२-०५ | ७०५९१४ | |
| ७६ | के.श्रीनिवास | बन्सीलालनगर | ९२-०५ | ८६९८० | |
| ७७ | सुधिर तुकाराम देशपांडे | सीटीसी १९३८१ बन्सीलालनगर | ००-०५ | २५४६१२ | |
| ७८ | सुधिर तुकाराम देशपांडे | बन्सीलालनगर | ९९-०५ | १३९२१६ | |
| ७९ | एकनाथ कोंडीराम तोनगिरे | ५-८-९०/९१ शिल्पनगर | ९४-०५ | ११९२११ | |
| ८० | डॉ.अलिल अहमद सिद्यीकी मो.आजम सिद्यीकी | ५-८-७७ जहागिरदार कॉ | ८९-०५ | ५००५७ | |
| ८१ | मंगलधाम फ़ायनान्स इन्व्हेस्टमेंट कंपनी प्रा.लि. | गुलमंडी | ०१-०५ | ६८९२५ | |
| ८२ | विजयसिंग शिवसिंग शेवगण | १२, समर्थनगर | ८९-०५ | ५३०९० | |
| ८३ | मंगलाबाई द्वारकाप्रसाद शर्मा | १०८, समर्थनगर | ८८-०५ | १९२००६ | |
| ८४ | तुकारामपंत हरिहरराव देव | १२७,समर्थनगर | ००-०५ | ८६७९२ | |
| ८५ | निरंजन जैस्वाल | २६,समर्थनगर | ८९-०५ | ८१९७७ | |
| ८६ | श्रीरामचंद्र तुकाराम पंतदेव | १२७/६ समर्थनगर | ००-०५ | १२९८०७ | |
| ८७ | संजय लक्ष्मण अप्पा | बी-८, समर्थनगर | ०१-०५ | ६६१५० | |
| ८८ | राजेंद्र मंगल चंदबोरा | शॉप नं.१,२ नगरखाना गल्ली | ०१-०५ | ८४३३९ | |
| ८९ | गणपत नारायण चव्हाण | ४-५-८१ जाधवमंडी | ०२-०५ | ८१०३८ | |
| ९० | लिलाबाई श्यामलालजी जैस्वाल | ४-४-८७/पी चौराहा | ८१-०५ | २७७२४१ | |
| ९१ | देवती बालाराम | ४-४-१२४/१२५ चौराहा | ८३-०५ | ५४३१२ | |
| ९२ | नगीनीदास पन्नालाल | ४-४-१२८ चौराहा | ८६-०५ | ५८००९ | |
| | | | एकूण | ७३,७७,४२८/- | |

## अग्निशमन विभाग

सन २००४-०५ या आर्थिक वर्षातील अग्निशमन विभागाकडील अभिलेख्यांची तपासणी करण्यात आली असून त्या अंतर्गत वसूलीबाबत पावती पुस्तके, कॅश रजिस्टर, चालान इ.तपासण्यात आले आहेत. तसेच विभागाने निर्गमित केलेल्या ना-हरकत प्रमाणपत्रांच्या १३७ संचिकांची तपासणी करण्यात आली आहे. शिवाय विभागास प्राप्त झालेले फ़ायर कॉलचे विवरण रजिस्टर त्याबाबत वसूलीची रक्कम, विविध प्रकारच्या थकबाकीच्या रकमा, आस्थापना विषयक बाबी तसेच अहवाल वर्षातील खर्चाच्या बाबी इत्यादीचीही तपासणी करण्यात आली असून तपासणीअंती खालील आक्षेपार्ह बाबी निदर्शनास आल्या आहेत.

**परिच्छेद १: वसूल रकमेचे /थकित रकमेचे डिमांड रजिस्टर न ठेवणे बाबत.**

विभागाअंतर्गत नोंद झालेल्या ना-हरकत प्रमाणपत्र धारकांकडून जी रक्कम अहवाल वर्षात वसूल झालेली आहे अथवा थकित आहे यासाठी स्वतंत्र डिमांड रजिस्टर ठेवण्यात आलेले नाही. त्यामुळे विभागाअंतर्गत नोंद झालेले ना-हरकत प्रमाणपत्र धारक किती आहेत आणि त्यांच्याकडे थकीत रक्कम किती आहे, याचा बोध झाला नाही. विभागाने यापूढे स्वतंत्र डिमांड रजिस्टर ठेऊन वसुलीबाबत अचूक कार्यवाही करावी शिवाय अहवाल वर्षआखेर त्यामध्ये अद्ययावत नोंदी घेऊन अनुपालन सादर करावे असे सूचित करण्यात आलेले आहे.

विभागाने दिनांक २९.६.२००६ रोजी सादर केलेले अनुपालन हे असमाधानकारक आहे.

**परिच्छेद २: फ़ायर कॉल प्रित्यर्थ वसूल न झालेल्या रकमेबाबत : रू.९१०२८/-**

अहवाल वर्षात फ़ायर कॉल प्रित्यर्थ विविध संस्था व्यक्ती यांना सेवा पुरविण्यात आलेली असून त्यापैकी **विवरणपत्र अ**-प्रमाणे २१ प्रकरणांअंतर्गत फ़ायर कॉल शुल्क रू.९१०२८/- ही अद्यापपावेतो वसूल झालेली नसल्याचे निदर्शनास आले आहे. विभागाने विवरणपत्रात नमूद केलेनुसार संबंधित व्यक्ति, संस्था, इत्यादी कडे पाठपुरावा करून रक्कम वसूलीबाबत कार्यवाही करावी व कार्यवाहीअंती अनुपालन सादर करावे असे सूचित करण्यात आलेले आहे.

विभागाने दिनांक २९.६.२००६ रोजी सादर केलेले अनुपालन हे असमाधानकारक आहे.

**परिच्छेद ३: एम.आय.डी.सी.वाळूज यांचेकडील थकित रकमेबाबत : रू.२८,००,०००.**

अग्निशमन केंद्र, वाळूज मार्फ़त एम.आय.डी.सी., वाळूज क्षेत्राअंतर्गत अग्निशमन सेवा पुरविण्यासाठी एम.आय.डी.सी. यांचेकडून प्रतिवर्ष रू.१२.०० लक्ष ही रक्कम सेवाशुल्क स्वरूपात महापालिकेस प्राप्त होत असते. विषयांकित संचिकेची तपासणी केली असता असे निदर्शनास आले आहे की, सन २००२-०३ ते सन २००४-०५ या तीन आर्थिक वर्षातील प्रतिवर्षाप्रमाणे (प्र.वर्ष

रू.१२ लाख याप्रमाणे) एकत्रित रक्कम रू.३६.०० लक्ष प्राप्त होणे आवश्यक आहे. मात्र त्यापैकी रू.८.०० लक्ष ही रक्कम धनादेश क्र.१७१९२६, दि.०२.०२.२००४ अन्वये प्राप्त झाली असून सन २००२-०३ या वर्षातील थकीत रक्कम रू.४.०० लाख सह मार्च २००५ अखेर एकुण रक्कम रू.२८.०० लक्ष एवढी थकित आहे. संचिकेचे अवलोकन केले असता असेही निदर्शनास आले आहे की, कार्यकारी अभियंता, म.औ.विकास महामंडळ,औरंगाबाद यांनी त्यांचेकडील पत्र जा.क्र.अके-४/११२७/ सन २००५, दिनांक १८.०३.२००५ अन्वये मुख्य अधिकारी यांना कळविले आहे की, सन २००२-२००३ या वर्षाकरीता रू.८.०० लक्ष मंजूर करण्यात आले असून उर्वरित रक्कम रू.४.०० लक्ष ही करारनामा कार्यान्वित केल्यानंतर अदा करण्याबाबत निर्णय झालेला आहे. मात्र कार्यालयामार्फ़त/ महापालिकेमार्फ़त अद्यापपावेतो करारनामा केलेला नाही. परिणामी, थकित रकमेची वसूली होऊ शकलेली नाही.

तेव्हा विभागाने सदर प्रकरण हे गांभिर्याने घेऊन आवश्यक ती पूर्तता /करारनामा करण्याच्या दृष्टीने कार्यवाही करावी आणि थकीत रक्कम रू.२८.०० लक्ष ही वसूल करून महापालिका फ़ंडात जमा करावी व कार्यवाही अंती तसे अनुपालन सादर करावे असे सूचित करण्यात आलेले आहे.

विभागाने दिनांक २९.६.२००६ रोजी सादर केलेले अनुपालन हे असमाधानकारक आहे.

**<u>परिच्छेद क्र.४:</u>** **अग्निशमन विभागाकडून निर्गमित होणाऱ्या ना–हरकत प्रमाणपत्राबाबत.**

विविध हॉटेल व्यावसायीकांना परवाने देण्याची कार्यवाही ही आरोग्य विभागामार्फ़त करण्यात येते. अग्निशमन विभागाकडील संबंधित अभिलेख्यांची पाहणी केली असता असे निदर्शनास आले आहे की, मा.आयुक्त यांचेकडील कार्यालयीन आदेश जा.क्र. मनपा/अशाद/४४४/२००१, दि.२७.४.२००१ अन्वये आरोग्य वैद्यकीय अधिकारी यांना सूचित करण्यात आले आहे की, आरोग्य विभागामार्फ़त हॉटेल व्यावसायिकांना जे परवाने वेळोवेळी देण्यात येतील त्यावेळी परवाने देण्यापूर्वी संबंधित व्यावसायिकाने अग्निशमन विभागाकडून ना-हरकत प्रमाणपत्र प्राप्त करून घ्यावे व तद्नंतरच आरोग्य विभागाने त्याआधारे परवाने निर्गमित करावेत. मात्र असे निदर्शनास आले आहे की, आरोग्य विभागाकडून परवाने देण्यापूर्वी अग्निशमन विभागाकडून बहुतांशी हॉटेल व्यावसायिक हे ना-हरकत घेत नाहीत, परिणामी महापालिकेचे उत्पन्न बुडते. अहवाल वर्षात आरोग्य विभागाामार्फत एकूण १४० हॉटेल व्यावसायिकांना परवाने देण्यात आल्याचे निदर्शनास आले आहे. तथापि त्यानुसार अग्निशमन विभागाकडून नाहरकत प्रमाणपत्र घेण्यात आले आहे किंवा कसे? या बाबत विभागाने खातरजमा करावी.

भविष्यात अग्निशमन विभागाने आरोग्य विभागाशी समन्वय साधून महापालिकेचे उत्पन्न वाढविण्यासाठी तात्काळ कार्यवाही करावी व अनुपालन सादर करावे असे सूचित करण्यात आले आहे.

विभागाने दिनांक २९.६.२००६ रोजी सादर केलेले अनुपालन पडताळण्यात आले असून पडताळणीअंती परिच्छेद वगळण्यात आला आहे.

**परिच्छेद क्र.५:अग्निशमन विभागा अंतर्गत निवासस्थान व्यवस्था: कर्मचाऱ्यांकडील घरभाडे वसूलीबाबत:**

अग्निशमन विभागा अंतर्गत कार्यरत अधिकारी/कर्मचारी यांचेसाठी पद्‌मपुरा,सिडको,वाळूज व चिकलठाणा अग्निशमन केंद्र येथे ४० निवासस्थाने उपलब्ध करून देण्यात आलेली आहेत. अशा निवासस्थानांमध्ये राहत असलेल्या कर्मचाऱ्यांची नांवे त्यांना दिलेले निवासस्थान, त्यांच्या वेतनातून होणारी घरभाडे कपात , निवासस्थान वाटपाबाबतचा दिनांक इ. तपशिल हा विभागाकडून लेखा परिक्षण कालावधीत मागविला असता विभागाद्वारे दि.२७.०३.२००६ रोजी प्राप्त झालेल्या तपशिलानुसार पद्‌मपुरा येथे १५ , सिडको येथे १४, वाळूज येथे ८ व चिकलठाणा येथे ३ कर्मचारी/अधिकारी हे महापालिकेच्या निवासस्थानांमध्ये राहत असल्याचे निदर्शनास येते. मात्र सदरचे कर्मचारी हे अशा निवासस्थानांमध्ये केव्हापासून राहत आहेत, त्यांचेकडून कोणत्या दराने आणि किती घरभाडे कपात होत आहे. इ.तपशिल उपलब्ध करून दिलेला नाही. तथापि माहे मार्च २००५ चे पगारपत्रक तपासले असता असे निदर्शनास आले आहे की, निवासस्थानांमध्ये राहत असलेल्या अधिकारी/कर्मचारी यांना घरभाडे भत्ता देण्यात येत नाही मात्र अशा कर्मचाऱ्यांकडून प्रचलित दरानुसार प्रतिमहा घरभाडेही वसूल केले जात नाही. घरभाडे वसूल न करण्याबाबत शासन निर्णय अथवा महापालिका धोरण व त्यानुषंगाने पारित केलेल्या आदेशाची प्रत उपलब्ध करून दिलेली नाही. त्यामुळे घरभाडे वसूली बाबतची पडताळणी करणे शक्य झालेले नाही.

तेव्हा विभागाने आवश्यक ती कागदपत्रे, संचिका, आदेश इ.पडताळणीस्तव सादर करावेत असे सूचित करण्यात आले आहे.

विभागाने दिनांक २९.६.२००६ रोजी सादर केलेले अनुपालन हे असमाधानकारक आहे.

**परिच्छेद क्र.६: विहीत नोंदवह्या न ठेवणे बाबत.**

विभागाअंतर्गत दैनंदिन कामकाजाचा भाग म्हणून विहीत नोंदवह्या जसे, बील रजिस्टर, डेड स्टॉक रजिस्टर, ठेवण्यात आलेले नसल्याचे दिसून आले त्यामुळे विभागाकडील खर्चाबाबत तसेच संग्रह पडताळणीबाबत खातरजमा करणे शक्य झालेले नाही. विभागाने वरीलप्रमाणे विहीत नोंदवह्या ठेवून त्या अद्ययावत कराव्यात व लेखापरीक्षणास्तव उपलब्ध करून द्याव्यात असे सूचित करण्यात आले आहे.

विभागाने दिनांक २९.६.२००६ रोजी अनुपालन सादर केले असून विहीत नोंदवह्या ठेवण्यात आल्याचे कळविले आहे. ठेवण्यात आलेले अभिलेखे हे अवलोकनार्थ दर्शविण्याबाबत विभागास पुनश्च कळविण्यात आले आहे.

## आस्थापना विभाग

अहवाल वर्षात आस्थापना–१ ,आस्थापना–२ ,शिक्षण विभाग आणि विविध वॉर्ड कार्यालये यांचे मार्फ़त लेखा परीक्षण विभागाकडे वेळोवेळी सादर करण्यात आलेले अधिकारी /कर्मचारी यांच्या वेतननिश्चितीची प्रकरणे पडताळण्यात आली आहेत. तपासणीदरम्यान ज्या काही त्रुटी किंवा चुका निदर्शनास आलेल्या आहेत त्याबाबत पुर्तता करणेस्तव त्या–त्या विभागाकडे प्रकरण पाठविण्यात येतात. तसेच लेखा विभागाकडून सेवानिवृत्तीवेतन, उपदान ,अंशराशिकरण इत्यादी संबंधितांना अदा करण्याच्या दृष्टीने पूर्वलेखापरीक्षणास्तव (Pre Audit) प्रकरणे सादर केली जातात. अशा सर्व प्रकरणांची पडताळणी करून सेवाविषयक लाभांचे प्रदान करण्याबाबत मान्यता देण्यात येते. त्याचप्रमाणे मा.आयुक्त यांचेकडून अभिप्रायास्तव पाठविण्यात आलेल्या संचिकांवरही अभिप्राय नोंदविण्यात आलेले आहेत.

अहवाल वर्षात वेतन निश्चितीची एकूण ४३९ प्रकरणे, सेवानिवृत्ती वेतनाची एकूण १४४ प्रकरणे आणि इतर ६४ प्रकरणे /संचिका पडताळण्यात आलेल्या आहेत.

अहवाल वर्षात लेखा परीक्षणाचे नियमित कामकाजा व्यतिरिक्त मा.सर्वसाधारण सभा, मा.महापौर, मा.स्थायी समिती, मा.सभापती स्थायी समिती आणि मा.आयुक्त,महानगरपालिका,औरंगाबाद यांनी वेळोवेळी दिलेल्या आदेशानुसार /सुचनेनुसार काही प्रकरणांमध्ये विशेष लेखापरीक्षणाचे कामकाज करण्यात आलेले असून त्याबाबतचे अहवाल हे वेळोवेळी सर्व संबंधित प्राधिकारी यांना सादर करण्यात आलेले आहेत. सदर कामकाज हे अहवाल वर्षातील कामकाजाबाबतचा एक भाग असल्याने तो यासोबत संलग्न करण्यात येत आहे. प्रकरणनिहाय तपासणीबाबतचा अहवाल हा पुढील प्रमाणे आहे.

## मा.महापौर यांच्या आदेशानुसार केलेल्या तपासणीबाबतचा अहवाल.

## <u>मालमत्ता विभाग</u>

**मालमत्ता विभागाकडील सन २००२–०३ ते सन २००४–०५ या आर्थिक वर्षातील अभिलेखे तपासणीबाबत**

मा.महापौर ,महानगरपालिका,औरंगाबाद यांचे पत्र जा.क्र. / मनपा / महापौर / २४९ / ०५ ,दिनांक २६.९.२००५ अन्वये मालमत्ता विभागाअंतर्गत मागील तीन वर्षातील अभिलेख्यांचे लेखापरीक्षण करून त्याबाबतचा अहवाल सादर करण्याबाबत आदेशित करण्यात आलेले आहे. त्यानुसार सन २००२-०३ ,सन २००३-०४ आणि सन २००४-०५ या आर्थिक वर्षातील अभिलेख्यांची तपासणी करण्यात आली असून त्याबाबतचा अंतरिम अहवाल हा जा.क्र./मनपा/मुलेप/१४८/२००५, दि.१८.१०.२००५ अन्वये सादर करण्यात आला असून अंतिम अहवाल हा जा.क्र./मनपा/मुलेप/३०/२००६, दि.१८.०१.२००६ अन्वये सादर करण्यात आलेला आहे. तथापि, मुंबई प्रांतिक महानगरपालिका अधिनियम १९४९ मधील कलम १०५(१) नुसार परिच्छेदनिहाय लेखापरीक्षण अहवाल हा मा.सभापती,स्थायी समिती महानगरपालिका,औरंगाबाद यांना कार्यालयीन पत्र क्र.जा.क्र. /मनपा/मुलेप /४३/ ०६ , दि.२५.०१.२००६ अन्वये सादर करण्यात आलेला आहे. त्यामुळे प्रकरणनिहाय अहवाल स्थिती ही वार्षिक लेखा परीक्षण अहवाल २००५-०६ मधील **भाग–एक** (मालमत्ता विभाग पृ.क्र.८० ते १२५ ) प्रमाणे अवलोकन व्हावे.

## मा.सर्वसाधारण सभेच्या आदेशानुसार केलेल्या तपासणीबाबतचा अहवाल.

## अग्निशमन विभाग

**अग्निशमन उप केंद्र, सिडको येथील वाहने धुण्याचा रॅम्प तोडल्यामुळे झालेल्या आर्थिक नुकसानी बाबत.**

संदर्भ:- मा.महापौर, महानगरपालिका,औरंगाबाद यांनी दिनांक २०.०१.२००६ रोजीच्या सर्वसाधारण सभेमध्ये दिलेल्या निर्देशानुसार.

अग्निशमन उपकेंद्र, सिडको येथील वाहने धुण्याचा रॅम्प तोडल्यामुळे झालेल्या आर्थिक नुकसानीबाबत चौकशी करण्याचे निर्देश हे मा.महापौर यांनी दि.२०.०१.२००६ रोजीच्या सर्वसाधारण सभेमध्ये दिलेले आहेत. सदर निर्देशानुसार विषयांकित प्रकरणांत तपासणी करण्यात आली असून त्याबाबतचा अहवाल हा खालीलप्रमाणे आहे.

१. अग्निशमन उपकेंद्र,सिडको येथील रॅम्प बांधकाम केव्हा करण्यात आले, त्याचे क्षेत्रफ़ळ काय आहे, त्यासाठी झालेला खर्च आणि बांधकामाचे प्रयोजन इ.बाबत खुलासा करणे तसेच बांधकाम संचिका व मोजमाप पुस्तिका सादर करणेविषयी शहर अभियंता, महानगरपालिका औरंगाबाद यांना या विभागाकडील जा.क्र. मनपा/मुलेप/३५/२००६, दिनांक २१.०१.२००६ अन्वये कळविण्यात आले. त्याचप्रमाणे मुख्य अग्निशमन अधिकारी यांनाही वरील बाबींचा खुलासा सादर करण्याविषयी जा.क्र./मनपा/मुलेप/३६/२००६, दिनांक २१.०१.२००६ अन्वये सूचित करण्यात आले. त्यानुसार शहर अभियंता यांचेकडील जा.क्र./मनपा/शअ/१०१०/२००६ दि.०६.०२.२००६ रोजीच्या पत्रानुसार फ़क्त विषयांकित बांधकामाची मोजमाप पुस्तिका क्र.१४१ ही तपासणीस्तव प्राप्त झाली. मात्र सदर पत्रासोबत बांधकामाची मूळ संचिका आणि मूळ अंदाजपत्रक तपशील उपलब्ध करून देण्यात आलेला नाही. मुख्य अग्निशमन अधिकारी यांनी त्यांचेकडील पत्र जा.क्र.मनपा/अशाद/११६/२००६, दि.०२.०२.२००६ नुसार अहवाल सादर केलेला आहे.

२. याशिवाय, या विभागाकडील गोपनीय पत्र जा.क्र. मनपा/मुलेप/५२/२००६, दि.०१.०२.२००६ अन्वये उप अभियंता (यांत्रिकी) , महानगरपालिका,औरंगाबाद यांना खालील मुद्यांबाबत अहवाल सादर करण्याविषयी सूचित करण्यात आले.

अ. रॅम्प आपल्या विभागामार्फ़त (यांत्रिकी) तोडण्यात आला आहे काय ?

ब. रॅम्प तोडण्यात आला असल्यास त्यासाठी कोणकोणत्या साधनांचा वापर करण्यात आला आहे?

क. अशा साधनांवर किती खर्च करण्यात आला आहे व रॅम्प तोडण्याचे काम हे किती दिवसात पूर्ण करण्यात आले आहे?

ड. रॅम्प कोणाच्या आदेशानुसार (तोंडी व लेखी) तोडण्यात आला आहे?

इ. ज्या साधनांचा वापर करण्यात आला आहे त्याबाबत लॉगबुक व इतर अभिलेख्यांमध्ये नोंदी घेतल्या आहेत काय ?

**त्यानुसार वरील मुद्यांबाबतचा अहवाल हा अति.शहर अभियंता यांनी त्यांचेकडील पत्र जा.क्र.मनपा/अशअ/५०/०६, दि.०२.०२.२००६ अन्वये सादर केला असून मुद्येनिहाय तपशिल हा खालील प्रमाणे नमूद करण्यात येत आहे.**

**अ.** रॅम्प यांत्रिकी विभागातर्फे तोडण्यात आलेला नाही.

ब. जेसीबी मशिन क्र.एम.एच.-२०-एफ़ ५७५८ द्वारे दि.१६.११.०५ व द.१७.११.०५ रोजी दुपार पाळीत रॅम्प तोडण्यात आला.

क. ज्या साधनांद्वारे रॅम्प तोडण्यात आला त्यावर इंधनासह एकत्रित खर्च रू.५६१७/- इतका झालेला आहे.

ड. सदरचा रॅम्प हा उप आयुक्त (महसूल), श्री.आनंदकर यांनी वाहन चालक श्री.गाडेकर यांना दिलेल्या तोंडी आदेशानुसार तोडण्यात आला आहे.

इ. ज्या साधनांचा वापर केलेला आहे त्याबाबत लॉग-बुक मध्ये नोंदी घेतलेल्या आहेत.

३. वरील परिच्छेद (१) नुसार शहर अभियंता यांनी सादर केलेल्या मोजमाप पुस्तिके आधारे (मोज पुस्तिकेत पृ.क्र.३२,३३,४६,४७,६० व ६३) तपासणी केली असता अग्निशमन उपकेंद्र, सिडको येथे व्हेईकल रॅम्प , होज रॅम्प व हौद इत्यादीचे बांधकाम हे सन १९९४-९५ या आर्थिक वर्षात झालेले असून त्यावर रू.९०२९९/- व निविदेनुसार १३% अधिक रक्कम रू.११७३९/- असा एकूण रू.१०२०३८/- इतका खर्च झाल्याचे दिसून येते. मात्र शहर अभियंता यांनी त्यांचेकडील पत्र जा.क्र./मनपा/शअ/२/२००६, दिनांक १३.०२.२००६ अन्वये सादर केलेल्या अहवालानुसार कामावर रू.९०,२९९/- इतका खर्च झाला असल्याचे कळविलेले आहे. सदर कामाची मूळ संचिका व इतर अनुषंगिक अभिलेखेही विभागाकडून मागणी करूनही उपलब्ध करून दिलेली नसल्यामुळे बांधकामाचे प्रयोजन, अंदाजपत्रकीय रक्कम, सक्षम मान्यता इत्यादीचा बोध झालेला नाही.

४. मुख्य अग्निशमन अधिकारी, महानगरपालिका औरंगाबाद यांनी दिनांक ०२.०२.२००६ रोजी सादर केलेल्या खुलाश्यासोबतच्या तपशीला आधारे असे दिसून आले की, दिनांक १५.०६.१९९४ ते दिनांक २८.०१.२००५ पर्यंतच्या कालावधीत अग्निशमन उपकेंद्र, सिडको येथे वाहनांची टेस्टींग, रिपेअरींग इत्यादी कामेही वेळोवेळी करण्यात आलेली आहेत. मात्र दि.१०.४.१९९७ नंतर म्हणजेच दि.२६.३.९८ ,दि.३०.६.९८, २०.९.०४, २२.१२.२००४ आणि २८.१.२००५ या दिवशीच वाहनांची टेस्टींग व अन्य कामे केल्याचे दिसून येते. दरम्यानच्या कालावधीत बांधकाम तोडल्या प्रकरणी खातरजमा करण्याच्या दृष्टीने उपअग्निशमन अधिकारी,सिडको यांनाही जा . क्र . मनपा / मुलेप / ७० /२००५, दिनांक

१४.२.२००६ अन्व्ये विचारणा केली असता त्यांनी दि.१६.२.२००६ रोजी खुलासा सादर केलेला असून त्यामध्ये रॅम्पची तसेच वॉटर टँकची आवश्यकता वाटत नसल्याचे नमूद केलेले आहे. शिवाय तसा अहवालही त्यांनी दि.२.८.२००५ रोजी उपआयुक्त(म), यांना परस्पर सादर केलेला आहे असे उपअग्निशमन अधिकारी यांनी दि.१६.२.२००६ रोजी मुख्य लेखा **प**रीक्षक यांना सादर केलेल्या अहवाला सोबतच्या पत्रावरून स्पष्ट होते. या उलट मुख्य अग्निशमन अधिकारी यांनी दि.२.२.२००६ रोजी सादर केलेल्या खुलाश्यामध्ये व्हेईकल रॅम्प , होज रॅम्प व वॉटर टँकची आवश्यकता अग्निशमन केंद्रात असल्याचे नमूद केलेले आहे आणि सर्वसाधारणपणे तशा मार्गदर्शक सूचनाही अग्निशमन सल्लागार,महाराष्ट्र शासन यांनी त्यांचेकडील पत्र दि. २९. ९.१९७८ अन्वये दिलेल्या आहेत असे दिसून येते. याशिवाय सिडको अग्निशमन केंद्रामध्ये पाण्याचा हौद नसल्यामुळे, पंप टेस्टींग करता येत नाही व गाड्याही धुता येत नाहीत आणि पर्यायाने सदरची कामे करण्यासाठी चिकलठाणा अग्निशमन केंद्रामध्ये जावे लागते. परिणामी त्यासाठी अनावश्यक वेळ व इंधन खर्च होत आहे असाही खुलासा मुख्य अग्निशमन अधिकारी यांनी केलेला आहे.

वरील तपशिलावरून असे स्पष्ट होते की, शाखा प्रमुख या नात्याने मुख्य अग्निशमन अधिकारी यांनी सादर केलेला खुलासा व त्यांचे अधिनस्त असलेले उपअग्निशमन अधिकारी यांचा खुलासा हा परस्पर विरोधी असल्याने मुख्य अग्निशमन अधिकारी यांनी सादर केलेला खुलासा हा या ठिकाणी विचारात घेणे आवश्यक ठरते.

५. वरील परिच्छेद २ प्रमाणे केलेला खुलासा व जेसीबी क्र.एम-एच-२० एफ़-५७५८ च्या लॉग-बुक वरील नोंदी तपासल्या असता सिडको अग्निशमन केंद्र येथील सर्व्हीस सेंटर हे दि.१६.१२.२००५ रोजी तोडण्यात आल्याचे दिसून येते. तथापि अशा वस्तुस्थितीबाबत खातरजमा करण्यासाठी मुख्य अग्निशमन अधिकारी यांचे समवेत दि.०१.०२.२००६ रोजी अग्निशमन उप केंद्र, सिडको येथे मुख्य लेखा परीक्षक यांनी प्रत्यक्ष भेट देऊन पाहणी केली असता तेथे व्हेईकल रॅम्प, होज रॅम्प व पाण्याचा हौद अस्तित्वात नसल्याचे दिसून आले. सदरचे तीनही प्रकारचे बांधकाम तोडण्याबाबतचा खुलासा वा अहवाल हा मुख्य अग्निशमन अधिकारी, महानगरपालिका,औरंगाबाद यांनी त्यांचेकडील पत्र जा.क्र.मनपा/अशाद/११६/२००६, दिनांक ०२.०२.२००६ अन्वये सादर केलेला असून त्यामध्ये सदरचे बांधकाम तोडण्यात येऊ नये अशी उपआयुक्त (महसूल) यांना मुख्य अग्निशमन अधिकारी यांनी विनंती केल्याचे नमूद केलेले आहे.

६. विभाग प्रमुख या नात्याने उपआयुक्त (म) , यांचेकडून वरील परि.(४व ५) मधील बाबीची खातरजमा करणे तसेच अन्य मुद्यांबाबत खुलासा घेणे यासाठी या विभागाकडील गोपनीय पत्र जा.क्र. मनपा/मुलेप/२००६/६७, दिनांक १०.०२.२००६ अन्वये सूचित केले असता उपआयुक्त (म), यांनी त्यांचे पत्र जा.क्र.मनपा/उआ (म),/स्वीस/२००६/७२, दि.१०.२.२००६ अन्वये खुलासा सादर केलेला आहे. सदर खुलाशामध्ये, मागील दहा वर्षात

सिडको उप अग्निशमन केंद्र या ठिकाणी बांधण्यात आलेल्या रॅम्पवर कोणत्याही प्रकारच्या गाड्या दुरूस्तीसाठी आलेल्या नाहीत किंवा त्यासाठी रॅम्पचा वापरही करण्यात आलेला नाही असा उल्लेख करण्यात आलेला असून भविष्यात अग्निशमन उपकेंद्र सिडको येथे सदर बांधकामाची आवश्यकता नाही असेही स्पष्ट नमूद करण्यात आलेले आहे. मात्र उपआयुक्त (म) यांनी रॅम्प व इतर बांधकाम तोडण्यासाठीचे प्रयोजन आणि त्यासाठीचे प्राधिकार या विषयी संयुक्तिक खुलासा केलेला नसल्याचे दिसून आले. शिवाय उपआयुक्त (म), यांनी जा.क्र.मनपा/उआ (म),/स्वीस/२००६/७३, दिनांक १३.०२.२००६ अन्वये सादर केलेला खुलासाही समाधानकारक असल्याचे दिसून आलेले नाही.

**एकूणच वरील परिच्छेद १ ते ६ प्रमाणे प्रस्तुत प्रकरणांतील वस्तुस्थिती स्पष्ट करण्यात आलेली असून त्याबाबतचे निष्कर्ष हे खालील प्रमाणे नमूद करण्यात येत आहेत.**

१. अग्निशमन उप केंद्रासाठी होज रॅम्प, व्हेईकल रॅम्प व वॉटर टॅंक या बांधकामाची आवश्यकता असल्याचे दिसून येते. तथापि उपआयुक्त(म),यांच्या अहवालनुसार अशा बांधकामाची आवश्यकताच नाही तर महापालिकेने सन १९९४-९५ मध्ये सदरचे बांधकाम हे कोणत्या निकषानुसार केले ही बाब अनुत्तरीत राहते.

२. श्री.जाफरखान, उप अग्निशमन अधिकारी, सिडको यांनी दि.०२.०८.२००५ रोजी परस्पर सादर केलेल्या अहवाला आधारे उप आयुक्त (म), यांनी बाधंकाम तोडण्याबाबत केलेली कार्यवाही ही समर्थनीय नाही.

३. उपआयुक्त, (म), महानगरपालिका, औरंगाबाद यांनी दिलेल्या तोंडी आदेशानुसार अग्निशमन उपकेंद्र, सिडको, औरंगाबाद येथील व्हेईकल रॅम्प, होज रॅम्प व हौद तोडण्याबाबतची जी कार्यवाही करण्यात आलेली आहे ती नियमबाह्य असून त्यासाठी सक्षम मान्यता घेण्यात आलेली नाही.

३. अग्निशमन उपकेंद्र, सिडको, औरंगाबाद येथे व्हेईकल रॅम्प, होज रॅम्प व हौद बांधकामा प्रित्यर्थ रू.१०२०३८/- इतका खर्च झालेला आहे. तर असे बांधकाम तोडण्यासाठी रू.५६१७/- इतका खर्च झालेला आहे.

सदर अहवालाआधारे प्रशासनाने केलेल्या कार्यवाही बाबतचा अहवाल हा अद्यापपावेतो अप्राप्त आहे.

**मा.स्थायी समिती सभा आदेशानुसार केलेल्या तपासणी बाबतचा अहवाल.**

**<u>नगररचना विभाग</u>**

**दि.१८/१०/२००५ रोजी संपन्न झालेल्या स्थायी समिती सभेमधे मा.सभापती यांनी दिलेल्या आदेशानुसार गारखेडा सर्व्हे नं.५३ मधील भूसंपादनाचे प्रकरणांसह सन १९९५ पासून खाजगी वाटाघाटीने महापालिकेद्वारा भूसंपादन झालेल्या प्रकरणांची तपासणी करण्यात आली आहे. तपासणीबाबतचा प्रकरणनिहाय अहवाल हा खालील प्रमाणे आहे.**

**<u>तपासणी प्रकरण क्र.१:</u>**

**प्रकरण : सर्व्हे क्र.५३:गारखेडा येथील भूसंपादनाबाबत.**

नगर रचना विभागाकडून दि.१.१२.०५ रोजी सर्व्हे क्र. ५३ गारखेडा भूसंपादन संदर्भात संचिका प्राप्त झाल्याने त्यानुसार सदर प्रकरणी तपासणी करण्यात आली असून त्याबाबतचा अहवाल हा खालील प्रमाणे आहे.

अ) (१) सर्व्हे क्र.५३ गारखेडा मधून जाणाऱ्या विकास रस्त्याच्या भूसंपादनाची संचिका ही प्रथम अर्जदार श्री.शेख शकील शेख बुढण पटेल यांनी सर्व्हे नं.५७, नभुक्र.१५८४० मधुन गेलेल्या रस्त्याचा मावेजा मिळण्याकरीता दिलेल्या अर्जानुसार सुरू झाल्याचे संचिकेमधिल टिपणी वरून दिसुन येते. श्री.शेख शकील शेख बुढण पटेल यांनी नगर रचना अधिकारी, महानगरपालिका यांना दि.२२.११.९९ रोजी उद्देशून लिहिलेल्या पत्राची छायांकित प्रत संचिकेत पृष्ठ.C/1 वर जोलेली आहे. प्राप्त अर्जाचे अनुषंगाने सन २००० मध्ये शाखा अभियंता नगररचना यांनी सर्व्हे नं.५३ गारखेडा मधुन गेलेल्या रस्त्या बाबत टिपणी सादर केली असून सदर टिपणी मध्ये उक्त रस्ता काम हे Non D.P.Road असे संबोधित करून त्याची बांधणी व भूसंपादना बाबत जिल्हा परिषद औरंगाबाद यांचे कडून माहिती मागण्याबाबत नमूद आहे तसेच उक्त रस्ता हा M.D.R-38 म्हणून घोषीत असल्याचेही टिप्पणीमध्ये नमूद आहे. उक्त टिपणीच्या आधारे महानगरपालिकेने जिल्हा परिषदेस विचारणा केल्यानुसार उप अभियंता जि.प. (बांधकाम), उप विभाग, औरंगाबाद यांनी त्यांचे पत्र क्रमांक जा. / जिपऔ / बांध/ उपविभाग / २०००/६१०/दि.१.७.२००० अन्वये हॉटेल जानकी ते शिवाजीनगर (सिडको ) या रस्त्याचे बांधकाम हे जिल्हा परिषद मार्फत केले नसल्याचे किंवा खात्या मार्फत भूसंपादन केल्याचे अथवा त्यानुसार मोबदला देण्यात आला नसल्याचे कळविले आहे.

२) दरम्यान उक्त रस्त्याबाबत टिपणी क्र.३ नमूद केल्या प्रमाणे रस्त्याचे बांधकामाविषयी अतिरीक्त शहर अभियंता, महानगरपालिका औरंगाबाद यांचे देखील अभिप्राय घेण्यात आले असून त्यानुसार त्यांनी सर्व्हे क्र.५७ मधील बाकी असलेल्या सुतगिरणी ते सिडको हद्यमधील ८०' डी. पी. उर्वरीत रस्त्याचे खडीकरण काम हे दि.३०.३.९५ रोजी तर सुतगिरणी ते सिडको हद्य रस्त्याचे डांबरीकरण काम दि.२८.२.९५ व याच रस्त्याचे उर्वरित डांबरीकरण हे दि.३१.१२.९५ रोजी केल्या बाबत नमुद केलेले आहे.

३) संचिकेतील टिपणी क्र.५ ते १३ नुसार सर्व्हे नं.५३ मधुन गेलेल्या ८० फुट रस्त्याचा मोबदला अदाईच्या दृष्टीने अभिप्राय नोंदविण्यात आलेले आहे. टिपणी क्र.१२ प्रमाणे संबंधित शाखा अभियंता यांनी सर्व्हे नं.५३ मधुन गेलेल्या ८० फुट रस्त्याचे ताब्याबाबत विभागात अभिलेखे उपलब्ध नाहीत. रस्ता तयार होवून वाहतूकीस खुला झाल्याने त्याच्या मोबदल्या करीता केलेल्या मागणीनुसार भूसंपादन करणे आवश्यक असल्याबाबत आणि तसे करणे झाल्यास खाजगी वाटाघाटीने अथवा मा.सर्वसाधारण सभेची मान्यता घेणे बाबत दि.३०.१.२००१ व दि.१९.४.२००१ अन्वये प्रस्ताव सादर केलेचे व त्यास तत्कालीन उप संचालकांनी दर्शविलेली सहमती व प्रस्ताव सर्व साधारण सभेपुढे सादर करणेचे दि.१९.४.२००१ रोजीचे अभिप्रायास मा.आयुक्त (तत्कालीन)यांनी दि.२३.४.०१ रोजी मान्यता दिलेचे दिसून येते.

४) संचिकेच्या टिपणी परिच्छेद २० नुसार नमूद आहे की, अर्जदार यांनी प्रत्यक्ष कार्यालयात येऊन स.न.५३ चा ७/१२ उतारा GPA (जो की नोंदणीकृत नाही) इत्यादी कागदपत्र दाखल केलेली आहेत.(उक्त कागदपत्रे संचिकेच्या पृष्ठ क्र.C/33 ते C/47 वर लावण्यात आलेली आहेत.) वरील मुद्दा क्र ३ मध्ये नमूद केल्यानुसार प्रस्ताव सर्वसाधारण सभेसमोर ठेवण्यासाठी शाखा अभियंता यांनी उप अभियंता यांचेकडे सादर केलेला आहे, तर अशा सादरीकरणावर सविस्तर माहिती द्यावी असे सुचना अंकित करून दि.३१.८.०१ रोजी तत्कालीन उप अभियंता यांनी स्वाक्षरी केलेली आहे.

५) संचिकेतील टिपणी परिच्छेद क्र.२३ ते २८ नुसार सर्व्हे क्रमांक ५३/२/१,५३/२/२/ मौजे गारखेडा येथील रस्त्यात बाधीत असलेल्या जमीनी बाबतचा मोबदला मिळणे संदर्भात मा.न्यायालयात दिवाणी दावा क्र.६९/२००४ नुसार वाद सुरू असल्याचे आढळून येते. शिवाय परिच्छेद क्र.२५ नुसार अर्जदार श्री.राजेंद्र पवार यांनी दि.१६.६.२००४ रोजी सर्व्हे नं.५३ मधील ८० फुट विकास योजना रस्त्याचा मावेजा मिळणेकरीता अर्ज केल्याचा उल्लेख असल्याचे दिसून येते.

६) दि.१७.८.२००४ व दि.३०.१२.२००४ रोजी अर्जदार श्री.राजेंद्र पवार व इतर यांनी न्यायालया बाहेर नोंदणीकृत तडजोड पत्रासह मावेजा मिळणे बाबत पुन्हा अर्ज केल्याचा उल्लेख आहे. संचिकेतील टिपणी परिच्छेद २९ ते ३६ नुसार विशेषत: टिपणी क्र.३१ नुसार "सदर जागेच्या मालकी हक्काबाबत वाद होता तो त्यांनी R.C.S .१०४७ /१९९७ नुसार उक्त रस्त्याचा मोबदला वादी श्रीमती. बबाबाई लक्ष्मण पवार व इतर यांना देण्यास हरकत नाही असे प्रतिवादी यांनी मा.न्यायालयात तडजोड करून दिले आहे. कृपया तडजोड पत्र (निर्णय ) अवलोकन व्हावे" असे नमुद आहे. उर्वरीत परिच्छेदा मध्ये (क्र.३३ ते ३६) दुय्यम आवेक्षक (दर्जा वर्ग ३) यांनी मे.अश्विनी ट्रेडिंग कंपनीचे मालकीच्या जागेतुन जाणाऱ्या रस्त्याच्या (सर्व्हे नं.५३/२/१ व ५३/२/२ मधील) भूसंपादनाबाबतचे मुल्यांकनाची आकडेमोड आहे. उपरोक्त आकडेमोड व अभिप्राय (दुय्यम आवेक्षक यांच्या) सादरीकरणा नंतर संचिकेतील पृष्ठ क्र.११९ वर लावलेले तडजोडपत्राच्या बाबतीत सहाय्यक संचालक नगर

रचना यांनी विधी सल्लागार यांचे अभिप्राय मागविले असून टिपणी परिच्छेद ३८ नुसार विधी सल्लागार यांनी प्रकरण न्यायप्रविष्ठ नसल्याबाबत तसेच सहाय्यक संचालक नगर रचना यांनी इतर बाबी तपासुन निर्णय घेण्यास हरकत नाही, असा सल्ला दि.१३.१.२००५ रोजी दिलेला आहे. उक्त प्रमाणे सल्ला प्राप्त झाल्यानंतर दि.१३.१.२००५ रोजीच उप अभियंता नगर रचना विभाग यांनी टिपणी परिच्छेद ३९ प्रमाणे "मा.सहाय्यक संचालक नगर रचना हे कार्यालयीन कामानिमित्त मुंबई येथे गेले आहेत, तरी प्रस्ताव मान्यतेस्तव सादर" असे कार्यालयीन टिपणी मध्ये नमुद करून प्रस्ताव /प्रकरण हे मुख्य लेखा अधिकारी यांचेकडे सादर केलेले आहे.

७) संचिकेतील परिच्छेद ४० ते ४१ नुसार सदर प्रकरणांत मुख्य लेखा अधिकारी यांनी दि.१४.१.२००५ रोजी खालील प्रमाणे काही मुद्यांवर खुलासा मागविला आहे.

१. Non D.P. Road असल्याने तो विकसीत करण्याची जबाबदारी कोणाची आहे.

२. सदरील रस्ता मनपा हद्यीत येतो का ?

३. परिच्छेद ३ नुसार कामे मनपाने कोणत्या मंजुरीअंती केलीत. कारण त्यामधे नमूद नुसार सुतगिरणी ते सिडको हद्य दाखविली आहे व ८० फुट डि.पी. रोड निर्देशीत आहे.

४. प्रस्तुत कामे सन १९९५ मध्ये केलेली आहेत. त्याअर्थी मिळकत मनपाचे ताब्यात होती किंवा नाही ?

५. जर रोडची कामे सन १९९५ मध्ये झाली आहेत तर मोबदला १९९५ सालाचाच देय होतो. (यापूर्वीचे दिल्लीगेट भूसंपादन प्रकरण पहावे.)

६. Non D.P. Road करीता संपादन आवश्यकता बाबत सर्वसाधारण सभेचा ठराव झाला आहे का ?

७. मनपाने १० वर्षाचे भूसंपादन नियोजन आराखडा तयार केलेला आहे. त्यामध्ये या रस्त्याचे भूसंपादन केव्हा प्रस्तावित आहे.

८. प्रकरणात न्यायालयीन तडजोड आहे. त्याअनुषंगाने एस.एल.ओ. व टी.एल.आर. यांचेकडे वाद नसल्याबाबत प्रमाणित करावे.

९. चालु वर्षीचे पी.आर.कार्ड / ७/१२ सह अद्ययावत दस्ताऐवज तपासावेत.

८) मुख्य लेखा अधिकारी यांनी विचारलेल्या दि.१४.१.०५ रोजी मुद्यांचे उत्तरी परिच्छेद ४२,४३,४४ प्रमाणे नगररचना विभागाने दि.१८.१.२००५ रोजी त्याचा खुलासा सादर केला आहे. सदर खुलासावर मुख्य लेखा अधिकारी यांनी पुन्हा दि.२०.१.०५ रोजी खालील प्रमाणे विचारणा केली आहे.

१. पृष्ठ एन.एस.-५ वरील परिच्छेद १५ व १६ नुसार सर्वसाधारण सभेची मान्यता आवश्यक आहे.

२. एस.एल.ओ. व टी.एल.आर. यांचेकडे वाद नसल्याबाबत प्रमाणित करावे.

३. भूसंपादनाचे १० वर्षाचे नियोजन पुस्तिकेत या रस्त्याचा समावेश का नाही ? याचा खुलासा करावा.

४. परिच्छेद ४० वरील मुद्या क्र.५ वर सहा.सं.न.र. यांनी स्वंयस्पष्ट भाष्य करावे.

९) मुख्य लेखा अधिकारी यांनी विचारणा केल्यावर सहाय्यक संचालक नगररचना यांनी दि.२५.१.०५ रोजी परिच्छेद क्र.४६ ते ४९ प्रमाणे मुख्य लेखाधिकारी यांचेकडे खुलासा सादर केला असून मुख्य लेखा आधिकारी यांनी परिच्छेद क्र.५० ते ५१ नुसार खालील प्रमाणे अभिप्राय नोंदवून संचिका ही मा. आयुक्त यांचेकडे रू.१,२९,३०,०२६/- एवढया रकमेचा मोबदला अदाईच्या दृष्टीने दि.३१.१.२००५ रोजी सादर केलेली आहे.

१. सन २००४-२००५ करीता 'भूसंपादन' लेखाशिर्षाखालील आर्थीक वर्षात देयक देता येणार नाही.

२. मुंबई प्रांतिक महानगरपालिका अधिनियम १९४९ चे कलम ७७ अन्वये खाजगी वाटाघाटीने मालमत्ता स्थायी समितीच्या मान्यतेने संपादीत करता येते व खाजगी वाटाघाटी मनपास फायदेशीर आहे. एस.एल.ओ. मार्फत संपादन केल्यास ३०% अतिरिक्त रक्कम अदा करावी लागते.

३. परिच्छेद ३५, ३६, एन.एस.-११ वरील सादर केलेले भूसंपादन, शिघ्रगणक २००५ नुसार बरोबर आहे. सोबत 'A'पताकावर शिघ्रगणक दर तक्ता जोडलेला आहे. त्यानुसार मुल्यांकन मान्य करण्यास हरकत नाही.

४. पृष्ठ एन.एस.-१२ परिच्छेद ३८ नुसार विधी सल्लागार यांनी प्रकरण न्यायप्रविष्ठ नसल्याचे प्रमाणित केलेले आहे.

५. पृष्ठ एन.एस.-१७ परिच्छेद ४७ नुसार एस.एल.ओ. व टी.एल.आर. यांचेकडे सदर रस्त्याचे प्रकरण प्रलंबीत नसल्याचे सहा.सं.न.र. यांनी सादर केलेले आहे.

सदर टिपणीवर परिच्छेद क्र.५२ व ५३ प्रमाणे मा.आयुक्त यांनी राज्य निवडणूक आयुक्तांचे निर्देशानुसार सदर प्रकरण आचारसंहिता कालावधी नंतर सादर करणेस सुचित केले आहे.

१०) दि.१८.०२.०५ रोजी श्री रविकिरण सावजी यांनी कार्यालयात पत्र देवून सदर प्रलंबीत प्रकरणी तात्काळ निर्णय घ्यावा अथवा रस्ता बंद करण्यात येईल असे कळविले आहे. त्यावर मा.आयुक्त यांनी स.स.नं.र.यांचेशी केलेल्या चर्चेनुसार ठेवण्यास आदेशीत केलेले आहे. सदरचे पत्र पृष्ठ क्र. C/233 वर लावण्यात आलेले आहे. प्रकरणी सदर रस्त्याचे संपादना बाबत श्री.सावजी यांनी दिलेल्या पत्रा मधील रस्ता बंद करण्याचे धमकी बाबत मा.आयुक्त, राज्य निवडणूक आयोग यांना मार्गदर्शन सुचना मिळणेस पत्र पाठविण्यात आलेले आहे. (पृष्ठ क्र.C/235) मा.राज्य निवडणूक आयोगाने भूसंपादनाचा मोबदला देण्यास अशा कालावधीत परवानगी नाकारली आहे. (C/236 -पत्र दि.१५ मार्च २००५ . )

११) आचार संहिता संपल्यानंतर सहाय्यक संचालक नगररचना यांनी सदर अहवालातील मुद्या क्रमांक ९ प्रमाणे (मुख्य लेखा अधिकारी यांनी दि.३०.१.२००५ रोजी दिलेल्या अभिप्राया

प्रमाणे) प्रस्ताव मान्य करण्यासाठी प्रकरण दि.२४.५.२००५ रोजी मा.आयुक्तांकडे सादर केले.

सदर प्रकरणावर मा.आयुक्त यांनी प्रथमत: चर्चा करणेस पृष्ठांकीत केले आहे. तदनंतर "Any case of private negotiation we must publish in news paper, if any person have any objection for we paying to the concerned party. Publish if no objections comes then put up to standing" असा शेरा नोंदवुन मा.आयुक्तांनी प्रकरण संबंधित विभागाकडे पाठविले आहे. त्याअनुषंगाने संबंधितांनी दि.१५.७.०५ चे दैनिक लोकमत व औरंगाबाद टाईम्स मध्ये जाहीर प्रगटन दिलेले आहे. (संचिका पान C /२४७ वर आले आहे.) त्यामध्ये श्री.सावजी व इतर यांचा उल्लेख करून १२ मी. व २४ मी. रूंद रस्त्याच्या देखील उल्लेख करण्यात आला आहे.

१२) वरील प्रगटना नुसार कोणाचाही आक्षेप प्राप्त न झाल्याने सहाय्यक संचालक नगर रचना यांनी प्रकरण टिपणी परिच्छेद क्र.७० व ७१ प्रमाणे स्थायी समितीकडे सादर करणे बाबत प्रस्तावित केलेले आहे व पृष्ठांकनास मा.आयुक्तांनी मान्यता दिली आहे. तथापि परिच्छेद ७२ नुसार प्रस्ताव हा पून्हा दि.१६.८.२००५ रोजी मा.आयुक्त यांचेकडे सादर केलेचे व अशा सादरीकरणावर मा.आयुक्त यांनी " Before sending to standing take verification from Account & Estate Dept that we have not paid for this road before", असा अभिप्राय देवून संचिका ही दि.२३.९.२००५ रोजी परत सहाय्यक संचालक नगर रचना यांचेकडे पाठविली असल्याचे दिसुन येते. मा.आयुक्त यांचे सुचनेनुसार मालमत्ता विभागाचे अभिप्राय घेण्यासाठी संचिका ही मालमत्ता विभागाकडे दि.२३.९.२००५ रोजी पाठविण्यात आली असता संबंधित मालमत्ता अधिकारी यांनी जागेचा ताबा यापूर्वी घेण्यात आला नसल्याचे तसेच भूसंपादन करणे व त्यानुसार मोबदला देणे ही कार्यवाही नगररचना विभागा मार्फत होत असल्याने या विभागामार्फत मोबदला देण्याचा प्रश्न उद्भवत नसल्याचे नमूद करून संचिका उप आयुक्त (महसूल) यांची मान्यता घेऊन नगर रचना विभागास दि.२४.९.२००५ रोजी पाठविल्याचे दिसुन येते. (टिपणी क्र.७४ व ७५ प्रमाणे) या शिवाय टिपणी क्र.७६ व ७७ नुसार संबंधित दुय्यम आवेक्षक यांनी भूसंपादन कार्यवाही, मोबदला देणे याबाबत संचिका व कार्यवाही ही नगर रचना विभागामार्फत होते, त्यामुळे प्रकरणांत नगर रचना विभागाने तपासणी करणे योग्य होईल असे मुख्य लेखा अधिकारी यांनी सुचित केले असल्याचा उल्लेख करून प्रस्ताव सादर केल्याचे दिसुन येते. परंतु संचिकेत मुख्य लेखाधिकारी यांचे त्याबाबत अभिप्राय घेतलेचे दिसुन येत नाहीत. परिणामी रस्त्याचा मोबदला हा यापुर्वी कोणासही देण्यात आलेला नाही, असे अभिप्राय पृष्ठांकित करून सहा.संचालक नगर रचना यांनी मा.आयुक्तांची फेर मान्यता न घेताच स्थायी समिती समोर प्रस्ताव सादर केला. सहाय्यक संचालक नगर रचना यांनी त्यांचे स्तरावर प्रस्ताव स्थायी समिती समोर दि.२४.९.०५ रोजी ठेवण्यास शिफारस केली आहे.

१३) वरील प्रस्तावास मा.स्थायी समितीने ठरावाद्वारे (विषय क्र.७३ सभा दि.२७.९.०५) सशर्त

" बाधीत क्षेत्रासाठी यापूर्वी कोणत्याही स्वरूपात कोणासही मोबदला दिला आहे का ? तसेच मालकी हक्काबाबत खात्री करून घ्यावी वरील सर्व बाबीची तपासणी करून लेखा विभागाने सविस्तर तपासणी केल्यानंतरच पुढील कार्यवाही करावी". असा निर्णय देवून खर्चास मंजुरी दिली आहे (C/271). तद्नंतर प्रकरणी उद्भवलेल्या परिस्थीती नुसार सदर ठराव रद्द करणेबाबत स्थायी समितीने दि.१८.१०.०५ रोजी विषय क्र.८४ अन्वये पूर्वी मंजूर केलेला ठराव क्र.७३ रद्द करणे बाबत मान्यता दिलेली आहे. (C/413)

**१४)** दरम्यानचे कालावधीत माजी आमदार श्री.कैलास पाटील यांनी दि.१६.७.२००५ च्या जाहीर प्रगटनावर शासनाकडे आक्षेप नोंदविलेला असून शासनाचे उप सचिव, नगर विकास विभाग यांनी त्यांचे पत्र क्र.औमपा-१००५/प्रक्र./नवि-२४, दि.१८.८.२००५ अन्वये अशा प्राप्त आक्षेपा बाबत वस्तुनिष्ठ अहवाल सादर करणे विषयी कळविलेले आहे (C -३८५). शिवाय पृष्ठ क्र.C/२४९ वरील मा.उप महापौर, मनपा औरंगाबाद यांचे पत्र क्र.उपमहापौर/६८/०५/१७.८.२००५ नुसार ही प्रस्तुत प्रकरणी मावेजा अदाईच्या दृष्टीने तपशिलवार माहिती लेखी स्वरूपात कळविणे बाबत तसेच तोपर्यंत या रस्त्याची रक्कम ही कोणासही अदा करू नये अशी मा.आयुक्त यांना विनंती केलेली आहे.

**१५)** परिच्छेद क्र.१३ मध्ये नमुद केले नुसार मा.स्थायी समिती मध्ये ठराव क्र.८४ दि.१८.१०.२००५ अन्वये ठराव क्र.७३ दि.२७.९.२००५ हा ठराव रद्द करण्यास सर्वानुमते मंजुरी देण्यात आली आहे. त्याअनुषंगाने टिपणी मधील परिच्छेद क्र.७९ ते ८४ नुसार मा.आयुक्त यांनी अर्जदाराचे नांवे एफ.आय.आर.दाखल करणे बाबत आदेशीत केले प्रमाणे सहाय्यक संचालक नगर रचना यांनी दि.१०.१०.२००५ रोजीच्या पत्रानुसार पोलीस निरीक्षक सिटीचौक, पोलीस स्टेशन औरंगाबाद यांचेकडे अर्जदार श्री.राजेंद्र लक्ष्मण पवार व इतर यांचे नांवे फौजदारी गुन्हे दाखल करणे बाबत कळविलेले आहे. परिणामी पोलीस स्टेशन सिटीचौक येथे गु.र.नं.आय./११९/०५ अन्वये भा.द.वि.कलम ४२०, ४२३ व ५११ खाली गुन्हा दाखल झाल्याचे दिसुन येते. अनुषंगीक पत्रव्यवहार हा संचिके मध्ये उपलब्ध आहे.

उपरोक्त प्रमाणे नमूद १ ते १५ पर्यंत असलेल्या मुद्याबाबत मुळ संचिका तसेच अनुषंगीक सर्व कागदपत्रे यांची सविस्तर तपासणी व सर्व बाबींचा सांगोपांग विचार करून खालील प्रमाणे वादीत मुद्दे निर्णयास्तव काढण्यात आलेले आहेत व त्याबाबतचा निष्कर्ष त्यांचे समोर दर्शविला आहे.

अ. भूसंपादन करण्याचा प्रस्ताव अर्जदाराने /जमीन मालकांनी नियमानुसार सादर केलेला आहे काय ?

ब. प्रस्तावा अंतर्गत असलेल्या बाधीत जमीनीची मालकी ही अर्जदारांची आहे असे सिध्द होते काय ?

क. प्रस्तावा अंतर्गत संपादन करावयाच्या जमीनीचा मोबदला /इतर मावेजा जसे अतिरिक्त चटई क्षेत्र निर्देशांक वगैरे देण्यात आलेला आहे काय ?

ड. प्रकरण जमीन संपादन करण्याचे कारवाई मध्ये अनियमितता झालेली आहे काय ?

**निष्कर्ष :–**

**ब)** **(१)**सर्व्हे क्र.५७ गारखेडा, औरंगाबाद या जमीनीतून प्रस्तावित विकास रस्ते अनुक्रमे २४ मी. रूंद संपादीत करण्यासाठी तथाकथीत जमीनमालक श्री.शेख शकील शेख बुढन पटेल यांनी मुद्या क्र.१ मध्ये नमुद केल्याप्रमाणे अर्ज दिलेला आहे. सदर अर्जाची मुळ प्रत संचिकेत नाही. मात्र छायाकिंत प्रती वरून असे दिसून येते की, दिलेला अर्ज हा परीपूर्ण नसून अर्जासोबत मालकी हक्क दर्शविणारी आवश्यकती कागदपत्रे जोडलेली नाहीत. शिवाय छायाकिंत अर्जात अतिरिक्त सर्व्हे क्रमांकाचा (सर्व्हे नं.५३ चा) समावेश केल्याचे आढळून येते व उक्त नोंदी हया कार्यालयीन कर्मचारी यांनी केल्याची शंका निर्माण होते. ज्या अर्थी श्री.शेख शकील बुढन पटेल यांनी दिलेला भूसंपादना बाबतचा अर्ज हा परीपूर्ण नव्हता, त्याअर्थी सदर अर्जावर भूसंपादनाची कार्यवाही सुरू करण्यास संचिका सुरू करणे योग्य नव्हते. तसेच उक्त देण्यात आलेला अर्ज हा नभुक्र.१५८४० चे संदर्भाने असून अभिलेख पडताळणी केली असता त्याचा मुळ सर्व्हे क्र.५३ नसून ५७ असा आहे. त्यामुळे सदर अर्ज /मागणी ही मुळातच सर्व्हे क्र.५३ ची नसून सर्व्हे क्र.५७ बाबतची असल्याचे दिसुन येते. तथापि कार्यालयीन शाखा अभियंता यांनी त्याच अर्जा मध्ये अतिरिक्त सर्व्हे क्र.(५३ स.न.) टाकुन हेतुपुरस्सर संचिका सुरू केल्याचे दिसुन येते. यावरून उक्त अर्ज हा मुळातच योग्य प्रकारे दाखल झालेला नसुन त्याचा मुळ सर्व्हे क्रमांक ५३ यांचेशी तत्वत: काही संबंध असल्याचे दिसत नाही. त्यामुळे कार्यालयीन शाखा अभियंता यांनी केलेली अतिरिक्त नोंद संशयास्पद आढळुन येते. मात्र संचिका टिपणी क्र.१२ ते १५ प्रमाणे सर्व्हे नं.५३ मधुन गेलेल्या ८० फुट रस्त्याच्या मोबदला अदाईस्तव संबंधित शाखा अभियंता यांनी दि.३०.१.२००१ रोजी भू-संपादन प्रस्ताव सादर केला असून अशा प्रस्तावास संबंधित उप संचालक, नगर रचना यांनी दि.१९.४.२००१ रोजी केलेल्या शिफरशी आधारे तत्कालीन मा.आयुक्त, मनपा यांनी दि.२३.४.२००१ रोजी मान्यता दिल्याचे दिसुन येते. म्हणजेच नगर रचना विभागाद्वारे प्रकरणांत कुठलीही खातरजमा न करताच सर्व्हे नं.५३ मधुन गेलेल्या ८० फुट रस्त्याचा भू-संपादन प्रस्ताव सादर करून मा.आयुक्त यांची मान्यता घेतल्याचे निदर्शनास येते. वास्तिवीक पाहता याठिकाणी श्री.शेख शकील शेख बुढण पटेल यांनी दि.२२.११.९९ रोजी सर्व्हे नं.५७, नभुक्र.१५८४० मधुन गेलेल्या ८० फुट रस्त्याचा मोबदला मागीतलेचे तर श्री.राजेंद्र पवार यांनी सर्व्हे नं.५३ मधुन गेलेल्या ८० फुट रस्त्या बाबतच्या क्षेत्रफळा बाबत आणि मोबदला अदाई बाबत दि.१४.७.९९ अन्वये विचारणा केल्याचे स्पष्ट असतांना सर्व्हे नं.५३ मधुन गेलेल्या रस्त्याचा मोबदला अदाई करण्याचा दृष्टीने प्रस्ताव सादर होतो, आणि तोही कुठल्याही कागदपत्राचा आधार न घेता, ही बाब गंभीर आहे.

**२)** दरम्यान दि.१६.६.२००४ रोजी अर्जदार श्री.राजेंद्र लक्ष्मण पवार यांनी स.नं.५३ गारखेडा येथील ८० फुट (२४ मी.) रूंद रस्त्याच्या मोबदला मिळणे बाबत अर्ज दाखल केला. त्या सोबतचे सहपत्र पाहता तो देखील परीपूर्ण असल्याचे दिसुन येत नाही. कारण अर्जासोबत

जोडलेल्या मालकी हक्कातील कागदपत्रावर अर्जदाराचे नाव नसुन मयत श्री.लक्ष्मण शंकर यांचे नाव असल्याचे दिसुन येते. वास्तविक मयत लक्ष्मण शंकर यांचे वारस अर्जदार श्री.राजेंद्र पवार हे जरी असले तरीही वारसाहक्काने सक्षम कार्यालयामार्फत त्यांचे व इतरांचे नावांची नोंद ही ७/१२ उताऱ्यावर झाल्यानंतरच त्यांची मालकी / वारसाहक्क विचारात घेणे आवश्यक होते. वरील बाब पाहता तशी नोंद ७/१२ उताऱ्यावर झाल्याचे उपलब्ध संचिके मधील उता-यावरून दिसुन येत नाही. यावरून अर्जदार श्री.राजेंद्र पवार यांनी मालकीहक्का बाबत केलेला अर्ज हा संघीग्ध असून परिपूर्ण असल्याचे दिसुन येत नाही. तसेच कोणत्याही मोबदला प्रकरणी संबंधित मिळकतधारकाचे हक्कात असलेल्या अथवा त्यांनी मागणी केलेल्या क्षेत्रा बाबतचे मोबदला प्रकरणी सक्षम कार्यालयाचे मोजणी नकाशा आवश्यक आहे. उक्त प्रकरणांमध्ये मोजणी नकाशाच नसल्याने प्रकरणी अर्जदाराचे मालकीहक्कातील हद्य बंदी व जागा निश्चिती करतांना कार्यालयीन कर्मचा-यांनी निश्चित काय आधार घेतला याचा बोध होत नाही. वास्तविक जागेचा मोजणी नकाशा, अर्जदाराचे मालकीहक्कातील नाव इत्यादी किमान बाबी प्राथमिक अहवालावेळी अर्जासोबत आवश्यक आहेत. उक्त प्रकरणी दोन्ही बाबी नसतांना मे.अश्विनी ट्रेडिंग कंपनीच्या मालकीचे जागेतुन जाणाऱ्या रस्त्यासाठीचा (सर्व्हे नं.५३/२/१ व ५३/२/२ मधुन गेलेल्या रस्त्याचा) मावेजा श्री.राजेंद्र पवार व इतर यांना प्रदान करण्याच्या दृष्टीने प्रस्तावित करणे ही बाब गंभीर असून दखलपात्र आहे.

वरील स्थिती पाहता अर्जदाराचा मागणी अर्जच अपूर्ण असल्याचे दिसुन येते. तसेच तो प्राथमिक छाननी मध्येच फेटाळणे आवश्यक होते अथवा त्याअनुषंगाने संबंधिताना सुचित करणे आवश्यक होते. दि.१६.६.२००४ रोजी अर्जदारांनी दिलेल्या अर्जा सोबत (संचिका पृष्ठ क्र. C-७५ ते C-८९) मा.न्यायालया मध्ये झालेली आपआपसातील तडजोडी बाबतची (मा.न्यायालय प्रकरण क्र.१०४५/१९९७) कागदपत्रे जोडली आहेत. त्यानुसार अर्जदारासह इतरांचा मालकीहक्क, हक्कसोड, ताबा इत्यादी बाबत स्पष्ट उल्लेख आहे. सदर बाब विशेषत: पान क्र.सी ८३, मुद्या क्र.३ यामध्ये स्पष्टपणे नमुद आहे. यावरून उक्त प्रकरणी अर्जदार श्री. राजेंद्र पवार यांना मे.अश्विनी ट्रेडिंग कंपनीच्या मालकीचे (९ एकर १८ गुंठे) जागेसंबंधि मावेजा मागणीचा कोणताही अधिकार नाही, ही बाब छाननी मध्ये मुख्यत्वेकरून विचारात घेणे आवश्यक होती. त्यामुळे अर्जदारांनी त्याठिकाणी त्यांचा कोणताही हक्क नसतांना मागणी केलेला मावेजा तात्काळ कार्यालयाकडून फेटाळणे आवश्यक होते. तथापि त्याकडे पूर्णत: हा दुर्लक्ष झाल्याचे दिसुन येते.

एकंदरीत प्रस्तावित प्रकरणी वरील बाबींचा गांभीर्याने विचार केल्यास अर्जदारांनी त्यांचे सोबत जोडलेल्या कागदपत्रा वरून मागणी केलेल्या जागेची मालकी ही त्यांची आहे हे सिध्द होत नाही. तसेच मा.न्यायालयात झालेल्या तडजोडीनुसार सुध्दा मे.अश्विनी ट्रेडिंग कंपनीच्या मालकीचे जागे बाबतचा मोबदला मागणेचा त्यांना कोणताही अधिकार नाही. या बाबी नगर रचना विभागाने प्राथमिक स्तरावर पडताळणी वेळी विचारात घेणे आवश्यक होते.

परंतु तसे झाल्याचे दिसुन येत नाही. अर्जा सोबतच्या आवश्यक कागदपत्रांची अपूर्णता ही बाब देखील गंभीर स्वरूपाची आहे. तसेच अर्जा सोबत जोडलेले जमीनीचे ७/१२ उतारेवर मालकी हक्कात श्री.लक्ष्मण शंकर असे नाव आढळुन येते. मात्र श्री.लक्ष्मण शंकर हे सोबत जोडलेल्या मृत्यु प्रमाणपत्रा आधारे दि.३०.१२.१९९६ रोजी मयत असलेने ७/१२ उताऱ्यावर त्यांचे नाव

कमी होऊन त्यांच्या वारसदारांची नावे येणे आवश्यक होते. तथापि तसे नामांतर (Mutation) झालेले दिसुन येत नाही व उक्त Mutation झाले विना वारसदारास आपला हक्क कायदेशीर दृष्टया दाखवता येत नाही. या बाबीकडे प्रशासनाचे दुर्लक्ष झालेले आहे.

३) प्रस्तावा अंतर्गत भुसंपादन प्रकरणी छाननी करतेवेळी उक्त मिळकतीचा मावेजा इतर माध्यमातुन जसे टी.डी.आर., अतिरिक्त चटई क्षेत्र निर्देशांक देण्यात आलेला आहे काय ? याबाबतची पडताळणी व त्याअनुषंगाने टिप छाननी अहवाला मध्ये दिसुन येत नाही. वास्तविक उक्त बाब ही देखील महत्वाची असून त्या बाबतचा उहापोह प्राथमिक छाननी अहवालात होणे अत्यंत आवश्यक होते. तसेच प्रकरणी त्या सर्व बाबी बाबत स्थळपाहणी अहवाल देखील ज्यामध्ये जागेवरील झालेला विकास (बांधकामे व इतर) व इतर आवश्यक बाबींचा उल्लेख असतो तो उपरोक्त संचिकेमधील अहवाला मध्ये कोणत्याही स्तरावर झाल्याचे नोंदी वरून दिसुन येत नाही. सदर बाब ही अतिशय महत्वाची व अत्यावश्यक होती. परंतु तसे या ठिकाणी झालेले नाही.

प्राप्त अभिलेखा नुसार सर्व्हे नं. ५३/२/१, ५३/२/२ या मिळकतीवर कार्यालयामार्फत मे.अश्विनी ट्रेडिंग कंपनीतर्फे श्रीमती.सुशिलादेवी रमेशकुमार बगडीया यांना विकास परवानगी यापूर्वीच बांधकाम परवानगी क्र.५२७/२००१ दि.३०.३.२००१ अन्वये कार्यालयामार्फत देण्यात आलेली आहे. तसेच त्यास सुधारीत बांधकाम परवानगी देखील कार्यालयाकडून बांधकाम परवाना क्र.२१३/२००३ दि.२८.७.२००३ अन्वये मे.अश्विनी ट्रेडिंग कंपनी तर्फे सुशिलादेवी रमेशकुमार बगडीया यांना देण्यात आलेली आहे. वरील बांधकाम परवानगीचे अवलोकन केले असता यामध्ये जोडलेल्या कागदपत्रा आधारे संबंधितांना त्यांचे मालकीहक्कातील १२ मी. व २४ मी.रूंद रस्त्याने बाधीत भागाचा मोबदला अतिरिक्त चटई क्षेत्र निर्देशांकाचे स्वरूपात देण्यात आला आहे. बांधकाम परवानगी संचिके मधील सक्षम कार्यालयाचे अभिलेख ७/१२ उतारा व सक्षम कार्यालयाचा विकास परवानगीधारक अर्जदार यांचे हक्कात असलेला जमीन मोजणी नकाशा पाहता त्यावेळी देण्यात आलेला चटईक्षेत्र

स्वरूपातील मावेजा अर्जदारांनी (विकासक) मागणी केल्या नुसार दिल्याचे दिसुन येते. सदर प्रकरणी उपलब्ध मा.न्यायालयातील तडजोडी नुसार (तडजोड पत्र मुद्या क्र.३ मध्ये नमुद केले नुसार) उक्त मावेजा घेण्याचा अधिकार हा श्रीमती.बगडीया यांनाच असल्याचे दिसुन येते. त्याआधारे व तसेच विकासकाकडील जमीन मोजणी नकाशा, मालकी हक्क कागदपत्रे इत्यादी बाबी विचारात घेऊन मावेजा चटई क्षेत्र निर्देशांकात देण्यात आल्याचे दिसते. बांधकाम

परवानगी संचिकेवरून रस्त्याने बाधीत सदर क्षेत्र महानगरपालिकेस नोंदणीकृत दस्ताऐवजाने Relinqishment Deed करून मनपाचे ताब्यात दिल्याचे देखील दिसुन येते. मात्र संबंधित विभागाकडून सदर मालमत्तेची नोंद ही महापालिकेच्या नांवे झाल्याचे / ताबा पावती घेतल्याचे दिसुन येत नाही.

वरील क्षेत्र व रस्त्याचे निश्चित केलेले स्थान पाहता महानगरपालिकेने यापूर्वी श्रीमती.बागडीया यांना दिलेल्या मावेजाचेच क्षेत्रावर श्री.पवार यांनी मालकी नसतांना भुसंपादनाचा पूनश्च: अर्ज दाखल केल्याचे दिसुन येत आहे. संचिकेत कोठेही मोबदला मागीतलेले क्षेत्र प्रमाणित केलेले नाही. मात्र C-६९ वर जोडलेल्या व Partly HatChed केलेल्या नकाशा वरून हा अंदाज करता येतो, कारण या नकाशावर देखील कोणाच्याही स्वाक्ष-या नाहीत. प्रस्तुत भुसंपादन संचिकेमधील C-८९ नुसार असलेल्या नकाशाचे अवलोकन केल्यासही उक्त बाब ठळकपणे दिसुन येते. संचिका पृष्ठ क्र. C-८९ नुसार जोडलेला नकाशा हा मा.न्यायालयात झालेल्या तडजोडी नुसार एक भाग असून तो सर्व मालकांचे सहमती / साक्षीने झालेला आहे. ज्यामध्ये उक्त रस्त्यांबाबतचे बाधीत जमीन, त्या संबंधिचे मावेजाचे अधिकार या बाबत स्पष्ट उल्लेख असून तो पाहता श्रीमती.बगडीया यांना चटई क्षेत्र निर्देशांक स्वरूपात मावेजा देण्यात आला असल्याचे दिसते.

४) जमीन संपादन करण्याचे उक्त कार्यवाही मध्ये नगर रचना विभागाकडून गंभीर स्वरूपाच्या अनियमितता झाल्याचे प्रत्यक्ष दर्शनी दिसुन येते. वास्तविकत: अशा अनियमितता हया प्राथमिक स्तरावरच संबंधित कर्मचारी / अधिकारी यांचे निदर्शनास यावयास हव्या होत्या. परंतु तसे याठिकाणी झालेले नाहीत. प्रकरणांतील अनियमितता हया गंभीर स्वरूपाच्या असून छाननी ही अत्यंत ढिसाळपणाने आणि सहकागदपत्रांची सखोल तपासणी न करताच अगदी मोघम स्वरूपात झाल्याचे दिसुन येते. तपासणी अंती निदर्शनास आलेल्या अनियमितता हया खालील प्रमाणे आहेत.

१. प्रकरणांत महानगरपालिकेस भुसंपादन विषयी प्राप्त अर्ज हा मुळ स्वरूपात नसुन त्याची छायांकित प्रत आहे. मुळ अर्ज हा या विषयाकिंत सर्व्हे क्रमाकांशी जुळून येत नाही. प्रथम अर्ज हा सर्व्हे क्र.५७, नभुक्र.१५८४० गारखेडा या संदर्भातील आहे. महानगरपालिका नगर रचना विभागातील कर्मचाऱ्याने त्यामध्ये स.क्र.५३ याचा समावेश करून उक्त भुसंपादन सूचना / अर्ज स.क्र.५३ बाबत असल्याचे कार्यालयास भासविले आहे व त्याआधारे टिपणी / नोटींग सुरू केलेली आहे आणि प्रकरणांत इतर अधिकाऱ्यांनी / कर्मचाऱ्यांनी त्याबाबत पडताळणी केल्याचे दिसुन येत नाही.

२. सर्व्हे क्र.५२/२/१, ५२/२/२ गारखेडा या मिळकती मधील विकास योजना रस्त्याचे भूसंपादन प्रकरण असून प्रथम अर्ज अथवा सुचने सोबत संबंधित अर्जदाराचा मालकी हक्क दर्शविणारा सक्षम कार्यालयाचा अद्ययावत तारखेचा ७/१२ उतारा आवश्यक आहे. प्रकरणी संबंधिताकडून दाखल केलेल्या मालकी हक्काचे उता-या मध्ये मावेजा मागणा-या अर्जदाराचे

नाव मालकीहक्का मध्ये दिसुन येत नाही. तसेच वैध वारसाहक्काचे कोणतेही कागदपत्र नसताना अर्जदारास / तडजोड करारपत्र करणा-यास / संमती देणारास उक्त क्षेत्राचा मालक ग्राहय धरणे ही चुकीची बाब आहे.

३. उक्त जमीनीचा मुळ मालक मयत झाला असल्याने मुळ मालकाचे मृत्युनंतर त्यांचे वारसदारांचे वैध वारसपत्र विना (SuCCession CertifiCate) संचिकेतील कधीही न बदलता येणारे अधिकारपत्र, (जी.पी.ए.विना नोंदणीकृत असलेले) तडजोडपत्र, करारनामा इत्यादींचा अधिक सखोल अभ्यास न करता ग्राहय धरून छाननीवेळी विचारात घेणे ही बाब पूर्णपणे अयोग्य आहे.

४. भुसंपादन प्रकरणी प्राप्त सूचना सोबत अर्जदारांनी त्यांचे मालकीहक्क दर्शविणारे सक्षम कार्यालयाचे उतारे व त्यानुसार त्यांचे मिळकतीचा हद्यबंद चतु:सिमा दर्शविणारा सक्षम कार्यालयाचा मोजणी नकाशा याबाबी दाखल करणे क्रमप्राप्त आहेत. त्याशिवाय कोणत्याही प्रकरणात छाननी होणे तांत्रिक दृष्टया अशक्य बाब असल्याचे दिसते. प्रकरणात मात्र संचिके वरून प्रत्यक्षात निश्चित कोणती जागा संपादीत करावयाची आहे, त्याबाबत स्पष्ट उल्लेख, अर्जदाराचे नावे मालकी हक्क दर्शविणारी कागदपत्रे आणि मुख्यत्वेकरून अर्जदाराची मालकीहक्का नुसार उक्त सर्व्हे क्रमांकाचा सक्षम कार्यालयाचा (तालुका निरीक्षक भुमी अभिलेख कार्यालयाचा) हद्यबंद चतु:सिमा दर्शविणारा मोजणी नकाशा प्रस्तावा सोबत असल्याचे दिसुन येत नाही. यावरून नेमके कोणते क्षेत्र संपादीत करण्याचा प्रस्ताव आहे हेच स्पष्ट होत नाही.

५. विकास योजने नुसार रस्ता रूंदीकरणाने अर्जदारांची त्यांचे हक्कातील प्रत्यक्षात किती जमीन बाधीत आहे. याबाबत पडताळणी करीता आवश्यक असलेला सक्षम कार्यालयाचा मोजणी नकाशा नसतांना भुसंपादनाचे वरील प्रकरणां मध्ये कोणत्या कागदपत्रा आधारे बाधीत क्षेत्राची मोजणी करून त्याचे क्षेत्रफळ निश्चित केले याचा बोध होत नाही. तसेच अर्जदारांनी देखील त्यांचे अर्जात त्यांचे मालकीचे किती क्षेत्र बाधीत होत आहे, याचा उल्लेख केलेला नाही. यावरून मावेजा देण्या करीता काढण्यात आलेले बाधीत क्षेत्र कोणत्या आधारे ग्राहय धरण्यात आले या बाबत संभ्रमता आहे. तसेच मोजणी नकाशा बाबत कार्यालयामार्फत तालुका निरीक्षक भुमी अभिलेख यांना दि.१९.८.२००५ रोजी लिहीलेले पत्र हे संबंधितांना प्राप्त झाल्याचे दिसुन येत नाही. कारण सदर पत्रावर ‘‘पत्र प्राप्त’’ म्हणून अर्जदार श्री.पवार यांचीच स्वाक्षरी असल्याचे दिसुन येते. थोडक्यात तालुका निरीक्षक भुमी अभिलेख यांचेकडील नकाशा आवश्यक आहे हे वेळीच लक्षात येऊनही प्रस्ताव वरिष्ठांकडे सादर करण्यात आलेला आहे.

६. संचिके मध्ये उपलब्ध असलेल्या कागदपत्रा वरून विशेषत: अर्जदारांनी दाखल केलेल्या कागदपत्रांची अधिक शहानिशा न करता तसेच त्याचे वैधते बाबत विशेष सखोल पडताळणी न करता छाननी केल्याचे दिसुन येते. तसेच मा.न्यायालयात प्रकरण क्र.१०४५/१९९७ मधील सन २००० साली झालेल्या व मा.न्यायालयाने त्यास दिलेल्या मान्यते नुसार तडजोड पत्रा मधील मालकीहक्क, ताबा, बाधीत भागाचे मावेजा बाबतचे अधिकार या संदर्भातील मुद्यांकडे

जाणीव पूर्वक दुर्लक्ष केल्याचे दिसुन येते. विशेष म्हणजे वरील तडजोडपत्र अर्जदारांनी स्वत: त्यांचे अर्जासोबत जोडलेले असून त्याकडील दुर्लक्ष ही बाब गंभीर अनियमितता असल्याचे दिसुन येते.

७. कार्यालयामार्फत प्रस्तावित बाधीत जमीनीचा मोबदला चटई क्षेत्र निर्देशांकाचे स्वरूपात यापूर्वीच देण्यात आल्याची बाब बांधकाम परवानगी क्र.२१३/२००३ दि.२८.७.२००३ संचिका क्रमांक ४५८/१७/२००२ मधील टिपणी नुसार विद्यमान सहाय्यक संचालक नगर रचना यांचे नजरे समोर असतांना त्याला दुर्लक्षीत करणे ही बाब देखील आक्षेपार्ह आहे.

८. प्रकरणा मधील टिपणी बाजू पाहता प्रस्तावित संपादीत करावयाची जमीन ही नेमकी कोठे आहे, कुठल्या परिस्थिती मध्ये आहे, जागेवरील झालेल्या विकासा बाबतची खात्री इत्यादी बाबत संपूर्ण उहापोह झाल्याचे दिसुन येत नाही. तांत्रिकदृष्टया आवश्यक स्थळपाहणी करून वरील बाबीसह सविस्तर टिपणीचा प्रकरणी अभाव दिसुन येते. सर्व तांत्रिक स्तरावरील टिपणी मध्ये स्थळनिरीक्षणे स्पष्टपणे नोंदविलेली दिसुन येत नाहीत. मावेजा रक्कम पाहता सहाय्यक संचालकाचे स्तरावर या बाबत विशेष स्थळ निरीक्षण होणे आवश्यक होते. परंतु याठिकाणी त्यांनी स्थळ निरीक्षण केल्याचे संचिकेवरून आढळुन येत नाही. शिवाय मुळ संचिकेतील पृष्ठ क्र.९ ते ११ वर केलेले मुल्यांकन हे वस्तुस्थितीनुसार नसुन ते काल्पनिक स्वरूपाचे आहे. कारण याठिकाणी बाधीत क्षेत्राची तपासणी न करता, मालकीहक्क व अधिप्रमाणित मोजणी नकाशा न तपासता / मागणी न करता किंवा इतर अनुषंगीत कुठलेही कागदपत्रे न तपासता फक्त दुय्यम आवेक्षक यांच्या काल्पनीक व सदोष मुल्यांकनास सहाय्यक संचालक नगर रचना यांनी मान्यता देणे ही बाब अंत्यत गंभीर आहे.

९. परिच्छेद क्र.१४ मध्ये नमुद केल्या प्रमाणे मा.उप महापौर, मनपा औरंगाबाद यांचे पत्र क्र.१७.८.२००५ व शासनांचे उप सचिव (नगर विकास विभाग) यांचे पत्र दि.१८.८.२००५ अन्वये प्राप्त झालेल्या संदर्भाचा संचिका टिप्पणी मध्ये प्रस्ताव हा स्थायी समिती समोर ठेवण्यापूर्वी कुठेही उल्लेख करण्यात आलेला नाही किंवा त्यानुसार काहीही खातरजमा न करताच, प्रस्ताव हा मान्यतेस्तव स्थायी समिती समोर ठेवण्यात आलेला आहे. म्हणजेच मा.उप महापौर, मनपा औरंगाबाद व शासनाकडून कळविण्यात आलेले असतांनासुध्दा त्याकडे दुर्लक्ष करून प्रस्ताव हा मान्यतेस्तव सादर करण्यात आलेला आहे, ही बाब गंभीर असून दखलपात्र आहे. महापालिकेद्वारा प्रस्तुत प्रकरणांतील वस्तुनिष्ठ अहवाल हा कार्यालयीन पत्र क्र.मनपा /नरवि/ ससंनर / भुसं/ ३१७१/ २००५ दि.२९.१०.२००५ रोजी शासनास सादर करण्यात आलेला आहे (C-३९७). मात्र मा.उप महापौर, मनपा औरंगाबाद यांना त्यांनी दिलेल्या पत्रा बाबत काहीही कळविणेत आलेचे दिसुन येत नाही.

१०) भुसंपादन प्रकरणांची छाननी व त्यामधील आवश्यक कागदपत्रांची सांगोपांग पडताळणी व सादरीकरण इत्यादी व यासह इतर तांत्रिक बाबी याबाबतीत निश्चित कार्यालयीन पध्दती असणे आवश्यक आहे. तसेच या बाबीचा सखोल अभ्यास असणारे सर्व स्तरावरील अधिकारी

/ कर्मचारी यांचे मार्फत अशा प्रकरणांची सुक्ष्म छाननी होणे ही कार्यालयाचे दृष्टीने हिताची बाब होती / आहे. उक्त प्रकरण जवळपास संपूर्णपणे दुय्यम आवेक्षक (वर्ग-३ दर्जा) यांनी हाताळलेले दिसुन येते व त्यांचे टिपणी / निरीक्षणावर सरळ सहाय्यक संचालक, नगर रचना यांनी सहमती दर्शवित वरिष्ठांकडे सादरीकरण केलेले आहे. वास्तविक नगर रचना विभागात शाखा अभियंता, उप अभियंता / नगर रचनाकार व सहाय्यक संचालक, नगर रचना या क्रमाने प्रकरण सादरीकरण होणे आवश्यक आहे. मात्र या प्रकरणा मध्ये शाखा अभियंता तसेच उप अभियंता / नगर रचनाकार यांचे टिपणी / अभिप्राय नसणे ही बाब देखील शंका निर्माण करणारी आहे. दुय्यम आवेक्षकाची कार्यक्षमता, त्याची भुसंपादन प्रकरणातील अभ्यासाची तसेच धारणेची खोली व विषयाचे आकलन याबाबत सहाय्यक संचालक नगर रचना यांनी वेळीच विचार करणे आवश्यक होते. परंतु तसे या ठिकाणी झालेले नाही.

**क)** संचिकेतील टिपणी बाजू व सहकागदपत्रांची छाननी करण्यात येऊन त्या बाबत ज्या काही आक्षेपार्ह बाबी निदर्शनास आल्या आहेत, त्या बाबी हया संबंधित कर्मचारी / अधिकारी यांना अवगत करून तत्ससंबंधिची खातरजमा / शहानिशा करण्यात आलेली आहे. विशेषत: श्री.एम.डी.राठोड, सहाय्यक संचालक नगर रचना, श्री.ओ.सी.शिरसाठ, विधी सल्लागार व श्री.एस.एस.गायकवाड, तत्कालीन दुय्यम आवेक्षक, नगर रचना विभाग यांना लेखी स्वरूपात पाचारण करून अपेक्षित मुद्दांबाबत विचारणा करण्यात आली असता श्री.एम.डी.राठोड व श्री.एस.एस.गायकवाड यांनी अनुक्रमे दि.२१.१२.२००५ व दि.२३.१२.२००५ रोजी खुलासा सादर केलेला आहे. खुलाश्या मध्ये ज्या बाबी संबंधिताकडून निदर्शनास आणुन देण्यात आलेल्या आहेत त्याबाबतचा उहापोह हा निष्कर्षा मध्ये अंतर्भुत करण्यात आलेला आहे.

**एकंदरीत प्रस्तुत प्रकरणी परिच्छेद (अ) मधिल मुद्दा क्र.१ ते १५ प्रमाणे भू-संपादना बाबतचा मोबदला अदाईच्या दृष्टीने नगर रचना विभागाने वेळोवेळी केलेल्या कार्यवाही बाबतचा उहापोह करण्यात आलेला असून परिच्छेद (ब) मधिल मुद्दा क्र.१ ते ४ नुसार सदरहू प्रकरणांतील तपासणी बाबतचे निष्कर्ष नमूद करण्यात आलेले आहेत. शिवाय परिच्छेद क नुसार प्रकरणाशी संबंधित कर्मचारी / अधिकारी यांना चर्चेसाठी पाचारण करून वस्तुस्थिती बाबत खातरजमा /शहानिशाही करण्यात आलेली आहे. सदर निष्कर्षानुसार,**

(१) गारखेडा सर्व्हे नं.५३ मधिल भू-संपादन मोबदला प्रस्ताव प्रक्रियेमधे ज्या रस्त्याचा मोबदला प्रस्तावित आहे त्यावर मे.अश्विनी ट्रेडिंग कंपनी यांचा मालकीहक्क असतांना त्याच जागेचा मोबदला हा अर्जदार श्री.राजेंद्र पवार व इतर यांना अदाईस्तव प्रस्तावित करणे.

(२) श्री.लक्ष्मण शंकर यांच्या नावाने ७/१२ वर मालकीहक्काची नोंद असली तरीही त्यांच्या मालकीच्या जागेचे स्थान निश्चित करणारे अधिकृत नकाशे नसणे.

**(३)** सर्व्हे क्र.५३/२/१ व ५३/२/२ मधिल रस्त्या बाबत मे.अश्विनी ट्रेडिंग कंपनीतर्फे श्रीमती.सुशिलादेवी रमेशकुमार बगडीया यांना चटई क्षेत्र निर्देशांक स्वरूपात मोबदला दिल्याबाबतची खातरजमा न करताच त्याच रस्त्याचा मोबदला हा श्री.राजेंद्र पवार व इतर यांना अदाईस्तव प्रस्तावित करणे.

**(४)** सर्व्हे नं.५३/२/१ व ५३/२/२ बाबत हक्कसोड करारानामा (Relinquishment Deed) हा महापालिकेच्या नांवे दि.२२.३.२००१ रोजी मे.अश्विनी ट्रेडिंग कंपनी यांनी करून दिलेला असतांनाही त्याबाबतची नोंद ही महापालिकेच्या नांवे न करणे / ताबा पावती न घेणे.

**(५)** नगर विकास विभाग, मंत्रालय मुंबई आणि मा.उप महापौर, मनपा औरंगाबाद यांनी लेखी स्वरूपात कळविलेल्या सुचनांची दखल न घेताच प्रस्ताव सादर करणे आणि असे करत असतांना अनुषंगिक कुठल्याही कागदपत्रांची छाननी / खातरजमा न करताच रू.१,२९,३०,०२६/- एवढया रकमेचा मावेजा अदाईच्या दृष्टीने दुय्यम आवेक्षक यांचेकडुन सहा.संचालक नगर रचना, यांचेकडे प्रस्ताव रास्त सादर होणे या व निष्कर्षातील इतर गंभीर नि दखलपात्र अनियमितता निदर्शनास आल्या आहेत. त्यामुळे अशा प्रकारच्या गंभीर व दखलपात्र अनियमितते बाबत नगर रचना विभागातील संबंधित कर्मचारी व अधिकारी यांचेवर जबाबदारी निश्चित करण्यात येऊन महाराष्ट्र नागरी सेवा (शिस्त व अपील) नियम, १९७९ अंतर्गत तरतुदीनुसार यथोचित प्रशासकीय कार्यवाही अनुसरणे आवश्यक ठरते असे प्रतिपादन करण्यात आलेले आहे.

दिनांक २४.१.२००६ रोजी संपन्न झालेल्या स्थायी समिती सभेमध्ये वरील विषयी सांगोपांग चर्चा होवून मा.सभापती यांनी असे आदेश दिले आहेत की, या प्रकरणांत जे जे अधिकारी /कर्मचारी सहभागी असतील त्यांची खातेनिहाय चौकशी ही मा.आयुक्तांनी आठ दिवसांत करावी व केलेल्या कार्यवाहीबाबत स्थायी समिती सभेमध्ये अहवाल द्यावा.

सदर प्रकरणी प्रशासनाने काय कार्यवाही केली याबाबतचा बोध अद्यापपावेतो झालेला नाही.

**<u>तपासणी प्रकरण क्र.२</u>**

प्रकरण :- **उत्सव मंगल कार्यालय ते अमरप्रित हॉटेल (पन्नालालनगर,रमानगर) ८० फूट विकास योजना रस्ता भूसंपादनाबाबत.**

लाभार्थी :- **श्री.महेशचंद्र सुरेशचंद्र वकील व इतर.**

आर्थिक वर्ष :- **२००४-२००५**

**१.** उत्सव मंगल कार्यालय ते अमरप्रीत हॉटेल (पन्नालालनगर,रमानगर) ८० फूट रूंद विकास योजना रस्त्याबाबत भू-संपादन तसेच त्यास संलग्न असलेल्या अथवा तत्संबंधी असलेल्या सर्व संचिकांची या विभागाकडील पत्र क्र.मनपा/मुलेप/१५९/०५, दि.२९.१०.२००५

अन्वये सहा.संचालक नगररचना यांचेकडून मागणी करण्यात आलेली होती. उक्त मागणी प्रमाणे नगररचना विभागाने प्रथम विषयांकित संचिका ही दि.१८.११.२००५ रोजी या विभागाकडे पाठविली असून त्यास संबंधित असलेली पन्नालाल नगर रेखांकनाची मूळ संचिका ही दि. १५.०२.२००६ रोजी पाठविण्यात आलेली आहे.

२. वर नमूद केल्याप्रमाणे प्राप्त भूसंपादन प्रकरणाच्या संचिकेची तपासणी केली असता असे निदर्शनास आले की, प्रकरणा अंतर्गत भूसंपादन कार्यवाही ही सन १९९७ मध्ये सुरू करण्यात आलेली असून तसा प्रस्ताव सर्व साधारण सभेसमोर ठेवण्याचे दृष्टीने तत्कालीन शाखा अभियंता यांनी दि.०२.०८.१९९७ रोजी टिपणी सादर केली आहे. उक्त प्रस्तावास प्रशासकीय मान्यता प्राप्त करण्यासाठी दि.०४.०८.१९९७ रोजी उप अभियंता व सहा.संचालक नगररचना यांनी मा.आयुक्त यांचेकडे प्रकरण सादर केल्याचे दिसून येते. मा.आयुक्तांनी अंदाज पत्रकात नमूद केलेल्या रस्त्याचे रूंदीकरण आवश्यक आहे. त्यासाठी Demarcation Survey भूसंपादन प्रस्ताव/ खाजगी वाटाघाटी या सर्व कायदेशीर मार्गांचा अवलंब करून मार्च ९९ पूर्वी रस्ता रूंदीकरणाची कार्यवाही पूर्ण करा अशा अभिप्रायासह प्रस्ताव सर्वसाधारण सभेत ठेवण्यास दि. ०५.०८.१९९७ रोजी मान्यता दिल्याचे दिसून येते. सदर प्रस्तावास मा.सर्व साधारण सभेने दि.१९.०८.१९९७ रोजीच्या ठराव क्र.६६/ २ अन्वये रस्ता संपादित करण्यास मान्यता दिलेली असून त्यानुसार मनपा/नरवि/भूसं/१६३१/१९९८ दिनांक ०१.०६.१९९८ अन्वये सदर रस्त्याअंतर्गत विविध नगर भूमापन क्रमांकांची सुमारे १३४५२ चौ.मी. जागा संपादित करण्यासाठी जिल्हाधिकारी, औरंगाबाद यांचेकडे सविस्तर प्रस्ताव पाठविण्यात आलेला आहे.

३. दरम्यानच्या कालावधीत अध्यक्ष, रमानगर विकास मंडळ यांनी दि.१३.१२.२००० रोजी मा.आयुक्त यांना निवेदन सादर करून रस्ता रद्द करावा अशी विनंती केल्याचे दिसून येते. महानगरपालिका सर्वसाधारण सभा ठराव क्र.६६/२ दि.१९.०८.१९९७ अन्वये उत्सव मंगल कार्यालय ते अमरप्रीत हॉटेल (पन्नालालनगर,रमानगर) ८० फ़ूट रूंद रमानगर मधून जाणारा रस्ता भू-संपादन करण्याबाबत झालेल्या ठरावाची अंमलबजावणी केल्यास रमानगर मधील राहणाऱ्या दलित बांधवांना अडचणीचे होणार आहे म्हणून असा ८० फ़ूट रूंद रस्ता रद्द करावा यासाठी महापालिका सर्वसाधारण सभा ठराव क्र.१८२/१५, दि.१९.१२.२००० नुसार मंजूरी मिळालेली आहे. अशा ठरावानुसार अंमलबजावणी व्हावी या दृष्टीने संबंधित नगरसेवक यांनी त्यांचे पत्र दि.२२.०१.२००१ अन्वये मा.आयुक्त यांना तसेच दि.३१.०१.२००१ रोजीच्या पत्रान्वये मा.आयुक्त व मा.महापौर यांना दि.१९.१२.२००० रोजीच्या ठरावानुसार अंमलबजावणी व्हावी अशी विनंती केल्याचे दिसून येते. अशा विनंती पत्राआधारे उपसंचालक नगररचना महानगरपालिका औरंगाबाद यांनी जा.क्र./मनपा/नरवि/भूसं/२००१/४४, दि.०८.०६.२००१ अन्वये पत्र पाठवून सर्वसाधारण सभा ठराव क्र.६६/२ दि.१९.०८.१९९७ प्रमाणे भूसंपादनाची कार्यवाही सुरू

असल्याने सर्वसाधारण सभा ठराव क्र.१८२/१५ दि.१९.१२.२००० अन्वये भूसंपादन रद्द करण्याबाबत जो ठराव झालेला आहे त्याविषयी पुनर्विचार करून सदर रस्त्याच्या विकासाकरिता भूसंपादनास सहकार्य करावे अशी विनंती संबंधित नगरसेवक यांना केलेली आहे असे दिसून येते.

४. सहाय्यक संचालक नगररचना, महानगरपालिका औरंगाबाद यांनी जा.क्र.मनपा/नरवि/भूसं/६७७/२००४, दि.१२.०३.२००४ अन्वये नगर -भूमापन अधिकारी, औरंगाबाद यांना पत्र देवून तूर्त उत्सव मंगल कार्यालय ते रमानगर ८० फ़ूट रूंद विकास रस्त्याची संयुक्त मोजणी करून त्याबाबतचा अहवाल (मोजणी नकाशासह) विशेष भूसंपादन अधिकारी (विशेष घटक) औरंगाबाद यांना सादर करून तसे महापालिकेस कळविण्याबाबत विनंती केलेली आहे. अशा पत्राआधारे नगर भू-मापन अधिकारी-१, औरंगाबाद यांनी सदर रस्त्यांची मोजणी करून त्याबाबतचा अहवाल हा विशेष भू-संपादन अधिकारी (विशेष घटक) औरंगाबाद यांना दि.१२.०४.२००४ अन्वये सादर करून तसे महापालिकेसही कळविलेले आहे. परिणामी, विशेष भू-संपादन अधिकारी (विशेष घटक) यांनी रस्त्याचे भूसंपादन करण्यासाठी (उत्सव मंगल कार्यालय ते रमानगर या रस्त्यासाठी एकूण क्षेत्र १३४५२ चौ.मी.) २/३ रक्कम रू.१.५० कोटी भरणा करावा असे त्यांचेकडील दि.२१.०४.२००४ रोजीच्या पत्रानुसार सहाय्यक संचालक नगररचना महानगरपालिका औरंगाबाद यांना कळविले आहे.

१. संचिका पृष्ठ क्र.एन-१८ परि.(५१) मध्ये सहाय्यक संचालक नगररचना यांनी प्रकरणात रेखांकन मंजुरीची मूळ संचिका, सन १९७५ डीपी चा पार्ट प्लान तसेच २००१ च्या डीपी चा पार्ट प्लान व Relinquishment Deed ही कागदपत्रे संचिकेत समाविष्ट करून वस्तुनिष्ट अहवाल सादर करणे बाबत नमूद केलेले आहे. त्यानुषंगाने संचिका पृ.क्र.एन-१९ चे अवलोकन केले असता असे दिसून येते की, तत्कालीन दुय्यम आवेक्षक यांनी त्यांच्या टिपणीमध्ये सदर रेखांकनातील आरक्षित जागेबाबत संबंधित मिळकतधारकांनी Relinquishment Deed करून दिलेले नाही,असा उल्लेख केलेला आहे. तसेच रेखांकनास अंतिम मंजूरी आदेश क्र.जा.क्र./मनपा/जीएडी-२/२३१-१७-७०/२२७५/७४, दि.०८.०८.१९७४ अन्वये दिल्याबाबतचाही उल्लेख टिप्पणी मध्ये करण्यात आलेला आहे. मिळकतधारकाचे उपरोक्त आरक्षणाखालील ( प्रा.शा.व खुली जागा) क्षेत्र-सुधारीत मंजूर विकास योजनेमध्ये निवासी क्षेत्र दर्शविण्यात आलेले आहे यावरून असे दिसून येते की, विकास योजनेआधारे ८० फ़ूट व ४० फ़ूट रस्ता आणि प्रा.शा. व खुली जागा क्षेत्र ही महापालिकेस हस्तांतरीत केलेले नाहीत. त्यामुळे मिळकत धारकाचे उक्त आरक्षणाखालील क्षेत्र रहिवासी म्हणून सुधारीत विकास योजना मध्ये समाविष्ट झालेले आहे. तसेच उपरोक्त ८० फूट, ४० फूट रूंद रस्त्याखालील क्षेत्र व विकास योजना आरक्षणाखालील क्षेत्र वगळून मिळकत धारकाने रेखांकन मंजुरी आदेशानुसार फ़क्त अंतर्गत रस्ते व रेखांकन खुली जागा

मनपास हस्तांतर केलेले दिसते आणि मिळकत धारक हे फ़क्त विकास योजना ८० फूट रूंद रस्त्याखालील जमिनीचा (संयुक्त मोजणी नकाशाप्रमाणे ३९९७.५० चौमी )मोबदला मागणी करत आहेत असाही उल्लेख करण्यात आलेला आहे.

वरील टिपणी आधारे सादर प्रस्तावाबाबत संबंधित शाखा अभियंता यांनी स्वाक्षरी करून प्रस्ताव हा सहा.संचालक नगररचना यांचेकडे सादर केल्याचे दिसून येते.

२. नगररचना विभागाचे शाखा अभियंता यांनी नगर भू-मापन क्र. १४८१३ पैकी ३९९७.५० चौ.मी. इतके बाधीत क्षेत्र दर्शवून सदर बाधीत जागेचे मूल्यांकन हे रू.८०३६९१९/- इतके केलेले असून सहा.संचालक नगररचना व मुख्य लेखाधिकारी यांनी त्या मूल्यांकनास मान्यता देवून प्रस्ताव हा मा.आयुक्त यांचेकडे सादर केलेला आहे. उक्त प्रस्तावास मा.आयुक्त यांनी दि. ०६.०८.२००४ रोजी मान्यता देवून प्रकरण हे स्थायी समिती समोर ठेवावे असे सूचित केलेले आहे. त्यानुसार स्थायी समिती ठराव क्र.७९, दि. ११.०८.२००४ अन्वये प्रस्तावास मान्यता मिळाली असून रू.८०३६९१९/- इतकी रक्कम ही संबंधित मिळकतधारकांना दोन हप्त्यात देण्याबाबतही निर्णय झालेला आहे. सदर ठरावाआधारे श्री.महेशचंद्र सुरेशचंद्र वकील व इतर यांना प्रमाणक क्र.३३४१ दि.१३.८.२००४ अन्वये रू.४०१८४५९/-, प्रमाणक क्र.३६२१ दि.२१.८.२००४ अन्वये रू. ३६९३०४६/- व प्रमाणक क्र.७७७६ दि.१७.११.२००४ अन्वये रू.४१०३३८/-असे एकूण रू.८१२१८४३/- प्रदान करण्यात आलेले आहेत. अशा प्रदान रकमांमध्ये नोंदणी शुल्कामधील जादा कपात केलेली रक्कम रू.८४९२४/- ही समाविष्ट आहे.

उपरोक्त प्रमाणे नमूद १ ते ६ पर्यंतच्या असलेल्या मुद्याबाबत मूळ संचिका तसेच अनुषंगिक सर्व कागदपत्रे यांची सविस्तर तपासणी व सर्व बाबींचा सांगोपांग विचार करून खालील प्रमाणे मुद्ये निर्णयास्तव काढण्यात आलेले आहेत व त्याबाबतचा निष्कर्ष त्यांचेसमोर दर्शविला आहे.

१. प्रस्ताव शासनाकडे प्रलंबित असतांना खाजगी वाटाघाटीने प्रस्ताव विचारार्थ घेण्यासाठीचे प्रयोजन/ आधार काय आहे ?

२. प्रस्ताव सादर करण्यापूर्वी संपादित होणाऱ्या जमिनीचा मोबदला मागणी करीता मिळकतधारक अथवा इतर यांचे अर्ज आहेत काय याचा विचार न करताच कार्यवाही करणे.

३. संचिका सुरू करण्यास कोणत्याही स्तरावर वरिष्ठांची मान्यता आवश्यक आहे किंवा कसे ?

४. सर्वसाधारण सभेचे ठराव क्र.६६/२ दि.१९.८.९७ व ठराव क्र.१८२/१५ दि.१९.१२.२००० च्या दुरूस्तीबाबत /रद्य करणे बाबत ठराव नसतांना प्रस्ताव सुरू करून अदाईची कार्यवाही अनुसरणे.

५. स्थायी समिती ठराव हा परिपूर्ण आहे किंवा कसे याबाबत खातरजमा करून कार्यवाही न करणे.

६. पूर्ण क्षेत्र मालकी हक्क दर्शविणारा उतारा आहे काय किंवा कसे, १९७४ मध्ये मंजूर झालेले ले-आऊट १९७२ साली डीडीटीपी यांनी दिलेल्या रेखांकन मंजूरीस सर्वांच्या नोंदी आहेत.

त्याकडे दुर्लक्ष झाले काय किंवा कसे, प्रकरण जमिन संपादन करण्याचे कार्यवाहीमध्ये अनियमितता झालेली आहे काय ?

**<u>निष्कर्ष :–</u>**

१. संचिकेचे अवलोकन केले असता प्राथमिक तपासणी मध्ये असे आढळून येते की, उक्त रस्त्याचा भूसंपादन करणेबाबतचा प्रस्ताव महानगरपालिकेमार्फ़त सुरू करण्यात आला आहे. रस्त्याच्या आवश्यकतेबाबत संचिकेमध्ये नमूद करून सदर भूसंपादनाचेदृष्टीने कार्यवाही ही १९९७ साली सुरू करण्यात आल्याचे दिसून येते. सदर कार्यवाही, मंजूरी व इतर बाबी पाहता भूसंपादन प्रस्ताव/खाजगी वाटाघाटी या बाबींचा उल्लेख करून तत्कालीन मा.आयुक्तांनी दिलेल्या मंजूरी आधारे भूसंपादन प्रस्ताव हा मा.जिल्हाधिकारी यांचे मार्फ़त विशेष भूसंपादन अधिकारी,विशेष घटक, औरंगाबाद यांचेकडे पत्र जा.क्र./मनपा/नरवि/भूसं/१६३१/१९९८ दि.१.६.१९९८ अन्वये वर्ग करण्यात आल्याचे दिसून येते नि विशेष भूसंपादन अधिकारी यांचेमार्फ़त कार्यवाही ही सुरू झाल्याचे व प्रसंगानुरूप महानगरपालिकेशी पत्रव्यवहार केल्याचे दिसून येते. सदर प्रकरणी भूसंपादनाची कार्यवाही ही आवश्यक सक्षम कार्यालयामार्फ़त म्हणजेच जिल्हाधिकारी कार्यालया मार्फ़त सुरू असतांना तद्नंतर त्याच भूसंपादनाची कार्यवाही ही खाजगी वाटाघाटीने पुन्हा सुरू करण्याबाबत सक्षम मान्यता घेतल्याचे दिसून येत नाही. तसेच खाजगी वाटाघाटी बाबत प्रस्ताव पुनश्च: विचारार्थ घेण्यासाठीचे प्रयोजन काय ? याचाही स्पष्ट बोध संचिकेतील कागदपत्रावरून होत नाही. सहा.संचालक, नगररचना, महानगरपालिका,औरंगाबाद यांनी अशा अनियमिततेबाबत प्रस्ताव सादर /सुरू करण्यापूर्वी गांभीर्याने विचार करणे आवश्यक होते. परंतू तसे या ठिकाणी झालेले नाही.

२. उक्त भूसंपादन प्रकरणातील संचिकेची उकल केली असता भूसंपादन खाजगी वाटाघाटीने करणे बाबत अथवा तत्सम मार्गाने करणेबाबत अथवा कायद्याअंतर्गत असलेल्या तरतूदी मार्फ़त मूळ मालकांनी लेखी सूचना दिल्याचे अथवा मागणी केल्याचे आढळून येत नाही. त्याआधारे विचार केला असता मालक निश्चित नसतांना संपादीत होणाऱ्या जमिनीचे मिळकतधारक निश्चित करणे याची देखील सखोल पडताळणी केल्याचे दिसून येत नाही. संचिकेमधील मिळकत पत्रिकेवरील मालकांनी प्रस्तावित भूसंपादनाबाबत कोणत्याही प्रकरणी मावेजा मागणी केल्याचे दिसून येत नाही.

३. भूसंपादन प्रकरण सुरू करणेस / खरेदी सुचनावर आवश्यक कायद्याअंतर्गत कारवाई सुरू करणेस मा.सर्वसाधारण सभेच्या मान्यतेची आवश्यकता असल्याने तशी मान्यता प्रथम घेणे क्रमप्राप्त होते. तथापि उक्त प्रकरणामध्ये खाजगी वाटाघाटीने जमिन संपादन करणेबाबत सक्षम मान्यता घेण्यात आली नसल्याचे प्राथमिक संचिका पहाणीवरून दिसून येते. लेखा परीक्षणाचे दृष्टीने ही बाब अत्यंत अनियमित स्वरूपाची आहे.

४. पन्नालालनगर येथील उक्त रस्ता रूंदीकरणाकरीता भूसंपादित जागेबाबत संपादनाचे दृष्टीने संचिकेमधील ठरावाचे अवलोकन केले असता मा.सर्वसाधारण सभा ठराव क्र.६६/२ १९.८.१९९७ नुसार संपादनास मान्यता आहे. तथापि खाजगी वाटाघाटीने त्या कराव्यात असा स्पष्ट उल्लेख ठरावामध्ये नाही अथवा ठरावावरून तशा प्रकारे भूसंपादन करावे असा देखील बोध होत नाही. त्यामुळे या ठरावाचे अवलोकन केल्यास वाटाघाटी खाजगी तत्वावर करण्यास सर्वसाधारण सभेपुढे पुनश्च प्रस्तावित करून (पूर्वीचा ठराव रद्द करून )त्यास मान्यता घेणे क्रमप्राप्त होते. प्रकरणामध्ये सन २००० साली देखील अशासकीय ठराव क्र.१८२/१५ दि.१९.१२.२००० प्रमाणे मंजूर असून त्यानुसार सदर ८० फ़ूट (२४ मी) रूंद रस्ता हा रमानगर या वस्तीमधून जाणार असल्याने सदर वस्तीमधून जाणारा रस्ता रद्द करणे बाबत मा.सर्वसाधारण सभेची मान्यता आहे. ठरावाचे निष्कर्ष पहाता रमानगर भागातून जाणारा रस्ता हा संपूर्णपणे वगळण्यात आला आहे. मात्र मंजूर ठरावामध्ये अशा रस्त्यासाठी पर्यायी व्यवस्था अथवा इतर मार्ग सुचविण्यात आल्याचे दिसून येत नाही. परिणामी सदर २४ मी रूंद रस्ता जो रमानगर वस्तीमधून विकास योजने मध्ये प्रस्तावित होता तो या ठरावाद्वारे विकासयोजनेतून वगळण्यात आल्याचे स्पष्ट होत असल्याने सदर जमिन भूसंपादन प्रकरण सुरू करण्यापूर्वीची त्या ठरावाबाबत अधिक विचार होणे आवश्यक होते किंबहूना त्या बाबत सुधारीत ठराव सर्वसाधारण सभेमार्फ़त करून घेणे उचित होते . तथापि या ठिकाणी तसे झाल्याचे दिसून येत नाही. वास्तविक पाहता मा.सर्वसाधारण सभेच्या ठराव क्र.१८२/१५ नुसार २४ मी रूंद रस्ता उत्सव मंगल कार्यालय ते अमरप्रीत हॉटेल (पन्नालानगर,रमानगर) हा रद्द झाल्याचे स्पष्ट आहे. परंतु त्याबाबत प्रशासनाने तद्नंतर आवश्यक ती कार्यवाही केल्याचे दिसून येत नाही. यावरून सदर रस्ता रद्द झाल्याचे अथवा वगळण्यात आल्याचे स्पष्ट असतांना त्याच रस्त्याचा मावेजा प्रस्तावित करणे/देणे ही बाब अत्यंत गंभीर स्वरूपाची असून भविष्यात नियोजनानुसार रस्ता पूर्ण होणार नसेल /तो रद्द केला असेल तसेच त्या रस्त्याचा नियोजनातील उद्देशचपूर्ण होवू शकणार नसेल तर त्या रस्त्याचे भूसंपादन करणे आणि त्यानुसार अदाई करणे ही बाब अयोग्य आहे. सहा.संचालक यांनी प्रथमत: याबाबत तांत्रिकदृष्टया सखोल विचार करावयास हवा होता. परंतू याबाबत कोठेही विचार झालेला नसून अनावश्यक भूसंपादन प्रस्ताव सादर करून रू. ८०३६९१९/- एवढ्या रकमेचा मोबदला अदा करणे ही बाब नक्कीच समर्थनीय असू शकत नाही.

५. उक्त प्रकरणाची संचिका पडताळणी करतेवेळी मा.स्थायी समिती द्वारा सदर भूसंपादन प्रकरणी मावेजा देण्यास मान्यता दिल्याचे ठराव क्र.७९ दि.११.०८.२००४ नुसार दिसून येते. तथापि सदर ठरावामध्ये विविध मुद्याबाबत संदिग्धता आढळून येते. कारण ठरावामध्ये ज्या जमिनमालकास मावेजा अदा करावयाचा आहे त्याचे नांव नमूद नाही, त्याचे मालकी हक्काबाबत उल्लेख नाही, खाजगी वाटाघाटी करणे बाबत आवश्यक स्तरावरील मान्यतेचा उल्लेख नाही, विशेष भूसंपादन अधिकारी यांचेकडून झालेल्या कार्यवाही बाबत उल्लेख नाही

आणि  ठरावाद्वारे उक्त मावेजा रक्कम ही कोणास व कोणत्या स्वरूपात अदा करावी याबाबत उल्लेख करण्यात आलेला नाही. एकूणच प्रशासनाद्वारे सादर केलेल्या व त्यानुषंगाने स्थायी समिती सभेद्वारा मंजूर झालेल्या ठरावाचे स्वरूप हे  अत्यंत मोघम  व अपूर्ण स्वरूपात असल्याचे  दिसून येते.  परिणामी सहा.संचालक नगररचना यांनी दाखल केलेला  प्रस्ताव /सादरीकरण  हे सदोष असल्याचे व सदोष प्रस्तावास  स्थायी समिती द्वारा मान्यता दिल्याचे दिसून येते.

६  सदर नगरभूमापन  क्र.१४८१३   पन्नालालनगर  या मिळकतीमधून विकास योजनेनुसार जाणाऱ्या ८० फ़ूट (२४ मी रूंद) रूंद रस्त्याचे बाधीत क्षेत्राचा मावेजा प्रकरणी जमिन संपादीत करण्याचे   कार्यवाहीमध्ये बहुतांशी अनियमितता झाल्याचे प्राथमिक तपासणीमध्ये दिसून येते. अनियमितता तपशील हा खालीलप्रमाणे आहे.

अ) नगरभूमापन  क्र. १४८१३ स.नं.४८ (स.नं.४८(पी)   उस्मानपुरा  येथील मिळकत पत्रिकेवरील    नोंदी ह्या भूसंपादन  प्रकरण हाताळतेवेळी विचारात   घेण्यात आल्याचे दिसून येत  नाही.  मालकी  हक्काबाबतच्या  नोंदीनुसार  रस्त्याने  बाधीत क्षेत्र व इतर क्षेत्रात तफ़ावत   असल्याचे दिसून येते मोजणी नकाशानुसार क्षेत्र व मावेजा क्षेत्र यामध्ये तफ़ावत  आढळून येते  तसेच   रस्ता रूं दीकरणाने  बाधीत  झालेल्या क्षेत्राबाबत  आखीव  पत्रिकेवर लाभार्थीचे नांव  नसल्याचे दिसून येते.

ब) आखीव पत्रिकेमधील मिळकतधारकांनी त्यांचेपैकी  एक  असलेल्या मिळकतधारकास जीपीए   देण्यात आल्याचे दिसते.  सदर  जीपीए  हा  नोटरीद्वारा   प्रमाणित आहे.  वास्तविक  पहाता  अधिकारपत्र  हे नोंदणीकृत असणे आवश्यक  आहे.

क) महाराष्ट्र म्युनिसिपाल्टीज ॲक्ट १९६५ चे कलम १७३, १७४  नुसार रेखांकनातील  रस्ते  हे  तत्कालीन नगरपरीषदेस हस्तांतरीत झाल्याची नोंद रेखांकन  आदेशातील अट  क्र.८ मध्ये  आहे. त्याचा शब्दश: अर्थ विचारात घेतल्यास उक्त  ८० फूट(२४ मी रूंद )  रस्ता रेखांकन   नकाशावर  दर्शविण्यात  आला असून  तो रेखांकनाचाच एक भाग  विचारात घेतल्यास वरील रेखांकन   अटीनुसार सदर    रस्ता  हा  न्यू पब्लिक स्ट्रीट  म्हणून घोषित होवून नगरपरिषदेस  हस्तांतरीत झाल्याचे दिसून येते. उक्त अट व कलम १७३,१७४ बाबत विकास योजना रस्ता या शिर्षाकरीता अधिक स्वयंस्पष्ट नाही त्यामुळे    उक्त विकास योजना रस्ता  रेखांकनाचा भाग विचारात घेणेबाबत संदिग्धता वाटते. रेखांकन संचिकेमधील तत्कालीन उपसंचालक नगररचना, औरंगाबाद विभाग यांचेशी झालेला पत्रव्यवहार पहाता उक्त रेखांकनामध्ये ८० फ़ूट व ४० फ़ूट रूंदीचे विकास योजना असल्याचे दिसून येतात. त्यानुसार त्यावेळी संबंधित मिळकतधारकांनी रेखांकन नकाशे सुधारीत करून( ८० फ़ूट व ४० फ़ूट रूंद रस्त्याचा समावेश करून) नकाशे दाखल केल्यानुसार उपसंचालक, नगररचना ,औरंगाबाद यांनी

दिलेल्या मान्यतेप्रमाणे तत्कालीन नगर परिषदेने रेखांकनास मान्यता विकास योजना रस्त्यासह दिल्याचे दिसते. विकास योजना रस्त्याचा मावेजा नियमावली / कायद्यानुसार निर्धारीत केलेल्या कालावधीमध्ये देणे स्थानिक नियोजन प्राधिकरणास बंधनकारक आहे. उक्त रस्ता हा विकास योजना रस्ता असल्याने व तसेच कलम १७३,१७४ नुसार रेखांकन अट क्र.८ बाबत संदिग्धता असल्याने त्याचा मावेजा देण्याबाबत प्रशासकीय विचार होण्यास हरकत नसावी. तथापि रेखांकन संचिका व अन्य उपलब्ध अभिलेखे विचारात घेता मुदत अधिनियमातील तरतुदी बाबत मावेजा अदा करतेवेळी विचार केल्याचे दिसून येत नाही. मुदत अधिनियम १९६३ मधील तरतुदीनुसार सदर रस्त्याबाबतच्या मावेजाची मागणी ही संबंधित मिळकतधारकांकडून नियमाने निर्धारीत केलेल्या कालावधीमध्ये होणे आवश्यक होते. त्याच प्रमाणे प्रशासनाने देखील मावेजा अदा करतेवेळी मुदत अधिनियमाचा विचार करणे आवश्यक होते. विद्यमान रस्त्याची स्थिती ही दि.१४.८.२००२ रोजी नगरभूमापन विभागासोबत झालेल्या संयुक्त मोजणी नकाशानुसार आणि त्यावेळी त्याठिकाणी झालेला विकास इत्यादीचा सखोल अभ्यास केल्याचे संचिकेवरून दिसून येत नाही. शिवाय मुदत अधिनियमातील तरतुदीनुसार झाल्याचे अथवा त्याबाबत शहानिशा केल्याचे दिसून येत नाही. मुदत अधिनियमातील तरतुदी आणि प्रकरणातील उपलब्ध अभिलेखे व रस्त्याची विद्यमान स्थिती विचारात घेतल्यास सदर मावेजा हा संबंधितास देय ठरू शकत नाही असे लेखा परीक्षणाअंती वाटते.

ड) प्रकरणामध्ये मिळकतधारकांनी मावेजा मिळणे बाबत कोणत्याही स्वरूपात मागणी अर्ज केल्याचे अभिलेखावरून दिसून येत नाही. शिवाय विकास कामे करतेवेळी मिळकतधारकाकडून अडथळा आणल्याचेही निदर्शनास येत नाही. परिणामी जागेवरील प्रत्यक्ष स्थिती नुसार त्या ठिकाणी दि.३०.३.९६ रोजी रस्त्याच्या खडीकरणाचे काम महानगरपालिकेने पूर्ण केलेले आहे. तसेच दि.३०.४.९८ रोजी उक्त रस्त्यावर डांबरीकरणाचेही काम पूर्ण झालेले आहे म्हणजेच विचाराधीन जागा ही महानगरपालिकेच्या निर्विवादपणे ताब्यात असतांना महानगरपालिकेने मावेजा देण्याच्या कार्यवाही अंतर्गत उक्त बाबींकडे दुर्लक्ष करून मावेजा देण्यासंदर्भी एकतर्फ़ी कार्यवाही केलेली आहे असे स्पष्ट होते.

ई) उक्त उत्सव मंगल कार्यालय ते अमरप्रित हॉटेल ८० फूट रूंद रस्त्याच्या खाजगी जमिन संपादन करण्याबाबतच्या प्रस्तावामध्ये (परिशिष्ट अ जा.क्र./मनपा/नरवि/भूसं/१६३१/१९९८, दि.१.६.९८ ) एकूण संपादनास हवे असलेले एकूण क्षेत्र १३४५२ चौमी एवढे दर्शविण्यात आले आहे. परिणामी कलम ४ किंवा ६ ची अधिसूचना काढणेपूर्वी भूसंपादक संस्थेकडून शासन, निर्णयानुसार २/३ रक्कम जमा करून घेणेबाबतचे पत्र (जा.क्र.विभूसंअ/विघऔ/भूसं/३६८ दि.२१.४.०४) महापालिकेस प्राप्त झाले असून त्यानुसार केलेली २/३ रक्कम रू.१.५० कोटीची मागणी ही संपूर्ण क्षेत्र १३४५२ चौ.मी. एवढ्या क्षेत्राकरीता असल्याचे दिसते. तथापि मा.स्थायी

समिती प्रस्तावामध्ये व संचिकेमधील इतर ठिकाणी सदर १.५० कोटी २/३ रक्कम फ़क्त याच भागाकरीता म्हणजेच ३९९७.५० चौमी. एवढ्याच क्षेत्राकरीता असल्याचे भासवून प्रशासनाची व मा.स्थायी समितीची एकप्रकारे सहा.संचालक नगररचना यांनी दिशाभूल केल्याचे दिसते,. ही बाब अत्यंत गंभीर स्वरूपाची आहे.

फ़) मा.सर्वसाधारण सभेच्या ठरावान्वये सदर प्रकरणी भूसंपादन वाटाघाटीने करावयाचे आहे. प्रकरणाची पूर्ण संचिकेचे अवलोकन केले असता यामध्ये वाटाघाटी झाल्याचे दिसून येत नाही. वाटाघाटी संदर्भाने कोठेही उल्लेख नाही तसेच महानगरपालिकेने एकतर्फ़ी मावेजा रक्कम ठरवून देयक अदा केले आहे. वास्तविक अशा भूसंपादन प्रकरणामध्ये मूल्यांकन समितीमार्फ़त मावेजा अंतिम करून त्या रकमेवर मा.आयुक्त यांचे समक्ष संबंधित मिळकतधारकांशी वाटाघाटी होणे आवश्यक आहे. वाटाघाटी म्हणजे महानगरपालिकेने निर्धारीत केलेल्या रकमेपेक्षा संबंधित मिळकतधारकास कमी रकमेमध्ये मावेजा देण्यास तयार करणे असा अर्थ होतो. त्यामुळे सदर प्रकरणात प्रत्यक्ष वाटाघाटी न झाल्याने महानगरपालिकेचे अप्रत्यक्षरित्या आर्थिक नुकसान झाल्याचे स्पष्ट होते.

**वरील निष्कर्षाच्या अनुषंगाने नमूद करण्यात येते की,**

१. खाजगी वाटाघाटी द्वारे जमिन/रस्ता संपादित करणेस प्रथमत: भूसंपादनाची शासनामार्फ़त चालु असलेली कार्यवाही दुर्लक्षित करून, सक्षम मान्यता न घेताच उक्त भूसंपादन प्रकरण प्रस्तावित केलेले आहे.

२. विचाराधीन जागा /जमिन याचा महानगरपालिके तर्फ़े विकास (रस्ते बांधणी) झालेला असतांना उक्त बाबीचा कोणताही विचार न करता वा आवश्यक कागदपत्रे न तपासता संपादनाची कार्यवाही सुरू करणे ही अत्यंत गंभीर आहे.

३. सदरचे रस्ते रेखांकनाचा भाग असतांना व सन १९७४ मधील रेखांकन मंजूरीच्या आदेशात नमूद असलेल्या अटीप्रमाणे उक्त रस्ते हे सार्वजनिक रस्ते आहेत किंवा कसे याबाबत कोणताही विधीसल्ला न घेता, किंवा मूल्यांकन समिती यांचा सल्ला न घेता एकतर्फ़ी भू-संपादनाची कार्यवाही प्रस्तावित करणे संशयास्पद आहे.

४. सदरच्या रस्त्यावर सन १९९६ मध्ये खडीकरण तर सन १९९८ मध्ये डांबरीकरण झालेले आहे त्यामुळे रस्ता भूसंपादीत करणेपूर्वी Cut off Date of Valuation निश्चित होणे आवश्यक होते व त्याकरीता मुदत अधिनियमातील तरतूदी (Limitation Act 1963) प्रमाणे तपासणी करणेही आवश्यक होते. परंतु तसे या ठिकाणी झालेले नाही.

५. तांत्रिकदृष्ट्या सखोल तपासणी न करताच अनावश्यक असा भू-संपादन प्रस्ताव सादर करून रू.८०३६९१९/- इतक्या रकमेचा भुर्दंड महापालिकेस झाला आहे असा निष्कर्ष काढण्यास वाव आहे.

६. प्रकरणास खाजगी वाटाघाटीने (महानगरपालिका औरंगाबाद) मावेजा देवून भू-संपादन करणेविषयी मान्यता आहे. तथापि प्रत्यक्षात संबंधित मालकासमवेत वाटाघाटी झाल्याचे दिसत नाही. महानगरपालिकेने निर्धारित केलेली रक्कम संबंधितास एकतर्फीच देण्यात आली. त्यामुळे महानगरपालिकेचे आर्थिक नुकसान झाल्याचे दिसते.

एकूणच वरील सर्व अनियमितता विचारात घेऊन सदर प्रकरणी सखोल चौकशी करण्यात यावी व जबाबदारी निश्चित करून संबंधित जबाबदार कर्मचारी /अधिकारी यांच्या विरूध्द महाराष्ट्र नागरी सेवा (शिस्त व अपिल ) १९७९ चे तरतुदी अंतर्गत यथोचित प्रशासकीय कार्यवाही करावी असे मत व्यक्त करण्यात आलेले आहे.

वरील प्रकरणी प्रशासनाने केलेल्या कार्यवाहीबाबतचा अहवाल हा अद्यापपावेतो अप्राप्त आहे.

**तपासणी प्रकरण क्र.३**

**प्रकरण :- अंगुरीबाग / चुनाभट्टी येथे रहदारीसाठी रस्ता भूसंपादनाबाबत.**

**लाभार्थी :- १) श्री. शेख नबी शेख वजीर**

**२) सौ.शिलाबाई ओमप्रकाश ढिलोड.**

**आर्थिक वर्ष :- २००१-२००२**

विषयांकित प्रकरणाची संचिका ही नगररचना विभागाकडून पत्र क्र.नरवि/भूसं/७२७/२००५, दि.३०.११.२००५ अन्वये प्राप्त झाली असून तपासणीअंती प्रकरणांत खालीलप्रमाणे वस्तुस्थिती निदर्शनास आली आहे.

१. शाखा अभियंता बांधकाम विभाग-१ यांनी दि.२७.१.१९९७ रोजी अभिप्राय देवून अंगुरीबाग/चुनाभट्टी येथील मिळकती सार्वजनिक रहदारीसाठी वापरात घेण्याकरीता खाजगी मिळकत धारकाकडून भूसंपादन करण्यासाठी प्रकरण सुरू करून नगररचना विभागाकडे वर्ग केलेले आहे. त्याच संदर्भाने कार्यकारी अभियंता (जलनि:सारण) यांनीही त्यांचे पत्र क्र. जा.क्र./मनपा/काअ/६३/९७ , दि.२९.१.९७ नुसार उक्त ठिकाणी जलनि:सारण वाहीनीकरीता जागा आवश्यक असल्याबाबत / भूसंपादन करणे या सदराखाली सहा.संचालक नगररचना, महानगरपालिका,औरंगाबाद यांना कळविले आहे. परिणामी अति.शहर अभियंता यांनी १० फूट रूंद तसेच कार्यकारी अभियंता (जलनि:सारण) यांनी १ मीटर (३ फूट) रूंद जागा संपादनाकरीता कळविले आहे.

कार्यकारी अभियंता/ अति.शहर अभियंता यांचे मागणी आधारे रस्त्याकरीता तसेच जलनि:सारण वाहीनी करीता नगर भूमापन क्र.१३३७५ या मिळकतीमधून ९ मी लांब व ३ मी रूंद जागा संपादनास सहा.संचालक नगररचना यांनी प्रस्ताव सादर केल्यानुसार तत्कालीन मा.आयुक्त यांनी त्यास दि.१७.४.९९ रोजी मान्यता दिलेली आहे. अशा मान्यतेनुसार संचिका पृ.क्र. एन-६ वर सहा.संचालक नगररचना यांनी आदेशीत केल्याप्रमाणे वर्ष १९९९ चा शिघ्र सिध्द गणकदर विचारात घेवून मूल्यांकन सादर केले आहे. एकूण मूल्यांकन

रू.४३२००+ खरेदीखताकरीता खर्च रू.४०००/- असे एकूण ४७२००/- चे मूल्यांकनास मान्यतेस्तव दुय्यम आवेक्षक, शाखा अभियंता, नगररचनाकार, आणि उपसंचालक नगररचना यांचे मार्फ़त प्रस्ताव हा मा.आयुक्त यांचेकडे सादर केलेला आहे. त्यामध्ये मूल्यांकन मान्य झाल्यास जमिन मालकास वाटाघाटी करीता बोलावणे बाबतचे उपसंचालकांचे टिपणीस तत्कालीन मा.आयुक्तांनी " वाटाघाटीस बोलवावे " असे आदेश दिलेले आहेत. परिणामी संचिका पॅरा क्र.५ पृ.क्र.एन-७ प्रमाणे नगरभूमापन क्र.१३४७५ चे मालक श्री.शेख नबी शेख नजिर हे वाटाघाटीस उपस्थित राहीले आणि समक्ष चर्चेअंती त्यांनी जागेच्या मोबदल्यातून १०% कमी करून मोबदला घेण्याचे मान्य केले. तसेच जागेच्या खरेदी खताचा खर्च हा निम्मा – निम्मा करणेस तयार असलेबाबतही संबंधित जमिन मालक यांनी संचिका पृ.क्र.२५ वर जबाब म्हणून स्वाक्षरी केली आहे. त्यावर मंजूरीकरीता मा.आयुक्त यांचेकडे उपसंचालकांनी सादर केलेले टिपणीवर मा.आयुक्तांनी ------

(१) माझ्यासमोर वाटाघाटी का केल्या नाहीत ? खुलासा करा.

(२) निर्धारीत मूल्यांकनाबाबत मुख्य लेखाधिकारी यांचे अभिप्राय घेवून फ़ेर सादर करावे असे आदेशित केले.

२. मुख्य लेखाधिकारी यांनी पृ.क्र. एन-९ मुद्या क्र.१,२ पृ.क्र.एन-१० मुद्या क्र. ३,४,५ उपस्थित करून खुलाश्याकरीता पुन्हा प्रकरण नगररचना विभागाकडे पाठविले होते. नगररचना विभागामार्फ़त उक्त प्रकरण पुन्हा मुख्य लेखाधिकारी यांचेकडे न जाता सरळ मा.आयुक्त यांचेकडे सादर करण्यात आले. मा.आयुक्तांनी आदेशित केल्यानुसार तांत्रिक कक्ष प्रमुखांनी पहाणी करून फ़क्त ड्रेनेजलाईन साठी भूसंपादन करणे करीता मा.आयुक्तांनी सशर्त मंजूरी दिली. मा.आयुक्तांचे टिपणीचा खुलासा उपसंचालक नगररचना, विधी सल्लागार व उपआयुक्त (प्र) , यांनी ३४,३५ पृ.क्र.एन-१८ नुसार केल्याप्रमाणे मा.आयुक्तांनी प्रस्ताव सर्वसाधारण सभा/ स्थायी समिती सभे समोर ठेवण्यास तसेच करारनामा करून घेण्यापूर्वी मूल्य निश्चित करून घेण्यास मान्यता दिली. दरम्यान रस्त्यांचे योग्य जूळवणूकीकरीता नगरभूमापन क्र.१३४७५ सह १३४७६ मधील (प्रत्येकी २७ चौ.मी) समक्षेत्राची जमिन भूसंपादन करावी लागेल. या करीता पृ.क्र.एन-२१, एन-२२ वर पुन्हा सादरीकरण करण्यात आले त्यास मा.आयुक्तांनी दि.१४.५.०१ रोजी मान्यता दिली आहे. संचिकेमध्ये नभू क्र. १३४७५ व १३४७६ या मधील मिळकत धारकांकडून जमिनीचे संपादन करण्यासाठी प्रत्येकी २७ चौ.मी. जागा रू.१९५०/- प्रती चौ.मी. (सिध्द शिघ्र गणक-२००१ नुसार ) या दराने प्रत्येकी रू.५२,६५०/- असे एकूण रू.१०५,३००/- मोबदला रक्कम प्रस्तावित करण्यात येवून त्यास मा.आयुक्त यांनी दि.२३.५.२००१ रोजी मान्यता दिल्याचे दिसून येते. तद्नंतर सदरच्या प्रस्तावास दि.०४.०६.२००१ रोजी स्थायी समिती ठराव क्र.६/५ नुसार मान्यता मिळाल्याचे संचिका पृ.क्र. २४ वर नमूद केलेले आहे. तथापि, प्रस्तावित केलेल्या मोबदला रकमेमधून प्रचलित पध्दतीप्रमाणे खाजगी वाटाघाटी करतांना १०% रक्कम वजावट न

करताच विभागाने स्थायी समिती समोर प्रस्ताव सादर करून त्यास ठराव क्र.६/५ दि.०४.०६.२००१ अन्वये मान्यता घेतल्याचे दिसून येते. परिणामी श्री.शे. नबी शे.नजिर यांना रू.५०,०१६/- (रजिस्ट्री खर्च वजा जाता) ही रक्कम धनादेश क्र.९७५६१५ दि.१३.८.२००१ अन्वये प्रदान करण्यात आली असून श्रीमती शिलाबाई ओमप्रकाश धिल्लोड (नभू क्र. १३४७६) यांना रू.५००१६/- (रजिस्ट्री खर्च वजा जाता) ही रक्कम धनादेश क्र.९७८११९ दि. २३.१.२००२ अन्वये प्रदान करण्यात आलेली आहे. दिसून येते. परिणामी सन१९९९ च्या

शिघ्र सिध्द गणक दर रू. १६००/- ऐवजी सन २००१ च्या शिघ्र सिध्द गणक दर रू.१९००/- प्र. चौ.मी. नुसार जागेचा मोबदला देण्यात आल्यामुळे रू.४३२००/- ऐवजी रू.५२६५०/- (खरेदीखत खर्चासह) प्रत्येकी अदा केल्यामुळे एकूण रू.१०५३०/- इतकी जादा रक्कम अदा करण्यात आली आहे.

लेखा परीक्षणाअंती उक्त प्रकरणामध्ये खालील आक्षेपार्ह बाबी निदर्शनास आल्या आहेत.

**१. एकूण मिळकतीपैकी नक्की भूसंपादीत जागा कोणती ?**

**२. भूसंपादन कारवाई बाबतची अनियमितता झाली काय ?.**

**३. खाजगी वाटाघाटीमध्ये नमूद वजावट केली आहे काय ?**

**४. स्थायी समिती समोर ठेवलेला ठराव अपूर्ण आहे काय ?**

**५. बाधीत भागाचे अखिव पत्रिकेवर महानगरपालिकेच्या मालकी हक्कात नांव लावण्यात आले काय** ?

**निष्कर्ष:-**

संचिकेच्या छाननीअंती खालील आक्षेपार्ह मुद्ये / अनियमितता झाल्याचे स्पष्टपणे आढळून येते.

१. प्रस्तावित भूसंपादीत क्षेत्राचे एकूण मिळकत व भूसंपादीत करावयाची मिळकत या बाबतचे स्पष्ट नकाशे संचिकेमध्ये नाहीत. सी-१३ वरील नकाशा अपूर्ण स्वरूपाचा असून त्यावर तांत्रिकदृष्ट्या आवश्यक त्या नोंदी नाहीत. किंवा असा नकाशा हा प्रमाणितही करण्यात आलेला नाही. उक्त नकाशानुसार इतरही मिळकती, विशेषत: नभूक्र.१३४७४ संपादीत करावयाची असल्याचे दिसते. त्याचा संपूर्ण संचिकेमध्ये इतरत्र उल्लेख नाही. नगरभूमापन क्र.१३४७५ व १३४७६ च्या एकूण जागेपैकी प्रत्येकी २७ चौ.मी. जागा संपादीत केली आहे. तथापि सदर मिळकती मधील संपादीत जागेचे स्थान, क्षेत्र, लांबी रूंदी दर्शविणारा आवश्यक नकाशा (सक्षम अधिकाऱ्यांनी साक्षांकित केलेला) इत्यादी बाबतचा तपशिल संचिकेमध्ये दिसून येत नाही. संबंधितांनी महानगरपालिकेस खरेदी खत करून दिले आहे त्यामध्ये फ़क्त संपादीत एकूण क्षेत्रफ़ळाचा उल्लेख आहे. संपादीत/ महापालिकेस हस्तांतरीत जागेची लांबी रूंदी दर्शविण्यात आली नसल्याने तांत्रिकदृष्ट्या मिळकतीचे कोणते क्षेत्र महापालिकेस हस्तांतरीत झाले याचा स्पष्ट बोध होत नाही. उक्त प्रकरणी संपादीत जमिनीचा तांत्रिकदृष्टया

योग्य नकाशा तयार करण्यात आला नाही. तसेच खरेदीखतामध्येही सदर बाब अत्यंत सहजतेने घेतल्याचे दिसून येते.

२. भूसंपादनाची कार्यवाही प्रक्रीया पहाता यामध्ये अनियमितता झाल्याचे प्राथमिक स्वरूपात दिसून येते. कारण सुरवातीस फ़क्त नभूक्र. १३४७५ मधील श्री.शेख नबी शे.नजिर यांच्या मालकीची २७ चौ.मी. एवढीच जागा संपादीत करावयाचे प्रस्तावित करण्यात आले असतांना तद्नंतर न.भू.क्र. १३४७६ मधील श्रीमती ढिल्लोड यांच्या मालकीची तेवढीच जागा संपादीत करण्यासाठी प्रस्ताव सादर करून मान्यता घेतल्याचे दिसून येते. प्रकरणी नगरभूमापन क्र.१३४७६ च्या मालक श्रीमती ढिलोड यांचा मागणी अर्ज दिसून येत नाही. श्रीमती ढिलोड यांचेकडे महानगरपालिकेची मालमत्ता कर, पाणीपट्टी व इतर बाबींची काही थकबाकी आहे काय यांची पडताळणी करण्यात आली नाही. मुख्य लेखाधिकारी यांनी उपस्थित केलेल्या मुद्यानंतर त्याचा सविस्तर खुलासा करून प्रकरणी मुख्य लेखाधिकारी यांची मान्यता पुन्हा घेतल्याचे दिसून येत नाही. मंजूरीनंतर संबंधितांना पेमेन्ट अदा करणे करीता मा.आयुक्तांची मान्यता घेतल्याचे दिसून येत नाही. मा.आयुक्तांचे तांत्रिक कक्षाने उपस्थित केलेल्या मुद्याबाबत खुलाशास पुन्हा तांत्रिकदृष्ट्या मा.आयुक्तांचे तांत्रिक कक्षाची मान्यता घेतल्याचे दिसून येत नाही.

३. उक्त प्रकरणी महानगरपालिके तर्फ़े निश्चित केलेल्या भूसंपादनापोटी द्यावयाचे मावेजा रकमेबाबत संबंधित मालका सोबत वाटाघाटी झालेल्या आहेत. ज्यामध्ये जमिन मालकाने महानगरपालिकेने निर्धारीत केलेल्या रकमेपेक्षा १०% रक्कम कमी घेण्याचे मान्य केले असतांना मात्र मावेजा अदा करतेवेळी सदर १०% रक्कम वजा केल्याचे दिसून येत नाही. यामुळे सदर प्रकरणी दोन्ही मिळकतीचे भूसंपादन मावेजा रक्कम रू.१०५३००/- पहाता एकूण रू.१०५३०/- एवढी रक्कम ही वजावट करणे आवश्यक होती . तथापि तसे झाल्याचे दिसून येत नाही. त्यामुळे महानगरपालिकेचे रू.१०५३०/- चे आर्थिक नुकसान झाल्याचे दिसून येते.

४. स्थायी समिती समोर सहा.संचालक नगररचना यांनी सादर केलेला प्रस्ताव हा अपूर्ण असल्याचे दिसून येते. प्रस्तावामध्ये ज्या जमिन मालकांना मावेजा द्यावयाचा आहे त्यांची नावे नाहीत. तसेच जमिन मालकांनी १०% कमी दराने मावेजा रक्कम स्विकृत करण्यास वाटाघाटीमध्ये मान्य केल्याचे प्रस्तावामध्ये नमूद नाही. वरील बाबी पहाता प्रस्तावित केलेला स्थायी समिती प्रस्ताव हा अपूर्ण स्वरूपात असून काही अंशी स्थायी समितीची दिशाभूल करण्यात असल्याचे आढळून येते.

५. भूसंपादीत रकमेची अदाई करतांना संबंधित जमिन मालकाकडून संपादीत जागेच्या क्षेत्रावर मालकी हक्कामध्ये महानगरपालिकेचे नांव लावून घेणे बंधनकारक आहे. तथापि प्रकरणी सदर संचिकेचे अवलोकन केले असता नगररचना विभागामार्फ़त पत्र क्र.मनपा/नरवि/भूसं/१४७६/२००३, दि.७.६.२००४ नुसार म्हणजेच भूसंपादन

कार्यवाही नंतर जवळपास दोन वर्षानंतर महानगरपालिकेचे नांवे संपादीत जागा करणे बाबत नगरभूमापन अधिकाऱ्यांना पत्र दिल्याचे दिसून येते. दोन वर्षाचा कालावधी दिरंगाईचा भाग असल्याचे आढळून येते. तसेच उक्त पत्राची प्रत मालमत्ता अधिकारी यांना देवून संबंधित कार्यालयाशी संपर्क साधणे विषयी कळविले आहे. तथापि मालमत्ता विभागामार्फ़त अद्यापपर्यंत उक्त संपादीत क्षेत्र महानगरपालिकेचे नांवे लावण्याची कार्यवाही झाल्याचे दिसून येत नाही. सदर बाब देखील गंभीर स्वरूपाची असून त्याबाबत योग्य दखल घेणे आवश्यक आहे.

**वर नमूद तपशिलाचे अवलोकन केले असता प्रस्तुत प्रकरणांत खालीलप्रमाणे कार्यवाही अनुसरणे/होणे आवश्यक ठरते.**

१. सदर प्रकरणांतील अनियमिततांबाबत जबाबदारी निश्चित करून संबंधिताविरूध्द यथोचित प्रशासकीय कार्यवाही करणे आणि निष्कर्ष परिच्छेद ३ मध्ये दर्शविल्याप्रमाणे रक्कम रू.१०५३०/- ही संबंधिताकडून वसूल करून महापालिका फ़ंडात भरणा करणे आवश्यक आहे.

२. निष्कर्ष परिच्छेद ५ प्रमाणे नमूद संपादीत जागेची नोंद ही महापालिकेच्या नांवे तात्काळ करणे आवश्यक ठरते असे मत व्यक्त करण्यात आलेले आहे.

सदर प्रकरणी प्रशासनाने केलेल्या कार्यवाहीबाबतचा अहवाल हा अद्यापपावेतो अप्राप्त आहे.

**तपासणी प्रकरण क्रमांक ०४**

**प्रकरण** :- **औरंगाबाद मंजूर विकास योजने नुसार १२ मी रूंद रस्ता भूसंपादन– काचीवाडा ते शहाबाजार.**

**आर्थिक वर्ष** :- **२००२–२००३.**

**लाभार्थी** :- १) नभूक्र.१०३७० रक्कम १६००००० /- श्री.शंकरलाल छगनलाल.
२) नभूक्र. १०४१६ रक्कम १,३०,०००/- लक्ष्मणराव बाबुराव सुर्यवंशी.
३) नभूक्र.१०४१७ रक्कम १,१०,०००/- श्री.पंढरीनाथ गवणाजी लहाने, श्री.भगवान गवणाजी लहाने.

उक्त विषयांकित संचिका ही नगररचना विभागामार्फ़त पत्र क्र. नरवि/७१०/०५, दि.२३.११.२००५ अन्वये तपासणीस्तव उपलब्ध करून देण्यात आली. तपासणीअंती प्रकरणांत खालीलप्रमाणे वस्तुस्थिती निदर्शनास आलेली आहे.

१. भूसंपादन संचिकेमधील टिपणीनुसार औरंगाबाद मंजूर विकास योजनेनुसार काचीवाडा ते शहाबाजार या १२ मी.रूंद रस्त्याकरीता भूसंपादन प्रस्ताव हा मा.स्थायी समिती समोर ठेवण्यासाठी दि.१८.६.२००२ रोजी मा.आयुक्तांनी मंजूरी दिली आहे.

२. न.भू.क्र.१०३७०,१०४१६ व १०४१७ ह्या तीन मिळकतीचे क्षेत्र संपादनासाठी मोबदला रक्कम अनुक्रमे रू.१६,००,०००/-, रू.१३००००/- व रू.११०,०००/- असे एकूण

रू.१८,४०,०००/- देण्यासाठी स्थायी समिती ठराव क्र.४४, दि.१८.०९.२००२ पारित करण्यात आला आहे. सदर ठरावानुसार मोबदला रकमेपैकी ५०% रक्कम ही खरेदी खत करतेवेळी व उर्वरीत ५०% मोदला रक्कम ही बाधीत क्षेत्र महापालिकेचे नांवे झाल्यानंतर देण्यास मंजूरी मिळालेली आहे. त्याचप्रमाणे खरेदीसाठी लागणारी रक्कम रू.२लाख २२ हजार अग्रीम म्हणून श्री.डी.डी.कालेले, शाखा अभियंता यांना देण्यास्तवही मंजूरी मिळाल्याचे दिसून येते.

३. सदर ठरावाच्या अनुषंगाने श्री.शंकरलाल छगनलाल पहाडीया ,श्रीमती आसराबाई लक्ष्मण सुर्यवंशी व इतर आणि श्री.पंढरीनाथ गवनाजी लहाने व भगवान गवनाजी लहाने यांना ५०% रक्कम रू.९२०,०००/- ही माहे ऑक्टोबर २००२ मध्ये प्रदान केल्याचे दिसून येते. तसेच उर्वरित ५०% रक्कम रू.९२००००/- ही रक्कम खालीलप्रमाणे अदा करण्यात आलेली आहे.

१. श्री.शंकरलाल छगनलाल पहाडीया यांना रू.८.०० लक्ष माहे फ़ेब्रुवारी २००३ मध्ये अदा करण्यात आलेले आहे.
२. श्रीमती आसराबाई लक्ष्मण व इतर यांना रू.६५,०००/- ही रक्कम धनादेश क्र.३०८४९८४ ,दि.०७.०६.२००४ अन्वये प्रदान करण्यात आलेली आहे.
३. श्री.पंढरीनाथ गवनाजी लहाने व भगवान गवनाजी लहाने यांना रू.५५०००/- ही रक्कम धनादेश क्र.३०८२९१७ दि.३१.०३.२००४ अन्वये अदा केल्याचे दिसून येते.
४. खरेदी खत करण्यासाठी तत्कालीन शाखा अभियंता श्री.डी.डी.कालेले यांना प्रमाणक क्र. ७७१३/ दि.२.११.२००२ अन्वये प्रदान अग्रीम रक्क्म रू.२ लाख २२ हजार इतक्या रकमेचे समायोजन हे अद्यापपावेतो झालेले नाही. मात्र त्यासाठी झालेला खर्च रू.२,०९,५००/- इतका असून त्यामधील १५८०४०/- एवढी रक्कम ही श्री. शंकरलाल छगनलाल पहाडीया यांनी प्रदान केल्याचे दिसून येते. त्यामुळे रू.१७०५४०/- इतक्या रकमेचे समायोजन अद्यापही प्रलंबित आहे.

**उपरोक्त संचिकेतील कागदपत्रांची शहानिशा केल्यानंतर खालील वादातीत मुद्ये निष्कर्षाकरीता काढण्यात येत आहेत.**

**१. भूसंपादन कार्यवाहीमध्ये अनियमितता झालेली आहे काय ?**
**२. भूसंपादनाचा उद्देश पूर्ण झाला आहे काय ?**
**३. मिळकतीचे मोजणी झाली आहे काय ?**
**४. खरेदी खतासाठी दिलेल्या अग्रीम रकमेचे समायोजन झालेले आहे काय ?**

**<u>निष्कर्ष :-</u>**

१. वरील नभूक्र.१०३७०,१०४१६, १०४१७ या मिळकती औरंगाबाद मंजूर विकास योजने नुसार १२ मी (४० फ़ूट) रूंद रस्ता भूसंपादन प्रकरणी भूसंपादन कार्यवाही मध्ये

अनियमितता झाल्याचे आढळून येते. विशेषत: मूळ जमिन संपादनाचे शासनाकडे (जिल्हाधिकारी कार्यालय) सादर केलेल्या प्रस्तावामधील उक्त मिळकतीचे संपादीत करावयाचे क्षेत्र व खाजगी वाटाघाटीने संपादीत प्रस्तावातील याच मिळकतीचे क्षेत्र यामध्ये तफ़ावत आहे. संचिकेमध्ये मिळकतीचे मोजणी नकाशे तसेच विकास योजनेचा अधिकृत भाग नकाशा उपलब्ध नाही. क्षेत्र तफ़ावतीबाबत अधिकृत भाग नकाशा नाही. क्षेत्र तफ़ावतीबाबत तांत्रिक खुलासा नसून बाधीत क्षेत्राचे विवरण देण्यात आल्याचे संचिकेवरून दिसून येत नाही. त्याचप्रमाणे संपादीत जागेचा मावेजा देण्यापूर्वी त्या आर्थिक वर्षापर्यंत त्या त्या मिळकतीचे थकबाकीबाबत बेबाकी प्रमाणपत्र संबंधित विभागीय अधिकाऱ्यास देणे आवश्यक आहे. तथापि त्याप्रमाणे कार्यवाही झाल्याचे दिसून येत नाही. कारण प्रकरणांत छाननीअंती मिळकतीधारक श्री.पहाडीया यांचे महापालिकेकडील बेबाकीप्रमाणपत्र दिसून येत नाही. तसेच सौ.सुर्यवंशी यांचे घराचे नळपट्टी जमा केल्याचेही दिसून येत नाही. सर्वसाधारणपणे जागेचा मावेजा प्रदान करण्यापूर्वी महानगरपालिकेची थकबाकी संबंधिताकडे आहे किंवा कसे याविषयी संबंधित कर्मचाऱ्यांनी खातरजमा केल्याचे दिसून येत नाही.

भूसंपादन कार्यवाही सुरू करण्यापूर्वी, संबंधित मिळकतधारकांचे मिळकतीचे मूळ अद्यावत आखीव पत्रिका ज्यावरून मिळकतीचे मालकी हक्काची खात्री होते ती व मिळकतीचे अद्यावत मोजणी नकाशा (मिळकतीच्या हद्दी व चतु:सिमा दर्शविणारा) इत्यादी बाबी पडताळणी करणे आवश्यक आहेत. संचिकेमध्ये अद्यावत मालकी दर्शविणाऱ्या मूळप्रती आढळून येत नाही किंवा त्याबाबत अधिक शहानिशा केल्याचेही दिसून येत नाही. तसेच भूसंपादन कार्यवाहीमध्ये संबंधित मावेजा रक्कम निश्चित करण्यासाठी आवश्यक ती आकडेमोड (Calculation) केल्याचे दिसून येत नाही. असे असतांनाही सदर प्रकरणी श्री.पहाडीये यांना देय रकमेमध्ये वाटाघाटी करून रक्कम रू. १९७५५००/- वरून रू.१६,००,०००/-पर्यंत कमी झाल्याचे दिसून येते. तथापि इतर मिळकतधारकांशी म्हणजेच श्री.सुर्यवंशी, श्री.लहाने यांचेशी वाटाघाटी झाल्याचे दिसून येत नाही. सदर बाब देखील अनियमिततेचा भाग आहे. जागेवर प्रत्यक्षात इमारतीसह भूसंपादन केले असल्याने सद्यस्थितीमध्ये संपादन करतेवेळी इमारती जमिनदोस्त केल्या किंवा नाही याचा खुलासा नाही. अशा बाबींचा सविस्तर खुलासा हा मावेजा अदा करणेपूर्वी होणे आवश्यक असते.

२. जिल्हाधिकारी कार्यालयाकडे सदर १२ मी रूंद विकास योजना रस्ता संपादीत करण्याकरीता एकूण ८४ मिळकती संपादीत करणे बाबत प्रस्ताव पत्र क्र. नरवि/भूसं/२६९३/९७, दि.१८.८.१९९७ अन्वये पाठविण्यात आला होता. मात्र खाजगी वाटाघाटीने एकूण मिळकती पैकी ३(तीन) मिळकती संपादन केल्या आहेत. संचिकेवरील नोंदीनुसार सदर ठिकाणच्या किमान ५ (पाच) एवढ्या मिळकती संपादीत केल्यास रस्ता वाहतूक सुरळीत होणार होती. तथापि आवश्यक एकूण ५ (पाच) मिळकतीपैकी फ़क्त ३ (तीन) मिळकती संपादन झाल्याने एकूण भूसंपादन कार्यवाहीचा उद्देश पूर्ण झाल्याचे दिसून येत नाही. परिणामी प्रकरणी झालेल्या

खर्चाचा लाभ महानगरपालिकेस आज होत असल्याचे दिसून येत नाही. मिळकतीचे भूसंपादन बाबत आवश्यकता दाखवून भूसंपादन प्रकरण सुरू झाल्याने संचिकेत नमूद केलेल्या आवश्यक इतरही मिळकती ह्या इतर मार्गाने (Compulsary acquisition) प्रक्रीया करून रस्त्याबाबतचा उद्देश साध्य करता आला असता परंतु आजमितीस संचिकेवरून रस्त्याकरीता अत्यावश्यक सर्व मिळकती (एकूण ५) संपादीत न झाल्याने भूसंपादनाचा उद्देश पूर्ण झाल्याचे दिसून येत नाही.

३. मा.जिल्हाधिकारी यांचेकडे सदर रस्ता भूसंपादन करणेचे दृष्टीने बाधीत होणाऱ्या मिळकतीचे मोजणी सक्षम कार्यालयाकडून करून घेणकरीता नगरभूमापन कार्यालयाकडे नगररचना विभागामार्फ़त रक्कम रूपये १२६००/- जमा केल्याचे पत्र क्रमांक जा.क्र./मनपा/नरवि/१९१५/९९, दि. २१.७.१९९९ वरून दिसून येते. या पत्रावरून मिळकती मोजणीकरीता महानगरपालिकेची रक्कम सन १९९९ पासून संबंधित कार्यालयात जमा आहे. परंतू अद्यापपर्यंत मोजणी झाल्याचे दिसून येत नाही. रक्कम जमा करून झालेला कालावधी पहाता अद्यापपर्यंत मोजणी होणे आवश्यक होते. तथापि त्याकडे नगररचना विभागाने दुर्लक्ष केल्याचे दिसून येते. महानगरपालिकेची रक्कम रू. १२६००/- मोजणी कार्यालयाकडे सन १९९९ पासून पडून आहे. उक्त बाब देखील दुर्लक्षित केली असल्याचे आवश्यक स्तरावर त्याबाबत विचारणा होणे गरजेचे आहे.

४. जमिन भूसंपादन प्रकरणी खरेदीखत करून घेणेकरीता महानगरपालिकेतर्फ़े श्री.डी.डी.कालेले शाखा अभियंता यांचे नांवे मुद्रांक खरेदी व खरेदीखतासाठी आवश्यक ती नोंदणी शुल्क जमा करण्यास रू.२. लाख २२ हजार एवढी रक्कम ही प्रमाणक क्र.७७१३ दि.२.११.२००२ रोजी रोख देण्यात आलेली आहे. अग्रीम रक्कम घेतल्यानंतर खरेदीखतासाठी आवश्यक मुद्रांक व इतर शुल्क हे महानगरपालिका औरंगाबादचे नांवे खरेदी होवून तसेच नोंदणी शुल्क सुध्दा महानगरपालिकेच्या नांवे अदाई करणे आवश्यक आहे.

सदर प्रकरणांत खरेदीखतासाठी अग्रीम घेतल्यानंतर सुध्दा रक्कम रू.१,५८०४०/- चे मुद्रांक हे श्री.कालेले यांनी माहनगरपालिकेचे नांवे खरेदी केल्याचे आढळून येत नाही. कारण रू.१५८०४० एवढ्या रकमेचे मुद्रांक हे श्री.शंकरलाल पहाडीया यांनी पावती क्रमांक ५४४२०३७ दि.२५.११.२००२ अन्वये फ्रॅन्किंग द्वारे खरेदी केल्याचे आढळून येत आहे. उक्त बाब ही वास्तविक असतांना देखील नगररचना विभागाने रू.१५८०४०/- चे मुद्राकाची किंमत पूर्वी घेतलेल्या अग्रीम रकमेत समाविष्ट करून दि.२८.०२.२००६ रोजी समायोजन देयक सादर केले आहे. यावरून असे स्पष्ट होते की, रू.१५८०४०/- एवढ्या मुद्रांकांची रक्कम ही इतर व्यक्तीने म्हणजे श्री.शंकरलाल पहाडिया यांनी अदा केल्यानंतर त्याचे समायोजन हे महानगरपालिका फ़ंडातून दाखविणे आणि पर्यायाने महापालिकेची फ़सवणूक करणे ही गंभीर बाब असून हा दखलपात्र गुन्हा आहे. याबाबत

संबंधिता विरूध्द जबाबदारी निश्चित करून  यथोचित प्रशासकीय कार्यवाही होणे आवश्यक वाटते.

**तेव्हा वर नमूद निष्कर्षातील तपशिलाचे अवलोकन केले असता प्रस्तुत प्रकरणी खालीलप्रमाणे अनयिमितता झाल्याचे स्पष्ट निदर्शनास येते.**

१. प्रकरणांत भूसंपादनासाठी आवश्यक असणारे अभिलेखे जसे मोजणी नकाशा, विकास योजनेचा अधिकृत नकाशा, आखीव पत्रिका, बेबाकी प्रमाणपत्र इत्यादी सखोल पडताळणी करण्यात आलेली नाही.

२. भूसंपादना अंतर्गत प्रस्तावित पाच पैकी तीनच प्रकरणांत भूसंपादन कार्यवाही पूर्ण झाल्याचे ,भूसंपादन उद्देश सफ़ल झालेला नाही. त्यामुळे तुर्तास तरी रू.१८,४०,०००/- एवढी रक्कम ही अकारण Block  झाल्याचे दिसून येते.

३. निष्कर्षातील परिच्छेद ३  प्रमाणे दि.२१.७.९९ रोजी नगरभूमापन कार्यालयास मोजणी पोटी प्रदान करण्यात आलेल्या रू.१२६००/- एवढ्या रकमेचा उद्देश सफ़ल झालेला आहे असे दिसून येत नाही. त्यामुळे अशी रक्कम परत घेणे किंवा मोजणी करून पूर्तता करणे आवश्यक ठरते.

४. प्रस्ताव हा खाजगी वाटाघाटी द्वारे भूसंपादन करणे असे असतांना त्यानुसार कार्यवाही ही श्री.शंकरलाल छगनलाल पहाडीया वगळता इतर दोन मिळकतधारकांशी न झाल्याने काही अंशी महापालिकेचे आर्थिक नुकसान झालेले आहे असे स्पष्ट होते.

५. श्री.कालेले डी.डी. तत्कालीन शाखा अभियंता, यांना खरेदी खत करण्याकरीता प्रदान अग्रीम रक्कम रू.२ लाख २२ हजार  पैकी रू.१५८०००/- एवढी रक्कम ही श्री. शंकरलाल पहाडीया यांनी भरणा केलेली असतांना सुध्दा ती स्वत: खर्च केलेली आहे असे दर्शवून तत्संबंधीचे समायोजन करणे या सदराखाली दखलपात्र आर्थिक गैरव्यवहार  समजून त्याबाबत जबाबदारी निश्चित करून प्रशासकीय कार्यवाही करणे आणि रक्कम रू.१५८०४०/- ही दंडनिय व्याजासह वसूल करून महापालिका फ़ंडात जमा करणे आवश्यक ठरते.

एकूणच प्रस्तुत प्रकरणातील अनयिमितता बाबत संबंधित जबाबदार कर्मचारी/ अधिकारी यांचे विरूध्द यथोचित प्रशासकीय कार्यवाही अनुसरणे आवश्यक आहे असे लेखा परीक्षणाअंती मत व्यक्त करण्यात आलेले आहे.

सदर प्रकरणी प्रशासनाने केलेल्या कार्यवाहीबाबतचा अहवाल हा अद्यापपावेतो अप्राप्त आहे.

**<u>तपासणी प्रकरण क्र.०५</u>**

| | | |
|---|---|---|
| प्रकरण | :- | **एन–७, सिडको आंबेडकरनगर स्मशानभूमी करीता अतिरिक्त जागा भूसंपादनाबाबत.** |
| लाभार्थी | **:–** | **दर्गा पीर बहुद्दीन भंडारी शाह (रह अलै) तर्फ़े महंमद जैनोद्दीन उर्फ़ पाशु  पिता महंमद शफ़ी शाह.** |

आर्थिक वर्ष :- **सन २००४-२००५. क्षेत्रफ़ळ : १५ गुंठे**

उक्त भूसंपादन प्रकरण हे तपासणीकरीता नगररचना विभागामार्फ़त त्यांचेकडील पत्र जा.क्रमनपा/नरवी/ससंनर/भूसं/.७१०/२००५ दिनांक २३.११.२००५ नुसार प्राप्त झाले आहे. विषयांकित संचिकेची छाननी ही प्राथमिक स्वरूपात करण्यात आली असता त्यामध्ये निष्कर्षाकरीता खालील मुद्यांवर उहापोह करण्यात येत आहे.

१. मंजूर विकास योजनेमध्ये स्मशानभूमी वाढीकरीता (Extension to Grave yard) आरक्षण आहे किंवा कसे. मंजूर विकास योजनेनुसार उक्त मिळकत इतर कारणाने बाधीत आहे किंवा कसे ? उक्त भागाचे नियोजन प्राधिकरण कोण ?

२. नागरिकांची स्मशानभूमी वाढ करणे बाबतची मागणी आहे किंवा कसे ?

३. सर्वसाधारण सभा ठराव अशासकीय आहे. त्यावर उचित कार्यवाही केली किंवा कसे ?

४. भूसंपादन प्रकरणी प्रशासकीय कार्यवाही मध्ये अनियमितता झालेली आहे काय ?

५. वजावटी योग्य प्रकारे केल्या आहेत किंवा कसे ? महानगरपालिकेचे आर्थिक नुकसान झाले किंवा कसे ?

६. प्रकरण सादरीकरणाबाबत शाखा अभियंता, उपअभियंता यांचे अहवाल नाहीत.

**उक्त मुद्यांचे अनुषंगाने संचिकेवरील नोंदी व सहपत्राचे अवलोकन करण्यात आले असता प्रकरणांत खालील निष्कर्ष काढण्यात येत आहेत.**

१. औरंगाबाद शहर मंजूर विकास योजने नुसार सदर ठिकाणी असलेल्या स्मशानभूमीत वाढ करणेबाबत कुठलाही प्रस्ताव असल्याबाबत संचिका टिपणीवरून दिसून येत नाही. त्याअर्थी सदर भूसंपादन प्रस्ताव कार्यवाही सुरू करण्यापूर्वी महाराष्ट्र प्रादेशिक व नगररचना अधिनियम १९६६ चे कलम ३७ अन्वये विकास योजनेमध्ये आरक्षणा संदर्भाने (Extension to Grave yard) रितसर कार्यवाही होणे आवश्यक होते. मंजूर विकास योजनेनुसार उक्त मिळकत रस्ता हा रूंदीकरणाने (जळगांव रस्ता) अथवा इतर रस्ता रूंदीकरणाने बाधीत आहे काय याबाबत शहानिशा करण्यात आलेली नाही. मिळकत मंजूर विकास योजनेनुसार रस्ता रूंदीकरणाने बाधीत असल्याने, रस्ता भूसंपादनाबाबतचे नियोजन प्राधिकरण कोण ? याबाबत देखील अधिक तपासणी केल्याचे दिसून येत नाही. वास्तविक उक्त रस्ता सार्वजनिक बांधकाम विभागामार्फ़त संपादीत/विकसित करणेची जबाबदारी असल्याने महानगरपालिकेकडून सदर रस्ता रूंदीकरणाचा मावेजा देण्यात आल्याचे आढळून येते. स्मशानभूमीत वाढ करणे करीता/ स्मशान भूमीकरीता किती आवश्यक क्षेत्र आहे याबाबत उहापोह करण्यात आलेला नाही.शिवाय Standard norms नुसार स्मशानभूमी करीता किती क्षेत्र आवश्यक आहे, किती उपलब्ध आहे इत्यादी बाबींचा संचिकेवरून विचार करण्यात आल्याचे दिसून येत नाही. वरील बाबी अत्यंत गंभीर स्वरूपाच्या असून तांत्रिक प्राथमिक छाननीमध्येच त्याचा सांगोपांग विचार होणे आवश्यक आहे. तथापि तसे झाल्याचे दिसून येत नाही.

२. स्मशानभूमीकरीता अधिक क्षेत्राची आवश्यकतेबाबत संचिकेमध्ये स्थानिक नागरीक, अथवा इतरांचे मागणी असल्याबाबत तसेच विकास योजना Standard norms पेक्षा कमी क्षेत्र इत्यादी बाबी आढळून येत नाही. केवळ फ़क्त अर्जदाराच्या अर्जा आधारे व लोकप्रतिनिधींनी पाठपुरावा केल्यामुळे संपादनाची कार्यवाही करणे ही बाब तशी अनाकलनीय आहे. कारण जागेचे आवश्यकतेबाबत आवश्यक स्तरावर पडताळणी न करता भूसंपादन करणेची उक्त कार्यवाही चूकीची आहे असे स्पष्ट मत आहे.

३. मा.सर्वसाधारण सभा अशासकीय ठराव क्र.२१५/२६, दि.०३.०२.२००० अन्वये मौजे जाधववाडी स.नं.१० भाग येथील स्मशानभूमीच्या जागेचा मोबदला देण्यासंबंधी मंजूरी देण्यात येवून वैधानिक कार्यवाही करणे बाबत आदेशित केले आहे. उक्त ठरावाआधारेच संबंधीत जमिन मालकाने जमिनीचा मावेजा देणेबाबत दि.०२.०६.२००० रोजी अर्ज दाखल केल्याचे संचिकेवरून दिसून येते. अशा अर्जाआधारे श्री.मो.जैनुद्यीन मो.शफ़ी शाह व इतर यांना रू.१५४१५५०/- इतक्या रकमेचा मावेजा देण्यासाठी मा.आयुक्तांचे दि.२६.०५.२००४ रोजीच्या पृष्ठांकनानुसार प्रस्ताव हा स्थायी समिती समोर सादर करण्यात आला व त्यास स्थायी समिती ठराव क्र.२६, दि.२७.०५.२००४ नुसार मान्यता मिळाली आहे. सदर मान्यतेनुसार श्री.मो.जैनुद्यीन (पाशु) मो.शफ़ी यांना रू.१३९१५५० ही रक्कम धनादेश क्र.३०९०१८६ अन्वये व रू.७९४००/-ही रक्कम धनादेश क्र.३०९०२८५, अन्वये अशी एकत्रित रक्कम रू.१४७०९५०/- ही (रजिस्ट्री खर्च वगळता) माहे जानेवारी २००५ मध्ये अदा केल्याचे दिसून येते.

मा. सर्वसाधारण सभेने उक्त ठरावामध्ये वैधानिक कार्यवाही करावी असे आदेशित केल्यावरून संबंधीताचे जागेबाबत प्रत्यक्ष शहानिशा करून जमिन मोजणी आधारे अहवाल तयार करणे, वस्तुस्थिती काय आहे हे विशद करणे, Standard norms नुसार स्मशानभूमीकरीता किती जागा आवश्यक आहे आणि प्रत्यक्षात किती जागा ताब्यात आहे याबाबत तांत्रिकदृष्टया पडताळणी करून वरील मुद्यांचे अनुषंगाने वाढीव भूसंपादनाची आवश्यकता आहे काय याबाबतचा अहवाल तयार करणे, इत्यादी बाबींची पूर्तता करणे आवश्यक असतांना संचिकेवरील नोंदीनुसार त्याबाबत स्पष्ट खुलासा दिसून येत नाही. कारण या अहवालामध्ये मा.सर्वसाधारण सभेचा ठरावावर भाष्य करण्यात आल्याचे दिसून येत नाही. तदवतच उक्त ठरावामध्ये वाटाघाटी खाजगी स्वरूपात करून भूसंपादन करणेविषयी कोठेही उल्लेख नाही तथापि त्याकडे दुर्लक्ष करून भूसंपादन खाजगी वाटाघाटीने केल्याचे दिसून येते. त्याकरीता पुनश्च मा.सर्वसाधारण सभेची मंजूरी आवश्यक असतांना ती घेण्यात आल्याचे दिसून येत नाही. सदर बाब अनियमिततेचा भाग असून तो गंभीर स्वरूपाचा आहे.

४. संचिकेची छाननी प्राथमिक स्वरूपात करण्यात आली असता त्यामध्ये बऱ्याच प्रशासकीय अनियमितता झाल्याचे निदर्शनास येते. कारण भूसंपादन प्रकरणामध्ये आवश्यक तांत्रिक बाबींची तपासणी करणे, त्याची पूर्तता करणे, पडताळणी करणे इ.बाबी ह्या कार्यवाहीचा एक

भाग असल्याने त्यामध्ये अनियमितता आढळणे ही बाब अतिशय गंभीर आहे. तथापि उक्त प्रकरणामध्ये छाननीनुसार मालकी हक्काबाबतचे कागदपत्रामधील मालकी हक्कातील नावांचा विचार तसेच त्यावरील नोंदीचा विचार केल्यास त्यामध्ये संदिग्धता आढळून येते. वारसाहक्काबाबत आवश्यक बाबी तपासण्यात आल्याचे दिसून येत नाही. तसेच मालकी हक्क उताऱ्यावरील त्या अनुषंगाने असलेल्या उताऱ्यावर व संचिकेमधील इतर अभिलेखाबाबत अधिक तपासणी झाल्याचे दिसून येत नाही. संबंधित इसम हे उक्त दर्ग्याचे मुतवली आहेत. मात्र त्यांचे अधिकृततेचा खुलासा वक्फ़ बोर्डाकडून करून घेण्यात आलेला नाही. किंबहुना वक्फ़ बोर्डाने सदर प्रकरणी कोणासही मावेजा देण्यात येवू नये याबाबतचे पत्र दि.१५.७.२००४ रोजी महानगरपालिकेस दिले असतांना त्याकडे दुर्लक्ष करण्यात आल्याचे दिसून येते.

स.नं.१० जाधववाडी या संपूर्ण गटाचे क्षेत्राबाबत मा.सर्वोच्च न्यायालयात वादा संदर्भाने कागदपत्रे संचिकेत आहेत. तसेच सचिव, कृषी उत्पन्न समिती,औरंगाबाद यांचे दिनांक १४.७.०४ चे पत्रानुसार उक्त अर्जदारा विरूध्द कृषी उत्पन्न बाजार समिती यांचेमधील सिव्हील अपील नं.६७३१-२००१ मध्ये मा.सर्वोच्च न्यायालयाने Statusquo till the SLPS are heard असे आदेश पारीत केल्याचे व तसेच सिव्हील अपील नं.३५१०, ३५११/२००२ मध्ये STATUSQUO IN ALL THE MATTERS WILL BE MAINTAINED IN THE MEAN WHILE (IT ALSO MEANS NO FURTHER CONSTRUCTION WHAT SOEVER SHALL BE MADE ON THE LANDS IN QUESTION) LIBERTY TO MENTION. असा आदेश आहे. दरम्यान याच पत्रानुसार उक्त मिळकतीबाबत मा.राज्य शासनाने देखील मा.सर्वोच्च न्यायालयात विशेष अनुमती याचिका क्र.एस.एल.पी ६२२६/२००२ दाखल केल्याचे व त्यावर मा.सर्वोच्च न्यायालयाने "जैसे थे " चा आदेश पारीत केल्याचे नमूद आहे. संचिकेमध्ये इतरही न्यायालयीन प्रकरणाबाबत कागदपत्रे आढळून येतात. त्यानुषंगाने विधी सल्लागार यांचे संचिकेमधील अभिप्राय त्रोटक असल्याचे दिसून येतात. विधी सल्लागार यांचे संचिकेमधील सर्व अभिप्रायामध्ये उक्त जमिनीचा मावेजा देण्यात यावा किंवा नाही याबाबत स्पष्टोक्ती दिसून येत नाही. त्यांचा सदर प्रकरणी न्यायालयीन आदेशाबाबत स्पष्ट अहवाल अपेक्षित होता. तथापि तो आढळून येत नाही.

उपजिल्हाधिकारी औरंगाबाद, यांचे प्रकरण क्र.८७/इनाम/विरासत/सिआर-१८, दि.५.२.९६ चे आदेशानुसार सदर जमिन इनामी आहे. (सी/३१) सदर इनामी जमिनी वरील हक्काबाबत उक्त आदेशात सविस्तर खुलासा करण्यात आलेला आहे. त्याकडेही कार्यालयीन टिपणीमध्ये दुर्लक्ष करण्यात आलेले आहे. MAHARASHTRA LAND REVENUE CODE १९६६ मधील तरतुदी नुसार स्पष्ट आहे की इनामी जमिनीची खरेदी खत करतेवेळी मा.जिल्हाधिकारी यांची पूर्वपरवानगी आवश्यक आहे. सदर प्रकरणांत जमिन ही इनामी जमिन म्हणून असल्याने संबंधिताकडून खरेदीखत करून घेण्यापूर्वी मालमत्ता अधिकारी/ नगररचना विभागाने मा.जिल्हाधिकारी यांचे सहमती घेणे आवश्यक होते. किंबहूना इनामी जमिनीची रजिस्ट्री

मा.जिल्हाधिकारी यांचे सहमती शिवाय होतच नाही व तसेच त्याशिवाय वैधता ग्राह्य धरण्यात येत नाही. उक्त बाबीबाबत संचिकेमधील टिपणीमध्ये कोठेही, कोणत्याही स्तरावर उल्लेख नाही सदर बाब गंभीर स्वरूपाची आहे.

जमिनीचा ताबा सन २००० पूर्वीचा असल्याचे लक्षात येते, तथापि प्रत्यक्षात ताबा कोणत्या वर्षी घेण्यात आला याबाबत कोणत्याही विभागाचा स्पष्ट उल्लेख संचिकेत आढळून येत नाही. सन २००० साली बांधण्यात आलेली कंपाउन्डवॉल पूर्वीच्या वायर फ़ेन्सींगवर बांधण्यात आल्याचा उल्लेख पहाता उक्त जमिनीचा (०.०६ आरचा) ताबा हा फ़ार पूर्वीचा असल्याचा निष्कर्ष काढला असता त्याबाबत मुदत अधिनियम १९६३ मधील तरतूदी तपासणे भूसंपादन कार्यवाही वेळी संबंधित विभागाकडून आवश्यक होते परंतू तसे झाल्याचे दिसून येत नाही. मुदत अधिनियमातील तरतुदी पहाता व प्रत्यक्ष ताब्याबाबतच्या इतर शक्यता पाहता सदर क्षेत्राकरीता मावेजा देय होवू शकणार नाही असे वाटते. तथापि त्या क्षेत्राचा मावेजा वरील बाबींची सखोल पडताळणी न करताच देण्यात आल्याने मावेजा देण्याबाबतची कार्यवाही ही संशयास्पद आहे.

प्रकरणामध्ये संबंधित मालकांनी जी.पी.ए. एकास दिलेला आहे. सदर जि.पी.ए.नोंदणीकृत असणे आवश्यक बाब आहे. तो फ़क्त नोटरीद्वारा साक्षांकित केलेला आहे. सदर बाब देखील गंभीर स्वरूपाची आहे. विशेष म्हणजे सदर जिपीए मध्ये संबंधित इसमास उक्त जमिन विक्री करणे, रक्कम गोळा करणे, मालमत्ता विक्री करणे, गहाण ठेवणे , खरेदीखत करून देणे इत्यादीव इतर बाबी स्पष्ट नमूद नाहीत. असे असतांना देखील सदर जीपीए ग्राह्य धरून महानगरपालिकेने प्रशासकीय कार्यवाही पूर्ण केल्याचे दिसून येते. सदर मुद्दे देखील अत्यंत गंभीर आहेत. याबाबत प्रकरणांत झालेली छाननी अत्यंत निष्काळजीपणाने झाल्याचे दिसून येते. आवश्यक स्तरावर योग्य प्रकारे छाननी होणे गरजेचे होते तथापि तसे झाल्याचे दिसून येत नाही.

भूसंपादन प्रकरणी मावेजा निश्चित करणे, वाटाघाटी करणे व इतर मुद्यांकरीता मूल्यांकन समिती गठित आहे त्यामध्ये (मुख्य लेखाधिकारी, सहा.संचालक नगररचना, उपआयुक्त (प्र))यांचा समावेश असून उक्त भूसंपादन प्रकरण हे अशा समिती मार्फ़त सादर झाल्याचे संचिकेवरील नोंदीनुसार आढळून येत नाही. तसेच सदर मावेजा प्रकरणाबाबत सदर समितीची बैठक झाल्याचे दिसून येत नाही. भूसंपादनाकरीता (०.०६ आर क्षेत्राचे) दर हे सन २००० चे सिध्द शिघ्र गणक दरानुसार विचारात घेण्यात आले आहेत. तथापि उक्त क्षेत्राचा ताबा निश्चित कोणत्या वर्षी घेण्यात आला याबाबत अधिक शहानिशा करण्यात न आल्याने सन २००० हे मावेजा दर रकमेकरीता ठरविण्यात आलेले आर्थिक वर्ष चुकीचे आहे असे मत आहे. सदर वर्षी ताबा मिळाल्याचे काल्पनिक स्वरूपात विचारात घेवून त्यावर्षीनुसार दर विचारात घेणे ही बाब देखील अनियमिततेची व महानगरपालिकेचे आर्थिक नुकसान करणारी असल्याचे आढळून येते. तसेच जळगांव रस्ता रूंदीकरणाने बाधीत क्षेत्र उक्त

भूसंपादीत क्षेत्रामधून वजा करणे आवश्यक होते. त्या रस्त्याची संपादनाची जबाबदारी महानगरपालिका नियोजन प्राधिकरणाची नसतांना त्याचे बाधीत क्षेत्र विचारात घेवून त्याचा मावेजा देण्यात आल्याने प्राथमिक दृष्टया सुमारे रू.२.५० ते ३.०० लाखाचे चूकीचे मूल्यांकन झाले असल्याचे आढळून येते.

सदर प्रकरणांमध्ये शेवटपर्यंत मालकी हक्कामध्ये स्पष्टता नसल्याने सशर्त खरेदीखत करून घेण्यात आले आहे. सशर्त मा.स्थायी समितीचा ठराव आहे. या बाबी देखील महानगरपालिकेच्या हिताच्या नाहीत. कारण मावेजा रक्कम अदाई पूर्वी मालकी हक्काबाबत स्पष्टता होणे ही अत्यंत आवश्यक बाब असून त्यामध्ये सशर्तता (Conditional) असणे चूकीचे आहे. जागेचा मालकी हक्क संदर्भाने छाननी अत्यंत सहजतेने केल्याचे दिसते. भविष्यात याबाबत वाद निर्माण झाल्यास महानगरपालिकेचे आर्थिक नुकसान होण्याची शक्यता नाकारता येत नाही. मालकी हक्काबाबत शेवटपर्यंत संधिग्धता असल्याचे स्पष्ट असतांना व तसेच वक्फ़ बोर्डाचे मावेजा न देणेबाबत पत्र असतांना प्रकरणी मालकी हक्काबाबत अधिक खात्री करण्यात आली नाही. त्याकरीता प्रचलित पध्दती नुसार स्थानिक वर्तमानपत्रात जाहीर प्रगटन देवून अधिक खुलासा करून घेणे आवश्यक होते. जाहीर प्रगटन न दिल्याने व मालकी हक्काबाबत सखोल पडताळणी न केल्याने सदर बाब संशयास्पद वाटते.

जागा संपादनाचा विकास योजना नकाशा हा सक्षम अधिकाऱ्यांनी साक्षांकित केलेला नाही. त्यावर आवश्यक नोंदी आढळून येत नाहीत, क्षेत्र निश्चितपणे दर्शविण्यात आलेले नाही. मोघम स्वरूपाचा नकाशा आधारे मूल्यांकन केल्याचे दिसून येते.

वरील अनियमितता याचे अवलोकन केल्यास त्या गंभीर स्वरूपाच्या असल्याचे दिसून येते. त्याबाबत अधिक शहानिशा संचिका हाताळणाऱ्या कर्मचारी/अधिकारी यांचे स्तरावर योग्य वेळी झाली असती तर महानगरपालिकेचे आर्थिक नुकसान झाले नसते असे प्राथमिक छाननी मध्ये स्पष्टपणे दिसून येते.

५. प्रकरणामध्ये वजावटी योग्य प्रकारे करण्यात आल्या नाहीत. त्यामुळे केलेले मूल्यांकन हे सदोष आहे. विकास खर्चाच्या दरात तफ़ावत आढळून येते. तसेच जमिन विकास निधी वजावटी मध्ये विचारात घेण्यात आल्याचे दिसत नाही. यावरून जास्तीचे मूल्यांकन करून संबंधितांना रू.६८२२०/- एवढ्या रकमेचा फायदा करून दिल्याचे दिसते.

६. एकूणच सदर भूसंपादन प्रकरणी छाननी ही प्रशासकीयदृष्टया अत्यंत मोघम स्वरूपात झाल्याचे आढळून येते. यापूर्वी प्रमाणे नगररचना विभागाची टिपणी बाजू पहाता दुय्यम आवेक्षक दर्जा (वर्ग-३) कर्मचाऱ्यानंतर सरळ सहाय्यक संचालक नगररचना यांनी मान्यता दिलेल्या आहेत. कर्मचाऱ्यांचा बौधीक पातळी त्याची छाननी क्षमता याबाबत या पूर्वीचे प्रकरणामध्ये सविस्तर उहापोह करण्यात आलेला आहे. दुय्यम आवेक्षकाचे टिपणीस / सादरीकरणास शाखा अभियंता व तद्नंतर उपअभियंता या स्तरावर अभिप्राय न घेता सहाय्यक संचालकांनी दिलेली मान्यता निश्चितच संशयास्पद आहे. उचित कार्यवाही होणे आवश्यक आहे.

**प्रकरणातील पूर्ण संचिकेचे अवलोकन केले असता यामध्ये वाटाघाटी झाल्याचे दिसून येत नाही. वाटाघाटी संदर्भाने कोठेही उल्लेख नाही तसेच महानगरपालिकेने एकतर्फ़ी मावेजा रक्कम ठरवून देयक अदा केले आहे. वास्तविक अशा भूसंपादन प्रकरणामध्ये मूल्यांकन समितीमार्फ़त मावेजा अंतिम करून त्या रकमेवर मा.आयुक्त यांचे समक्ष संबंधित मिळकतधारकांशी वाटाघाटी होणे आवश्यक आहे. वाटाघाटी म्हणजे महानगरपालिकेने निर्धारीत केलेल्या रकमेपेक्षा संबंधित मिळकतधारकास कमी रकमेमध्ये मावेजा देण्यास तयार करणे असा अर्थ होतो. त्यामुळे सदर प्रकरणात प्रत्यक्ष वाटाघाटी न झाल्याने महानगरपालिकेचे अप्रत्यक्षरित्या आर्थिक नुकसान झाल्याचे स्पष्ट होते.**

**एकूणच प्रस्तुत प्रकरणी निष्कर्षात नमूद केल्यानुसार खालीलप्रमाणे अनयिमितता निदर्शनास आलेल्या आहेत.**

१. संपादीत केलेली जमिन ही विकास योजना नुसार स्मशान भूमीसाठी राखीव अथवा बाधीत नव्हती तरीपण जागा संपादीत केलेली आहे.

२ संपादीत केलेली जमिन ही स्मशान भूमीसाठी अधिग्रहीत असल्याने महाराष्ट्र प्रादेशिक व नगररचना अधिनियम १९६६ चे कलम ३७ प्रमाणे विकास योजनेत किरकोळ फेरफ़ारची आवश्यकता असतांना सदर बाबींकडे दुर्लक्ष केलेले आहे.

३. मालकी हक्काबाबत वाद असतांना मोबदला अदा केलेला आहे.

४. जमिनीचे मुल्यांकन करतांना ६० मी. रूंद विकास रस्त्याने बाधीत क्षेत्रांचा सुध्दा मोबदला अदा केलेला आहे, जेव्हा की, ६० मी रूंद रस्त्याचे संपादन प्राधिकरण हे सार्वजनिक बांधकाम विभाग आहे. ज्या मुळे सुमारे रू.३.०० लक्ष चे महापालिकेचे आर्थिक नुकसान झालेले आहे.

५. जमिनीचे मुल्यांकन करताना जमिन विकास खर्च मुल्यांकन रकमेतून वजा होणे आवश्यक होते. तसेच मूल्यांकनाच्या वेळेस लागू असलेल्या दराने विकास खर्च वजा होणे आवश्यक होते. परंतु तसे न करता कमी दराने वजावटी केलेल्या आहेत. ज्यामुळे रू.६८२२०/- हे संबंधितास जादा अदा करण्यात आलेले आहेत.

६. संचिका हाताळतांना प्रशासकीय व तांत्रिक कार्यपध्दतीचा अवलंब झालेला नाही. एकंदरीत जमिन संपादनासाठी अनुसरलेली कृती ही कार्यालयीन पध्दतीच्या विरूध्द आहे.

७. प्रस्तावित प्रकरणांत न्यायालयीन आदेश वा सूचनांबाबत गांभिर्याने विचार झालेला नाही असे दिसून येते. परिणामी संपादीत केलेली जमिन ही अनावश्यक वाटते.

**तेव्हा वरील मुद्या क्र.१ ते ७ आणि निष्कर्षाअंतर्गत नमूद अनियमिततेबाबत संबंधित अधिकारी/कर्मचारी यांचा खुलासा घेवून व जबाबदारी निश्चितअंती यथोचित प्रशासकीय कार्यवाही करावी असे मत व्यक्त करण्यात आलेले आहे.**

सदर प्रकरणी प्रशासनाने केलेल्या कार्यवाहीबाबतचा अहवाल हा अद्यापपावेतो अप्राप्त आहे.

**<u>तपासणी प्रकरण ०६</u>**

**प्रकरण :- मौजे ईटखेडा येथील गट नं.२४ मधील १५.०० मी व ३० मी रूंद विकास योजनारस्ता भूसंपादनाबाबत.**

**लाभार्थी :- बालाजी इंटरप्राईजेस तर्फे श्री.सचिन छापरवाल व श्री.रविंद्रसिंग जोहर.**

**आर्थिक वर्ष :- २००४-२००५. क्षेत्रफ़ळ : १७५३ चौ.मी.**

नगररचना विभागामार्फ़त उक्त प्रकरणांची भूसंपादन संचिका ही या विभागास पत्र क्र. मनपा/नरवि/ससंनर/भूसं/७२७/२००५ दि.३०.११.२००३ अन्वये प्राप्त झाली. प्रकरणी आवश्यक असलेली कलम १२७ ची सूचना संचिका व मंजूर रेखांकन आदेशाची संचिका ह्या वरील संचिकेसोबत प्राप्त झाल्या नसल्याने त्या उपलब्ध करून देणेबाबत सहाय्यक संचालक नगररचना यांना दूरध्वनीवरून कळविण्यात आले असता फ़क्त रेखांकन संचिका उपलब्ध करून देण्यात आली. कलम १२७ ची सूचना संचिका ही दि.२९.३.२००६ पर्यंत प्राप्त झाली नाही. रेखांकन संचिका उपलब्ध करून देण्यात आलेल्या संचिकेतील टिपणी/ सहपत्र यांची प्राथमिक तपासणी करण्यात आली असून त्यामधील निष्कर्षाकरीता खालील वादातीत मुद्दे काढण्यात येत आहेत.

१. कलम १२७ अन्वये दिलेल्या भूसंपादन सूचनेबाबतची महानगरपालिकेची धारणा/ निर्णय योग्य आहे किंवा कसे?

२. सर्वसाधारण सभेची मान्यता घेणे आवश्यक आहे काय ?

३. भू-संपादन कार्यवाहीमध्ये अनियमितता झालेली आहे काय ?

**<u>निष्कर्ष:-</u>**

१. उक्त प्रकरणी उपलब्ध भूसंपादन संचिकेची तपासणी करण्यात आली असता संबंधित मिळकत धारकाने महापालिका कार्यालयास महाराष्ट्र प्रादेशिक व नगररचना अधिनियम १९६६ चे कलम १२७ अन्वये खरेदी सुचना देण्यात आल्याचे दिसते. तसेच सदर गट क्रमांकामध्ये रेखांकनास (मिळकत धारकाचे) अंतिम मान्यता महापालिकेतर्फ़े देण्यात आल्याचे रेखांकन संचिकेमध्ये दिसून येते. संचिकेमध्ये नोंदणीकृत दस्तऐवजाद्वारे उक्त मिळकती मधील रेखांकन, खुली जागा व अंतर्गत रस्त्यासह विकास योजने मध्ये १५ मी व ३० मी रूंद रस्त्याने बाधीत भाग महानगरपालिकेस नोंदणीकृत Relinquishment Deed आधारे हस्तांतरीत केले आहेत. सदर Relinquishment Deed मधील विकास योजना रस्त्याबाबत केलेल्या उल्लेखाचे दृष्टीने अर्जदारांनी कलम १२७ अन्वये दिलेली खरेदी सुचना महानगरपालिकेस लागू होत नसल्याबाबत. मा.प्रधान सचिव, नगर विकास विभाग यांना कार्यालयीन पत्र क्र. जा.क्र./मनपा/नरवि/भूसं/३९६/०४, दि.१२.२.२००४ अन्वये विचारणा करून धारणा पक्की करण्याविषयी विनंती केली असता उपसंचालक, नगररचना औरंगाबाद यांनी त्यांचे पत्र क्र.वियो-औबाद/बा.क्षे/१२७/ईटखेडा/उसं/४३१, दि.२४.२.२००४ अन्वये महापालिकेची धारणा योग्य वाटत नसल्याचे कळविले आहे. तसेच

पत्रात याबाबत महानगरपालिकेच्या कायदेशीर सल्लागार यांचे मत घेवून आवश्यक कार्यवाही करण विषयी कळविले आहे.

वरील पत्रव्यवहार पहाता प्रकरणी महानगरपालिकेने व्यक्त केलेल्या धारणेविषयी मार्गदर्शन मा.प्रधान सचिव स्तरावर अपेक्षिले असतांना उपसंचालक नगररचना यांचे स्तरावरील धारणे विषयीचा खुलासा ग्राह्य धरून भूसंपादन कार्यवाही केली ही बाब संशयास्पद आहे. वास्तविक प्रकरणी शासनाचे पर्यायाने मा.प्रधान सचिवांचे मार्गदर्शन प्राप्त करून घेणे आवश्यक होते मात्र याठिकाणी तसे झालेले नाही.

२. प्रकरणातील संचिकेची तपासणी केली असता अर्जदारांनी दिलेल्या खरेदी सुचनेआधारे महानगरपालिकेने सरळ खाजगी वाटाघाटीने भूसंपादन कार्यवाही सुरू केल्याचे दिसून येते. अर्जदाराची खरेदी सुचना देवून आठ महिने कालावधी झाल्याचे दिसून येते. महाराष्ट्र प्रादेशिक व नगररचना अधिनियम १९६६ चे कलम १२७ मधील अशा सुचनांकरीताचा निर्धारीत कालावधी सुचना प्राप्त झाल्यापासून ६ (सहा) महिने आहे. प्रकरणी आठ महिन्यानंतर कार्यवाही सुरू झाल्याने विलंब कालावधीबाबत संबंधितावर जबाबदारी निश्चित करणे आवश्यक आहे. तसेच कालावधी ८ महिने झालेला असल्याने व मावेजाची रक्कम तुलनेत कमी लागत असल्याने खाजगी वाटाघाटी मान्य करणे बाबतची सहाय्यक संचालकांची नगररचना यांची शिफ़ारस संयुक्तिक वाटत नाही. तसेच भूसंपादन करणेकरीता प्रस्ताव हा जा.क्र.मनपा/नरवि/भूसं/८८८/२००४, दि.१.४.२००४ अन्वये रितसर शासनाकडे पाठविण्यात आल्यानंतरही खाजगी वाटाघाटीने भूसंपादन करणे आवश्यक वाटत नाही. प्रकरणी भूसंपादन खाजगी वाटाघाटीने करणेबाबत मा.सर्वसाधारण सभेची देखील मान्यता घेण्यात आल्याचे संचिकेवरून दिसून येत नाही.

वरील बाब पहाता प्रकरणामध्ये कार्यालयीन कामामध्ये विलंब झाल्याचे व काही बाबींची हेतुपुरस्सर पूर्तता न केल्याचे आढळून येते. याबाबी गंभीर स्वरूपाच्या असून महानगरपालिकेस आर्थिक नुकसान करणाऱ्या असल्याचे स्पष्ट मत आहे.

३ भू-संपादन करणेकरीता आवश्यक गांभिर्याने विचार न करता अत्यंत मोघम स्वरूपात एकूण छाननी झाल्याने खालील अनियमितता आढळून येतात.

✻ उपसंचालक, नगर रचना औरंगाबाद यांनी त्यांचे पत्रात महानगरपालिकेची धारणा योग्य नाही असे नमूद केले असले तरी महापालिकेचे विधी सल्लागाराचे या मुद्यावर कायदेशीर मत घेणेबाबत त्यामध्ये स्पष्ट नमूद केले असतांना प्रशासनाने महानगरपालिकेच्या धारणेबाबत कायदेशीर मत घेतल्याचे दिसून येत नाही. सदर अनियमितता अत्यंत गंभीर स्वरूपाची आहे. खरेदीखत सुचनेचा कालावधी आठ (८) महिने ओलांडल्या प्रकरणी टिपणीवरील नोंदी देखील संशयास्पद असून संबंधितावर आवश्यक कार्यवाही होणे जरूरी आहे. तसे सहा.संचालक नगररचना यांनी संचिकेमध्ये कोठेही नमूद केलेले नसल्याने वरील संशयास अधिक वाव मिळतो.

* प्रकरणांत संबंधित मिळकत मालकाचे मालकी हक्क दर्शविणारे मूळ कागदपत्र तसेच मिळकतीच्या चतु:सिमा दर्शविणारा सक्षम कार्यालयाचा मोजणी नकाशा, बाधीत क्षेत्राबाबत माहिती देणारा कार्यालयाचा विस्तृत नकाशा इत्यादी बाबी उपलब्ध नाहीत. सदर बाबीशिवाय तांत्रिकदृष्ट्या भूसंपादन प्रकरण सुरूच होवू शकत नसल्याचे स्पष्ट मत आहे. सदर अनयिमितता निश्चितच समर्थनीय नाही.
* संचिकेमधील सहकागदपत्रावरून मा.सर्वसाधारण सभेकरीता सादर करावयाचा प्रस्ताव मसुदा जोडलेला आहे असे दिसते. मात्र सर्वसाधारण सभा ठरावाची प्रत संचिकेत कुठेही निदर्शनास आलेली नाही. तथापि ऐनवेळी मा.स्थायी समिती सभेसमोर प्रस्ताव सादर करण्यात आला आहे. सदर प्रस्तावाआधारे संबंधित मिळकतधारक बालाजी इंटरप्राईजेस तर्फ़े श्री.सचिन छापरवाल व रविंद्रसिंग जोहार यांना रू.५४५,८७४/- (सर्व वजावटी जाता) इतक्या रकमेचा मोबदला देण्यासाठी स्थायी समिती ठराव क्र.१०१, दि.२३.८.२००४ अन्वये मान्यता मिळाल्याचे दिसून येते. त्या आधारे संबंधित बालाजी इंटरप्राईजेस यांना धनादेश क्र. ३०९६७३९ दि.४.१०.२००४ अन्वये रू.५४५८७४/- ही मोबदला रक्कम प्रदान करण्यात आल्याचे स्पष्ट दिसून येते.
* प्रकरणामध्ये विकास योजनेमधील रस्ता रूंदीकरणाने बाधीत भागाचा मोबदला आर्थिक स्वरूपात दिल्याने मिळकत धारकाकडून त्या जागेचे नोंदणीकृत खरेदीखत करून घेणे अत्यंत आवश्यक बाब आहे. भविष्यामध्ये प्रकरणी खरेदीखत न करणे या मुद्यावरून महानगरपालिकेची फ़सवणूक होण्याची शक्यता नाकारता येत नाही. नोंदणीकृत खरेदीखत केले नसल्याने व ते मावेजा रक्कम संबंधितांना अदा करणेपूर्वी करून घेणे या बाबी प्रशासकीय कार्यवाहीच्या दृष्टीने अत्यंत महत्वाच्या असल्याने त्याची पूर्तता न करणे ही अत्यंत गंभीर अनियमितता असल्याचे स्पष्ट मत आहे. तसेच प्रकरणी संबंधितांना देण्यात आलेल्या मावेजा रकमेनुसार खरेदी खताकरीता मुद्रांक शुल्क देखील शासनाकडे जमा न करणे ही बाब देखील निश्चितच गंभीर आहे. किंबहुना प्रकरणी शासनाचे आर्थिक नुकसान झाल्याचे स्पष्ट होते.
* शासनाचे नुकसानीबाबत आवश्यक स्तरावर स्वतंत्र पत्रव्यवहार होणे आवश्यक असून नोंदणीकृत खरेदीखत न होता फ़क्त ७/१२ उताऱ्यावर Relinquishment Deed आधारे महानगरपालिकेचे विकास योजना रस्त्याने बाधीत क्षेत्रावर मालकी हक्कात नांव नोंदविणे ही बाब अत्यंत अनियमित आहे .
*. प्रकरणामध्ये खाजगी वाटाघाटी बाबत उल्लेख असून संचिकेमधील कार्यवाही पहाता तसेच मावेजा अदाई पहाता कोणत्याही स्तरावर खाजगी वाटाघाटी मिळकतधारका समवेत झाल्याचे दिसून येत नाही. त्यामुळे महानगरपालिकेचे त्या दृष्टीने आर्थिक नुकसान झाल्याचे ग्राह्य धरण्यास हरकत नाही.

**एकूणच प्रस्तुत प्रकरणी निष्कर्षात नमूद केल्यानुसार खालीलप्रमाणे अनियमितता निदर्शनास आलेल्या आहेत.**

१. भू-संपादन प्रकरणी खाजगी वाटाघाटीद्वारे भू-संपादन करणेस सक्षम मान्यता घेतल्याचे दिसून येत नाही.

२. भू-संपादन प्रस्ताव हा शासनाकडे पाठविण्यात आलेला असतांना पुन्हा त्याबाबत खाजगी वाटाघाटी द्वारे कार्यवाही अनुसरणे समर्थनीय आहे असे वाटत नाही.

३. नोंदणीकृत खरेदीखत न करता Relinquishment Deed आधारे भू-संपादन कार्यवाही अनुसरणे हे वैधानिक दृष्टया अतिशय अयोग्य आहे. तसेच अशा प्रकारे केलेल्या भू-संपादन कार्यवाही मुळे शासनास मुद्रांक शुल्कापोटी मिळणारे महसूली उत्पन्नही बुडाले आहे.

४. भू-संपादन हे खाजगी वाटाघाटीने केलेले असले तरीही प्रत्यक्षात मिळकतधारकांशी वाटाघाटी झालेल्या नसल्याने महापालिकेचे आर्थिक नुकसान झालेले आहे.

५. निष्कर्षातील परिच्छेद १ नुसार नमूद केल्यानुसार शासनास संदर्भ करण्यात आला असतांना व त्याबाबत कोणतीही मार्गदर्शक सूचना प्राप्त नसतांना भू-संपादन कार्यवाही अनुसरलेली आहे हे समर्थनीय नाही.

तेव्हा वरील मुद्या क्र.१ ते ५ आणि निष्कर्षामधील अनियमिततेबाबत सखोल चौकशी करून संबंधित अधिकारी /कर्मचारी यांच्याविरूध्द जबाबदारी निश्चिती आधारे यथोचित प्रशासकीय कार्यवाही करावी असे मत व्यक्त करण्यात आलेले आहे.

सदर प्रकरणी प्रशासनाने केलेल्या कार्यवाहीबाबतचा अहवाल हा अद्यापपावेतो अप्राप्त आहे.

# <u>जकात विभाग</u>

**<u>तपासणी प्रकरण क्र.७:</u>**

**जकात पावती क्र.८९९०१ ते ९०००, क्र.९१९०१ ते ९२०००, क्र. ९६९०१ ते ९७०००, क्र. ११३९०१ ते ११४०००, क्र.१२९९०१ ते १३००००, क्र.१३९९०१ ते १४०००० व क्र .१५४९०१ ते १५५००० अन्वये वसूल केलेल्या जकातीबाबत.**

संदर्भ:- १) मा.स्थायी समिती सभा, दि.२३.२.२००६ : मा.सभापती यांनी दिलेले आदेश.
२) उपआयुक्त (म), यांचेकडील पत्र जा.क्र.मनपा/उआ (म)/सीआर-१२ / २००५ , दिनांक २४.०२.२००६.

वरील विषयी संदर्भिय (१) च्या आदेशान्वये जकात विभागाकडील दि.१८.०३.२००६ रोजी उपलब्ध करून दिलेल्या अभिलेख्याआधारे प्राप्त सात पावती पुस्तकांची अनुषंगिक अभिलेख्यासह तपासणी करण्यात आली असून त्याबाबतचा अहवाल हा खालीलप्रमाणे आहे.

सन २००४-०५ या आर्थिक वर्षात जकात वसूलीअंतर्गत विषयांकित सात पावती पुस्तकांआधारे वसूल केलेल्या रकमेबाबत संबंधित जिन्सवार व कॅश रजिस्टर आधारे तपासणी करण्यात आली असून पावती पुस्तकनिहाय वसूल केलेल्या रकमेचा तपशील व वसूल रक्कम कॅश रजिस्टर नुसार कॅशियरकडे जमा केल्याबाबतचा सविस्तर तपशील हा सोबतच्या तक्त्यामध्ये **(विवरण–अ)** नमूद करण्यात आला आहे. प्रकरणाअंतर्गत पावती पुस्तकनिहाय वसूल करण्यात आलेल्या रकमेबाबतचा तपशील हा खालीलप्रमाणे नमूद करण्यात येत आहे.

अ)१. पावती पुस्तक क्र.९०० मधील पा.क्र.८९९०१ ते ९०००० अन्वये दि.१४.०२.२००५ ते दि.१७.०२.२००५ या कालावधीत एकूण जकातीची रक्कम रू.६३८७४/- वसूल करण्यात आली असून सदरची रक्कम ही दि.१५.०२.२००५ व दि.१७.०२.२००५ रोजी जमा केल्याचे कॅश रजिस्टरवरून निदर्शनास आले आहे.

२. पावती पुस्तक क्र.९२० मधील पा.क्र.९१९०१ ते ९२००० अन्वये दि.१६.०२.२००५ ते दि.१९.०२.२००५ या कालावधीत एकूण जकातीची रक्कम रू.७३९७८/- वसूल करण्यात आली असून सदरची रक्कम ही दि.१६.०२.२००५ ते दि.१९.०२.२००५ रोजी जमा केल्याचे कॅश रजिस्टरवरून निदर्शनास आले आहे.

३. पावती पुस्तक क्र.९७० मधील पा.क्र.९६९०१ ते ९७००० अन्वये दि.१९.०२.२००५ ते दि.२५.०२.२००५ या कालावधीत एकूण जकातीची रक्कम रू.६२०३६/- वसूल करण्यात आली असून सदरची रक्कम ही दि.२२.०२.२००५ ते २८.०२.२००५ या कालावधीत जमा केल्याचे कॅश रजिस्टरवरून निदर्शनास आले आहे.

**४.** पावती पुस्तक क्र.११४० मधील पा.क्र.११३९०१ ते ११४००० अन्वये दि.२५.०२.२००५ ते दि.०४.०३.२००५ या कालावधीत एकूण जकात रक्कम रू.६४४२०/- वसूल करण्यात आली असून सदरची रक्कम ही दि.२८.०२.२००५ ते दि.०४.०३.२००५ या कालावधीत जमा केल्याचे कॅश रजिस्टरवरून निदर्शनास आले आहे.

५. पावती पुस्तक क्र.१३०० मधील पा.क्र.१२९९०१ ते १३०००० अन्वये दि. ४.०३.२००५ ते दि.१०.०३.२००५ या कालावधीत एकूण जकात रक्कम रू.७०४५०/- वसूल करण्यात आली असून सदरची रक्कम ही दि.०४.०३.२००५ ते दि.१०.०३.२००५ या कालावधीत जमा केल्याचे कॅश रजिस्टरवरून निदर्शनास आले आहे.

६. पावती पुस्तक क्र.१४०० मधील पा.क्र.१३९९०१ ते १४०००० अन्वये दि.१०.०३.२००५ ते दि.१५.०३.२००५ या कालावधीत एकूण जकात रक्कम रू.७७३३२/- वसूल करण्यात आली असून सदरची रक्कम ही दि.१०.०३.२००५ ते दि.१५.०३.२००५ या कालावधीत जमा केल्याचे कॅश रजिस्टरवरून निदर्शनास आले आहे.

७. पावती पुस्तक क्र.१५५० मधील पा.क्र.१५४९०१ ते १५५००० अन्वये एकूण जकातीची रक्कम रू.८७१४३/- वसूल करण्यात आली असून सदरची रक्कम ही दि.१५.०३.२००५ ते दि.२१.०३.२००५ या कालावधीत जमा केल्याचे कॅश रजिस्टरवरून निदर्शनास आले आहे.

वरील प्रमाणे ७ (सात) पावती पुस्तकांद्वारे दि.१४.०२.२००५ ते दि.२१.०३.२००५ या कालावधीत जकाती प्रित्यर्थ जी एकत्रित रक्कम रू.४९९२३३/- वसूल करण्यात आलेली आहे, ती कार्यालयीन आदेश जा.क्र.मनपा/जकात/आस्था/०५/३३, दि.१०.०१.२००५ अन्वये निर्गमित सूचनेनुसार केल्याचे दिसून येते. वसूलीअंती प्राप्त झालेली रक्कम ही वेळोवेळी महापालिकाफंडात जमा करण्यात आलेली आहे.

ब.) तपासणी अंती असे निदर्शनास आले की, पावती पुस्तक क्र.११४० मधील पावती क्र. ११३९५३ दि.०२.०३.२००५ अन्वये रू.१०८०००/- किंमतीच्या हार्डवेअर या मालावर अनुसूची दरानुसार २.५% दराने रू.२७००/- ऐवजी रू.२१६०/- वसूल केल्यामुळे रू.५४०/- कमी वसूल करण्यात आले आहेत. त्यामुळे सदरची रक्कम संबंधिताकडून वसूल करणे आवश्यक ठरते.

क) १.वरील पावती पुस्तकांद्वारे जी रक्कम वेळोवेळी वसूल करण्यात आलेली आहे ती रक्कम ही “जकात फ़रक पावती ” या शिर्षकाखाली वसूल करण्यात आलेली आहे. मात्र रक्कम वसूल करतांना फ़रकाची रक्कम ही कोणत्या कालावधीसाठी वसूल केलेली आहे व कोणत्या बीजकातील फ़रकांची रक्कम वसूल केलेली आहे, याबाबतचा बोध झालेला नाही. तसेच, ज्या आयातकाकडून फ़रकाची रक्कम वसूल करण्यात आलेली आहे, त्या आयातकांनी वेळोवेळी आयात केलेल्या मालावर त्या-त्या वेळी आयात केलेल्या परिमाणाप्रमाणे जकात वसूली ही का करण्यात आलेली नाही ? Partly वसूली करण्याचे कारण काय ? Partly वसूली करण्यासाठी जबाबदार कोण आहेत आणि त्यांचेवर काय कार्यवाही अनुसरण्यात आली ? याबाबत स्वतंत्रपणे खुलासा मागवून जबाबदारी निश्चितीअंती यथोचित कार्यवाही करणे आवश्यक वाटते. कारण त्या –त्या वेळी कार्यरत असणाऱ्या कर्मचाऱ्यांनी जकात वसूल

करतांना अनुसरलेली कार्यवाही (Partly वसूली बाबतची कृती ) ही संशयास्पद असून नियमाला धरून आहे असे म्हणता येणार नाही.

२. पावती पुस्तकातील पावत्यांचे अवलोकन केले असता असे दिसून आले की, ज्या आयातकांकडून जकात फ़रकाची रक्कम वसूल करण्यात आलेली आहे त्यांचे नांव, पत्ता इ.संपूर्ण तपशिल पावतीवर नमूद करण्यात आलेला नाही. त्यामुळे जकात फ़रकेच्या रकमेची वसूली ही कोणाकडून करण्यात आलेली आहे याचाही बोध झालेला नाही.

३. पावती पुस्तके ही कोणत्या नाक्यासाठी वापरण्यात आलेली आहेत आणि ती कोणाकडून वापरलेली आहेत याचा उल्लेख हा पावतीवर/पावती पुस्तकावर नमूद करण्यात आलेला नाही. तसेच पावतीवरील छापील रकान्यानुसार तपशीलही नमूद केलेला नसून मोघमपणे वसूली केलेली आहे असे दिसते.

ड) १. जकात विभागाने वसूलीसाठी जे कॅश रजिस्टर ठेवलेले आहे, त्यास पृष्ठांकन केल्याचे दिसून येत नाही. तसेच शेवटच्या पृष्ठावर सक्षम अधिकाऱ्याचे विहीत प्रमाणपत्रही देण्यात आलेले नाही.

२. जकात विभागाकडून प्राप्त झालेल्या जकात रकमेची नोंद ही विहीत Octroi Collection Register मध्ये घेण्यात येते व त्यानुसार रकमांचा भरणा हा महापालिका फ़ंडात Bank Slip /चालान अन्वये करण्यात येतो. मात्र अशी नोंदवही ही सुध्दा पृष्ठांकन केलेली नसून सक्षम अधिकाऱ्याने शेवटी प्रमाणपत्रही दिलेले नसल्याचे दिसून आले. त्याचप्रमाणे नियमितपणे रक्कम जमा करणारे कनिष्ट लिपिक श्री. देशपांडे यांचे रजा कालावधीत ज्या कर्मचाऱ्याने जकातीची रक्कम ही जकात नाक्यावरून प्राप्त करून घेतली त्या कर्मचाऱ्याने संबंधित Octroi Collection Register मध्ये प्राप्त रकमेच्या नोंदी घेतलेल्या नसल्याचे दिसून आले. तथापि, वसूल रकमेच्या नोंदी ह्या Bank Slip/ Bank Scroll या आधारे तपासल्या आहेत. त्यामुळे रजिस्टरमध्ये अद्ययावत नोंदी न घेताच प्राप्त रक्कम ही महापालिका फ़ंडात भरणे ही बाब योग्य नाही.

३. वरील पावती पुस्तकांद्वारे वसूल रकमेच्या नोंदी ह्या लेखा विभागामध्ये ठेवलेल्या जमा रोकड नोंदवहीतील नोंदीसोबत (कॅशियर कॅशरजिस्टर) तपासल्या असता असे निदर्शनास आले की, सदरच्या रजिस्टरमध्येही पृष्ठांकन केलेले नसून प्रमाणपत्रही नोंदविण्यात आलेले नाही. तसेच अशा रजिस्टरमधील दैनिक नोंदी सुध्दा साक्षांकित केल्याचे दिसून आलेले नाही.

**एकूणच वर नमूद परिच्छेद अ,ब ,क व ड नुसार अनुसरण्यात आलेली कार्यवाही / कार्यपध्दती ही सदोष असून यामध्ये कामकाज करत असतांना बऱ्याच त्रुटी निदर्शनास आलेल्या असून भविष्यात जकात विभागा अंतर्गत कामकाज हे अचूक तत्पर आणि परिणामकारक होण्याच्या दृष्टीने खालीलप्रमाणे अभिप्राय देण्यात येत आहेत.**

१. परिच्छेद ब प्रमाणे कमी वसूलीची रक्कम रू.५४०/- ही संबंधिताकडून वसूल करून महापालिका फ़ंडात जमा करणे आवश्यक ठरते.

२. परिच्छेद क (१) मध्ये नमूद केल्यानुसार "जकात फ़रकाची रक्कम" या शिर्षकाखाली सात पावती पुस्तकांद्वारे वसूल केलेली एकत्रित रक्कम रू.४९९२३३/- ही कुठल्या कालावधीसाठी आणि कशाच्या आधारे वसूल केलेली आहे याचा बोध होत नाही. त्यामुळे Partly जकात वसूलीबाबत जबाबदार असलेले कर्मचारी/अधिकारी यांचेकडून प्रकरणनिहाय समर्थनीय खुलासा मागवून यथोचित प्रशासकीय कार्यवाही अनुसरणे आवश्यक वाटते.

३. परिच्छेद क मधील मुद्या क्र.२ व ३ मध्ये नमूद केलेल्या अनियमिततेबाबतही संबंधिताचा खुलासा घेवून पुढील आवश्यक ती कार्यवाही अनुसरणे गरजेचे आहे.

४. परिच्छेद ड मधील मुद्यांमध्ये ज्या अनियमितता निदर्शनास आलेल्या आहेत त्याबाबत संबंधिताकडून खुलासा घेण्यात येवून अभिलेखे अद्ययावत करावेत आणि भविष्यात असे होणार नाही या दृष्टीने कार्यवाही व्हावी.

५. जकात विभाग हा महापालिका आर्थिक स्त्रोताचा एक अत्यंत महत्वाचा विभाग असून त्याअंतर्गत वसूलीमध्ये / वसूलीच्या अभिलेख्यांमध्ये काहीही अनियमितता राहू नयेत यासाठी विभागाने यापुढे जाणीवपूर्वक दक्षता घेणे आवश्यक असल्याने तशा सूचना शाखा प्रमुख व विभागप्रमुख यांना निर्गमित करणे आवश्यक आहे असे मत व्यक्त करण्यात आलेले आहे.

सदर प्रकरणी प्रशासनाने केलेल्या कार्यवाहीबाबतचा अहवाल हा अद्यापपावेतो अप्राप्त आहे.

## मा.आयुक्त यांचे सुचनेनुसार करण्यात आलेली तपासणी.

## आस्थापना विभाग

**श्री. रमेश शिंदे, दै.वे. प्लॅन्ट ऑपरेटर, यांच्या महानगरपालिकेतील सेवेबाबत.**

श्री. रमेश शिंदे, दैनिक वेतन प्लॅन्ट ऑपरेटर, सिध्दार्थ जलतरण तलाव यांना महापालिका सेवेमध्ये कायम करण्यासंदर्भाने चौकशी करण्याचे कळविण्यात आलेले आहे. त्यानुसार श्री. रमेश शिंदे दै.वे.प्लॅन्ट ऑपरेटर यांच्या नियुक्तीच्या अनुषंगाने अभिलेख्यांची तपासणी करून त्याबाबतचा वस्तुनिष्ठ अहवाल हा खालील प्रमाणे सादर करण्यात येत आहे.

१. महापालिका क्षेत्राअंतर्गत सिध्दार्थ उद्यान जलतरण तलाव येथे कार्यरत विविध संवर्गातील दैनिक वेतनावरील एकूण १३ कर्मचाऱ्यांनी दि.२८.०७.१९९७ रोजी प्रथमत: अर्ज सादर करून सेवेत कायम करण्याबाबत मा.आयुक्त,महानगरपालिका औरंगाबाद यांना विनंती केल्याचे दिसून आले. त्यानंतर वेळोवेळी सादर केलेल्या निवेदनाआधारे उपआयुक्त (प्र) , यांनी जलतरण तलाव येथे कायमस्वरूपी कर्मचारी उपलब्ध होण्याचे दृष्टीने, सर्वसाधारण सभेसमोर पदनिर्मितीचे दृष्टीने प्रस्ताव सादर केल्याचे दिसून येते.उपआयुक्त (प्र) , यांनी सादर केलेल्या प्रस्तावानुसार सर्वसाधारण सभा ठराव क्र.११/१ दि.१७.०६.१९९८ अन्वये खालील प्रमाणे पदांना / पदनिर्मितीस मान्यता मिळालेली आहे.

| अ.क्र. | पदनाम | वेतनश्रेणी | पदसंख्या |
|---|---|---|---|
| १ | व्यवस्थापक | रू.१६००-२६६० | ०१ |
| २ | जलनिर्देशक | रू..१४००-२३०० | ०१ |
| ३ | सहा.जलनिर्देशक (पु./म.) | रू.१२००-२०४० | ०२ |
| ४ | प्लॅन्ट ऑपरेटर | रू.१४००-२३०० | ०२ |
| ५ | लाईफ़ गार्ड | रू.९५०-१४०० | ०३ |
| ६ | लाईनमन (विद्युत) | रू.९५०-१४०० | ०१ |
| ७ | लिपीक | रू.९५०-१५०० | ०१ |
| ८ | सक्शन स्वीपर | रू.८२५-१२०० | ०२ |
| ९ | साईड ब्रशर | रू.८२५-१२०० | ०४ |
| १० | स्वीपर | ---- | ०१ |
| | | **एकूण** | **१८** |

वरील प्रमाणे विविध दहा संवर्गातील एकूण १८ पदांना सर्वसाधारण सभेची मंजूरी मिळाल्याने अशा मंजूरी आधारे उप आयुक्त(प्र), महानगरपालिका,औरंगाबाद यांनी कार्यालयीनपत्र जा.क्र.मनपा/आस्था-१/३६९५/९८, दिनांक १०.०९.१९९८ अन्वये पदनिर्मितीस मान्यता मिळणेस्तव प्रस्ताव हा नगर विकास विभाग, मंत्रालय, मुंबई यांचेकडे सादर केला असून त्यास शासन निर्णय क्र.एएमसी-१४९८/२११७/प्रक्र.२१९/९८/नवि-२४ दिनांक २ मे २००० अन्वये खालील पदांसाठी मान्यताही मिळाल्याचे दिसून येते .

| अ.क्र. | पदनाम | वेतनश्रेणी (असुधारित) | पदसंख्या |
|---|---|---|---|
| १ | व्यवस्थापक | १६००-२६०० | ०१ |
| २ | जलनिर्देशक | १४००-२३०० | ०१ |
| ३ | सह. जलनिर्देशक (पु/म) | १२००-२०४० | ०२ |
| ४ | प्लॅन्ट ऑपरेटर | १४००-२३०० | ०२ |
| ५ | इाईफ़ गार्ड | ९५०-१४०० | ०२ |
| ६ | विद्युत लाईनमन | ९५०-१४०० | ०१ |
| ७ | लिपीक | ९५०-१४०० | ०१ |
| ८ | सक्शन स्वीपर | ८२५-१२०० | ०२ |
| ९ | साईड ब्रशर | ८२५-१२०० | ०१ |
| १० | स्वीपर | ७५०-९४० | ०१ |
| | | **एकूण** | १४ |

२. शासनाच्या मान्यतेनुसार सिध्दार्थ जलतरण तलावाकरीता विविध पदे भरण्यासाठी मुंबई प्रांतिक महानगरपालिका अधिनियम,१९४९ मधील कलम ५४ (१) अन्वये निवड समितीची बैठक ही दि.२४.१०.२०००, दि.१३.११.२०००, दि.२१.११.२०००, दि.२३.११.२००० व दि.२९.११.२००० रोजी आयोजित केल्याचे दिसून येते. तथापि दि.२९.११.२००० रोजी आयोजित बैठकीमध्ये सदर १४ पदांसाठी अर्हता ठरविण्यात येवून अशा अर्हतेस मान्यता मिळण्यासाठी सर्वसाधारण सभेसमोर प्रकरण ठेवण्याचे ठरविण्यात आले. तसेच आरक्षणासाठी आदिवासी व सेवायोजन कार्यालयाकडून नांवे मागवावीत असाही निर्णय घेण्यात आला. त्यानुसार दि.१९ जानेवारी २००१ रोजी संपन्न झालेल्या सर्वसाधारण सभेमध्ये ठराव क्र.२१५/८ नुसार विद्युत लाईनमन, लिपीक व स्वीपर ही पदे वगळता अन्य ११ पदांसाठी अर्हता ठरविण्यात आल्याचे दिसून येते.

प्रस्तुत प्रकरणी कार्यवाहीचा भाग म्हणून दि.१९.०४.२००१ रोजी निवड समिती बैठक आयोजित करून त्यामध्ये प्रशासनाद्वारे परिशिष्ट १ प्रमाणे सादर जलतरण तलाव येथे कार्यरत असलेल्या दैनिक वेतनावरील कर्मचाऱ्याच्या निवडीबाबत शासननिर्णय दि.१८.१०.१९९७ व दि.२९.०९.१९९८ अन्वये निर्गमित मार्गदर्शक सूचनेनुसार आरक्षणाचा विचार करण्यात आला. परिणामी व्यवस्थापक, जलनिर्देशक, इ.पदांसह एकूण १३ पदांना नियुक्ती देण्याबाबत ठरविण्यात आले व उर्वरित ०१ पद हे महिलांसाठी (सहजलनिर्देशक) आरक्षित असल्याने ते रिक्त ठेवण्यात आले.( निवड समिती बैठक दि.१९.४.२००१ चे इतिवृत्त- परिशिष्ट ३ ). परंतु दि.१९.०४.२००१ रोजीच्या बैठकीत ज्या कर्मचाऱ्यांची निवड करण्यात आली अशा निवड यादीवर दि.०३.०८.२००१ रोजी स. नगरसेवकांनी आक्षेप घेतल्याने निवड समितीची

दि.०७.०९.२००१ रोजी पुन्हा बैठक आयोजित करून या बाबत फ़ेर आढावा घेण्यात आला आणि एकूण मंजूर १४ पदांपैकी ११ पदांसाठी (आरक्षण विचारात घेता) उमेदवारांची निवड करण्यात आल्याचे दिसून येते. (निवड समिती बैठक दि.७.९.२००१ चे इतिवृत्त- परिशिष्ट ४). दि.१९.०४.२००१ रोजीचे निवड समिती बैठकीत प्लॅन्ट ऑपरेटर व लाईफ़गार्ड या संवर्गातील प्रत्येकी दोन पदांवर कार्यरत असलेल्या कर्मचाऱ्यांची निवड ही आरक्षणाचा विचार न करता करण्यात आली असल्याने दि.०७.०९.२००१ रोजीच्या बैठकीत सदरच्या दोन्ही पदांबाबत आरक्षणाचा पुन्हा विचार करण्यात आला आणि त्यानुसार उक्त संवर्गातील दैनिक वेतनावर कार्यरत कर्मचाऱ्यांपैकी सेवाज्येष्ठतेनुसार पात्र असलेले कर्मचारी अनुक्रमे श्री.शाम आबाराव खपले व श्री. विठ्ठल अर्जुन पाटील यांची निवड करण्यात आल्याचे दिसून येते. शिवाय मंजूर पदांपैकी सहजल निर्देशक (महिला ), प्लॅन्ट ऑपरेटर व लाईफ़ गार्ड या संवर्गातील प्रत्येकी एक पद हे आरक्षणाचा विचार करून रिक्त ठेवण्यात आल्याचेही दिसून येते.

निवडसमिती बैठक दि.१९.११.२००१ मधील निर्णयानुसार सिध्दार्थ जलतरण तलाव येथील मंजूर १४ पदांबाबत बिंदू नामावलीनुसार आरक्षण तपासणी करण्याच्या दृष्टीने पत्र जा.क्र.मनपा /आस्था-१/३१२७/०१, दि.२८.११.२००१ अन्वये सहाय्यक आयुक्त (मागसवर्गीय कक्ष),विभागीय आयुक्त कार्यालय,औरंगाबाद यांना कळविण्यात आले असता मागासवर्गीय कक्ष कार्यालयाकडील पत्र . जा.क्र.२००१/विआका/मावक/कावि-५०२, दि.०१.१२.२००१ अन्वये आरक्षण कसे असावे या बाबत मार्गदर्शक सूचना प्राप्त झालेल्या आहेत. अशा प्राप्त सुचनेनुसार निवड समितीने शिफ़ारस केलेल्या ११ उमेदवारांपैकी विद्युत लाईनमन व लिपीक या पदांवरील उमेदवार वगळता अन्य संवर्गातील ९ पदावंर कार्यालयीन आदेश जा.क्र. मनपा/आस्था-१/२००२/४४९-४५७, दि.१५.०२.२००२ अन्वये नियुक्ती आदेश निर्गमित केल्याचे निदर्शनास येते. **<u>अद्यापपावेतो बिंदू नामावली आरक्षणानुसार विद्युत लाईनमन व लिपीक (प्रत्येकी एक पद) या पदावर नियुक्ती केल्याचे तर सहजल निर्देशक (महिला),</u> प्लॅन्ट ऑपरेटर व लाईफ़गार्ड (प्रत्येकी एक पद) अशा तीन पदांकरिता निवड झाल्याचे दिसून येत नाही.**

३. वरील परिच्छेद (२) मध्ये अनुसरलेल्या कार्यवाही अंतर्गत निवड समिती समोर प्रशासनामार्फ़त ठेवण्यात आलेल्या जलतरण तलाव येथील विविध संवर्गातील कर्मचाऱ्यांच्या प्रथम नियुक्तीबाबतच्या प्रमाणित तपशीलात ज्या नोंदी दर्शविल्या आहेत त्यामध्ये सक्शन स्वीपर या संवर्गात श्री.कृष्णा भिमराव मोटे यांचा प्रथम नियुक्ती दिनांक हा दि.२०.०३.१९९९ असा असून साईड ब्रशर या संवर्गात श्री.हरी बन्सी खंडागळे यांचा प्रथम नियुक्ती दिनांक हा दि.०१.०४.१९९६ असा दर्शविला आहे. (परिशिष्ट -१ नुसार)तथापि, जा.क्र.मनपा/आस्था-२/२०८५/२००१, दि.१३.०७.२००१ अन्वये निर्गमित नियुक्ती (तात्पुरती) आदेशामध्ये श्री.मोटे व श्री.खंडागळे यांची **मजूर** या पदावर दि.०३.०७.२००१

ते दि.३१.१२.२००१ या कालावधीसाठी नियुक्ती केल्याचे निदर्शनास येते. (सोबत दि.१३.०७.२००१ रोजीच्या आदेशाची प्रत-परिशिष्ट -२ ). ज्याअर्थी दि.१३.०७.२००१ रोजीच्या आदेशामध्ये वरील दोन्ही कर्मचारी हे **मजूर** संवर्गात आहेत त्याअर्थी त्यांचा दि.१९.०४.२००१ रोजीच्या निवड समिती समोर अनुक्रमे **सक्शन स्वीपर** व **साईड ब्रशर** या संवर्गात अनुक्रमे दि.२०.०३.१९९९ व दि.०१.०४.१९९६ असा नियुक्ती दिनांक दर्शवून आस्थापना शाखेने निवड समितीची दिशाभूल केलेली आहे. परिणामी श्री.मोटे व श्री.हरी खंडागळे यांना अनुक्रमे **सक्शन स्वीपर** व **साईड ब्रशर** या संवर्गात देण्यात आलेल्या नियुक्त्या ह्या अयोग्य असल्याचे दिसून येते . वास्तविक पाहता **प्लॅन्ट ऑपरेटर** या संवर्गातील ०१ पद हे जरी आरक्षणाचा विचार करून रिक्त ठेवावयाचे असल्याने सदर संवर्गात श्री.रमेश शिंदे हे ज्येष्ठतेनुसार क्र.२ वर असल्याने त्यांना सक्शन स्वीपर वा साईड ब्रशर या संवर्गात नियुक्ती देणे सहज शक्य होते. कारण शिंदे हे श्री.मोटे व श्री.खंडागळे यांच्यापेक्षा सेवाज्येष्ठ आहेत. तथापि, या ठिकाणी तसा विचार झालेला नाही.

४ महापालिका आस्थापना-२ शाखेद्वारा जा.क्र.मनपा/आस्था-२/३५७०/९५, दि.२८.११.१९९५ अन्वये प्रसिध्द केलेल्या (जलतरण तलाव येथील) दैनिक वेतन कर्मचाऱ्यांच्या ज्येष्ठता यादीमध्ये प्लॅन्ट ऑपरेटर संवर्गात श्री.शाम आबाराव खपले यांची दैनिक वेतन नियुक्ती तारीख ही दि.२५.०४.१९९४ तर श्री.रमेश शिंदे यांची नियुक्ती तारीख ही दि.२४.०५.१९९४ अशी असल्याचे दिसून आले. परिणामी श्री.शाम आबाराव खपले हे जरी इतर मागासवर्गीय प्रवर्गात असले तरी त्यांची नियुक्ती सेवाज्येष्ठते आधारे प्लॅन्ट ऑपरेटर या पदावर खुल्या वर्गातून कायमस्वरूपी करण्यात आली असल्याचे निदर्शनास येते. त्यामुळे श्री.रमेश शिंदे हे खुल्या प्रवर्गातील कर्मचारी असले तरीही ते श्री.खपले यांना कनिष्ठ असल्यामुळे त्यांची नियुक्ती / निवड करण्यात आलेली नाही .

५. वर नमूद परिच्छेद (२) नुसार निवड करण्यात आलेल्या ११ कर्मचाऱ्यांपैकी व्यवस्थापक हे पद महापालिका अंतर्गत कायम स्वरूपी कर्मचाऱ्यांमधून भरण्यात आलेले आहे तर उर्वरित १० पदे ही सिध्दार्थ जलतरण तलाव येथील दैनिक वेतनावर कार्यरत असलेल्या कर्मचाऱ्यांमधून रास्त शिफ़ारस करून भरण्यात आलेली आहेत. वास्तविक पाहता महानगरपालिका सर्वसाधारण सभा ठराव क्र.२१५/८, दि.१९.०१.२००१ अन्वये विहीत करण्यात आलेल्या अर्हता / अटी व शर्ती प्रमाणे सदरची पदे ही जाहिरात प्रसिध्द करून प्राप्त होणाऱ्या अर्जामधून निवड पध्दतीने भरावयास हवी होती परंतु तसे न करता सिध्दार्थ जलतरण तलाव येथे कार्यरत दैनिक वेतनावरील कर्मचाऱ्यांमधून रास्त निवड करून भरण्यात आल्याचे दिसून येते, जे नियम बाह्य आहे. तसेच नियुक्तीसाठी मुंबई प्रांतिक महानगरपालिका अधिनियम १९४९ मधील कलम ५४ (३) अन्वये सक्षम मान्यता घेण्याविषयीची कार्यवाही सुध्दा अनुसरण्यात आलेली नाही.

**वरिल तपशिलाचे  अवलोकन केले असता प्रस्तुत प्रकरणात खालील प्रमाणे निष्कर्ष काढण्यात येत आहेत.**

१) सिध्दार्थ जलतरण तलाव येथील कायम स्वरूपी कर्मचारी नियुक्ती प्रक्रियेमध्ये निवड समितीने सिध्दार्थ जलतरण तलाव येथे दैनिक वेतनावर कार्यरत असलेल्या कर्मचाऱ्यांपैकी श्री.रमेश शिंदे यांना प्लॅन्ट ऑपरेटर या पदासाठी वगळण्याबाबत जो निर्णय घेतलेला आहे तो उक्त कार्यवाहीचे मर्यादित नियमानुसार असला तरीही परिच्छेद ३ मध्ये नमूद वस्तुस्थिती पाहता श्री.रमेश शिंदे यांना किमान सक्शन स्वीपर वा साईड ब्रशर या पदावर नियुक्ती देणेबाबत कार्यवाही झालेली नाही.

२) परिच्छेद २ प्रमाणे केलेल्या नियुक्त्या ह्या वरील परिच्छेद ५ मध्ये नमूद वस्तुस्थिती विचारात घेता त्या विहीत कार्यपध्दतीचा अवलंब न करता केलेल्या आहेत असे दिसून येते, जे नियमबाह्य आहे.

३) परिच्छेद ३ मध्ये नमूद वस्तुस्थिती पाहता श्री.कृष्णा भिमराव मोटे व श्री.हरी बन्शी खंडागळे यांना दिलेल्या नियुक्त्या ह्या नियमबाह्य आहेत असे दिसून येते.

४) मुंबई प्रांतिक महानगरपालिका अधिनियम १९४९ मधील कलम ५४ (३) अन्वये नियुक्तीसाठी महापालिकेची मान्यता घेण्यात आलेली नाही.

५) शासन निर्णय क्र.एएमसी-१४९८/२११७/प्रक्र.२१९/९८/नवि-२४ दिनांक २ मे २००० अन्वये मंजूर १४ पदांपैकी ५ पदे ही अद्यापपावेतो रिक्त असल्याचे दिसून येते.

अद्याप अशा अहवालानुसार प्रशासनाद्वारे केलेल्या कार्यवाहीबाबतचे अनुपालन अप्राप्त आहे.

**मुख्य लेखा परीक्षक**

महानगरपालिका,औरंगाबाद.